मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.


स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत



अनुक्रमणिका

कुसुमावती देशपांडे वाङ्मयधन

लघुकथा आणि ललितलेख संग्रह

दीपकळी, १९३५
दीपदान, १९४१
मोळी, १९४६
दीपमाळ (३१ निवडक कथांचा संग्रह, संपादक वि. स. खांडेकर १९५८)
मराठी साहित्यदर्शन माला पुष्प १४ वे
कुसुमावती वाङ्मय दर्शन - संपादन - डॉ. अनुराधा पोतदार १९७५

समीक्षात्मक :

'पासंग' पहिली आवृत्ती, १७ ऑगस्ट १९५४
'मराठी कादंबरी पहिले शतक भाग एक', १९५३
'मराठी कादंबरी पहिले शतक भाग दोन', १९५४

इंग्रजी

'A History of Marathi literlture' 1966 (प्रकाशक साहित्य अकादमी)
कै. रमाबाई रानडे यांच्या आठवणींचा इंग्रजी अनुवाद १९६३

अनुवादित

आधुनिक मानवाचा संघर्ष इ. स. १४५० ते आजपर्यंत [illegible] त्रोटक
(एफ्. जी. पीयर्स कृत The struggle of Modren Man [illegible] १९

बालसाहित्य

थेंबांची गोष्ट चिल्ड्रेनस बुक ट्रस्टतर्फे प्रकाशित, मराठी

युगवाणी

मी कां लिहिते ? ८ सप्टेंबर - आक्टोबर ४६
हरिनारायण आपटे यांच्या कलानिर्मितीचे रहस्य / ४५८ / नोव्हेंबर ६०
केशवसुतांच्या 'नवा शिपाई' कवितेचे रसग्रहण / २/ नोव्हेंबर ५३
मराठीतील पत्रवाङ्मय /८/आक्टोबर ५४
आगरकरांचे विकारविलसित / ५ / मार्च ५५
कादंबरीकार फडके / १३३ / ऑगस्ट ६९
क्षिप्रा / मुक्तिबोध / २४ जुलै ५४

सत्यकथा

प्रभाकर पाध्ये (आजकालचे लघुकथा लेखक ५) ऑगस्ट १९४७
आधुनिक मराठी वाङ्मयातील ऑगस्ट १९४७
विचारप्रवाह कादंबरी (मार्च १९५०) (आकाशवाणी केंद्रावरील व्याख्यानमाला)

लेख

शापित आणि उःशापित - लघुकथासंग्रह
इंदुमती शेवडे - नागपूर प्रकाशन १९५०

अनुक्रमणिका

युगवाणी

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

कुसुमावती देशपांडे जन्मशताब्दी विशेषांक २००५

संपादक डॉ. सुलभा हेर्लेकर

कार्यकारी संपादक : केशव जोशी

अनुक्रम

पत्रव्यवहाराचा पत्ता संपादक, युगवाणी, विदर्भ साहित्य संघ, सांस्कृतिक संकुल,
झाशीराणी चौक, सीताबर्डी, नागपूर - १२, दूरध्वनी २५२३९२९

प्रकाशक सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ नागपूर - १२

मुखपृष्ठ मांडणी शैलेश देशपांडे, नागपूर

रेखाटन संजय धोतरकर, नागपूर

कुसुमावती देशपांडे - जीवनपट

देशपांडे, कुसमावती आत्माराम (१० नोव्हेंबर १९०४ -१७ नोव्हेंबर १९६१)
श्रेष्ठ मराठी कथा लेखिका आणि समीक्षक, अमरावती येथे जन्म. पूर्वाश्रमीचे नाव कुसुम जयवंत. मुंबई, नागपूर व लंडन विद्यापीठांत शिक्षण, बी. ए. (ऑनर्स) झाल्यावर नागपूर महाविद्यालयात (पूर्वीच्या मॉरिस कॉलेजात) १९३१ ते १९५५ पर्यंत इंग्लिशचे अध्यापन. नंतर आकाशवाणीच्या स्त्री व बालविभागाच्या निर्मितिप्रमुख. श्रेष्ठ मराठी कवी अनिल (आ.रा. देशपांडे) यांच्याशी त्यांचा १९२९ मध्ये प्रेमविवाह झाला. उभयतांच्या प्रेमजीवनाचे दर्शन घडविणारा पत्रव्यवहार कुसुमानिल (१९७२) या नावाने प्रसिद्ध झाले आहे. तो मराठीत तरी अपूर्व आहे. दीपकळी १९३५, दीपदान १९४१, मोळी १९४६ दीपमाळ १९५८ असे चार लघुकथा संग्रह प्रकाशित. अनुभवांचे निवेदन अपरिहार्य वाटल्यावरच त्यांनी कथा लिहिल्या. निसर्ग आणि मानवी जीवन यातील संबंधांचा त्यांनी आपल्या कथातून शोध घेतला. तंत्रापेक्षा कथेचा विषय व त्या विषयीचा आपला दृष्टीकोण ह्यांना महत्त्व दिल्याने त्यांच्या कथांना वेगळेपणा लाभला. मुंबई मराठी साहित्यसंघाच्या वामन मल्हार जोशी स्मारक व्याख्यानमालेत त्यांनी मराठी कादंबरी साहित्यावर १९४८ ह्या वर्षी व्याख्याने दिली. ती मराठी कादंबरी पहिले शतक या नावाने दोन भागात १९५३ व १९५४ प्रसिद्ध झाली. त्यात १८५७ ते १९५० मधील कादंबऱ्यांचे समालोचन आहे. मराठी कादंबरीचा टीकात्मक इतिहास, तिच्यातील प्रवृत्तींचे व परंपरांचे स्पष्टीकरण आणि कादंबरी या साहित्यप्रकाराच्या अंतिम मुल्यांचे दिग्दर्शन त्यात आढळते. पासंग (आवृ. २ री, १९६१) हा त्यांच्या १९३३ ते १९६१ ह्या काळातील निवडक टीकालेखांचा व भाषणांचा संग्रह ह्या काळातच नवकाव्य व नवकथा आणि अनुषंगाने समीक्षेतील काही नवे विचार त्यांचा उदय झाला. स्वतंत्र भारतातील सामाजिक पुनर्घटनेचे प्रश्न इतर विचारवंताप्रमाणे कुसुमावतींना देखील जाणवले. इंग्लिश साहित्यसमेक्षेच्या चोखंदळ अभ्यासाचीही जोड लाभली. त्यामुळे सौंदर्यमूल्यांवरोबरच मानसशास्त्रीय, सामाजिक आणि सर्वकालीन जीवनमूल्यांचा त्यांनी पुरस्कार केला. स्फुट टीकालेखनाच्या आधुनिक परंपरेत जीवनसापेक्ष टीकाविचाराला सर्वसमावेशक वनवून त्यांनी अधिक विकसित केले. त्याचा प्रत्यय पासंग मधील टीकालेखावरुन येतो. त्यांनी लहान मुलांसाठीही लिहिले आहे. त्यापैकी थेंबांची गोष्ट पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाली. रमाबाई रानडे यांच्या आमच्या आयुष्यातील आठवणींचे त्यांनी इंग्रजीत भाषांतर केले ते केंद्रीय शासनाने त्यांच्या मरणोत्तर प्रसिद्ध केले. समाजशिक्षणाच्या दृष्टीने त्यांनी काही पुस्तके लिहिली आहेत. साहित्य अकादेमीच्या त्या सभासद होत्या. ग्वाल्हेरला १९६१ मध्ये भरलेल्या ४३व्या मराठी साहित्य संमेलनाच्या त्या अध्यक्षा होत्या. नवी दिल्ली येथे त्या हृदयविकाराने निधन पावल्या.

(विश्वकोषातून साभार)

❑❑❑

अनुक्रमणिका

संपादकीय

'**यु**गवाणी'चा या वर्षीचा हा वार्षिक अंक कै. कुसुमावती देशपांडे विशेषांक आहे. कुसुमावतींच्या जन्मशताब्दीनिमित्त त्यांच्या अजोड साहित्याचे पुनः एकदा मूल्यमापन व्हावे नव्या पिढीने डोळसपणे त्यांच्या साहित्याचा मागोवा घ्यावा या दृष्टीने आणि कुसुमावतीबाई, विदर्भ साहित्य संघाच्या पूर्वाध्यक्ष या नात्यानेही हा अंक उल्लेखनीय ठरावा. खर म्हणजे युगवाणीची ही संयत वाटचाल आहे. मूल्यमापन करायचे झाल्यास काहीतरी देण्याची धडपड एवढेच हाती येते. तरीही न थांबता पुनःपुन्हा नव्या उमेदीनं उभ राहून आपला कार्यभार अपार श्रद्धेने तडीस नेण्याच्या जाणीवेतूनच युगवाणी नेहमीच नवे विचार देत आहे.


एकीकडे मोठ्या प्रमाणावर सुमार लिहिणारांची भाऊगर्दी वाढत असतानाच हाती चांगले, वेगळे साहित्य नाही म्हणून रिकाम्या जागा भरणारे आणि नियतकालिकेही त्यावरच खूष असणारी त्यामुळे सकस साहित्य कोणते अशी शंका येणे रास्तच आहे. नियतकालिकांसह सोबतच इतर माध्यमांकडून (रेडिओ, दूरदर्शन, वृत्तपत्रीय साहित्य) अशा सवंग व सुमार साहित्याभिरुची घडविण्याचे कार्य सातत्याने होत आहे. एकंदर अशी परिस्थिती असताना वाङ्मयीन व्यवहाराबद्दल 'युगवाणी' ने अलिप्त राहू नये, यासाठी कुसुमावतींच्या जन्मशताब्दीचे निमित्त साधून त्यांच्या संपूर्ण साहित्याचा विचार मांडलेला आहे. शिवाय नव्या काळात विद्यापीठात कुसुमावतींच्या साहित्याची विद्यार्थ्यांना ओळख व्हावी, जाणीव व्हावी हाही एक हेतू आहेच. कारण वाचक विद्यार्थ्यांची अभिरुची आणि विद्यापीठातून शिकवण्यात येणारी व म्हणून प्रतिष्ठित मानली जाणारी पुस्तके यांचा मेळ बसत नाही. विद्यापीठातील प्राध्यापकी समीक्षेची परस्परातच उदोउदो होत असल्याने सर्व सामान्यांपर्यंत तिचा प्रभाव पोहचत नाही. एखादी चौकट निर्माण करून त्या विशिष्ट चौकटींच्या व पाश्चात्य संकल्पनांच्या आधारे होणारी तथाकथित समीक्षा ही वाङ्मयाच्या आकलनाला मदतीची ठरण्याऐवजी प्रतिबंधकच ठरते. आज वाङ्मयातील श्रेष्ट - कनिष्ठपण ठरते ते विद्यापीठाच्या मान्यतेमुळे. कारण विद्यार्थ्यांना ज्या पुस्तकांचा व लेखकांचा अभ्यास करावा लागतो, तेवढे खरे महत्त्वाचे पुस्तक वा लेखक असे सहजपणे वाटते. म्हणून साहजिकच इतर पुस्तकांकडे व लेखकांकडे दुर्लक्ष होते. समीक्षेवर वाङ्मय व्यवहारावर जी भक्कम पकड हवी तिचा गंभीरपणे विचार व्हावयास हवा म्हणून अनेक चांगल्या लेखक प्रतिभावंतांचा विचार 'युगवाणी' करते.

या अंकात म्हणूनच तरुण पिढीचे लेख जास्त आहेत. एकंदर मराठी साहित्यातील कलाकृतीचा विचार रूढ चौकटीतून न करता तिला नव्या परिमाणातून नव्या संज्ञेतून भाषा, विषय, शैली या सर्व घटकांचा विचार करून मराठी साहित्याचा चेहरा स्पष्ट करू शकणारे साहित्य - शोधक दृष्टीतून घेणारे लेखन यात दिसेल. कुसुमावतीबाईंचा ज्यांचा जवळून संबंध आला अशा ज्येष्ठ समीक्षक डॉ. उषाताई देशमुख यांनी त्यांच्या व्यक्तिमत्त्वापासून तर साहित्यापर्यंत एक सुरेल प्रवास घडवला आहे, तर प्रा. देवानंद सोनटक्के यांनी कुसुमावतीबाईंच्या कलाविचाराला स्वतःच्या विचारांनी संपन्न केले आहे. मराठी साहित्याच्या अभ्यासक समीक्षक डॉ. आशा सावदेकर यांनी कुसुमावतीबाईंच्या हळुवार शैलीची चिंतनपर, भावोत्कट विचारांची दखल घेतलेली आहे. कादंबरीकार डॉ. किशोर सानपांनी कुसुमावतीबाईंची कादंबरीविषयक जी मते होती त्यावर नेमके बोट ठेवले आहे. डॉ. अरुणा देशमुख यांनी, 'कुसुमावती एकाच वेळेस बाह्य वास्तवाचा आणि स्वतःच्या अंतरंगाचा शोध कसा घेतात याचे अभ्यासपूर्ण विश्लेषण केले आहे. डॉ. जया द्वादशीवार यांनी कुसुमावतींच्या 'पासंग' या समीक्षेच्या पुस्तकाचे अंतरंग उलगडून त्यातले विचार मांडले आहेत. डॉ. राजा नाईकवाडे यांनी कुसुमावतींच्या ललित साहित्याचा विस्ताराने शोध घेतला आहे.

उत्तरार्धात डॉ. अनघा केसकर यांनी शब्दांकित केलेल्या कुसुमावतींच्या भगिनी कै. कमलिनी देशमुख यांच्या आठवणी असून डॉ. शिरीष व आशावती देशपांडे यांनीही कौटुंबिक आठवणींना उजाळा दिला त्याचे शब्दांकन डॉ. मालती निमदेव यांनी केले आहे.

नवीन पिढीला कुसुमावतींची कथा व ललित लेखन कसे आहे ह्याची झलक म्हणून 'समांतर वाटा' ही कथा आणि माध्यान्ह ललितलेख या अंकात दिली आहे. एकूणच कुसुमावतींच्या सर्व साहित्याचा विचार व्हावा या दृष्टीने हे सर्व लेख अभ्यासकां, वाचकांना वैशिष्ट्यपूर्ण वाटतील अशी आशा आहे. 'युगवाणी'वर वाचकांचा तसाही लोभ आहेच. तो वृद्धिंगत व्हावा हीच या नववर्षाच्या सुरवातीला अपेक्षा !

- डॉ. सुलभा हेर्लेकर



।। मराठी साहित्य मंदिरातील फुलवात ।।

◗ अुषा मा. देशमुख

कुसुमावती देशपांडे यांचा जन्म १० नोव्हेंबर १९०४ मधला विदर्भातील प्रसिद्ध जयवंत कुटुंबात झाला आणि मृत्यू १७ नोव्हेंबर १९६१ म्हणजे ग्वाल्हेरचे साहित्यसंमेलन झाल्याबरोबर उण्यापुऱ्या एका महिन्यात ब्रेनहॅमरेजने दिल्लीला मृत्यू झाला. आयुष्य केवळ सत्तावन्न वर्षाचे. २००४ हे कुसुमावतींच्या जन्मशताब्दीचे वर्ष आहे. त्यांच्या मृत्युलाही चाळीस वर्षे उलटून गेलेली आहेत. आजच्या तरुण अभ्यासकांना त्यांच्या व्यक्तित्वाची ओळख असणे शक्य नाही. बाईंच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने त्यांच्या जीवनकार्याचे आणि साहित्य सेवेचे संस्मरण मात्र केले पाहिजे. ते आज या चर्चासत्राच्या निमित्ताने आपण करीत आहात, याचा आनंद वाटतो.

१९३१ मध्ये 'मृगाचा पाऊस' ही पहिली कथा कुसुमावतींची प्रसिद्ध झाली. 'दीपकळी' १९३५ 'दीपदान' १९४१ 'मोळी' १९४६ असे तीन कथा संग्रह व त्यातील तीन लघुनिबंध 'माध्यान्ह', 'मध्यरात्र' आणि 'चंद्रास' लिहिले गेले आहेत. 'दीपदान' या कथासंग्रहात बाईंच्या इतर कथासंग्रहातील एकतीस कथा संगृहित केलेल्या असून संपूर्ण मराठी कथेचा आढावा घेणारी वि. स. खांडेकर यांची दीर्घ प्रस्तावना या संग्रहात आहे. याच संग्रहात भाग २ मध्ये माध्यान्ह, मध्यरात्र हे लघुनिबंध आणि भाग ३ मध्ये कला आणि कृत्रिमता, जिव्हाळ्याच्या गोष्टी, साक्षरांचे कार्य, लघुकथेचे जीवनतंत्र हे विषयही आलेले आहेत. 'दीपदान' या संग्रहावरून ४० वर्षांपूर्वी कथा व निबंध यांची मैत्री कशी अतूट होती हे लक्षात येते. १९५३ । ५४ मध्ये मराठी कांदबरी चे पहिले शतक भाग एक भाग दोन हा ग्रंथ बाईंचा प्रसिद्ध झाला याच काळात १९५४ साली 'पासंग' हा समीक्षात्मक ग्रंथ सिद्ध झाला. कुसुमावतींची एक कविता 'येना घरी' ही प्रतिभेच्या १९४० च्या अंकात उपलब्ध होते. १९६० साली महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभाग योजनेत एफ. जी. पियर्स यांच्या 'द स्ट्रगल ऑफ मॉडर्न मॅन' या ग्रंथाचे भाषांतर 'आधुनिक मानवाचा संघर्ष' या शीर्षकाने कुसुमावतींनी केले. रमाबाई रानडे यांच्या 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी' या ग्रंथाचे इंग्रजीत भाषांतर केले. प्रा. मं. वि. राजाध्यक्ष यांच्या सहकार्याने इंग्रजीतून मराठी वाङ्मयाचा इतिहास लिहिण्याचा प्रयत्न केला तो पूर्ण पुढे झाला. काही ग्रंथांना कुसुमावतींनी प्रस्तावनाही लिहिल्या आहेत. तीस वर्षातील बाईंची ही वाङ्मयसंपदा मर्यादित वाटत असली तरी ती गुणवती आहे. लघुनिबंध, कथा, कांदबरी विमर्श आणि वाङ्मयसमीक्षा या चारही वाङ्मयीन क्षेत्रात साहित्याचे मानदंड उभे करण्याचे सामर्थ्य कुसुमावतींच्या लेखणीत होते व आहे हे आजही अनुभवाला येते. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या पहिल्या स्त्री अध्यक्ष त्या होत्या पण त्यांना असे म्हटलेले आवडत नसे. साहित्य संमेलनाच्या भाषणाची सुरवातच कुसुमावतींनी स्त्रियांची साहित्य सेवा या विषयाने केलेली आहे. महाराष्ट्राची एकात्मता, त्रिभाषासूत्र, मराठी आणि शैक्षणिक माध्यम, साहित्याचा अभ्यास आणि अध्ययन, बृहन् महाराष्ट्राच्या सांस्कृतिक गरजा, साहित्यातील प्रवृत्ती, पाश्चिमात्य प्रवृत्तींचा संसर्ग हे बदलत्या वाङ्मयीन वातावरणातील जिव्हाळ्याचे विषय संमेलनाच्या व्यासपीठावरून कुसुमावतींनी मांडले होते. हे त्यांचे अखेरचे भाषण ठरले. पण

त्यातून मराठी अस्मिता, इंग्रजी प्रवृत्तींना अंधळेपणाने स्वीकारण्या मागील धोका, मराठी वाङ्मयातील व विशेषतः काळातील नवप्रवृत्ती, नवसमीक्षेच्या मर्यादा यासंदर्भात विचार मंथन केलेले आहे. आपले कथासंग्रह म्हणजे साहित्यप्रकारांची खिचडी आहे याची त्यांना जाणीव होती तसे त्यांनी प्रस्तावनेत नमूद केलेले आहे.

कुसुमावती देशपांडे ललित लेखनाकडून समीक्षा लेखनाकडे वळलेल्या आहेत. कुसुमावतींनी मोजकेच लेखन केले पण ते अतिशय मोलाचे ठरले आहे. मराठी वाङ्मयाच्या इतिहासात कथा, कांदबरी, लघुनिबंध, समीक्षा या वाङ्मयप्रकारात कुसुमावतींच्या साहित्याच्या आधाराने पुढे जावे लागते. इंग्रजी, संस्कृत, मराठी साहित्याच्या व्यासंगातून स्थिर झालेली मर्मदृष्टी बाईंच्या साहित्यातून दिसून येते. अभिजात रसिकता आणि चौफेर व्यासंग यामुळे कुसुमावतींचे लेखन लक्षणीय आणि गोळीबंद असे झालेले आहे. केवळ इतिहासकाराची भूमिका घेऊन बाईंनी चिंतन केलेले नाही तर समीक्षकाची चौफेर मर्मदृष्टी आणि विषयासंबंधातील सहानुभूती यातून बाईंचे लेखन आकार घेत आलेले आहे. 'मराठी कविता ही महाराष्ट्राचे वैभव आहे' असे संमेलनाच्या व्यासपीठावरून भाषणाची अखेर करतांना त्या बोलून जातात. किंवा 'अभिजात वाङ्मयाची थोरवी फार मोठी आहे त्याचा आस्वाद घेण्याची शक्ती मात्र आपण कमावली पाहिजे' असा इशाराही देऊन जातात. संपूर्ण वाङ्मय व्यवहाराकडे अत्यंत उत्कटतेने आणि तळमळीने बघण्याचा त्यांचा हा प्रयत्न ठरतो. गद्यकाव्याच्या जवळ जावे असे कथालेखन, कथेच्या जवळ जावे असे लघुनिबंधलेखन मराठी कांदबरीच्या विकासाच्या उत्क्रांतीच्या पाऊलखुणा शोधण्याचा प्रयत्न आणि आधुनिक कवितेविषयीचा जिव्हाळा व समीक्षा व्यवहार अशी पंचपदी बाईंच्या साहित्य निर्मितीची आहे. अध्ययन अध्यापनातून निर्माण झालेला व्यासंग आणि विषय निरुपणातील सखोल सशक्त विचारदर्शन यामुळे भीडमुर्वत न ठेवता कुसुमावतीबाई आपले चिंतन उभे करतात त्यासाठी असतो तो वाङ्मयविषयीचा नितांत जिव्हाळा ! 'टीका' करण्यापेक्षा कुसुमावतीबाई समीक्षा करतात. विचाराअंती बनलेली आपली मते ठामपणाने आणि निर्भीडपणाने त्या मांडतात त्यावेळी त्यात वैयक्तिक भाव नसतो तर जीवनमूल्यांच्या आधाराने वाङ्मयीन प्रश्नांचे साहित्यप्रवाहांचे योग्य भान निर्माण करण्याचा तो प्रयत्न असतो. तत्त्वचिंतक आणि विचारवंत, ललित लेखक आणि वाङ्मयसमीक्षक कुसुमावतींच्या ठिकाणी केंद्रित झालेला आहे. मानवी जीवन आणि साहित्य निर्मिती यांच्या परस्परसंबंधाच्या अवलोकनातून त्यांची एकसंध जीवनदृष्टी बाईंच्या वाङ्मयातून प्रतिबिंबित झालेली आहे. एका हार्दिक निष्ठेने मनःपूत असे लेखन कुसुमावतींनी केलेले आहे.

बाईंचा आणि माझा परिचय फार जुना होता.१९५२ सालच्या उन्हाळ्यात जशी मी नागपूर येथे आले तशी माझी पहिली ओळख झाली ती कुसुमावती देशपांडे यांचेशी! नागपूर येथे तसे आम्ही जवळच रहात होतो. धंतोली पार्कच्या समोर त्यांचा मोठा बंगला आणि धंतोलीतच टिकेकर मार्गावर सरनाईकांच्या बंगल्यात आमचे वास्तव्य होते. तेव्हाच्या मॉरिस कॉलेजमध्ये कुसुमावतीबाई इंग्रजी शिकवीत असत आणि माधवराव देशमुख मराठी विषय शिकवीत असत. दुपारी तीन चारच्या सुमारास दोघांची व्याख्याने संपली की ऑस्टिनगाडी स्वतः चालवीत कुसुमावतीबाई आमच्या घरी येत. चहापाणी झाले की त्यांच्या व माधवरावांच्या एखाद्या वाङ्मयीन विषयावर चर्चा चाले. कुसुमावतींनी माधवरावांना धाकटा भाऊ मानले होते व त्या अक्का होत्या. त्यामुळे त्या माझी अगत्याने काळजी घेत. मुंबई पुण्याचे साहित्यिक कुसुमावतींकडे आलेत की त्या आम्हाला निरोप पाठवित. पु. य. विमलाबाईही आलेले असत आणि त्यांच्या गप्पांना रंग भरत असे. मी बाईंना घरगुती मदत करीत असे. कोजागिरीला रात्री अनिलासह काव्यवाचनाचा कार्यक्रम होई. १९५२ पासून कुसुमावतींच्या अखेरच्या दिवसांपर्यंत त्यांनी माझ्यावर मुलीसारखे प्रेम केले. त्यामुळे त्या काळात त्यांच्या साहित्यिक मोठेपणापेक्षा मला माझी जवळची पण आदर असलेली मैत्रीण मिळाल्याचा आनंद होई. पहिले पहिले सणवार, श्रावणातील पूजा, दसरा, दिवाळी अशा काळात गोडाधोडाची देवघेव होई. मी माझी सुखदुःख बाईजवळ मोकळी करीत असे. मी मॅट्रिकच्या परीक्षेत संस्कृतात प्रावीण्य मिळविले तेव्हा कुसुमावती पेढे घेऊन आलेल्या. पुढे आम्ही अमरावती औरंगाबाद असे बदली होऊन गेलोत पण तरीही पत्रव्यवहार भेटीगाठी चालूच असत. माझ्या घरातील वातावरण अतिशय जुन्या वळणाचे होते पण शिक्षणाविषयी मात्र आस्था होती. मी जुळी मुले सांभाळून शिक्षण घेत आहे याचे त्यांना भयंकर कौतुक वाटत असे. नागपूर येथे लिबर्टीला एखादा चांगला इंग्रजी सिनेमा आला की तिकिटे आणून कुसुमावती, माधवराव, वसंतराव नाईक असे जात असत नंतर पुढे आठ दिवस त्या चित्रपटावर चार्चा चाले. कुसुमावतींचे 'पासंग', 'मराठी कांदबरीचे पहिले शतक' साहित्यासंमेलनाची भाषणे यांची जुळवाजुळव माधवरावांबरोबर झालेली आहे आणि प्रुफे तपासण्यापासूनची सर्व कामे त्यांनी

अनुक्रमणिका

आत्मीयतेने केलेली आहेत. दोघांचाही भिन्न लेखनधर्म आणि भिन्न मर्मदृष्टी असून ही परस्परांविषयीची आत्मीयता बघण्यासारखी होती. प्राध्यापकाची नोकरी सोडून बाई दिल्लीला आकाशवाणीवर स्त्रियांच्या आणि मुलांच्या कार्यक्रमाच्या प्रमुख म्हणून गेल्या ही गोष्ट माधवरावांना आवडलेली नव्हती व अक्काने लष्करच्या भाकरी भाजण्याचा निर्णय का घेतला ? या विषयी तेच अस्वस्थ होते. कुसुमावती कॉलेजात शिकविण्यासाठी जातांना साडीवर कोट घालीत असत त्यामुळे त्या अधिकच रुबाबदार दिसत असत. गोरा रंग, भव्य कपाळ, सरळ नाक, कृश शरीरयष्टी आणि चेहऱ्यावर एक प्रकारचे तेज यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व चारचौघीत उठून दिसत असे. त्यांची सौंदर्यदृष्टी गृहकृत्यदक्षता आणि व्यावसायिक जबाबदारी यांचा समन्वय त्यांनी कसा केलेला होता हे मी अगदी जवळून बघत आले होते. त्यांच्या ज्येष्ठ पुत्राच्या अपघाती निधनाने त्या उन्मळून गेलेल्याही मी बघितलेले आहे. अतिशय हसतमुख, स्वागतशील, आस्थेवाइक असे त्यांचे व्यक्तिमत्त्व माझ्या परिचयाचे आहे. सर्वांसाठी ते तसे असेल का? या विषयी माझ्या मनात शंका आहे. मी बी. ए. च्या दुसऱ्या वर्षाचा अभ्यास करीत असता १९६१ मध्ये कुसुमावतीबाई ग्वाल्हेरच्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष म्हणून निवडून आल्यात. त्यावेळी आम्ही औरंगाबादला होतो. माझ्या लेखनाची सुरवात झाली ती कुसुमावतीबाईंवर संमेलनाच्या निमित्ताने लेख लिहून. मी काय लिहिले होते ते मला आज आठवत नाही आणि तो लेखही हाताशी नाही पण बाईंनी तो वाचला होता व त्यांनी मला आवर्जून तसे कळविले होते व संमेलनासाठी येण्याचे निमंत्रणही दिले होते. पण घरातील अडचणींमुळे मी जाऊ शकले नव्हते. संमेलन अतिशय चांगले झाल्याचे वृत्तपत्रातून व माधवरावांकडून समजले होते. माझ्या वाङ्मयीन लेखनाचा श्रीगणेशा मला आदर्शवत वाटणाऱ्या मातृतुल्य अशा कुसुमावतीबाईंकडून झाला हा योगायोग मला फार महत्त्वाचा वाटतो. आकाशवाणीच्या कामानिमित्त हैद्राबादला जातांना किंवा येतांना एखादा दिवस औरंगाबादला थांबून त्या पुढे जात असत. त्यावेळी आईच्या मायेने सर्वांची चौकशी होत असे. माझ्यासाठी न विसरता त्या काहीतरी वस्तू घेऊन येत असत.

अर्वाचीन मराठी वाङ्मयाच्या सरत्या काळात जे लेखक मराठी साहित्यात लाभले त्यात कुसुमावतीचे स्थान अव्वल दर्जाचे आहे. १९२५ नंतर मराठी साहित्य व्यवहारात जी परिवर्तनं आलीत त्यांची सुरवात याच लेखकांनी केलेली होती. रविकिरण मंडळाची स्थापना, पहिल्या महायुद्धातून निर्माण झालेले विविध प्रश्न, इंग्रजी वाङ्मयाचा व विचारांचा साहित्य व्यवहारावर होणारा परिणाम, आधुनिकतेकडे वळण्याचा होणारा प्रयत्न या साऱ्यांचे प्रतिबिंब या काळातील लेखकांच्या लेखनातून प्रतिबिंबित होत होते.

कुसुमावती इंग्रजीच्या मान्यवर प्राध्यापक होत्या. तीसपस्तीस वर्षे त्यांनी इंग्रजी साहित्याचे अध्ययन अध्यापन केले. शेक्सपियरच्या साहित्याचा त्यांचा गाढा व्यासंग होता. इंग्रजी साहित्य व त्यातील नवे प्रवाह तसेच इंग्रजी समीक्षा व तिच्यातील नवेपणा बाईंना ज्ञात होता. इंग्रजी साहित्याशी संपर्क ठेऊनही त्याच्या आहारी कुसुमावतींचे लेखन गेलेले नाही. ललित लेखक आणि समीक्षक अशी जोड भूमिका घेऊनही बाईंचे लेखन स्वत्व जपणारे असेच राहिले. आपल्या वाङ्मयशक्तीचे प्रगटीकरण त्यांनी स्वतंत्रपणे केले. मराठी कादंबरीचा चिकित्सक परामर्श घेतांना किंवा 'पासंग' मधील लेखनातही ही गोष्ट विशेषत्वाने लक्षात येते. बाईंनी अल्प प्रमाणात लेखन करून इंग्रजीची उसनवारी न करता विवेकनिष्ट लेखन केले. पूर्वग्रह विरहित स्वागतशील वृत्तीने बाईंनी मराठी साहित्याचा व्यासंग केला व साहित्य अकादमीसाठी नॅशनल बुक ट्रस्टसाठी मराठी साहित्याचा इंग्रजीतून आढावा घेतला व त्यातील मर्म उकलून दाखविले. कुसुमावतींचे लेखन नवविचारदर्शक लेखन आहे. साहित्याविषयी ताजी टवटवीत अभ्यास आस्था असलेले लेखन बाईंनी केले. १९३० ३१ पासून त्यांनी लेखनाला सुरवात केली ती ललितलेखक म्हणून लघुनिबंध आणि कथा या वाङ्मयप्रकारात त्यांनी लेखन केलेले होते. ना. सी फडके, वि. स. खांडेकर, अनंत काणेकर यांनी ज्या लघुनिबंधात वेगळेपण दिले त्यात कुसुमावतींनी महत्वाची भर घातली व पहिल्या पाच निबंधकारात त्यांचे नाव घेतले गेले.

'दीपकळी, 'दीपदान' 'मोळी' हे तीन ललित लेखनाचे कुसुमावतींचे संग्रह त्यांच्या काळात खूप गाजलेले आहेत. कथा आणि लघुनिबंध या ग्रंथात एकत्र आलेले आहेत. 'मध्यान्ह' 'मध्यरात्र' आणि 'चंद्रास्त' हे कुसुमावतींचे तीन लघुनिबंध आहेत. १९२५। २६ पासून १९४५ पर्यंत कथा लिहिणारे लेखकही लघुनिबंधही लिहीत होते. ना. सी. फडके, खांडेकर यांच्या लघुनिबंध - कथा लेखनाचा हा बहराचा कालखंड होता. वि. वि. बोकील, अनंत काणेकर, ना. मा संत, भा. वि. वरेरकर, य. गो. जोशी इत्यादी लेखक भरभरून कथा निबंध लेखन करीत होती. त्यात कुसुमावतींच्या केवळ पस्तीस कथा आणि तीन लघुनिबंध आहेत. संख्या अल्प असली तरी गुणवत्ता विलक्षण होती. लघुनिबंधाचा

रूपबंध, संरचना याविषयीही याच काळात चर्चा होत होती. आत्मपरतेचा अतिरेक समकालीन लघुनिबंधात होत असता कुसुमावतींनी खोट्या वरवरच्या काव्यात्मतेला बाजूला सारून अस्सल काव्यात्मकता कशी असते हे दाखवून दिले. निसर्गाची अनुभव प्रगटीकरणातील अपरिहार्यता आणि त्यातून 'मी' चा होणारा आविष्कार यामुळे कुसुमावतींच्या लघुनिबंधाला वेगळे परिमाण मिळाले. अल्पाक्षर रमणीय असे त्याचे स्वरूप आहे. कुसुमावतींच्या कथाही अल्पाक्षरी गद्यकाव्याच्या जवळ जाणाऱ्या अशाच आहेत. लघुनिबंधात येणारा खाजगीपणा नाहीसा करून कुसुमावतींनी व्यक्तिनिष्ठेचे वेगळेपण स्पष्ट केले. मीच्या अनुभूती आणि आजुबाजूचे पर्यावरण यांच्या एकसंध आविष्काराचा नवा आदर्श बाईंच्या लघुनिबंधाने घातला व पुढच्या काळातील काव्यात्म लघुनिबंधाची जणू नांदीच सिद्ध झाली. चिंतनशीलता, भावपूर्णता आणि निसर्गाच्या विलसितांचा मानवी मनाशी असलेला संदर्भ यांचे अतिशय तरल, हळुवार, सौंदर्यपूर्ण, मुलायम चित्रण कुसुमावतींच्या लघु निबंधातून डोकावते. हळुवार वृत्ती, सहानुभूतीने न्याहाळलेले विश्व आणि जीवनोत्सुकता या गुणांमुळे कुसुमावतींचे लघुनिबंध महत्त्वाचे वळण म्हणून लक्षात घ्यावे लागतात. या वृत्तीचा वामन चोरघडे यांच्या लेखनात पुढे विस्तार झालेला दिसून येतो. पुढच्या काळात ललितगद्याचा जो विकास दिसतो त्याची सुरवात कुसुमावतींच्या लघुनिबंधांतून झालेली आहे.

लघुनिबंधाप्रमाणे कुसुमावतींनी लघुकथाही समकालीन कथाकारांपेक्षा अत्यल्पच लिहिलेल्या आहेत. उण्यापुऱ्या पस्तीस कथा त्यांच्या नावे आहेत. पण या कथा स्त्रीमनाचे जसे निखळ दर्शन घडवितात तसेच वास्तवाचे भानही आणून देतात. कमलाबाई टिळक, क्षमा राव, कृष्णाबाई मोटे, विभावरी शिरुरकर, इरावती कर्वे या समकालीन कथालेखकांच्या कथेपेक्षा वेगळी कथा कुसुमावतींनी लिहिली.तलस्पर्शी व्यक्तिदर्शन, सामान्यातील असामान्यता यामुळे मराठी कथेला एक नवे वळण मिळाले. समाजातील वेगवेगळ्या स्तरावर जगणाऱ्या माणसाचे सुखदुःख, आशा आकांक्षा आणि परिस्थितीमुळे विवश होणाऱ्यांचे जग बाईंनी उभे केले. चिंतनगर्भ, सूक्ष्म विश्व आणि काव्यात्म मांडणी यामुळे कुसुमावतींच्या कथेतील व्यक्तिरेखा जिवंत होऊन समोर उभ्या रहातात. भया, इन्द्रा, चिमणी, दमडी अशा विविध जीवनभोग स्वीकारणारे स्त्रीपुरुष ज्या समाजस्तरातून येतात तो स्तरही जिवंत झालेला असतो. समाज आणि व्यक्ती यांच्या नात्याचा गोफ बाईंच्या कथेत विणलेला असतो.

लघुकथेचा पारंपारिक साचा न स्वीकारता मनोविश्लेक्षणात्मक पद्धतीने घटना, प्रसंग आणि व्यक्ती यांच्यातील विविध ताण अतिशय हळुवारपणाने आणि सहानुभूतीने बाई उकलत नेतात. माणसामाणसातील भावबंध, घटना प्रसंगापेक्षा व्यक्तिचित्रणाची वैशिष्ट्यपूर्णता, स्त्रियांची सुखदुःखे आणि स्त्रीमनात दाटून येणारी भावविवशता यांचे प्रत्ययकारी चित्रण कुसुमावतींच्या कथेत होते. १९४५ नंतर नवकथेला धुमारे फुटू लागले होते त्याची पावले कुसुमावतींच्या कथेतून पडलेली आहेत. प्रासादिकता अल्पाक्षरत्व आणि अर्थभारत्व हे खरे म्हणजे काव्याचे गुण आहे परंतु कुसुमावतींच्या कथा अशा काव्याच्या जवळ जातात. कथेला आणि लघुनिबंधाला जे खाजगीपण या काळात आलेले होते त्यापेक्षा वेगळी वाट स्वीकारून लघुनिबंध आणि लघुकथा यांच्या कक्षा कुसुमावतींच्या ललितलेखनाने रुंदावल्या. 'मृगाचा पाऊस' 'सवंगडी', 'चिमणी', 'एकटीच' पिसारा' 'गवताचे पाते', 'वादळ', 'पिठोरी अमावस्या' अशा अनेक कथांची उदाहरणे देता येतील. माणसाविषयीचे प्रेम, त्याला पडणारे सामान्य प्रश्न, त्यातून निघणारा तत्त्वाशय, वैचारिकता आणि व्यक्तिकेंद्री कथाशय यामुळे कुसुमावतींची कथा त्याकाळात वेगळी उमटून दिसली. वि. स. खांडेकर यांनी 'दीपदान' च्या प्रस्तावनेत 'कुसुमावतींच्या कथा क्वचित' रुक्ष आणि कठोर वाटतात... त्यांच्या व्यक्तित्वामुळे असे म्हटले आहे. परंतु बाईंची कथा इतकी अल्पाक्षरी असते की वाचतांना ती लगेचच संपलेली असते त्यामुळे रुक्षता येणे शक्य नाही. आणि बाईंचा स्वभाव कठोर होता हेही बरोबर नाही उलट सर्वसामान्य माणसांविषयीचे प्रेम हाच कुसुमावतींच्या सहानुभूतिपूर्वक कथांचा आत्मा ठरतो. वाचकाला हुरहुर लावणे, अस्वस्थ करणे, अन्तर्मुख बनविणे हे कुसुमावतींच्या कथेचे वैशिष्ट्य आहे. सूचकता हा तिचा महत्त्वाचा घटक ठरतो. मराठी कथावाचकांच्या अभिरुचीला वेगळे वळण देण्याचे सामर्थ्य बाईंच्या कथेत आणि लघुनिबंधातही आहे. त्यांचा अखेरचा कथासंग्रह 'मोळी' हा आहे. खरोखर कथा आणि लघुनिबंध यांची एकत्रित मोळी बाईंनी बांधलेली आहे. कथा आणि लघुनिबंध यांच्या सीमारेषा कशा अस्पष्ट होत्या हेच येथे दिसून येते. आपल्या अनुभूतीचे आविष्करण नेमके कोणते रूप घेणार याविषयाची नेमकी जाणीव असलेली दिसत नाही. ''कुसुमावतींच्या कथा जाईजुईच्या फुलासारख्या नाजुक आणि आकाराने लहान आहेत.'' असे वि. स. खांडेकरांनी म्हटले आहे. रंजनप्राधान्य आणि भडक अनुभव कथन यापासून कुसुमावतींची कथा दूर आहे. कृत्रिमता,

हळवेपणा यापासून कुसुमावतींची कथा दूर असते. दिवाकर कृष्ण आणि वामन चोरघडे या दोन कथाकारातील तोल कुसुमावतींच्या कथेने सांभाळला. बदलत जाणाऱ्या जीवनाचे चिंतनशील दर्शन त्यांच्या कथेतून घडते. हा काळ मानवी जीवनाचा संक्रमणाचा काळ होता. जीवनातील लवचिकता, तोचतोचपणा, आलेली मरगळ यांचे सूक्ष्म तपशीलबहुल चित्रण कुसुमावतींच्या कथेत असतेच पण त्यामुळे माणसे निराश झालेली नसतात तर त्या जीवनातूनही आनंद मिळविण्याचा प्रयत्न करीत राहतात. हा आशावाद कुसुमावतींच्या समग्र लेखनाला माखलेला आहे. 'गवताचे पाते' मधील सदाशिवराव ही व्यक्तिरेखा अभ्यासण्यासारखी आहे. मरगळलेल्या जीवनाकडे पाठ फिरवून भविष्याची स्वप्ने शोधणाऱ्या माणसांचे विश्व कसुमावतींनी साक्षात केले. जिवंत व्यक्तिदर्शन, भावभावनांची आंदोलने, जीवनातील मध्यमवर्गीय घुसमट यांचे सूक्ष्म चित्रण कुसुमावतींची कथा करते त्यातून कोणताही स्वप्नरंजनाचा किंवा कल्पनारम्यतेचा सोस आलेला नसतो. कृत्रिमतेपेक्षा स्वाभाविकतेकडे ही कथा केंद्रित होते. गवताच्या पात्याप्रमाणे छोटी मोठी सुखदुःखे स्वीकारणाऱ्या माणसाची ही वास्तवाची कथा आहे. परिणामकारकरित्या अनुभव संक्रांत करण्याची किमया कुसुमावतींच्या कथेत उतरली आहे. नव कथेचे पूर्णरूप कुसुमावतींच्या कथेतून स्पष्ट होते. निसर्ग आणि माणूस यांचे नाते उलगडून दाखविण्याचा प्रयत्न चिंतनशीलतेच्या पातळीवर बाईंच्या कथेत घडून येतो. दादाजी चांभार, दमडी, सरस्वती, सदाशिवराव या विविध स्तरावरील माणसांचा आशावाद त्यांच्या जीवनात अर्थपूर्णता देत असतो. मराठी नवकथेच्या गुणवैशिष्ट्यांची चाहूल कुसुमवातींच्या कथेतून लागलेली आहे.

'अंतर्मुख' मनाला दीर्घकाळ हुरहुर लावून अस्वस्थ करणे आणि काही वेळेला त्याला विचारप्रवृत्त करणे ही कोणत्याही प्रभावी ललित लेखकाची वैशिष्ट्ये त्यांच्या कथांत खात्रीने आढळतात. पण यापेक्षाही कुसुमावतींच्या लेखनाने केलेले अधिक महत्त्वाचे कार्य म्हणजे त्यांनी मराठी वाचकांच्या स्वाभिमानाची वाढ केली हे होय. प्रकाशित झालेल्या तीनच लेखसंग्रहांचे वाचन केलेली व्यक्ती त्यांतील सृष्टीवर्णनाशी समरस होईल; व्यक्तिचित्रणात स्वतःची अनुभूती अजमावून पाहील; लेखिकेच्या सहानुभूतिपूर्ण दृष्टिकोणाशी सहभाव पावेल, नवविचारांनी उद्‌बोधित होऊन आपल्या सहृदयतेची व विचारांची क्षितिजे अधिकाधिक व्यापक करील. परंतु या सर्व परिणामांबरोबर वाचकाच्या अभिरुचीची पातळी उंच होईल हे सर्वांहून विशेष. मराठी ललित वाङ्मयात ह. ना. आपटे व वा. म. जोशी यांच्यानंतर सदभिरुचीला ज्यांनी एकदाही धक्का लावला नाही व तथाकथित ललित भाषेच्या आवरणात आपली अभिरुची कधीही खालच्या पातळीवर आणली नाही असे फारच थोडे लेखक मराठीत निर्माण झालेत अशा थोड्या लेखकांत कुसुमावती देशपांडे या अग्रगण्य आहेत.(वाङ्मयीन व्यक्ती १९६७ पृष्ट १३९) हा डॉ. मा. गो. देशमुख यांचा अभिप्राय कुसुमावतींच्या ललित लेखनाविषयी (कथा व लघुनिबंध) बरेच काही सांगून जातो.

'मराठी कादंबरीचे पहिले शतक' भाग १ व भाग २ हे ग्रंथ म्हणजे समीक्षक कुसुमावतींची ओळख पटविणारे ग्रंथ आहेत. 'पासंग' हा समीक्षात्मक ग्रंथही याच काळातला आहे. या दोन ग्रंथांनी ज्येष्ठ समीक्षक म्हणून कुसुमावतींचे नाव झाले. मराठी कादंबरीचे शंभरवर्षांचे केवळ समालोचन करण्याचा किंवा इतिहासात्मक आढावा घेण्याच्या उद्देशाने निर्मिती झालेली नसून समीक्षकाची भूमिका या ग्रंथातून स्पष्ट होते. मराठी कादंबरीचा बहर १८५० ते १९५० या शंभरवर्षातील मराठी कादंबरीच्या माध्यामतून झालेला आहे. मराठीत आलेल्या नव्या वाङ्मयप्रकारांपैकी कादंबरी हा व्यापक असा वाङ्मयप्रकार आहे. शंभरवर्षातील कादंबरीचा कालक्रम, लेखकनिष्ट तंत्रवैशिष्ट्ये आणि प्रयोगशीलता यामुळे कादंबरीचा विकासक्रम दाखविण्यात सरळपणा येत नाही तरीही तसा अल्पसा प्रयत्न आपण करीत आहोत अशी कुसुमावतींची धारणा आहे. मुंबई मराठी साहित्यसंघाच्या वामन मल्हार स्मृतिनिमित्त बाईंनी १९४३ मध्ये 'आधुनिक मराठी कांदबरीचा उत्क्रांतिमार्ग' या विषयाचे व्याख्यानरूपाने चिंतन केलेले होते. अभ्यासपूर्ण अशा नोंदी केलेल्या होत्या. जवळजवळ सर्व कादंबऱ्या मिळवून त्यावरील भाष्य सिद्ध केलेले होते. इंग्रजी साहित्याचा कुसुमावतींचा व्यासंग असल्यामुळे त्यांचे कादंबरीचिंतन नवार्थदर्शक आणि तुलनात्मक पद्धतीने निष्कर्ष काढणारे असे होते. राजवाडे यांच्यानंतर सर्वप्रथम मराठी कादंबरीची समीक्षा सिद्ध होत होती. ह. ना. आपटे, वामन मल्हार जोशी, डॉ. केतकर, फडके खांडेकर यांच्यासारख्या विपुल आणि वैविध्यपूर्ण लेखन करणाऱ्या कांदबरीचे विश्लेषण, निरीक्षण आणि अर्थनिर्गमन करण्याचे फार जबाबदारीचे काम कुसुमावतींना करावयाचे होते. एकीकडे कांदबरी या ऐसपैस वाङ्मयप्रकारांचे मूलभूत निकष सिद्ध करणे आणि दुसरीकडे उपयोजित समीक्षेच्या अंगाने कादंबरीकाराचे श्रेय निश्चित करणे असा दुहेरी अभ्यास कुसुमवतींनी केलेला या ग्रंथातून स्पष्ट होतो. त्यांची सर्वच्या सर्व मते अभ्यासकांना पटतीलच असे नाही पण सूक्ष्म अभ्यासाने

बनविलेली ती मते आहेत याविषयी मतभेद होऊ शकत नाही. कादंबरी समीक्षेचा मापदंड बाईच्या या ग्रंथातून निर्माण झाला आहे. 'कादंबरीचे पहिले शतक' याची अनुक्रमणिका लक्षात घ्यावी. कादंबरीचा उगम, ऐतिहासिक कादंबरी, ह. ना. आपटे, वाचकवर्गाची वाढ, वामन मल्हारांचे युग, तत्त्वप्रधान कादंबरी ही पहिल्या भागातील प्रकरणे आहेत. दुसऱ्या भागात ना. सी. फडके, पु. ल. देशपांडे, वि. स. खांडेकर, ग. त्र्यं. माडखोलकर, बोकील ते क्षीरसागर, लेखिकांच्या कादंबऱ्या, वेगळ्या वाटा, भाषांतरित कादंबरी, आजची कादंबरी अशा दोन्ही भागांची व्यापक मांडणी आहे. ह. ना आपटे, वामन मल्हार, ना. सी फडके, पु. ल. देशपांडे, वि. स. खांडेकर, ग. त्र्यं. माडखोलकर यांचा स्वतंत्र विचार कुसुमावतींनी केलेला आहे. त्यातही वामन मल्हारांचे युग आणि तत्त्वप्रधान कादंबरी असे झुकते माप वा. म. जोशी यांना मिळालेले आहे. मराठी कादंबरीच्यां उत्क्रांतिमार्गातील महत्त्वाचे कादंबरीकार आणि उत्क्रांतीमधील टळक टप्पे यांचे मार्गदर्शन या ग्रंथात मिळते. कादंबरीचे प्रमुख प्रवाह आणि अंतःप्रवाह यांचे योग्य विश्लेषण व्यापक सामाजिक दृष्टिकोणातून आणि चोखंदळपणाने बाईंनी केलेले आहे. प्रत्येक कादंबरीकाराचा प्रकृतिधर्म, वृत्तिविशेष, विचारसरणी, जीवनभान यांचे संश्लेषण समग्रतेने या ग्रंथात होते. एक खुली सर्वसमावेशक अशी वाङ्मयीन अभिरुची आणि कादंबरीच्या विश्लेषणातील पारदर्शकता दोन्ही भागातून स्पष्ट होते. वंगाली कादंबरीचा मराठी कादंवरीवरील परिणाम ऐतिहासिक कादंबरी व राजकीय कादंबरीतील साम्यभेद , हरिभाऊ मराठीचे स्कॉट आहेत या विधानाचा परामर्श, माडखोलकरांच्या कादंबरीवरील कडाडून केलेला हल्ला पण अभिरुची न सोडता असा. येथे रा. शं. वाळिंबे यांच्या 'मुक्तता ते प्रमद्वरा' या ग्रंथाची आठवण येते. तसा अधिक्षेप कुसुमावतींच्या समीक्षेत नाही. माडखोलकरांची वाङ्मयीन तांत्रिक भूमिका व त्यांचे साहित्य यामधील विरोध कुसुमावतींनी स्पष्ट केलेला आहे. त्याचवेळी हरिभाऊ आणि वामन मल्हार यांच्या कादंबरीतील नवे आदर्श, सुशिक्षित वातावरण, प्रगल्भ प्रौढ अशी व्यक्तित्वे, आशयपूर्णता आणि बौद्धिक विचारविमर्श करणारी समकालीन समस्यांवर विचारविनिमय करणारी स्त्रीपुरुषांची चित्रणे यामुळे मराठी कादंबरी प्रौढ झालेली कुसुमावतींना जाणवलेली आहे. तर पु. य. देशपांडे यांची संख्येने कमी असलेली कादंबरी असूनही बदलत्या मूल्यांचे दर्शन तिच्यातून कसे घडते यावर बाईंनी भर दिलेला आहे. वाङ्मयाच्या संस्कारशील सामर्थ्यावर कुसुमावतींची श्रद्धा असल्यामुळे कला आणि जीवन यांचा मेळ मराठी कादंबरीने कसा आत्मसात केलेला आहे यावर त्या लक्ष ठेवून असतात. 'चंद्रप्रभा विरहवर्णना' पासून 'रणांगण' पर्यंत आणि बाबा पदमजींपासूनी मर्ढेकरांपर्यंतचा कादंबरी शोध आणि तिचे वैशिष्ट्यपूर्ण स्थान कुसुमावती अधोरेखित करतात. फडके - खांडेकर यांच्या कादंबरीतील वैगुण्ये सांगूनही कादंबरीच्या मुख्य प्रवाहातील त्यांचे स्थान आणि त्यांनी मराठी कादंबरीत घातलेली मौलिक भर यावर भर देतात. वाङ्मय व्यवहाराविषयीची विलक्षण आस्था त्यातून लक्षात येते. माडखोलकरांच्या कादंबरीची मूलगामी चिकित्सा करूनही कुसुमावतींनी चंदनवाडी या कादंबरीचे विशेष जिव्हाळ्याने स्पष्ट केले आहेत. सहृदयता आणि गुणग्राहकता हेच कुसुमावतींच्या कादंबरी समीक्षेचे वैशिष्ट्य आहे. मराठी कादंबरीच्या साक्षेपी भाष्यकार असे त्यांना म्हटले जाते. कारण मराठी कादंबरीचे सत्व आणि सातत्य यांचा यथार्थ वेध घेऊन कुसुमावतींनी कादंबरी समीक्षेचा मापदंड सिद्ध केला. 'रणांगण' कादंबरी वेगळी आहे व तीत नव्या कादंबरीची बीजे आहेत असाही निर्वाळा देतात. कादंबरीभोवती असणारे सामाजिक सांस्कृतिक संदर्भ लक्षात घेऊन रसिक आस्वादकाच्या संवेदनक्षमतेने कुसुमावती मूल्यांकन करतात त्या एकाचवेळी उदारमतवादी असतात आणि त्याचवेळी तात्त्विक सिद्धांतांना धरून कादंबरी समीक्षा करतात. कलावाद आणि जीवनवाद याविषयी त्यांच्या काळात रणधुमाळी निर्माण झालेली असतांना कुसुमावतींची कादंबरी समीक्षा स्वयंसिद्धेच्या मार्गानेच वाटचाल करतांना दिसते.

वि. का. राजवाडे यांच्यानंतर इतकी समृद्ध कादंबरी समीक्षा कुसुमावतींनी केली व त्यातूनच नरहर कुरुंदकर, चंद्रकांत वांदिवडेकर, उषा हस्तक यांची कादंबरी समीक्षा पुढे गेली. म्हणजे लघुनिबंध आणि कथेच्या संदर्भात जे कार्य कुसुमावतींच्या लघुनिबंध आणि कथेने केले तेच कार्य त्यांच्या कादंबरी समीक्षेने केलेले आहे. मराठीमधील १९५० पर्यंतच्या मराठी कादंबरीच्या साक्षेपी भाष्यकार असे त्यांना म्हणता येईल. 'मराठी कादंबरीचे पहिले शतक' या एकाच ग्रंथाने मराठी कादंबरी समीक्षेला समृद्ध केलेले आहे हे नक्की.ममम नव साहित्याच्या निर्मितीच्या पार्श्वभूमीवर सदभिरुची संपन्न पर्यावरण कुसुमावतींच्या ग्रंथानी केलेले आहे असे म्हटले तर अतिशोयक्ती होऊ नये 'रणांगण' ही एकमेव कादंबरी लिहून विश्राम बेडेकरांची कादंबरी, कादंबरी क्षेत्रात साहित्याची मानदंड टरली त्याप्रमाणे कुसुमावती देशपांडे यांनी 'पासंग' हा एकमेव समीक्षात्मक ग्रंथ लिहून ही समीक्षा क्षेत्रात 'पासंग' हा ग्रंथ

साहित्याचा मानदंड ठरलेला आहे. 'मराठी कादंबरीचे पहिले शतक' या ग्रंथाबरोबरच पुढे मागे १९५३ साली 'पासंग' हा ग्रंथ प्रसिद्ध झाला.

'पासंग' या ग्रंथाची १९८७ साली ४ थी आवृत्ती प्रसिद्ध झाली. या ग्रंथात एकूण १५ लेख असून त्यापैकी पाच लेख वाङ्मयीन मासिकांसाठी लिहिलेले आहेत. एक औरंगाबाद नभोवाणीवरील भाषण आहे. दोन 'दीपदान' मधील लेख घेतलेले आहेत आणि बाकीचे सर्व लेख म्हणजे साहित्यसंमेलनाच्या व्यासपीठावरील गाजलेली भाषणे आहेत. 'नवभारतातील कला आणि मध्यमवर्ग' हे भाषण मराठी वाङ्मय परिषदेच्या व्यासपीठावरून १९४८ साली बडोद्यात दिलेले भाषण आहे. 'इंग्रजी काव्य आणि मराठी मनोवृत्ती' १९४८ 'अभिरुची' मधील लेख आहे. 'कवीची काव्यदृष्टी' १९४५ मौज दिवाळी अंकातील लेख आहे. 'नवा शिपाई' युगवाणी दिवाळी अंक १९५३ मधला लेख आहे. 'आम्ही कोण'' १९४६ अभिरुचीतील लेख आहे. 'केशवसुतांच्या काव्यदृष्टीतील उत्क्रांती' १९५२ मधील मौजमध्ये आलेला लेख आहे. 'आधुनिक मराठी कादंबरीचा उत्क्रांतिमार्ग' मुंबई मराठी साहित्य संघातील १९४३ मधील भाषण आहे. 'मराठी वाङ्मयसमीक्षा सौंदर्याची नवप्रतीती, १९५० सालच्या मराठी साहित्यसंमेलनातील टीका विभागाचे अध्यक्षीय भाषण आहे. 'नव साहित्याचे काही प्रश्न' अखिल भारतीय मराठी साहित्यसंमेलनाच्या अध्यक्ष पदावरील १९६१ मधील भाषण आहे. 'मी का लिहिते' १९५८ साली औरंगाबाद नभोवाणीतील भाषण आहे आणि शेवटचे दोन लेख 'कला आणि कृत्रिमता' व 'लघुकथेचे जीवनतंत्र' हे 'दीपदान' मधील लेखन आहे. १९४१ ते १९६१ या वीस वर्षातील समीक्षात्मक लेखन 'पासंग' मध्ये आलेले आहे. ललित लेखनाकडून समीक्षा लेखनाकडे कुसुमावतीबाई वळल्याचा हा कालखंड आहे. कला विचार, कादंबरी विचार, समीक्षाविचार आणि काव्यविचार यांना या ग्रंथात महत्त्व मिळालेले आहे. पैकी कवितेवर चार लेख आहेत आणि समीक्षेवर जवळजवळ पाच लेख आहेत. कादंबरीकार्यात हरिभाऊ आणि वामनमल्हार जसे बाईंच्या अभ्यासाचे जिव्हाळ्याचे विषय ठरले, त्याचप्रमाणे केशवसुतांची कविता आणि समीक्षा विचार यांना या ग्रंथात विशेष प्राधान्य मिळालेले आहे. यावरून कुसुमावतींच्या चिंतनाच्या विषयावर प्रकाश पडतो. वाचकास विचारप्रवृत्त करणे, अभिरुची संपन्न करणे आणि नवविचारदर्शनातून आपली भूमिका स्पष्ट मांडणे यामधून कुसुमावती ललित लेखनाकडून समीक्षा लेखनाकडे वळलेल्या आहेत. त्या उत्तम अध्यापक म्हणून नावाजलेल्या होत्या आणि तीन दशके इंग्रजी साहित्याचे अध्ययन अध्यापन त्यांनी केले होते. हे संस्कार घेऊन त्या कला, कविता, कादंबरी, कथा, नवसाहित्यातील वृत्तिप्रवृत्ती आणि सैद्धांतिक समीक्षा यांचा सखोल मर्मग्राही आस्थापूर्वक असा विचार मांडतात. अभ्यास विषयाचे बहुविध आणि अनेकपदरी रूप जाणून घेणारी त्यांची दृष्टी आहे. साहित्यकलाकृती, आस्वादक वाचक, सांस्कृतिक व सामाजिक पर्यावरण यांचा संतुलित विचार हा कुसुमावतींच्या समीक्षेचा गाभा आहे. या दृष्टीने 'पासंग' हे ग्रंथशीर्षक अतिशय समर्पक आहे. 'युगवाणीत' एप्रिल १९५५ च्या अंकात कादंबरीकार पु. य. देशपांडे यांनी 'पासंग' या ग्रंथाचे परीक्षण करतांना म्हटले आहे की 'अत्यंत नाजुक तराजूची दांडी स्थिर व समतोल राहण्यासाठी सूक्ष्मतम पासंगाची जशी आवश्यकता असते तशीच कलाकृतींची समीक्षा करताना सर्व पूर्वग्रहांच्या जडवृत्तींना बाजूला सारून रसग्रहण यथार्थ व्हावे यासाठी सूक्ष्म तरलतम अशा सहानुभूतीचे पासंग आपल्या अंतरंगाच्या अंतराळातून बाहेर काढता आले. तरच ती समीक्षा सुफल होऊ शकते. कलाकृती ही अतिनाजुक अशा तराजू सारखी असते. तीत तोल असतो. पण तो आंतरिक असतो. तो स्थूलदृष्टीला दिसत नाही व पूर्वग्रहदूषित अशा स्थूल व जडदृष्टीला ते भासतही नाही. अशा दृष्टीला व वृत्तीला या कलाकृतिरूप तराजूची दांडी अखंड खालीवर होत आहे असे भासते. आपल्या आंतरिक सहानुभूतीचे अतिनाजुक पासंग या अथवा त्या पारड्यात टाकून नित्य आंदोलित होणारी ही दांडी स्वीकारता आली तरच कलाकृतीचा आस्वाद यथार्थतेने रसिकाला व समीक्षकाला घेता येईल. कुसुमावतींची समीक्षापद्धती पासंगप्रक्रिया स्वरूपाची आहे. समतोल साधणारी अशी कुसुमावतींची समीक्षा आहे असा वरील अभिप्राय आहे.

'आम्ही कोण', 'नवा शिपाई' आणि 'केशवसुतांच्या काव्यदृष्टीतील उत्क्रांती' या तीनही लेखातून केशवसुतांच्या कवितेचे वेगळेपण, नवतेच्या स्पष्ट होणाऱ्या खुणा, केशवसुतांच्या कवितेचे आशयसूत्र, केशवसुतांचा जीवनविषयक दृष्टिकोण यांच्या परामर्शातून केशवसुतांच्या कवितेचे विशेष सांगितले आहेत. माणूस आणि त्याचे जीवन हेच केशवसुतांच्या काव्याचे मूलभूत केंद्र आहे आणि कुसुमावतींची दृष्टी याच पद्धतीने विचार करणारी असल्यामुळे त्यांनी समग्रतेने ऊहापोह केलेला दिसतो. 'नवाशिपाई' या कवितेतील माणूस आणि विश्व यांच्या संबंधातील एकात्मता हे सूत्र त्यांनी स्पष्ट

केले आहे. आम्ही कोण ?' ही काव्यपर कविता आहे आणि आपल्या काव्यविषयी कवी अतिरेकी विधाने करीत असल्यामुळे तो रोगट मनोवृत्तीचा कवी आहे अशी टीका ग. त्र्यं. माडखोलकर यांनी केशवसुतांवर दीर्घलेख लिहिला त्यात केलेली आहे. कुसुमावतींनी मात्र कवितेचा वेगळा अर्थ लावून तिची उकल केलेली आहे. 'सुरांच्या' म्हणजे 'देवांच्या' वसाहती असा अर्थ न घेता 'सुरांच्या' म्हणजे स्वरांच्या असा वेगळा अर्थ लावून कवी प्रतिभावंताच्या श्रेष्ठत्तेवर त्यांनी भर दिला आहे. बाईंची मार्मिक टीकादृष्टी व सूक्ष्मचिंतनशीलता येथे स्पष्ट होते. व्यक्तिगत प्रतीती व सामाजिकता या दोन ध्रुवबिंदूंच्या आधाराने केशवसुतांच्या काव्यदृष्टीचा विकास होत गेला हे कुसुमावतींचे प्रमेय आहे. त्यांचा हा विचार सर्वार्थाने पटणारा नसला तरी त्यांची स्पष्ट भूमिका त्यातून डोकावते.

'कवींची काव्यदृष्टी' या लेखात रविकिरणमंडळाच्या कवितेच्या मर्यादा स्पष्ट करणारी परखड विधाने कुसुमावतींनी केलेली आहेत. 'सामान्य वाचकांसाठी लिहिलेल्या सामान्य कविता' अशी त्या भलावण करतात. आभासनिष्ट व्यक्तिवाद या कालखंडातील कादंबरीतून जसा डोकावतो तसा तो रविकिरण मंडळाच्या कवितेतूनही व्यक्त होतो. वि. का. राजवाडे यांच्या लेखनातून प्रतिबिंबित झालेली जाज्वल्य मनोवृत्ती समकालीन साहित्यातून व्यक्त होत नाही याची खंत म्हणून कुसुमावतींनी 'साधारणांचे युग' म्हटले आहे. 'लोकमान्यांच्या मृत्यूनंतर सुधारणेचे युग होण्यापेक्षा जीवनाच्या वेगवेगळ्या क्षेत्रात महाराष्ट्रात साधारणांचे युग सुरू झाले. साधारणांचे विभूतिकरण झाले. साधारणांना नसती विरुदे चिकटविली गेली. तर कुणी त्यांच्या जीवनात स्वप्नवत सौंदर्यस्थाने आहेत असे भासवून त्याला आणखीनच दुबळेपणा आणला (पासंग २ आ. पृष्ठ ३९) फडके यांची आनंदवादी आणि खांडेकर यांची बोधवादी कादंबरीही याच काळातली आहे. या काळातील साहित्यातून जीवनातील प्रश्न उभे राहतात. जीवन उभे राहात नाही अशी तक्रारही कुसुमावतींनी केलेली आहे.

कलावाद आणि जीवनवाद, आशय आणि आविष्कार, व्यक्ती आणि समूह या संदर्भात कुसुमावतींच्या संक्रमणकाळात चिंतन होत होते. नवी समीक्षेची परिभाषा निश्चित होत होती. साम्यवाद आणि समाजवाद या दोन्ही विचारसरणींनी लेखक भारावलेले होते. या कालखंडातील सर्व वाङ्मयव्यवहारात त्याचे प्रतिबिंब स्पष्ट दिसते. दि. के. बेडेकर, कुसुमावती, मुक्तिबोध यांची समीक्षादृष्टी परस्परांना पूरक अशी दिसते उलट वा. ल. कुळकर्णी कलेचा जीवनाशी अपाततः संबंध असतो असे म्हणून कला व जीवन यांची सांगड घालू बघतात. कुसुमावती व्यक्ती आणि समाज या परिप्रेक्ष्यातून आपले सिद्धांत मांडतात. याचा अर्थ त्यांना कला, सौंदर्य, प्रतीतिग्राह्यता मान्य नाही असा होत नाही तर सामाजिकतेवर त्यांनी विशेष भर दिलेला आहे यादृष्टीने 'मराठी वाङ्मयसमीक्षा सौंदर्याची नवनिर्मिती' हा लेख महत्त्वाचा ठरतो त्याचप्रमाणे कलेचा प्रादेशिकतेच्या अंगानेही त्या विचार करतात असे दिसून येते. तसेच वाङ्मयीन समीक्षेचे निकष कोणते, नवसमीक्षेचे स्वरूप कोणते आहे ? समीक्षा पद्धतीमधील विविधता आणि वैचारिकता या काळात मराठी समीक्षेत आली पण ही समीक्षा समाजापासून दूर गेली अशीही त्या नोंद करतात. कलेतील जीवनांग आणि जीवनांगातील कला यांचा समतोल साधला जावा अशी कुसुमावतींची भूमिका आहे. बोधवाद, कलेतील कारागिरी, रविकिरणमंडळातील काव्याचा ढोबळपणा याविषयी स्पष्टपणाने कुसुमावती आपला विरोध नोंदवितात तो सबळ पुरावे देऊन.

शांताबाई शेळके यांच्या 'रूपसी' या काव्य संग्रहाला कुसुमावतींची प्रस्तावना आहे त्यात शांताबाईंच्या काव्यातील ज्या मर्यादा कुसुमावतींनी स्पष्ट केल्या होत्या त्यातून पुढे शांताबाईंची कविता बदलत गेली असा संदर्भ 'अर्वाचीन मराठी काव्यदर्शन' मध्ये डॉ. अक्षयकुमार काळे यांनी दिलेला आहे. यावरूनही कुसुमावतींची समीक्षादृष्टी प्रहार करणारी नसून लेखकाला स्फूर्ती देणारी होती हे लक्षात येते. कुसुमावतींनी फार अशा प्रस्तावनाही लिहिलेल्या नाहीत. किंवा त्यांच्या ग्रंथांच्या प्रस्तावनाही काही वाङ्मयीन चर्चा पुढे नेणाऱ्या अशा नाहीत. त्यांनी अल्पप्रमाणात साहित्यनिर्मिती केली पण ती पुढच्या काळाला आणि वाङ्मयीन प्रवाहाला दिशा देणारी ठरली असे म्हणता येईल.

कुसुमावतींच्या समीक्षेची काही वैशिष्ट्ये नोंदविता येतात. वाङ्मय प्रेमातून आणि रसिकांना अभिरुचिसंपन्न करण्याच्या भूमिकेतून त्यांनी आपले विचार निर्भीडपणाने आणि स्पष्टपणाने मांडलेले आहेत. त्यांच्या विचारांवर झालेल्या टीकेला त्यांनी उत्तर दिलेले नाही. कुसुमावतींची समीक्षा समाजकेंद्री सहानुभूतीतून सिद्ध झालेली आहे. त्यांच्या काळात कलावादाचा उत्कर्ष होत असतांना कुसुमावती, दि. के. बेडेकर आणि मुक्तिबोध हे समाजसापेक्ष विचारदर्शन घडवीत होते. पण बेडेकर मुक्तिबोध यांची समीक्षा साम्यवादाच्या अंगाने पुढे गेली तर कुसुमावती तसे संस्कार स्वीकारतात पण स्पष्ट असे वळण घेत नाहीत. कुसुमावती

तसे संस्कार स्वीकारतात पण वाङ्मयनिष्ठा ढळू देत नाहीत. त्यामुळे अभिनिवेशापेक्षा सहानुभूती ही प्रभावी ठरलेली असते. वाङ्मयीन वृत्तिप्रवृत्तींचे सूक्ष्म निरीक्षण आणि नवउन्मेषांकडे स्वागतशील वृत्तीने न्याहाळून समग्रलक्षी समीक्षा सिद्ध करतात. वाङ्मयीन संक्रमणांचा वेध घेणारी कुसुमावतींची समीक्षा असली आणि नव्याचे स्वागत करणारी असली तरी हरिभाऊ म्हणजे 'मराठी कादंबरीचे शिल्पकार' व केशवसुत हे 'अर्वाचीन मराठी कवितेचे जनक' आहेत. हेच केंद्र बाईंच्या समीक्षेत प्रभावी ठरलेले आहे. निर्भीडपणा आणि सावधता यांचा संगम कुसुमावतींच्या साहित्यविमर्शात दिसतो. मराठी साहित्य समीक्षेला प्रौढ आणि गंभीर स्वरूप देण्यात कुसुमावतींची समीक्षा प्रभावी ठरली. कलाकृती मध्ये लपलेल्या वाङ्मयीन शक्तींचा शोध घेऊन त्यांचे खुलेपणाने प्रगटीकरण केलेले आहे. कुसुमावतींच्या समीक्षेत विचारांचा मानदंड आणि विवेकाचा तुलादंड त्यांचे समकालीन वा. ना. देशपांडे यांच्या समीक्षेप्रमाणे दिसून येतो. ललितलेखन म्हणून कुसुमावतींची जी वाङ्मयीन दृष्टी आहे. तिचा प्रभाव त्यांच्या साहित्यसमीक्षेवर आहे. बाईंची समीक्षा मानवी जीवनाचा लौकिकतावादी परिप्रेक्ष्यातून विचारदर्शन घडविते. कलामूल्य आणि जीवनमूल्य यांचा तोल आपल्या मर्मदृष्टीच्या 'पासंगाने' कुसुमावती सांभाळतात. गंगाधर गाडगीळ, पु. शि. रेगे, माधव आचवल यांच्या समीक्षा प्रवाहाशी मतभेद नोंदविणारी परंतु श्रेष्ठ मूल्यांचा आग्रह धरणारी समीक्षा कुसुमावतींनी सिद्ध केली. कलावंताच्या अनुभूतीचे प्रामाण्य व कलाकृतीची सामाजिकता या दोन्हींचा समतोल कुसुमावतींनी आपल्या समीक्षेतून साधलेला आहे.

- उषा मा. देशमुख

'फुलराणी' साहित्य सहवास, वांद्रे (पूर्व) मुंबई - ५१

❑❑❑



नागपूर महापालिका आणि विदर्भ साहित्य संघ आयोजित नामकरण समारंभप्रसंगी घेतलेले छायाचित्र. धंतोलीतील अनिलांच्या निवासस्थानानजिकचा चौक आता'कुसमानिल चौक' झाला आहे (१९९८) सोबत शेवाळकर, महापौर देवेन्द्र फडणविस (उजवीकडे) प्रभृती.

युगवाणी
कुसुमावती देशपांडे
विशेषांक
२००४/०५

कुसुमावतींचा कलाविचार

प्रा. देवानंद सोनटक्के

कुसुमावती देशपांडे यांनी वाङ्मयसमीक्षेच्या प्रांतात १९३३ - ६१ या काळात अत्यंत मोजके पण मौलिक लेखन केलेले आहे. 'पासंग' (१९५४) आणि 'मराठी कादंबरीचे पहिले शतक' खंड १ (१९५३) व २ (१९५६) हे दोनच ग्रंथ त्यांनी लिहिले असून ते मराठी कला व साहित्य विचाराला नवी चालना व दिशा देणारे ठरले आहेत. कारण या ग्रंथातील विचारांमागे कुसुमावतीबाईंचे अभिजात व रसिक, व्यासंगी व अभ्यासू, तरल सौंदर्यवेधी आणि ललित कलांची समज असलेले, पाश्चात्य व भारतीय कलाविचार परंपरेचे भान असलेले सामाजिकतेचे, वैचारिकतेचे आणि मानवनिष्ठेचे अधिष्ठान असलेले व्यक्तिमत्त्व उभे आहे. कलांविषयीचा गंभीर दृष्टिकोण त्यामागे आहे. वैचारिकता, डोळस विश्लेषण, जीवनातील मूलभूत प्रश्नांविषयीची ठाम मते, संवेदनशीलता आणि प्रौढ भाषा या साऱ्या परिपाकाने त्यांचे लेखन सिद्ध झाले आहे.

अशा व्यासंगी आणि युगप्रवर्तक टीका लेखिकेच्या कलाविचारांचा शोध घेण्याची संधी लाभल्यामुळे एकाचवेळी संकोच आणि आनंद या भावनांनी माझे मन भारावून गेले आहे. अशा प्रगल्भ विचारांच्या गंगेत न्हाऊन निघण्याची संधी दिल्याबद्दल मी संयोजकांचा ऋणी आहे.

सैद्धान्तिक आणि उपयोजित अशा दोन्ही स्वरूपाची समीक्षा कुसुमावतींनी केली आहे. मात्र त्यांच्या कलाविचारांचे सैद्धान्तिक स्वरूप शोधण्यासाठी उपयोजित समीक्षेचाच विचार करावा लागतो; कारण वेळोवेळी दिलेली व्याख्याने, भाषणे आणि स्फुट लेखांमधून त्यांचे सिद्धान्त विखुरले आहे. निव्वळ सैद्धान्तिक समीक्षाग्रंथ त्यांनी लिहिला नाही. त्यामुळे 'पासंग' व मराठी कादंबरीचे पहिले शतक या ग्रंथाची प्रस्तावना याहष्टीने महत्त्वाची आहे. कुसुमावतींनी आपला कलाविचार वाङ्मयीन परिप्रेक्ष्यातून मांडलेला असल्याने त्यांचा कलाविचार हा साहित्यविचारच आहे हे लक्षात घेतले पाहिजे.

कुसुमावतींच्या साहित्याविचाराची मांडणी डॉ. अरुणा देशमुख यांनी 'मराठीतील लौकिकतावादी साहित्यविचार' या ग्रंथात केली असून कुसुमावती लौकिकतावादी कलामीमांसक होत्या असे साधार प्रतिपादन केले आहे; त्यांच्या या मतांशी मी सहमत आहे. मात्र या निबंधात मी त्याच मांडणीचे अनुकरण न करता १) कुसुमावतींची जीवनदृष्टी २) कुसुमावतींची कलादृष्टी ३) कुसुमावतींच्या कलामीमांसेचे स्वरूप ४) सौंदर्यमूल्य आणि जीवनमूल्ये ५) आस्वादमीमांसा ६) काव्यमीमांसा ७) कादंबरी मीमांसा ८) नवसाहित्य व अभिजात साहित्य मीमांसा आणि ९) कुसुमावतींचे योगदान या विषयांच्या अनुषंगाने हा शोध घेण्याचा प्रयत्न करणार आहे.

मी कां लिहिते ?

प्रामाणिक प्रतीतीतून उद्भवलेले आपले ललित लेखन हा जीवन समजून घेण्याचा, उत्कटपणे जगण्याचा व जीवनाचा आनंद द्विगुणित करण्याचा मार्ग आहे; असे कुसुमावतींनी म्हटले आहे; त्याचप्रमाणे "आपल्याला जे पटले ते दुसऱ्यांना पटवण्याची पराकाष्ठा करणे यात तर मानवी संस्कृतीच्या विकासाचे मूळ आहे." असे त्यांनी म्हटले. आपल्या साहित्यविचाराच्या लेखनामागील हेतूच त्यांनी

अशा प्रकारे, सांस्कृतिक विकास मानला होता हे लक्षात येते. एकूणच कलाव्यवहार, कलाव्यापार हा मानवी संस्कृतीचा भाग असल्याने या संस्कृती विकासासाठी आपला कलाव्यवहार वाङ्मयव्यवहार शुद्ध व उदात्त झाला पाहिजे असे त्यांना वाटत होते व त्या दृष्टीनेच त्यांनी आपले लेखन केले आहे.

कुसुमावतींची जीवनदृष्टी

या संस्कृतीचा केंद्रबिंदू असतो मानव आणि आधार असतो समाज म्हणून कुसुमावतींची जीवनदृष्टी ही मानवतानिष्ट व समाजनिष्ट अशीच आहे. ''एका सामाजिक कल्याणातच कलेचे अंतिम श्रेयस असते हा कलाविषयक दृष्टीकोण कुसुमावतींनी बाळगला होता. त्यामुळे त्यांच्या लेखनामागील दृष्टी ही; वाङ्मयाचे उद्दिष्ट काय ? आणि हे उद्दिष्ट व जीवनहेतू यांचे परस्पर नाते काय? यासंबंधी त्यांनी विचारान्ती धरलेल्या दृढ भूमिकेशीच निगडित आहे आणि ही भूमिका कुसुमावतींच्या विश्वविषयक आणि जीवनविषयक श्रद्धांतूनच स्पष्टपणे उद्‌भवली आहे. असे अनुराधा पोतदारांनीही स्पष्ट केले आहे.

कुसुमावतींची जीवनश्रद्धा जीवनदृष्टी अशी विश्वरचनेच्या मानवी जीवनाच्या उत्क्रांतीमागे एक / रचना निश्चित अशी योजना आहे. पूर्णतेकडे, आनंदाकडे, समतेकडे सुखाकडे जाणारा हा प्रवास आहे. या प्रवासात कितीही चढउतार आले, कदाचित परागती झाली, असेही वाटले तरी ती तात्कालिक अशीच असते. प्रगतीची वाट मात्र अखंड आणि अपरिहार्य अशी आहे. ती प्रगती ही विश्वरचनेचे सूत्रच आहे आणि मानव या विश्वकोषातील जाणिवेचे प्रतीक आहे. म्हणूनच तो एकाचवेळी विश्वरचनेचा नियंता व साधनही असतो. मानव हा विश्वरचनेचा भाग असल्याने पूर्णतेकडे त्याची प्रगती होणे अपरिहार्य असते आणि ही प्रगती घडवण्याची जबाबदारीही त्याचीच असते. साहाजिकच त्याची वैयक्तिक व सामाजिक संबंधातील प्रत्येक कृती ही मूळ उद्दीष्टाला समांतर आणि पूरक असणे आवश्यक असते. किंबहुना मानव म्हणून त्याची पात्रताही त्यावरच अवलंबून असते. अशा प्रकारे कुसुमावतींची जीवनदृष्टी मानवनिष्ठा व सामाजिक प्रगतीशी निगडित आहे. मात्र ती बी कवींसारखी ''पूर्णापासुनि ढळलेले जग जाते पूर्णाकडे'' अशी भारतीय अध्यात्मनिष्ठ आहे.

त्यांच्या या जीवनश्रद्धेतूनच त्यांचा कलाविषयक दृष्टिकोण निर्माण झाला आहे.

कुसुमावर्तींची कलादृष्टी

अर्थात हा विश्वरचनेचा मार्ग, ही प्रगतीची दिशा सामान्य माणसाला गवसणे शक्य नाही, ही जबाबदारी कलावंताला प्रतिभेची देणगी मिळालेली असल्याने सामान्य मानवाला या विश्वरचनेच्या मार्गावर नेण्याची, त्याला प्रगतीची दिशा दाखवण्याची जबाबदारी ही प्रामुख्याने कलावंताचीच. त्यांच्या कलावृत्तीचा परिणामही खोलवर पोचत असल्याने त्याची अनेकविध स्वरूपाची अभिव्यक्तीही नेहमीच या जीवन सूत्रांशी दृढपणे निगडित असणे आणि या अभिव्यक्तीने सतत मानवाच्या प्रगतीचे उद्दिष्ट अटळपणे समोर ठेवणे आवश्यक ठरते. त्यातही इतर कलाप्रकारांपेक्षा यासंदर्भात सर्वात जास्त अपेक्षा या साहित्यकलेकडूनच आहेच. ''मानवी प्रगतीला दिशा देण्याचे सर्वात प्रबळ साधन म्हणजे साहित्य. म्हणूनच लेखकाची जबाबदारी सर्वच कलावंताकडून अधिक मोठी. जे साहित्य मानवाचे मन उन्नत करते, प्रगल्भ करते, त्याच्या वैयक्तिक जबाबदारीबद्दल आणि व्यष्टीसमष्टी संबंधांबद्दल त्याचा सुजाण दृष्टीकोण देते तेच साहित्य उच्च ठरते.

कुसुमावतींचा कला व जीवन विषयक दृष्टिकोण असा मानव कलावंतांचे मार्गदर्शन मानवप्रगती = सांस्कृतिक विकास आत्यंतिक मानवनिष्ठ व समाजनिष्ट आहे. या समाजप्रगतीसाठी कला महत्त्वाचे साधन असल्याने कला व जीवन यांचा संबंध त्यांनी ठामपणे सांगितला आणि जीवनविन्मुख कलावंतांना त्यांनी खडसावले की, ''इहलोकीच्या सुव्यवस्थेविषयी, व्यवहारातील मूल्यांविषयी आपण जितकी जागरूकता बाळगू तितकी थोडीच होणार आहे. परलोकी प्राप्त होणाऱ्या सुखासाठी अगर शांतीसाठी काय करावे याचा विचार आपण तूर्त तहकूब केला व त्याऐवजी आपल्या भारताचे ऐहिक व्यवहार सचोटीचे, उदारतेचे व न्यायपूर्ण कसे होतील ही चिंता आपण बाळगली तर ते आपल्या अंतिम कर्तव्याच्या दृष्टीनेदेखील हिताचे होण्यासारखे आहे.

ही दृष्टी न बाळगल्यामुळे आपल्या राष्ट्रीय व सामाजिक जीवनावर काय परिणाम झाला हे सांगताना त्या म्हणतात. ''महानुभावापासून तुकारामापर्यंत सर्वांनी आपली दृष्टी परलोकातील मूल्यांवर केंद्रित केली. ऐहिक जीवन म्हणजे त्यांना परलोक जीवनाची प्रयोगशाळा वाटायची. याचा परिणाम झाला की व्यावहारिक जीवनात आपण कर्तृत्वहीन ठरलो, दीनवृत्ती बनलो. आत्म्याच्या उन्नतीची सदैव चिंता वाढता वाढता आपण आत्मसन्मानासही मुकलो.

याउलट ईहलोकनिष्ठा बाळगल्यास त्यातून जग सत्य आहे ही निष्ठा निर्माण होईल, त्या निष्ठेतून मानवी अंतः शक्तीची जाणीव करून घेण्याची आकांक्षा, सृष्टीच्या विविधत्वाचे आकर्षण, सृष्टीची रूपे, शांती, शक्ती, तेज, विदारकता यांची प्रतीती घेऊन तो आनंद इतरांना मिळवून देण्याची प्रतिभावंताला इच्छा होईल. कारण, ''इहलोकीचे हे जीवन सुंदर निरामय, व शांतिपूर्ण करण्यात मानवी बुद्धीचे व शक्तीचे सार्थक आहे.

अशा जीवनमूल्यांच्या आधारे त्यांनी कलाप्रश्नांचे विवेचन केले. मानवी जीवन आणि ते जगणारा सामान्य माणूस याबद्दलच्या आंतरिक जिव्हाळ्यातूनच त्यांनी टीकालेखन केले. कलावंताला त्याच्या समाजातील परंपरेचे व सांस्कृतिक संचिताचे भान असावे असे त्यांना वाटे. म्हणूनच ''सामाजिकता व मानवनिष्ठा ही त्यांनी वाङ्मयीन श्रेष्ठतेची कसोटी मानली.

कुसुमावतींची कलामीमांसा

या कसोटीवरच कुसुमावतींनी आपली कलामीमांसा केली आहे. ''प्रत्येक युगातील उच्चतम कला, लोकांच्या कला, लोकांच्या जीवनामधून स्फुरत असते. साधारण लोकांच्या ज्या निष्ठा असतात, त्यांच्या श्रद्धेचे जे दवरूप असते, त्यांचा ज्या तत्त्वावर विश्वास असतो त्या पासून त्या त्या युगातील उच्चतम कला निर्माण होत असते'' असे त्यांचे म्हणणे आहे.

अर्थात असे उच्चतम कलेचे विश्व निर्माण करणारा वर्ग बुद्धिनिष्ठ मध्यमवर्ग आहे. कालिदासापासून केशवसुतांपर्यंत सर्व प्रतिभावंत या वर्गाचे प्रतिनिधी होते मात्र ''कलेचे विश्व, अवलियांचे, तत्त्वज्ञांचे, ज्यांना स्वानंद समाधी लावता येते त्यांचे, या चुकीच्या धारणेमुळे मध्यमवर्ग उच्चकलेकडे वळला नाही. त्यामुळे मध्यमवर्ग व कला दोघांचीही अवनती झाली. कला व जीवन यांच्यात फारकत निर्माण झाली. जीवन आंधळे वनले व कलेत प्राण राहिला नाही. घाऊक कला व खरी कला असा भेद निर्माण होऊन घाऊक कला लोकरंजन करणारी, आनंद हे ध्येय मानणारी व सवंग स्वप्नसाम्राज्यात विहरणारी ठरली. दुसरीकडे खऱ्या कलेला मानणाऱ्यांनी आत्मकेंद्रित वृत्ती ठेवली त्यामुळे त्यांची कला अर्थशून्यतेच्या व तांत्रिकतेच्या गर्तेत सापडली. या साऱ्यांचा परिणाम म्हणजे मध्यमवर्गाची उपेक्षा झाली. त्याच्यावरोवर त्याची मूल्ये आणि संस्कृतिपरायणताही विलयास गेली. या उच्च व सवंग कलेचे स्वरूप सांगाताना त्या म्हणतात, ''उच्चप्रतीची कला आपल्या अनुभूतीच्या उन्नत भूमिकेमुळे रसिकाच्या सहृदयतेला, सौंदर्यदृष्टीला आवाहन करते; तसेच त्याच्या बुद्धीलाही आव्हान देते. सवंग कला याला स्थितिनिष्ठ करते, आळशी करते. जेवढे त्याच्या नेहमीच्या सुखलोलुप आवाक्यातले असेल तेवढेच त्याला देऊन त्याची स्वप्न लालसा पुरी करते.''

उत्तम कलाकार हा साधारण जीवनाचाच एक भाग असतो. कधी त्याच्या वृत्ती आपल्या भोवतालच्या जीवनाच्या सौंदर्याने हेलावतात, कधी भोवतालच्या अन्यायाने, अज्ञानाने, पाशवी वृत्तीने त्याला चीड येते. तो अत्यंत व्यक्तित्वपूर्ण असला तरी त्याचे विचार व त्याच्या भावना युगाच्या वातावरणातूनच उद्‌भवलेल्या असतात व त्याला जे सांगायचे असते ते युगाच्या प्रक्रियेतूनच निर्माण झालेले असते.

म्हणून ''जीवनमूल्यांची राखण करणे, त्याविषयी मानवी मनाला सदैव, जागृत ठेवणे, मानवी सहृदयतेची जपणूक करणे, मानवी संकुचित क्षुद्रवृत्ती वनू न देणे अश्मप्राय होऊ न देणे हे कलेचे मुख्य कार्य आहे.

अशा कलेचा आत्मा कोणता तर प्रतीती हाच कलेचा आत्मा होय. ही प्रतीती घेण्यासाठी 'कलावंताचे हृदय विशाल करून त्या वृत्तीतून जे उगम पावेल. त्याला आपल्या वुद्धिमत्तेने मूर्त संघटित केले पाहिजे. हे करताना त्याने प्रतिभेच्या कल्पनेच्या कितीही भराऱ्या मारल्या तरी वास्तव विसरता कामा नये; यातच त्याच्या प्रतिभेचे सार्थक आहे, हे सांगताना त्यांनी ''प्रतिभेचा पक्षी हा सामान्य घरट्यातच राहतो; तेथूनच तो उड्डाण घेतो; स्वच्छंदपणे विहार करतो; जगाची पाहणी करून येतो; मोलाच्या अनुभवाचे दाणे टिपून येतो; पण परत येतो तो घरट्यातच..... त्या घरट्यातल्या जीवनाच्या पोषणात व त्याच्या अभिवृद्धीतच त्याच्या उडडाणाचे सार्थक असते.

पण प्रतिभावंताला जीवनाचे हे सौंदर्य कसे प्रतीत होते. कलेच्या सौंदर्याचा हा गाभा (आत्मा) कसा प्रतीत होतो ? ''प्रत्येक वस्तूमध्ये सौंदर्याचा चित्कण आहे. याची प्रतीती कवीच्या (कलावंतांच्या) आत्म्याला होते; व त्या चित्कणाचे स्पष्ट दर्शन करून घेण्याच्या प्रयत्नातून कलेची निर्मिती होते. वास्तविक जीवनातील प्रत्येक क्षणाचा गाभा सौंदर्यपूर्ण आहे. जीवनाच्या अखंड गतिमानतेतून असा एकच क्षण मानवी प्रतिभेने विलग करून घेतला व त्याचे निरक्षण केले तर हा सौंदर्यमय गाभा प्रतीत होईल.''

अशा प्रतीत झालेल्या सौंदर्याच्या गाभ्याची प्रतिभावंतांची प्रतीती म्हणजेच सौंदर्याची नवप्रतीती होय ''व ही प्रतीती कलेची मूळ होय.'' सौंदर्याच्या नवप्रतीतीमध्ये कलेचे मूळ असते. ही प्रतीती

व्यक्तिगत असते व अखेर समष्टी जीवनात समाविष्ट होते. त्या व्यक्तीच्या सांस्कृतिक संचितातून ती उदयास येते. परंतु अखेर त्या संचिताच्या विकासाला कारण होते.

सौंदर्याच्या कल्पनेचा विकास अशा तऱ्हेने व्यक्ती, समष्टी, सांस्कृतिक संचित, नवानुभूती यांच्या आंदोलनातून झालेला दिसतो व तो विकास जीवनाच्या विकासाला समांतर ठरतो. तो जीवनसापेक्ष असतो. सौंदर्याची कल्पना याप्रमाणे सर्वदृष्टींनी अधिकाधिक जीवन जगण्याच्या मानवाच्या धडपडीतून जन्मास येते व विकास पावते.

कला आणि कृत्रिमता

आपल्या कलाविचारात कुसुमावतींनी कला व कृत्रिमता यात भेद केला असून अभिजात कलेचा गौरव केला आहे. कलेत जीवन असते आणि कृत्रिमतेत जीव नसतो, जीवनरहित, चैतन्यसहित कृत्रिमता जेव्हा कलेचे रूप धारण करून जनतेची व जीवनाची दिशाभूल करू लागले. तेव्हा अभिजात कलेच्या स्वरूपाची ओळख. व पोषण करण्याची गरज निर्माण होते. अभिजात कला साधी, सौजन्यशील, मानवतापूर्ण असते आणि सवंग कला, बेगडी, कला असते. ती मोहक वाटते, मनात विकल्प निर्माण करते. जरासा तर्काचा किंवा सुविचाराचा कस लावताच तिचा डोलारा कोसळून पडतो. याचा विवेक आपण रसिकांनी बाळगून अभिजाताचा स्वीकार आणि सवंगाचा धिक्कार करणे हाच कलेच्या पोषणाचा मार्ग होय.

रसिकांनीही कलेच्या कृत्रिमतेवर आणि कलावंतांच्या बेजबाबदारीवर नियंत्रण ठेवले पाहिजे असे त्यांना वाटे. कलावंतांना उच्च आदर्शावर दृष्टी ठेवण्यास भाग पाडणे, हे आपले कर्तव्य आहे. आमच्या जीवनात जे सत्य आहे त्याचाच आम्ही आविष्कार होऊ देऊ, जीवनाचा उपमर्द होऊ देणार नाही असा रसिकांनी निर्धार केला पाहिजे असे त्या म्हणतात. अभिजात कलेचा हेतूच मुळी मनोनिवेदन किंवा उद्दीपन नाही. ती मानवी मनाच्या सर्व प्रवृत्ती, संवेदना, विचारशक्ती, कल्पना यांना जागविते किंबहुना हेच तिचे अंतिम मूल्य होय म्हणून ''कोणत्याही कलेत या सर्व मनःशक्तींना उस्फूर्त करण्याचे किती सामर्थ्य आहे यावरून तिचे अंतिम मूल्य ठरविले जाते'' असे त्या म्हणतात.

कलेची सूत्रे मध्यम वर्गीयांकडून बहुजन वर्गाकडे

समाजपरिवर्तन आणि सांस्कृतिक बदलानुसार कलेची सूत्रे निव्वळ मध्यमवर्गीयांकडून बहुजनांकडे जाणार याची जाणीव कुसुमावतींना आहे. पुढील युग घडविण्यासाठी या वर्गाच्या कलेचा सहभाग कसा असावा या बद्दल त्या म्हणतात, ''उद्याचे जीवन प्रचंड व अमर्याद अशा बहुजन समाजाच्या तालाने चालणार आहे..... त्यांच्यात दुर्दम्य जीवनेच्छा, निर्भेळ सवंगडीभाव, ज्ञानलालसा, स्वार्थत्याग आहे. पुढील युगात शांती नांदण्यासाठी याच प्रवृत्तींना उचलून धरले पाहिजे. (१६)

यावर्गाचे सांस्कृतिक संचित व कला याच्यांकडे महदयतेने पाहून त्या वर्गाच्या मार्गदर्शनासाठी, नियमनासाठी व विकासासाठी नवभारतातील सर्व कलांचा उपयोग केला पाहिजे. सुसंगत व सर्वांगीण विकासामुळे व्यक्तित्वाला समतोलपणा येतो तो सर्व वैचारिक जीवनाचा पाया असतो. म्हणून कला व्यवसाय व कलाध्ययन यांतून आपले राष्ट्रीय जीवन घडू शकेल असे बाईंना वाटते.

कुसुमावतींची समीक्षा व सौंदर्य मीमांसा

समीक्षेमुळे कला, जीवन सन्मुख राहते. त्यामुळे कल्पनारम्य कलानिर्मितीचा प्रवाह फोफावला त्याला टीकाकार जबाबदार आहे. कारण ''टीका ही सुजाण कला आहे. आपल्या मूल्यांच्या तर्कनिष्ट आकलनावर ती अवलंबून आहे, तशीच तिला आपल्या सामाजिकतेची जाणीवही आवश्यक आहे; आणि म्हणूनच टीकाकारांना सौंदर्याच्या स्वरूपापासून कला वस्तूच्या सामाजिक परिणामापर्यंत सर्व कलाविषयक प्रश्नांचा पद्धतशीर विचार करणे शक्य होते. (१७)

बाईंनी समीक्षेचे १) नीतिकल्पनानुसारी २) मानसशास्त्र प्रेरित ३) समाजशास्त्रनिष्ठ समीक्षा ४) सौंदर्यशास्त्राधिष्टित समीक्षा असे चार प्रकार सांगितले आहेत. पहिल्या प्रकारात मानवी श्रेयविषयक कल्पना, जीवनाचे आदर्श यांचा परिपोष साहित्यात कसा होतो ते पाहिले जाते, तर दुसऱ्या प्रकारात विशिष्ट साहित्यकृतीच्या निर्मात्याच्या मनातील प्रेरणांचे स्वरूप व त्याच्या निर्मितीची प्रक्रिया. त्यातील अनुभूतीचे वेगवेगळे अंश यांचा विचार केला जातो. समाजशास्त्राधिष्टीत समीक्षकाचा भर व्यक्तिमनापेक्षा भोवतालच्या परिस्थितीवर असतो. परिस्थितीने व्यक्तिमन आकारास येते व म्हणून व्यक्तिमनाने निर्मिलेल्या कलाकृतीमध्ये त्या परिस्थितीचे चित्रण होते असा त्यांचा दावा असतो. 'चौथी सौंदर्यवादी. ''सौंदर्य हे एकच मूल्य सर्व ललित कलांना आणि साहित्याला सामान्य असे आहे. वेगवेगळ्या ललित कलांची माध्यमे आणि अभिव्यक्तीची साधने वेगळी असली तरी त्यांचे मूलतत्त्व सौंदर्य हेच असून तेच त्याचे व्यवच्छेदक लक्षण आहे. ही या समीक्षेची धारणा आहे. कुसुमावतीबाईंनी या समीक्षापद्धतीवर जोरदार आक्षेप घेतला आहे. त्या म्हणतात ''इतर कलांमध्ये केवळ इंद्रिय संवेदनांच्या संगतीचे लयतत्त्व असते. वाङ्मयकृतीत मात्र संवेदनांच्या अर्थामुळे निर्माण होणाऱ्या संगतीवर आधारलेले लयतत्त्व असते असा फरक आवश्यक

ठरतो. (१८) हा भेद करून इतर कलांच्या समीक्षेपेक्षा साहित्य समीक्षेमध्ये सौंदर्यवादी समीक्षेचा अपुरेपणा जाणवून दिला आहे. इतर कलांपेक्षा साहित्याचे आवाहन एका ज्ञानेंद्रियावर अवलंबून नसते. ते अर्थाच्याद्वारे सरळ मनावर परिणाम करते. अर्थसंगती हा धागा असतो. समीक्षकाला ह्या अर्थसंगतीचे विवरण आणि मूल्यमापन करणे आवश्यक असते. समीक्षेच्या संदर्भात १) आस्वाद २) सौंदर्याच्या संश्लिष्ट प्रतीतीचे विवरण आणि ३) मूल्यमापन या तीन पायऱ्या घडत असतात आणि म्हणनूच कोणत्याही एका समीक्षा पद्धतीने यापैकी तिन्ही पायऱ्यांचे विवेचन होत नाही. मानसशास्त्रीय व समाजशास्त्राधिष्ठित समीक्षा यांच्या सहयोगानेच (कलेतील अर्थाच्या) साहित्यकृतीचे विवरण घडते आणि या विवरणाशिवाय साहितत्यकृतीचे सौंदर्यही पूर्णांशाने प्रतीत होणे शक्य नसते.

सौंदर्यवादी समीक्षेच्या मर्यादा सांगताना त्यांनी दवबिंदू आणि गंगेच्या ओघाचे उदाहरण दिले आहे. त्या म्हणतात, ''गंगेशी निगडित असलेल्या युगानुयुगांच्या भावनांचे संस्कार केवळ गंगौघाच्या केवळ निर्देशानेही उभे राहतात. त्याच्या मापनाला सौंदर्याचे मूल्य वापरता येत नाही. निसर्ग सौंदर्याच्या जाणिवेतही हे प्रश्न उद्‌भवतात. मग मानवी मनातील सर्व संचितांशी जिचा अविभाज्य संबंध असतो अशा साहित्यकृतीच्या गुणवत्तेचे विश्लेषण आणि मापन करताना सौंदर्य हे मूल्य आवश्यक असले तरी एकमेव व अंतिम मानून चालणार नाही. साहित्याची कलात्मकता कशामध्ये आहे हे ठरल्यावर त्याची गुणवत्ता व महानता कशामध्ये आहे याचाही विचार समीक्षेच्या कार्यात आवश्यक ठरतो. येथेच जीवनमूल्यांचा संबंध येतो. सौंदर्यशास्त्रीय मूल्यांचा अपुरेपणा जाणवतो.'' (१९)

साहित्याव्यतिरिक्त इतर कलांमध्ये निर्मिती मध्ये सौंदर्यमूल्य व जीवनमूल्य यांत त्यांनी भेद केलेला दिसत नाही. अर्थात याचे फार स्पष्टीकरणही त्यांनी दिले नाही. मात्र उत्तम मंदिराच्या शिल्पामागेही शेकडो काम करणाऱ्यांच्या मनातील श्रद्धाभाव युगधर्म असतो असे सांगितले आहे. (कामकऱ्यांच्या) बोटांतून त्यांच्या लहान लहान आयुधातून त्या युगधर्माच्या प्रवाहाचा अखंड स्त्रोत त्या दगडांवर स्रवत होता व त्या प्रवाहानेच त्यांच्या मूर्तीत चैनन्य ओतले व त्यांना सौंदर्य दिले. म्हणजे कलानिर्मितीच्या चैतन्याच्या व सौंदर्याच्या मुळाशी निर्मात्याचा जीवनमूल्यभावच असतो असे म्हणतात.

मुळात जीवनमूल्ये व सौंदर्य यांत विरोध नाहीच. तो विचारप्रणालीने निर्माण केला आहे. सौंदर्य आणि जीवनमूल्ये यांची फारकत केल्यामुळेच अनेक वैचारिक भावनाविषयक आपत्ती उद्‌भवतात. 'सौंदर्यमूल्याला जीवनमूल्यांच्या श्रेणीमध्ये योग्य ते स्थान दिल्याने या आपत्तीचा परिहार होतो.'' (२०) असे त्या म्हणतात.

कुसुमावतींची सौंदर्यकल्पना

वा. ल. कुळकर्णी, वा. म. जोशी आणि मर्ढेकर यांच्या सौंदर्य कल्पनेचे विश्लेषण करून कुसुमावतींनी त्यांची अपूर्णता सांगितली आहे आणि आपली सौंदर्यकल्पना मांडली आहे. सौंदर्य हा व्यक्ती - वस्तू संबंध आहे. या संबंधातून उदयास येणारी ती कल्पना आहे, भाव आहे. या कल्पनेचे, भावनेचे, जाणिवेचे स्वरूप जसे काही अंशी त्या वस्तूच्या गुणधर्मावर अवलंबून राहील. तसेच त्या वस्तूच्या संबंधात येणाऱ्या व्यक्तीच्या स्वधर्मावर व विशेषता संस्कृतीवर अवलंबून राहील.(२१)

व्यक्तीची जीवन जगण्याची धडपड आणि सौंदर्य कल्पना यांचा संबंध त्यांनी जोडला आहे. जीवनाकांक्षा ही मानवी जीवनातील सर्वात प्रभावी शक्ती व त्याच्या सर्व क्रियाशीलतेचे मूळ आहे. त्याचे ज्ञान, त्यांची कला, त्याची शक्ती व त्याचा धर्म, त्याचा ईश्वर हे सर्व त्याचा सर्वांगीण विकास ज्यात शक्य होईल असे जीवन जगण्याच्या धडपडीतून निर्माण झाले आहे आणि म्हणून त्याच्या सौंदर्य विषयक कल्पनाही या जीवनाकांक्षेशी निगडित आहेत. जे युगानुयुगांच्या प्रयोगात व जीवनानुभाव अबाधितपणे टिकते ते आपण सत्य समजतो. जे युगानुयुगे मानवी मनाला आकर्षित करीत राहते, दुसऱ्या कोणत्याही मानसिक क्रियेपेक्षा ज्याच्या आस्वादाच्या क्रियेने मानवाला अधिक व सर्वांगीण जीवनानंद लाभल्यासारखा वाटतो, त्याला आपण चिरंतन सौंदर्य म्हणतो. युगानुयुगांच्या बदलत्या पण प्रगतिशील जीवनामध्ये जे मानवाला कल्याणकारी ठरते त्याला आपण शिव म्हणतो. सत्य, सौंदर्य व शिव ही जीवनाची त्रिगुणात्मक अंगे आहेत, ती जीवनसापेक्ष आहेत. यापैकी प्रत्येकाची प्रतीती व्यक्ती व्यक्तीला स्वतःच्या अंतरंगाच्या खोल गाभाऱ्यातच येऊ शकते; परंतु ही व्यक्तिगत प्रतीती त्या त्या व्यक्तीच्या सांस्कृतिक संचिताने रंगलेली असते. म्हणून सौंदर्याची प्रतीती हा जसा एक व्यक्ती वस्तुसंबंध आहे तसेच तिचे स्वरूप व्यक्ती - समष्टी - संबंधावरही अवलंबून असते. (२२)

सौंदर्यानुभवाचे स्वरूप

मर्ढेकर वस्तू - वस्तू - संबंध - संबंध कुसुमावती वस्तू व्यक्ती - समष्टीसंबंध

मर्ढेकरांच्या सौंदर्यकल्पनेवर कुसुमावतींनी टीका केली असली तरी सौंदर्यानुभवाचे स्वरूप मात्र मर्ढेकरांच्या सारखेच वाटते. कवी आणि अकवीमध्ये भेद करून मर्ढेकरांनी कवीची (प्रतिभावंतांची) प्रतीती सौंदर्यपूर्ण असते असे म्हटले होते. तसेच विश्लेषण कुसुमावतींनी केले आहे. त्यांच्या मते ''साधारण व्यक्तीला येणारी (सौंदर्याची) प्रतीती जवळजवळ पूर्णपणे समष्टीमध्ये रुळलेल्या कल्पनांनी मर्यादित व ह्या कल्पनांवर अवलंबून असते. संस्कृतीच्या

विकासाच्या दृष्टीने ही प्रतीती मोलाची नसते. तीत ठराविकपणा असतो... प्रतिभावंतांची सौंदर्य प्रतीती ठराविकाला आश्लेषून आपल्या सांस्कृतिक संचितांचे पाथेय बरोबर घेऊन ज्ञानाच्या पलीकडे जाते. मानवी अनुभूतींच्या सीमारेषेच्या पलीकडे जाण्यासाठी, मानवी अनुभूतींचे क्षितिज विस्तारण्यासाठी तिची धडपड असते (त्यातून) तिचा ठराविकाशी झगडा होतो. परंतु या झगड्यातून त्या ठराविकालाच नावीन्य येते व त्या सांस्कृतिक संचितांमध्ये नवजीवन ओतले जाते. येथे सर्वोच्च कलेचा मूलस्त्रोत सापडू शकेल. (२३) अशा तऱ्हेने सांस्कृतिक संचिताच्या नवजीवनात सर्वोच्च कलेचे मूळ असते असे सांगून ही प्रतीती (सौंदर्यानुभव) संस्कृतीचा विकास करते असे म्हटले आहे. ही व्यक्तिगत प्रतीती समष्टीजीवनात समाविष्ट होते. त्या व्यक्तीच्या सांस्कृतिक संचितातून ती उदयास येते, परंतु अखेर त्या संचिताच्या विकासाला कारण होते. सौंदर्यकल्पनेचा विकास अशातऱ्हेने व्यक्ती समष्टी, समष्टी व सांस्कृतिक संचित व नवानुभूती यांच्या आंदोलनातून झालेला दिसतो. व हा विकास मानवी जीवनाच्या विकासाला समांतर ठरतो.

मानवता हेच जीवनमूल्य, सौंदर्यमूल्य

कुसुमावतींनी जीवनमूल्य हेच सौंदर्यमूल्य असते असे म्हटले पण 'पासंग' मध्ये हे जीवनमूल्य कोणते ? याचा ठाम उच्चार 'त्यांनी केला नाही. तो 'मराठी कादंबरीचे पहिले शतक' या ग्रंथात केला आहे. 'उदंड मानवता' हे श्रेष्ठ जीवनमूल्य त्यांनी मानले आहे. व त्यामुळेच त्यांनी केशवसुत व हरिभाऊ यांचा गौरव केला आहे. ''जी मानवी जीवनाचा दिलासा, विसावा वा स्फूर्तिस्थान होणे शक्य आहे, ती कथनात्मक कला असीम मानवतेशिवाय निर्माण होत नाही. निर्मळ मानवतेच्या पोटीच विशाल व उच्च कलेचा जन्म होतो. असे त्या म्हणतात. (२४)

या मानवतेचे स्वरूप सर्व धर्मातीत, सर्व पक्षभेदातीत असते. ती विशिष्ट विचारप्रणालीतून निर्माण होत नाही. उलट प्रणालीपीडित जीवनदर्शनाला मुकतात. ही मानवता सर्व राजकीय, आर्थिक, सामाजिक विचारप्रणालीचा परिणाम स्वीकारणारी असली तरी ती त्यांनी विकसित होत नाही. 'प्रणालीपिडित वा शून्य कलावाद्यांपेक्षा जीवनाचे विराटदर्शन व मानवी अंतःकरणाच्या 'स्पंदनाची जाणीव' मानवतावादी लेखकांनाच होत असते. असे कुसुमावतीबाई म्हणतात.

कुसुमावतींचा आस्वाद विचार

वाङ्मयीन आस्वादाचा विचार करताना कुसुमावतीबाईंनी आस्वादाच्या उत्कटतेचे स्वरूप १) आस्वादकाची आंतरिक गरज २) त्याच्यावरील वाङ्मयीन पूर्वसंस्कार यावर अवलंबून असल्याचे म्हटले आहे. आस्वादात जाणवलेला घटक म्हणजे आस्वादक वृत्ती. ती चौकस असते. १) ती आपल्या अनुभूतींचे स्वरूप तपासते आणि २) अन्य आस्वादांशी तुलना करीत असते. हा आस्वाद स्थलकाळ संस्कृती निरपेक्ष असतो. पण अभिजात वाङ्मयाचा आस्वाद एका मनाचा दुसऱ्या मनाशी संवाद घडवून आणून देते. त्यामुळे मानवी जीवनविषयक समज वाढतो. तत्त्वचिंतनाचा प्रवाह कायम राहतो. म्हणून त्यांनी अभिजात वाङ्मयाच्या आस्वादाची थोरवी मानली आहे.

कुसुमावतींची काव्यमीमांसा

अपेक्षित मानवतावादी युगनिर्मितीत कवितेचे योगदान मोठे असते. म्हणून कवींना ''आपल्या मनःशक्तींना आवरून आत्मकेंद्रित करण्यापेक्षा त्यांना समाजाचे संशोधन करण्यासाठी बाह्यविश्वाच्या दाही दिशा धुंडाळून काढण्यासाठी, वास्तवाचे विश्लेषण करण्यासाठी सत्याची दीक्षा घेऊन पाठविणे अत्यंत आवश्यक आहे. (२५) आणि रसिकांनीही कवितेच्या सामाजिक महत्त्वाची, तिच्या शक्तीची युयुत्सू जाणीव ठेवली पाहिजे असे त्या म्हणतात.

सोबतच त्यांनी आत्मनिष्ठा व बहुनिष्ठा या वाङ्मयीन प्रवृत्तींची चर्चा केली आहे. आत्मनिष्ठेत ठराविकाच्या पलीकडे जाण्याची. अंतःकरण प्रवृत्तीद्वारे विश्वाचे आकलन करण्याची वृत्ती दिसते. तर बहुनिष्ठेचे मनोयुग स्थितिप्रधान असते. ही आत्मनिष्ठा केशवसुतांच्या कवितेत होती. आजच्या कवितेत ती आत्मनिष्ठा व रवीकिरण मंडळाची 'भोवतालच्या जीवनाशी समरस होण्याची आकांक्षा यांचा संगम होण्याची गरज त्यांनी बोलून दाखवली आहे.

कुसुमावतींची कादंबरीमीमांसा

धर्म व कुटुंबापेक्षाही कादंबरीची संस्कार क्षमता आज जास्त आहे. परंतु मराठी कादंबरीला 'आभासनिष्ठ व्यक्तिवादाने' ग्रासलेले आहे. ही प्रवृत्ती मानवी मनाला अत्यंत जीवनविन्मुख आहे. तिचे विविध प्रकारही त्यांनी सांगितले आहेत. एक जीवनाच्या आकलनाचा अभाव, दोन, मर्यादित विश्वातील स्वयंकेंद्रित व्यक्तींचे चित्रण आणि तीन, जीवनाची चर्चाच न करणे यामुळे अशा लेखकांची मूल्यश्रेणी विकृत बनते. उदार सहानुभूतीतून उगम पावणाऱ्या प्रभावी प्रवाहाऐवजी वैयक्तिक कुरुबुरीचे पाझर त्यांच्या लिखाणातून वाहू लागतात. त्यातून, कलात्मक ऋजुता हा या वृत्तीतून बाहेर निघण्याचा मार्ग त्यांनी सुचविला आहे. ही ऋजुता आत्मवंचनेच्या निर्मूलनासाठी आवश्यक आहे. त्यामुळे ती अंगी बाणवणाऱ्याच्या हातून कलेचा उपमर्द होत नाही. याच जोडीला 'मनाच्या गाभाऱ्यात आणखी खोल न जाता मनाची द्वारे खुलीकरून देणारी 'वस्तुनिष्ठा' गरजेची. यांतून मराठी कादंबरीला उत्क्रांतिमार्ग गवसेल असे त्यांना वाटते.

नवसाहित्य व अभिजात साहित्य

व्यापक व विशाल मानवतावादी दृष्टीमुळे बाईना, नवसाहित्य संकुचित, यांत्रिक व खुरटे वाटते. या साहित्यात पूर्णविकासाअंती

अनुक्रमणिका

होणारे अंतःशक्तीचे विसर्जन व त्यातून होणारे नवसर्जन नसते. मग त्यांची कलाकृती खुरटून जाते. त्यानंतरच्या केविलवाण्या धडपडीतून दुर्बोधता, कृत्रिमता व बीभत्सपणाचा मार्ग निवडला जातो. हे लेखन वाचकाच्या मनात विश्वास आणि जाणीव निर्माण करू शकत नाही.

या उलट अभिजात साहित्य ते विविध ऊर्मीमधून जन्मास येते. ते बोधाचा आग्रह न धरताही मूल्यांचे संस्थापन करते. तिच्या प्रकाशात जीवनाचे मर्म, जीवनाचे सौंदर्य आविष्कृत होते. अभिजात साहित्य ''(ती ऊर्मी) जणू आपल्याच अंतर्यामीच्या चांदण्याच्या तलावात न्हाऊन निघालेली असते आणि त्या चांदण्यांचे तेज त्या दृष्टिवाटे परिसरावर पसरते. त्या डोळ्यांनी ते इतरांना विश्वाचे दर्शन घडविते आणि त्यांना विश्वोत्तीर्णही करते. (२६) उदा. ज्ञानेश्वरांचे साहित्य, तुकोबाचे अभंग इ.

कलाविचाराचे मूल्यमापन व योगदान

थोडक्यात, कुसुमावतींना सांस्कृतिक विकास, व भारताचे राष्ट्रीय जीवन उन्नत व्हावे, अशी अपेक्षा आहे. त्यासाठी समाजात युगप्रवृत्ती, प्रगतीची दिशा निर्माण होणे गरजेचे आहे. त्यासाठी जीवनाचे, वास्तवाचे, समाजाचे वास्तविक, मूल्यनिष्ट, सौंदर्यदर्शनच कलेत आविष्कृत व्हावे. सामान्य माणसाला जीवनातील सौंदर्यपूर्ण चित्कणाची प्रतीती येणे शक्य नसते. ही जबाबदारी कलावंतांनी आणि रसिकांनी पेलायची असते. ही नवप्रतीती ठराविकाच्या पलीकडची, सांस्कृतिक संचिताची शिदोरी असल्याने ती मानवी संचिताच्या विकासाला कारण होते. म्हणून कलावंतानी विशाल अंतःकरण व असीम मानवतावादी दृष्टी ठेवून भोवतालच्या जीवनाशी समरस झाले पाहिजे. या प्रगतीच्या आड येते ती सवंग कला, कलावंतांची आत्मकेंद्रित वृत्ती, संकुचित नवसाहित्य, आनंदवादी, सुखवस्तू स्थितिनिष्ट जीवन चित्रण करणाऱ्या कादंबऱ्या आणि त्यांच्या पोषणास मदत करणारी सौंदर्यवाद्यांची व शून्य कलावाद्यांची वृत्ती.

म्हणून या वृत्तीचाच धिक्कार करून त्यांच्यावर कुसुमावतीबाईंनी प्रखर टीका केली आहे.

कुसुमावतींच्या साहित्यविचारांमुळे वा. म. जोशी ते शरच्चंद्र मुक्तिबोध यांच्या मधला दुवा साधण्याचे कार्य घडून आले आहे. पुढे जाऊन मुक्तिबोधांनी सकलात्म मानुषनेचा सिद्धान्त मांडला. त्याची बीजे कुसुमावतींच्या साहित्यविचारात आहेत असे डॉ. अरुणा देशमुख म्हणतात.

समाजशरण टीकाकारांमध्ये तरल सौंदर्यभावनेचा प्रसंगी बळी देण्याची वृत्ती असते. कुसुमावतींनी मात्र संवेदनक्षमतापूर्वक सौंदर्यवृत्ती जपलेली आहे.

डॉ. भालचंद्र नेमाडे यांनी 'टीकास्वयंवर' ग्रंथात पुढे जाऊन मराठी कादंबरीतील मुक्तामाला, मोचनगड प्रवृत्ती सांगितल्या त्याचीही बीजे कुसुमावतींच्या साहित्यविचारात आहेत.

आज मराठी साहित्यविचारात देशीवाद ही संकल्पना प्रामुख्याने प्रचलित आहे. ती समाजनिष्ठ व संस्कृतिसंचिताचा पुरस्कार करणारी आहे. अशा विचारांपर्यंत पोहोचणारा विचारप्रवाह निर्माण करण्याचे काम कुसुमावतीबाईंच्या कलाविचाराने केले आहे. मर्ढेकरप्रणित कलावादी सौंदर्यविचाराला समर्थ प्रत्युत्तर त्यांनी दिले आहे. नवसाहित्याच्या गौरवाच्या काळात त्यांच्यातील आत्मकेंद्री वृत्तीचे परखड विश्लेषण करून नवलेखकांना डोळस दृष्टिकोण दिला आहे.

संदर्भ व टीपा

१. 'मराठीतील लौकिकतावादी साहित्यविचार' डॉ अरुणा देशमुख, साहित्यप्रसार केंद्र, नागपूर, १९९५
'पासंग', कुसुमावती देशपांडे, मौज प्रकाशन, मुंबई १९८७, पृ. १२९
'कुसुमावती वाङ्मयदर्शन', अनुराधा पोतदार, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७५, पृ. ८-९
४. पासंग, उनि, पृ. ८
५. पासंग, तत्रैव, पृ. ९
६. पासंग, तत्रैव, पृ. ८-९
७. पासंग, पृ. १६
८. पासंग, पृ. १६ - १७
९. पासंग, पृ. १९
१०. कुसुमावती वाङ्मयदर्शन, पृ. १३
११. पासंग, पृ. ५
१२. पासंग, पृ. ६
१३. पासंग, पृ. १०-११
१४. पासंग, पृ. ५५
१५. पासंग, पृ. ८६
१६. पासंग, पृ. १२
१७. पासंग, पृ. ८३
१८. पासंग, पृ. ९२
१९ पासंग, पृ. ९६
२०. पासंग, पृ. ९७
२१. पासंग, पृ. ८५
२२. पासंग, पृ. ८६
२३. पासंग, पृ. ८६
२४. मराठी कादंबरीचे पहिले शतक, कुसुमावती देशपांडे, मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई, १९५३ पृ. १३
२५. पासंग, उनि, पृ. ३९
२६. पासंग, पृ. १२५

- प्रा. देवानंद सोनटक्के

यवतमाळ

□□□

अनुक्रमणिका

युगवाणी
कुसुमावती देशपांडे विशेषांक
२००४/०५

कुसुमावती देशपांडे यांचे मराठी साहित्यातील 'दीपदान'

डॉ. आशा सावदेकर

कथा, ललितलेख, समीक्षा, वाङ्मयेतिहास अशा चार महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये स्वच्छंद विहार करणारी कुसुमावतींची प्रतिभा आणि प्रतिभावळ यांचे पुनर्दर्शन घेण्यासाठी त्यांच्या जन्मशताब्दीचे निमित्त महत्त्वाचे आहे.

'कुसुमानिल' या पुस्तकात प्रकाशित झालेली कुसुमावतींची पत्रे वाचली म्हणजे कुसुमावतींच्या कोवळ्या वयात झालेले संस्कार स्पष्ट होतात. कविमनाच्या प्रियकराशी संवाद साधताना त्यांच्या मनाने जी भावसंपन्न आणि कोवळी मनोवृत्ती व्यक्त केली होती ती पाहिली की ही भावोत्कटता फक्त त्यांच्या ललितलेखनात प्रकटलेली दिसते. त्या काळातील स्त्रीपुरुषमैत्रीला ज्या चौकटीचे बंधन होते त्यात दादा - ताई नातेसंबंधाशिवाय दुसरे नाव नव्हते. आपले प्रेम जपत असतानाच आपले आईबाप आणि कुटुंब जपण्यासाठी त्यांनी जो आटापिटा चालविला होता त्याचे दर्शन तिथे घडते. आंतरजातीय विवाहाच्या बंडासाठी त्यांनी सोसलेल्या उन्हाच्या छटा तिथे आहेत. आधी प्राध्यापक व नंतर आकाशवाणीत कार्यक्रम संयोजक अशी पदे भूषविताना त्यांनी जे कर्तृत्व प्रकट केले ते लक्षणीय होते. रमाबाई रानडे यांच्या 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी'चा त्यांनी इंग्रजी अनुवाद केलेला होता. १९२९ च्या 'यशवंत'मध्ये व 'प्रतिभा' जुलै १९३४ या अंकात त्यांच्या कविता प्रकाशित झालेल्या आहेत. त्यांच्या कथालेखनातील काव्यात्मतेचा उगम याच वृत्तीत असला पाहिजे.

कुसुमावतींची काव्यात्मता ही कोमल नाजूक फुलाप्रमाणे नव्हती. त्यातही चिंतनशीलतेचा एक धागा खुबीने ओवला गेला होता. मध्यरात्रीच्या शांत वेळेला गच्चीवरून झोपलेली घरे न्याहाळताना त्यांना वाटते. ''माझ्या गच्चीच्या भोवती तऱ्हेतऱ्हेची घरं पसरली होती.कोणी कानटोपीप्रमाणे खोल छपरं कानशिलापर्यंत ओढून घेऊन झोपली होती. कोणी योग्याप्रमाणे समाधीतही अगदी ताठ मान उंचावून डोक्यावर जटांचा मुकुट धारण करून बसली होती. दूर, काही शेतांच्या पलीकडे -लहान लहान झोपड्या एकमेकींना बिलगून निजल्या होत्या. पण या सर्व विविधतेवर एक अखंड, अनंत मायेची चादर पसरली होती....''

या चिंतनातही मानवी मनाच्या कुरूपतेची जाण पक्की आहे. ''किती पार्थिव, किती क्षुद्र.... मानवी मनाचं विश्व जर खरं सुंदर असतं, तरच जीवन सुंदर झालं असतं.....

खालच्या या अपरंपार वात्सल्याबरोबर आभाळाचे सौंदर्य म्हणजे 'दैवी ऐश्वर्य' असेही कुसुमावतींना वाटते म्हणून त्यांना मध्यरात्र सुंदर वाटते, तिच्यात सांत्वनाचे सामर्थ्य जाणवते, सादाला पडसाद देण्याचे बळ कळते. मध्यरात्र त्यांच्या दृष्टीने एकटेपणा नाहीसा करणारी आहे. अन्तर्दृष्टी विकास पावण्याचे सामर्थ्य तिच्यात आहे असा साक्षात्कारच त्यांना होतो आणि वाटते की मध्यरात्रीच्या चंद्रप्रकाशात सृष्टी ऐश्वर्यनिमग्न नाही, विलग नाही तर तीत एका विश्वव्यापक सहानुभूतीची जाण आहे.

कुसुमावतींची ही विश्वविषयक जाणीवच त्यांच्या कलादृष्टीमागे उभी आहे म्हणूनच सामाजिक उन्मुखतेतच कलेचे श्रेयस दडले आहे

अनुक्रमणिका

असे त्यांना वाटते. जसे सृष्टीचे तत्त्व पूर्णतेकडे जात असते त्याप्रमाणेच प्रगतीची दिशा दाखवणे आणि माणसाच्या मनाचे प्रगल्भ उन्नयन करणे हाच साहित्याचा दृष्टिकोण असला पाहिजे असे त्यांना वाटते. म्हणूनच आस्वादाच्या प्रक्रियेतच 'अधिक व सर्वांगीण जीवनानंद' दडला आहे असे त्यांना वाटते.

आत्मप्रत्ययातून उदयाला आलेले पण फक्त स्वयंकेंद्री नसलेले सामाजिक संबंधांचे विश्व उभारणे कुसुमावतींना कादंबरीच्या संदर्भात महत्त्वाचे वाटले आहे. कलेची क्रांतिकारकता व वास्तवातील हीन प्रवृत्तीबद्दल त्वेष यातून कलेची 'युयुत्सू वृत्ती' प्रकट व्हायला पाहिजे असे कुसुमावती 'आधुनिक मराठी कादंबरीचा उत्क्रांतिमार्ग' या 'पासंग' मधील लेखामध्ये मांडतात. म्हणूनच 'आत्मवंचना' विघातक आहे असे म्हणून आभासनिष्ठेवर त्या टीका करतात व त्यांना त्यासंदर्भात 'रणांगण' कांदबरी महत्त्वाची वाटते. माडखोलकरांच्या 'नागकन्या' ला त्या 'उपजीविकावादी अनुकृती' म्हणतात आणि 'चंदनवाडी' ला मात्र 'सहृदय चित्रणा' चे भान आहे असे प्रकट करतात.

त्याच निबंधात एके ठिकाणी त्या स्पष्ट करतात की ''लेखकांची कलात्मक ऋजुता व आत्मशोधनामुळे उदयास येणारी स्वतःविषयीची आभासविरहित दृष्टी'' कादंबरीत मोलाची असते. ''व्यक्तिनिष्ठा एका विशिष्ट निरोगी सीमेच्यापलीकडे गेली की तिचे स्वयंकेंद्रितत्वात रूपांतर होते. ती आभासमय तरी होते किंवा अतिरंजित... त्यासाठी ''मनाची कपाटे खुली करून तेथे वास्तवाच्या वाऱ्याला अनिर्बंधपणे खेळू देणे.'' हा उपाय कुसुमावती सुचवितात. (पृ. ९२ ते ११७ पासंग आ. १ ली)

याच संदर्भात 'मी का लिहिते ?'' हा त्यांचा लेखही वाचण्यासारखा आहे.

''साधारण माणसाचे मन व्यवहारापासून मोकळे होऊन निसर्गाच्या प्रांगणात रमू शकते व अशावेळी त्याला जाणीव होते की खरोखरी मानव हाही निसर्गाचाच घटक. निसर्गातील आनंदाचे झरे त्याच्याच मालकीचे, त्यांच्यापासून नवजीवन प्राप्त करून घेऊन तो द्विगुणित उत्साहाने व वाढत्या समजाने आपले व्यावहारिक लढे लढू शकतो. 'गवताचे पाते' या लघुकथेतील सदाशिवरावांना हीच प्रतीती आली. (तत्रैव पृ.१३०)

एखाद्या साध्या व्यक्तीच्या अंतःकरणात असे चैतन्याचे झरे कुसुमावतींना दिसले आहेत. उदा. 'माउली'मधील सरस्वती. उच्चतम कलाकृत्ती निर्माण करण्याचे सामर्थ्य या 'अखंड मानवते'त असते असे कुसुमावतींना वाटते. मग मानवी जीवनातील रोजच्या दृश्यात नवा आशय दिसतो आणि त्यांच्याच शब्दात सांगायचे तर ''परिस्थितीच्या विविध कणांचे विश्लेषण करणारे व त्यांच्या विराट स्वरूपाचे दर्शन घडवणारे एक सूक्ष्मदर्शक यंत्रच जणू आपल्या हाती लागते व त्या दर्शनाच्या आधारावर, आपल्या अनुभूतीतून, जीवनाची नवी रचना करण्याची आकांक्षा आपल्या मनात स्फुरण पावते. भावनांचे क्षितिज विस्तारते व विचाराला धार येते. याठिकाणी कुसुमावतींना कवी बी यांच्या एका रूपकाची आठवण येते. ''वेल रसप्रसन्न झाली की, तिला फुलोरा येणारच. त्या फुलांच्या भरवशावर ती संहारकालाच्या ज्वालांचीही दिक्कत बाळगीत नाही. त्या फुलोरात ती आत्मप्रतिमाच निर्मून ठेवते; स्वतःला एक परीने ती अमर करते व कालाच्या प्रभावाला सहजपणे झुगारून देते. क्षणजीवित्वाच्या शापातून ती स्वतःला मुक्त करते. कलाकृतीच्या निर्मितीच्या वेळी अमरत्वाची आस कितीशा सुजाणपणे कलावंताच्या मनात वसत असते, कोण जाणे ! पण त्याला निर्मितीचा निर्भय, निर्हेतुक आनंद लाभतो एवढे मात्र निश्चित.''

कुसुमावतींना माणूस हा विश्वरचनेच्या साखळीतील बुद्धिवादी कडी असल्यामुळे तो त्याचा एक भाग आहे, साधन आहे आणि प्रगतीच्या दृष्टीने तोच आधारही आहे हे सांगायचे असल्यामुळेच कलावंत म्हणून लेखकाची जबाबदारी फार मोठी आहे हेच अधोरेखित करावयाचे आहे. म्हणूनच त्या कवितेत 'सामाजिक महत्त्व' आणण्यावर भर देतात व ''युगाच्या निर्मितीला पोषक अशी गतिमान, उत्कट व प्रभावशाली वृत्ती निर्माण करणे हेच कवीचे कार्य मानतात. म्हणूनच त्यांच्या वाङ्मयात तरल संवेदनक्षमता दिसते, सौंदर्याविषयीची ओढ दिसते ज्यांना चिंतनशीलतेचे अस्तर आहे.

कुसुमावती आधी निर्मितिशील कलावंत आहेत व नंतर रसज्ञ समीक्षक आहेत. कवी, ललित लेखक आणि समीक्षक यांचे नाते ताणाचेच असते. पण वाङ्मयसमीक्षक हाही वाङ्मनिर्माताच आहे ही भूमिका घेतली तर कुसुमावतींची वाङ्मयीन दृष्टी अधिक चांगली लक्षात येईल. जुजबी अभिप्राय ही समीक्षा नव्हे. Criticism म्हणजे सम + ईक्ष म्हणजे सर्वांगीण दृष्टीक्षेप होय. या समीक्षेला अर्थनिर्णय करणे भाग आहे. 'रसिकत्वीहि परतत्त्व, स्पर्शु जैसा' यातही सर्जनशीलतेला महत्त्व आहे. डॉ. मा. गो. देशमुख यावर चर्चा करताना म्हणाले होते की 'शाकुंतल' हा जसा महाकवी कालिदासाचा सर्जनशील प्रतिभेचा विलास आहे त्याप्रमाणे गुरुदेवांचा 'शाकुंतला' वरील प्रबंध म्हणजे त्यांच्या सर्जनशील

प्रतिभेचाच पैलू नव्हे काय ?''

मला कुसुमावतींच्या अर्थनिर्णयात हीच सर्जनशील प्रतिभाच दिसते. म्हणूनच त्यांची समीक्षा ही कलाकृतीच्या अंतरंगात शिरते आणि असली काय व नकली काय त्याचा निर्णय देते.

'कला आणि कृत्रिमता' या त्यांच्या लेखात त्यांनी जिव्हाळा नसलेल्या व जीवनाशी समरस न झालेल्या 'कारागिरां' विषयी नोंदवून ठेवलेले आहे. ''दिसावयाला विषय मात्र लोकजीवनातला, पण त्याची मांडणी जीवनाविन्मुख अशा कल्पनाविलासावर उभारलेली पासंग आ.१ पृ.३६ असे त्यांच्या 'नकली' कृतीचे स्वरूप असते. कुसुमावती तिथेच नोंदवतात. ''तेव्हा प्रतीती हाच कलेचा आत्मा होय. कलावंताने प्रथम आपले हृदय विशाल केले पाहिजे. (तत्रैव पृ. ९७)

कुसुमावतींची समीक्षा ही 'पासंगप्रक्रिया' आहे ती या अर्थाने. व्यापक अनुभूती व बुद्धी आणि भावना यांच्या ऐक्यातून साधला गेलेला समतोल यातून त्यांची समीक्षा उद्‌भवते. त्यांची अभिरुचीच त्यांच्या समीक्षेला खरा आकार देते. त्यामुळे ती अभिनिवेशी नाही तर निःपक्षपाती आहे. ती भूमिका विचारवंताची आहे पण त्यात चिंतनशीलतेला प्राधान्य आहे. मूल्यनिष्ठा आणि संस्कृतीचा झरा ओळखणे हे त्यांच्या दृष्टीचे विशेष आहेत.

साहित्याबरोबर समीक्षेची रूपेही बदलत असतात. प्रत्येक समीक्षकाच्या व्यक्तित्वाचा, वृत्तीचा आणि व्यासंगाचाही परिणाम समीक्षेवर होत असतो. कुसुमावतींना समीक्षकांमधील व्यासंगाची उणीवही महत्त्वाची वाटलेली आहे. 'पासंग'च्या दुसऱ्या आवृत्तीमधील 'वाङ्‌मयीन समीक्षेचे निकष' या लेखात सुरुवातीलाच ही उणीव त्या नोंदवतात. समीक्षेचे नीतिकल्पनानुसारी, मानसशास्त्र प्रेरित, समाजशास्त्रनिष्ठ आणि सौंदर्यशास्त्राधिष्ठित असे प्रकार त्या मानतात. नीतिदृष्ट्या संस्कारांची छाननी, मानसशास्त्रीय प्रेरणांच्या आधारे निर्मितीचा विचार, व्यक्तीभोवतालच्या परिस्थितीचा विचार-युगधर्म यांचा विचार तर सौंदर्याचे दर्शन घडवणे हे कलेचे कार्य मानण्याचा विचार अशा त्या समीक्षापद्धती आहेत. मर्ढेकरांनी वाङ्‌मयकृतीला भावात्मक लयांची केंद्रपूर्ण आकृती म्हटले. कुसुमावतीबाई यातूनच निर्माण होणाऱ्या 'समीक्षकांतील मतभेदांचे तीव्र स्वरूप' नोंदवितात. आकलन, आस्वाद व विवरण यातल्या जात मूल्यमापन करणे हा समीक्षेचा धर्म आहे. ''अनुभूतीची झेप, विशालता, सूक्ष्मता व सखोलता, उत्कटता आणि उदारता'' यावरच कृतीची गुणवत्ता ठरते. समीक्षेच्या या कार्यात 'जीवनमूल्यांचा' संबंध येतो. ''सौंदर्य आणि जीवनमूल्ये यांची फारकत केल्यामुळेच अनेक वैचारिक आणि भावनाविषयक आपत्ती उद्‌भवतात'' असे कुसुमावती म्हणतात.(पासंग, ४थी आ. मौज, पृ ९७) मानसशास्त्रीय, सामाजिक आणि अखेर सार्वकालीन जीवनमूल्ये हा समीक्षेच्या प्रक्रियेतील 'तीन पायऱ्यांचा सोपान' आहे असे त्यांचे म्हणणे आहे. (तत्रैव)

काव्याबाबत 'प्रतिमांचे सौंदर्य' 'त्यात कवीने ओतलेल्या आशयावर' अवलंबून असते. प्रतिमा हा विषय नाही, ती साधने आहेत. अनुभूतीचे आकलन हे साध्य. तीत कवीचे 'आत्मशोधन' असते. (तत्रैव पृ. १०३) एक जिवंत मन दुसऱ्या मनाशी संवाद करते त्या 'मनःसंवादातच काव्याची खरी परिपूर्ती होते. (तत्रैव पृ. १०४)

जबलपूरमधील विदर्भ साहित्य संमेलनात १९५२ साली बोलताना कुसुमावतींनी भाषाविचार मांडलेला आहे. भाषेची मूलप्रकृती आमूलाग्र बदलत नाही म्हणून ती त्या समाजाच्या संस्कृतीची सर्वांगीण साठवण करते. असे त्या मांडतात. (तत्रैव पृ. १०७) ''प्रादेशिक संस्कृतीचे सातत्य राखण्याचा पहिला व सर्वश्रेष्ठ मार्ग म्हणजे प्रादेशिक वाङ्‌मयाचे परिशीलन होय. (तत्रैव पृ. १११) कुसुमावतींनी या स्वभाषेचा प्रसार, उत्तेजन व अभिरुचिसंवर्धन ही कामे साहित्यसंस्थांवर सोपविलेली आहेत. त्या एक महत्त्वाचा प्रश्न विचारतात की ''आम्ही अभिरुचीच्या, व्यासंगाच्या, साहित्यास्वादाचा कोणत्या श्रेयस्कर परंपरा पाडल्या आहेत वा कायम ठेवल्या आहेत ?'' कारण मराठीपण जपण्याचा तो महत्त्वाचा मार्ग आहे.

कुसुमावतींच्या कथा आणि ललितनिबंध यांचे दर्शन घडविण्याच्या निमित्ताने रसिकांना त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचेच दर्शन घडवावे लागते. 'लघुकथेचे जीवनतंत्र' या त्यांच्या 'दीपदान' मधील लेखात त्यांनी म्हटले आहे की 'जीवितकोडे सोडवण्यासाठी जास्त समाधानकारक, जास्त विविधतेचा व सत्यस्वरूप असा मार्ग म्हणजे वाङ्‌मयाचे वाचन.'' पुढे त्या स्पष्ट करतात की ही तहान 'लघुकथेला जास्त सहजपणे भागवता येते. लघुकथेच्या बाह्य स्वरूपापेक्षा 'विषयाची निवड' व 'दिग्दर्शित केला जाणारा दृष्टिकोन' त्यांना विचार करण्याजोगा वाटला आहे.त्याठिकाणी वर्डस्वर्थच्या एका उदाहरणाचा उपयोग कुसुमावती करतात. "Of genius the only proof is the act of doing well what is worthy to be done and what was never done before;" of genius in

fine arts, the only infallible sign is the widering of the sphere of human sensibilities, to the deligh, honour and benefit of human nature.

मानवी जीवनात दुःख आहे, पण त्याबरोबरच मानवी हृदयात धडाडी, धैर्यही अपरंपार आहे; परिस्थितीचे चक्रव्यूह अहेत, पण त्याबरोबरच त्यातून वाट काढायला समर्थ अशी कुशाग्र, समतोल बुद्धीही आहे व ही आहेत म्हणून मानवाचे मनुष्यत्व कायम आहे, यातच थोरवी आहे'' (दीपदान पृ. १२२) या संदर्भात 'माउली', 'गवताचे पाते', 'मृगाचा पाऊस' या कथा पाहण्याचा लागतात; म्हणूनच कसुमावतींना 'आल्हाद व गूढता' व्यक्त करणारे दीपदान मोलाचे वाटले. जीवनाचा आल्हादच कुसुमावतींनी दिव्यांसारखा साहित्यप्रवाहात सोडून दिला आहे. जणू जीवनाचे नवे संशोधनच त्या करतात. 'माऊली' मधली सरस्वती पतीच्या दोषांची जाणीव होऊनही घर सोडत नाही ती दुबळी म्हणून नव्हे. ती म्हणते '' या घराचे ते मालक खरे; पण तिकंच हेही खरं ना की मी मालकीण आहे. मग त्यांनी एक भलता मार्ग धरला, म्हणून सर्व सत्ता त्यांचे हाती देऊन मी पळ काय म्हणून काढावा. (दीपदान पृ. ३०, उषा प्रकाशन, औंध मे १९४१)

भीरुतेला निरोप हे महत्त्वाचे स्त्रीस्वभावतत्त्व इथे साकारते. सासूबाईंचे गावमाउलीपण पत्करणे माणसामाणसांच्या धाग्यांमुळे सरस्वतीला महत्त्वाचे वाटते आहे. कर्तव्यक्षेत्राच्या प्रेमाने ती बांधली गेली आहे.

'सीता' या त्यांच्या कथेतही बलात्कारातून आईपण वाट्याला येणार आहे हे कळलेली सीता गर्भपाताला नकार देते. आपल्या रक्ताने पोसला जाणारा जीव 'माय' म्हणेल आणि आपल्याजवळ राहील हे तिला एकाकीपणातही पुरेसे वाटते आहे.

'विचारशील प्राणी' या 'दीपकळी' तील आशयाचा आकार कथेचा नाही. 'साधारणांच्या जीवनातील अंधार' दिसल्यामुळे आपल्या आयुष्याची व्यर्थता जाणवणारी स्त्री आणि तिचे मनोगत म्हणजे लेखिकेचे मनच जणू. 'निराशेतून' सारखी कथा विवाहित माणसाच्या आकर्षणातून बाहेर पडणाऱ्या मुलीच्या मानससंघर्षाची कथा आहे. कुसुमावती हृदयाचे पावित्र्य आणि दिव्यता मांडता मांडता चाफ्याच्या झाडाचे प्रतीकात्मक दर्शन घडवतात. ''पण त्या फुलांचे प्याले मात्र कधी खाली वाकले नाहीत, इतके प्याले उंचावून ते झाड आकाशाजवळ काय मागत होतं ?'' (दीपकळी, प्रकाशक प्र. श्री कोल्हाटकर, मुंबई, १९३५ पृ. ९४) 'सवंगडी' ही कथा आई आणि बालवयीन मुलगा यांच्या दोस्तीतील नाजुक भाव टिपणारी कथा आहे.

कुसुमावतींच्या ललित लेखनाचा विचार कथांसोबतच करावा लागेल. त्यांचे व्यक्तिमत्त्व चिंतनशील व विवेकी आहे. त्यामुळे आपल्या पिंडधर्मानुसार अनुभूतींचा विचार - विस्तार त्या करतात. मात्र त्यातील भावनेची व सौंदर्याची खोली विलक्षण आहे. म्हणूनच त्यांच्या कथा व्यामिश्र अनुभव आणि जटिलता यांचा आधार घेत नाहीत. भावचिंतनातून आकारणारे क्षण असे त्यांच्या कथेचे रूप आहे. म्हणूनच त्यांचे ललितलेखनही विपरीततेच्या दर्शनानंतरही चिंतनाच्या सखोलतेने त्यावर मात करीत अनुभूतीतील सत्त्व शोधतात. तिथे स्वप्नमयता नाही, वास्तवाचेच एका वेगळ्या कोनातून घडणारे दर्शन आहे. जीवनानुभवाचे निरीक्षण करता करता विलक्षण साधेपणातून त्यांचे दर्शन त्या घडवतात. त्यात कृत्रिम गोष्टींची सजावट नाही, ते ते अनुभव आपल्या स्वधर्मानेच झळाळत आहेत. 'माया' सारख्या कथेतील पोटाची खळगी भरण्यासाठी खोटेपण पांघरून जगणारे जोडपे. 'खोटेपणा करू नये तर जगावं कसं'? या प्रश्नाने आपल्याला घायाळ करते. कारण ते एका वास्तववेदनेचे जिवंत चित्र आहे. म्हणून या अनुभूतींचे रंग गडद नाहीत पण त्यातील खोलवरचे आर्द्रतेचे निनाद ऐकू येतात, विपरीतताही जाणवते. आपल्या सभ्य इस्त्रीच्या जगात वावरतानाही कुसुमावतींनी तळागाळातील सामान्यांची दुःखे इतक्या कोमल हातांनी टिपली आहेत की तीत एक अकृत्रिम जिव्हाळा जाणवावा. कधी सामाजिक तर कधी मानसिक वादळात अडकलेल्या स्त्रीदुःखांना वाचा फोडली गेली आहे. 'चिमणी', 'भय्या' ही तर व्यक्तिचित्रे, शब्दचित्रे अशा गटात मोडणारी ललित कृती. कसुमावतींची कथा ही फक्त अनुभव टिपत नाही. ती तत्संबंधी भावचिंतनही नोंदवते. कथा आणि ललितगद्य यांच्या सरमिसळीतून साकारलेले हे सुवर्णक्षणचित्रण आहे. मराठी कथेला भावचिंतन आणि काव्यात्मतेच्या मार्गाने नेण्याचे कार्य कुसुमावतींनी केले.

माध्यान्ह', 'मध्यरात्र' आणि 'चंद्रास्त' या ललित लेखनातही पूर्णत्वाकडे जाण्याचा मार्ग भावचिंतनातून व निसर्गमग्न मानसबळातूनन प्रकट होताना दिसतो. निसर्ग आणि मानव यांच्या एकरसतेचा तो नवा प्रत्यय होता. कुसुमावती इंग्रजी साहित्याच्या अभ्यासक होत्या. त्यामुळे वर्डस्वर्थसारख्या निसर्गपूजक आणि शेलेसारख्या गूढ सौंदर्यशोधी व्यक्तित्वाचा तो अमिट संस्कार असावा असे वाटते. हेच बीज 'गवताचे पाते' या कथेतही दिसते. निसर्गाचे सौंदर्य अतिशय हळुवारपणे जपतानाच कुसुमावतींनी वास्तवाचे गडद

रंगही दृष्टीतून वगळलेले नाहीत हे लक्षात ठेवावे लागते. १९२५ नंतर ना. सी फडके, वि. स. खांडेकर यांच्या ललितनिबंधातील कृत्रिमतेचा लवलेशही कुसुमावतींच्या ललित लेखनात नाही. आत्मगत काव्यात्मता व क्रांतदर्शी चिंतनशीलतेचे दर्शन त्या लेखनात मिसळलेले आहे. त्या दृष्टीने त्यांची शैलीही लक्षात घ्यावी लागते.

'एकटीच' सारख्या कथेमध्ये गंगाकाकूचे व्यक्तिचित्र येते ते विलक्षण वेगळे होते. हाडाची काडे करणाऱ्या बाईला ना नवऱ्याची सोवत, ना मुलांचा आधार हे स्पष्ट करताना गंगाकाकू म्हणतात ''बिचाऱ्या स्त्रीहृदयाची सारी आस मायेच्या शब्दासाठी'' लेखिकेला हा 'पन्नास वर्षाच्या जीवनातला भकासपणा' महत्त्वाचा वाटतो. (दीपकळी) बाईचे हेच सारे सुखदुःख आणि भोवतालच्या जीवनचक्रात भोवळ येणारे मन सदाशिवराव आणि रमाबाई यांच्यातून 'गवताचे पाते' मध्ये प्रकटते. ''वाऱ्याची झुळूक येई. सर्व पाती बरोबर वाकून एक निःशब्द लय आळवीत, पुन्हा पूर्ववत कसली तरी वाट पाहात उभी राहात.'' हीही एक महापुरात वाचणाऱ्या लव्हाळ्याची, सर्वसामान्याची प्रतिमाच आहे. कवुतरगच्या खुराड्यात राहणे, रोज त्याच त्या भातपोळ्या, दोन महिन्यात दहाव्यांदा येणारी ती भाजी, विचार सुरूच आहेत. सायकल ''लोटांगणे' घालीत चालली होती. ''आम्ही कारकुनांची मुले कारकुनांचेच बाप होणार.'' हाच विचार ''सापाचे विष अंगात भिनले की, निंबाचा पाला कडू लागत नाही. असेच एक प्रकारचे विष सदाशिवरावांच्या मनात भिनले होते.'' कथेतच मिसळत राहणारे हेच ते ललित गद्य.

'माध्यान्ह' सारखा ललित निबंध स्तब्धता, लाही लाही होणारी सृष्टी, कोरडा ठणठणीत उन्हात तळमळणारा रस्ता या वर्णनात सुरू होतो. माध्यान्ह लेखिकेला साध्या भोळ्या वृत्तीत देवताकरणाइतकी आकर्षकता असलेली भासते.. ती शांतीही स्वातंत्र्याची शांती वाटते. कांचनाच्या फांदीवरचे फूल म्हणजे 'एकेका कल्पनावाजाचे मूर्त स्वरूपच' असे दर्शन कुसुमावतींच्या दृष्टीला घडते.

'माध्यान्ही'चे सौंदर्य कुसुमावतींना ''कुठल्याही अतिरंजनाने अदूषित' अशा वास्तविकतेचे रूप वाटते. ''प्रगल्भ हृदयाप्रमणे तिची दुःखे निःशब्द आहेत.

'चंद्रास्त' या ललित निबंधात चंद्रकोर टेकडीआड जातानाची 'विषण्णता' न्याहाळताना 'प्रकाशाचा लोप व जीवनाचा अंत' या कल्पना लेखिकेच्या मनात येतात आणि त्यांच्या चिंतनशील हळुवार कविहृदयात 'डेस्डिमोना' आणि 'इंदुमती' जाग्या होतात. विनाशाचे, अंतिम नयाचे ते तीव्र दर्शन कुसुमावतींना 'अस्वस्थता... हुरहूर' देऊन जाते. लेखिकेला वाटते आपले सारे मानवतेचे पाश गळून पडतात, एका अनिर्वचनीयतेने अपरिहार्यांना धीराने तोंड देणाऱ्या सौंदर्याचे ते दर्शन असते.

'चंद्रास्त' वाचता वाचता ऐन उमेदीत, उमलत अधिक पूर्ण होणाऱ्या चंद्रिकेची जागा कुसुमावतींची आकृतीच घेऊ लागते.

'मराठी कादंबरी पहिले शतक (१८५० - १९५०)' (मुंबई मराठी साहित्य संघ प्रकाशन, पहिली आवृत्ती १९५३, १९५४) हा कुसुमावतींचा ग्रंथ उदंड व्यासंग, चतुरस्त्र दृष्टी व तीक्ष्ण समीक्षाशक्ती यांचाच प्रत्यय आहे. कादंबरीच्या उत्क्रांतीतील ठळक टप्पे आणि नजरेत भरणाऱ्या कृती यांचेच हे चित्र आहे मात्र त्यात दृष्टीची समग्रता आहे. कुसुमावतींनी वाचकाच्या अनुभूतीचे क्षेत्र वाढणे, सहानुभूतीचा विकास होईल हे गृहीत धरून त्या त्या कलाकृतीत मनःशक्तींना संवेदना, विचार, कल्पना उस्फूर्त करण्याचे किती सामर्थ्य आहे त्यातूनच मूल्यमापन केलेले दिसते. हरी नारायणांचे वास्तव व मूलग्राही विश्लेषण, यमूशी झालेले त्यांचे तादात्म्य, व त्यातून जीवनसाक्षात्कार यांनाच त्या महत्त्व देतात. व्यक्तिचित्रण व जीवनदर्शन यांचा संयोग घडवून आणण्याची शक्ती तादात्म्यातच आहे हे त्या मांडतात म्हणूनच वामन मल्हारांची निर्मिती त्यांना 'कमी भरदार, कमी जिवंत व जास्त पुस्तकी' वाटते (आ. २री, १९७५, पृ. १३८) डॉ. केतकरांवर भाष्य करताना त्यांनी साधारणतः सामान्य जीवनाच्या चित्रणाकडे लक्ष दिले नाही. अपवादात्मक जीवन रंगवले असे निरीक्षण कुसुमावती नोंदवतात. ''विकट सामाजिक प्रश्नांची गुंतागुंत ज्या व्यक्तींच्या जीवनात निर्माण होते त्यांच्या विचारांचे व कृतींचे विश्लेषण करणे त्या विचारांचा व कृतींचा भोवतालच्या परिस्थितीशी असलेला सापेक्ष संबंध शोधून त्याचे दिग्दर्शन करणे हा त्यांच्या लेखनाचा प्रमुख हेतू. (तत्रैव पृ. १५३)

ना. सी. फडक्यांचे आगमन सूचित करतानाच लेखिकेने मामा वरेरकरांच्या कादंबरीचे मूल्यमापन केले आहे. त्या म्हणतात ''फडके यांच्या 'जादूगार' व 'दौलत' या कादंबऱ्या अनुक्रमे १९२७ - १९२९ मध्ये प्रसिद्ध झाल्या व हळूहळू महाराष्ट्रातील सुबुद्ध वाचकांचा एक फार मोठा वर्ग साखरझोपेतील स्वप्नात दंग होऊ लागला. या पलायनवृत्तीच्या काळात वरेरकरांनी वास्तववादाचे निशाण फडकते ठेवले. जीवनाचे निरीक्षण. निरूपण व उन्नयन करण्याच्या कार्यापासून मराठी कादंबरीला त्यांनी परावृत्त होऊ दिले

नाही.'' (तत्रैव पृ. १७४) पु. य. देशपांडे यांच्या निर्मितीतील 'विस्कळीतपणा व विकलता' यावर बोट ठेवून 'कठोर वस्तुनिष्ठेचे अनुशासन लाभले असते तर मराठी कादंबरीला एक फार थोर कलावंत लाभला असता.'' असे त्या स्पष्ट करतात. (तत्रैव पृ. २२८)

वि. स. खांडेकरांबद्दल विवेचन करताना ''एका परीने फडक्यांच्या भूमिकेशी विरोध व दुसऱ्या तऱ्हेने फडक्यांच्या कलेतील काही विशेषांच्या स्वीकरण्याचा प्रयत्न'' यामुळे एकसंधता निर्माण होत नाही असा स्पष्ट निष्कर्ष कुसुमावती काढतात. ग. त्र्यं. माडखोलकरांबद्दल बोलताना ''कामुकतेचा औचित्यविहीन आविष्कार, स्त्रियांची भडक वर्णने'' यावर त्या स्पष्ट आक्षेप घेतात. पण 'चंदनवाडी' कादंबरीत 'उच्चांक गाठला' असेही स्पष्ट करतात. स्त्रियांच्या अभिव्यक्तीत विभावरी शिरूरकर व गीता साने या दोन लेखिकांची 'निर्मिती उठून दिसते' (तत्रैव पृ. २९५) असा त्यांचा अभिप्राय आहे.

श्री. ना पेंडसे यांच्या कादंबरीच्या स्वागताने हा ग्रंथ शेवटास गेलेला आहे. अनुभूतीचा जिव्हाळा हा त्यांचा विशेष आहे असे लेखिकेला वाटते. व्यक्तिकेंद्रिततेपक्षा मनःसामर्थ्य व परिस्थितीची भीषणता अशी 'सम्यक्प्रतीती' कुसुमावती मोलाची मानतात. ''माणसाच्या अंतःकरणाविषयी सहृदय समज व मानवी जीवनाविषयी व्यापक, सुजाण व सुसंगत दृष्टिकोण हे आजच्या कादंबरीकाराला अवश्य असणारे निदानीचे गुण आहेत.'' (तत्रैव पृ. ३४३) हा त्यांचा अभिप्राय विलक्षण बोलका आहे.

साहित्याच्या सूक्ष्म आवाहनाचा हा प्रत्यय आहे. विशालतेबरोबर सूक्ष्मता, उत्कटतेबरोबर सखोलता यावर कुसुमावती भर देतात. सौंदर्य आणि जीवनमूल्ये यात तफावत न करता कलाकृतीला समर्थ करणे त्यांना मोलाचे वाटले आहे. मानवी मनाला आकुंचित, क्षुद्रवृत्ती बनवू न देणे हे त्यांना साहित्याचे महत्त्वाचे कार्य वाटते.

कुसुमावतींचा हा ग्रंथ म्हणजे आधुनिक मराठी वाङ्मयेतिहासाचा एक महत्त्वपूर्ण भागच आहे. वैचारिक प्रवृत्तींचे विवेचन हा वाङ्मयेतिहासाचा आत्मा असतो. इतिहासाची दृष्टी केवळ सनावळी व नामावळी यावर केंद्रित होत नाही ती जंत्री नव्हे. वाङ्मयाचा इतिहास हा एक स्वतंत्र साहित्यप्रकार आहे. लेखकाच्या व्यक्तित्वसमृद्धीवर आणि व्यासंगावर त्याचे खरे स्वरूप अवलंबून असते. वाङ्मयेतिहास अलिप्ततेने लिहिला गेला तर तो वाङ्मयप्रकार ठरणार नाही आणि आत्मपर झाला तर तो एकारला जाईल. त्यामुळे आत्मनेपद व परस्मैपद यांचा योग्य समन्वय त्यात व्हावा लागतो. मुख्य म्हणजे सम्यक्दर्शन. हा वाङ्मयेतिहासाचा उल्लेखनीय गुण असावा लागतो. वाङ्मयाचा इतिहास हा असा सर्जनशील व विकासशील वाङ्मयकृती असतो. कुसुमावतींच्या 'मराठी कादंबरीचे पहिले शतक' या ग्रंथाने वाङ्मयेतिहासाचे एक त्रुटित तरीही योग्य असे रूप आपल्यापुढे ठेवले आहे. असे वेगवेगळ्या वाङ्मयप्रकारांचे इतिहास सिद्ध होणेही वाङ्मयसंसाराच्या वाढीच्या दृष्टीने आवश्यक मानावे लागेल. `A History of Marathi literature' या ग्रंथाचे पूर्वरूपही त्यांनी सिद्ध करून ठेवले होते ते पुढे म. वि. राजाध्यक्षांनी पूर्ण केले व साहित्य अकादमीने १९८८ साली प्रसिद्ध केले.

लहान लहान कथा, तीन ललित निबंध, एक समीक्षालेखसंग्रह, एका वाङ्मयप्रकाराचा एका शतकाचा इतिहास एवढाच लेखनप्रपंच करून एका 'दीपकळी'ने वाङ्मयवृत्तीचा वसा वाटत वाटत एक अभूतपूर्व 'दीपदान' करून ठेवले आहे. त्याचा वेध घेणे म्हणजे एक शिवधनुष्य पेलणेच होय. तसा प्रयत्न करण्याची संधी मला विदर्भ साहित्य संघाने दिली म्हणून मी त्यांची ऋणी आहे.

- डॉ. आशा सावदेकर

२५५ / व, दक्षिण अंबाझरी मार्ग, लक्ष्मीनगर, नागपूर - २२

फोन २२२९४९९

❑❑❑

अभिनंदन

७८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य समेलनाच्या अध्यक्षपदी ख्यातनाम कवी, कथालेखक व समीक्षक प्रा. केशव मेश्राम यांची अविरोध निवड झाल्याबद्दल 'युगवाणी'तर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन !

अनुक्रमणिका

कुसुमावतीबाईंची कांदबरीकडे पाहण्याची दृष्टी

डॉ. किशोर सानप

आपण मराठीत जिला कादंबरी म्हणतो तिला इंग्रजीत फिक्शन म्हटले जाते. फिक्शन म्हणजे काल्पनिक प्रतिसृष्टी निर्माण करणे होय. कांदबरीकार काल्पनिक प्रतिसृष्टीचा निर्माता असतो. वास्तव व अद्‌भुताचे एकजीव रसायन सत्यनिष्टेने कादंबरीत आविष्कृत करणे आवश्यक असते. फिल्डिंगने कादंबरीस 'महाकाव्य' ही संज्ञा दिली. महाकाव्याप्रमाणेच कादंबरीतही एखाद्या देशाच्या किंवा लोकसमुदायाच्या सामाजिक जीवनाचा, रूढींचा, परंपरांचा चित्रपट असावा असे फिल्डिंगला वाटत होते. महाकाव्य हे जसे सर्वव्यापक पद्य असते तसेच कादंबरी हे सर्वव्यापक गद्य असते असा फरक दोन्ही वाङ्मय प्रकारात करता येईल. प्राचीन काळात जसे महाकाव्याला महत्त्व होते तसेच आधुनिक कालखंडात कादंबरीला महत्त्व प्राप्त झाले. कादंबरीचा केवळ समाजाच्याच नव्हे तर देशाच्याही एकूणच जीवनावर मोठा परिणाम होत असतो, ही बाब इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी मराठी कादंबरीच्या अगदी प्रारंभपर्वातच व्यक्त केली होती. ''जेव्हा जेव्हा एखादे राष्ट्र जगाच्या रंगभूमीवर प्रमुख पात्राचे काम करण्याचे अवसान दाखविते, तेव्हा तेव्हा त्या अवसानाचे सूचक, दर्शक व प्रोत्साहक असे शब्द कोणत्या ना कोणत्या तरी रूपाने त्या राष्ट्रातील ग्रंथकारांच्या लेखणीतून व तोंडांतून पडतात.''१ कुसुमावती देशपांडे यांनी कादंबरीचा समावेश अभिजात कलेत केलेला आहे. केवळ मनोविनोदन किंवा उद्दीपन हाच केवळ अभिजात कलेचा मुख्य हेतू नसतो तर,''अभिजात कला मानवी मनाच्या सर्व प्रवृत्तींना साकल्याने आवाहन करते. मानवी संवेदना, विचारशक्ती, कल्पना व संकल्प या सर्वांना ती जागविते. कोणत्याही कलाकृतीत या सर्व मनःशक्तींना उत्स्फूर्त करण्याचे किती सामर्थ्य आहे, यावरून तिचे अंतिम मूल्य ठरविले जाते. २ कुसुमावतीबाईंचा कादंबरीकडे पाहण्याचा मूळ दृष्टिकोण हा निखळ मानवतावादी होता, हे आधी लक्षात घ्यावे लागते.

आधुनिक मराठी कादंबरीचा जन्म

प्राचीन कथावाङ्मयाशी कादंबरीचा संबंध आहे, असा निर्वाळा जवळपास सर्वच कादंबरीच्या अभ्यासकांनी दिला आहे. पुराणे आणि इतिहासातून कादंबरीची बीजे सापडतात याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. आज आपल्यासमोर कादंबरीची एक निश्चित संकल्पना आहे. हळूहळू कादंबरीची संकल्पना आणि रूपबंधाची समज विकसित होत गेली. इ. स. १७४९ मध्ये फील्डिंगने 'टॉम् जोन्स्' ही कादंबरी लिहिली आणि आधुनिक कादंबरीचा जन्म झाला. आधुनिक कादंबरीचा एकूणच इतिहास हा अडीचशे तीनशे वर्षाच्या आसपासचा आहे. जगात जेव्हा स्वतंत्रपणे कादंबरीचे गद्य लिहिले जात होते तेव्हा मराठीत इंग्रजी कथा - कादंबऱ्यांच्या भाषांतराची लाट उसळली होती. बनियनच्या 'पिल्‌ग्रिम्स प्रोग्रेस' (१६७८) या ग्रंथाचे मराठीत इ. स. १८४१ मध्ये हरि केशवजींनी 'यांत्रिकक्रमण' या नावाने भाषांतर केले. कादंबरी हे नाव ज्याला शोभून दिसेल असा हा पहिला मराठी ग्रंथ असल्याचे मत कुसुमावती देशपांडे यांनी मांडले आहे. सोबतच त्यांनी तीव्र शब्दात आपली नाराजीही व्यक्त केली आहे. ''हे भाषांतर सरस उतरले असले तरी मूळ पुस्तकाचे वातावरण, वृत्ती व आशय सर्वच महाराष्ट्रधर्माला व महाराष्ट्र समाजाला परके त्यामुळे मराठी लिहिण्याचा व मराठी

ग्रंथसंपत्ती निर्माण करण्याचा एक बुद्धिपुरस्सर प्रयत्न यापेक्षा जास्त महत्त्व या पुस्तकाला मिळणे कठीण आहे. (३)

कादंबरीच्या मीमांसकांची परंपरा

मराठीतील भाषांतरित आणि स्वतंत्र कादंबऱ्यांचा कालखंड लक्षात घेतला तर केवळ दीडशे वर्षाच्या आसपासची आधुनिक मराठी कादंबरीला परंपरा आहे. इतिहास आहे. दीडशे वर्षाच्या ह्या लहानशा कालखंडातही मराठी कादंबरीने आशय आणि रूपाच्या संदर्भात निरनिराळी वळणे घेतल्याचे दिसते. कांदबरीच्या विकसनाच्या वेगवेगळ्या टप्प्यावर कादंबरीच्या अभ्यासकांनी मराठी कादंबरीकारांची कानउघाडणी करून कादंबरीच्या विकासाला हातभार लावणारा थोडा बहुत सल्लाही दिलेला आहे. मराठी कादंबरीची चिकित्सा करणारी आणि कादंबरीच्या संकल्पनांचा वेध घेणारी काही चांगली पुस्तकेही मराठीत प्रकाशित झाली. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, ल. ग. जोग, दंडवते, रा. श्री. जोग, प्रा. बापट आणि प्रा. गोडबोले, द. वा. पोतदार, कुसुमावती देशपांडे , नरहर कुरूंदकर, उषा हस्तक वगैरे मीमांसकांनी अत्यंत आस्थेवाईकपणे मराठी कादंबरीचा परामर्श घेतला आहे. या परामर्शाचे स्वरूप वहुतांशी आस्वादपरच होते.

इ. स. १८७२ मध्ये का. वा. मराठ्यांनी लिहिलेला नावल आणि नाटक, इ. स. १९०२ मध्ये वि. का.रावाड्यांनी लिहिलेला कादंबरी आणि इ. स. १९८० मध्ये भालचंद्र नेमाड्यांनी लिहिलेला मराठी कादंबरी : प्रेरणा व स्वरूप हे तिन्ही लेख मराठी कादंबरीच्या समीक्षाक्षेत्रात मौलिक योगदान देणारे ठरले आहेत. शिवाय मराठी कादंबरीवावतच्या विविध वादांचा, समस्यांचा, आशय आणि रूपबंधांचाही मूलभूत विचार ह्या मीमांसकांनी केल्यामुळे ह्या लेखनाला ऐतिहासिक आणि वाङ्मयदृष्ट्या सैद्धांतिक असे स्वरूप प्राप्त झाले आहे. कुसुमावतीबाईंचे कादंबरीच्या पहिल्या शतकाचे लेखन आस्वादपर असले तरी त्यामागे सामाजिक आणि मानवतावादी दृष्टिकोण होता, ही बाब महत्त्वाची मानावी लागते. उपरोक्त मीमांसकांनी आपापल्या कालखंडातल्या कादंबऱ्यांची चिकित्सा करीत मराठी कादंबरीचा जागतिक कादंबरी वाङ्मयाच्या संदर्भात विचार केला. मराठी कादंबरी ही मुळातच इंग्रजी कादंबरीचा अवतार असल्यामुळे अस्सल देशी अशा जुन्या कथावाङ्मयासारख्याही कादंबऱ्या दीडशे वर्षात मराठी कादंबरीकारांना निर्माण करता आल्या नाहीत, अशी खंत ह्या मीमांसकांनी व्यक्त केली. कादंबरीच्या विकासाची कळकळ त्यांच्या लेखनातून व्यक्त होत असतानाच मराठी कादंबरीचे आशादायक भवितव्य त्यांनी पाहिले होते. परंतु मराठी कादंबरीकारांचा सुरुवातीपासून सुरू असलेला सांकल्पनिक गोंधळ आणि धिंगाणा अजूनही पुरेसा आटोक्यात आल्याचे दिसत नाही. एकूणच मराठी कादंबरीचा आधुनिक इतिहास हा असमाधानकारक असल्याचा निर्वाळा, कादंबरीच्या बहुतांश मीमांसकांनी आजवर दिलेला आहे. याच मीमांसकांच्या परंपरेत कुसुमावतीबाईंचाही उल्लेख करावा लागतो.

संस्कृतच्या अमर वैभवाची आठवण

का. बा. मराठे न्यायाधीश होते म्हणून त्यांची कादंबरीकडे पाहण्याची दृष्टी न्यायनिष्ठूर होती. त्यांच्या समोर एकूण २५ वर्षांचा कालखंड होता आणि या कालखंडात कादंबरीचा मुख्य हेतू; मनोविनोदन आणि केवळ सुखवस्तू खुशालचेंडू अशा वतनदारांची व मध्यमवर्गीयांची करमणूक करणे हा होता. इंग्रजांच्या गुलामगिरीत मराठी भाषेचा न्यूनगंड जोपासणाऱ्या सुशिक्षित समाजाला इंग्रजी ही वाघिणीचे दूध वाटत होती. कावांनी पहिल्या पंचवीस वर्षात चांदोबांच्या गोष्टींसारख्या कादंबऱ्या लिहिणाऱ्या मुक्तामाला परंपरेतील कादंबरीकारांची कानऊघाडणी केली तरी मात्र त्याचा पुढच्या पंचवीस वर्षात मराठी कादंबरी लिहिणाऱ्यांवर कोणताही परिणाम झाला नाही. वि. का. राजवाडे हे इतिहास संशोधक आणि चतुरस्त्र विद्वान गृहस्थ होते. त्यांनी आत्यंतिक उपहासगर्भ शैलीत मुक्तामाला परंपरेतल्या नावलांची कीड पसरवणाऱ्या कांदवरीकारांवर आणि तत्कालीन खुशालचेंडू मध्यमवर्गीय वाचकांवर, कठोर प्रहार करून मराठी कादंवरीला वळण लावण्याचा प्रयत्न केला. एकट्या हरिभाऊ आपट्यांनी राजवाड्यांच्या देशीय कादंवरीच्या अपेक्षा काहीशा पूर्ण केल्या. परंतु मराठी कादंबरीचे रंजनवादी आणि अद्भुत वळण मात्र त्यांनाही वदलता आले नाही. सन् १८४० ते १८६० पर्यंतचा महाराष्ट्रातील बहुतेक सर्व समाज हा किंकर्तव्यमूढ होता. कादंबऱ्यांचा मुख्य वाचकवर्ग म्हटला म्हणजे मराठे संस्थानिक, जहागिरदार व इनामदार लोक होते. हे बडे सुखवस्तू, ऐदी, खुशालचंद आणि निष्काम लोक होते. लक्ष्मणशास्त्री हळबेंसारखे मुक्तामालाकार खंडेराव गायकवाडांकडून वर्षासने मिळवून कादंबऱ्या लिहीत होते.(४) पहिल्या पन्नास वर्षातल्या कादंबरीकारांत प्रामुख्याने लक्ष्मण मोरेश्वरशास्त्री हळबे (मुक्तामाला १८६१, रत्नप्रभा १८६६), नारो सदाशिव रिसबुड (मंजुघोषा १८६८, विश्वासराव १८७०, वसंतकोकिला १८७६), रा. भि, गुंजीकर (मोचनगड १८६७) या तीन कादंवरीकारांचा जबरदस्त प्रभाव होता आणि या कालखंडात मुक्तामाला प्रवृत्ती वळावली. कावांनी या कालखंडातल्या कादंबऱ्यांना नावलांची कीड म्हटले तर विकांनी अद्भुताचे खुरटे पीक अशी टीका केली. कुसुमावतीबाईंनी मात्र हळव्या शब्दात आपली नाराजी प्रकट करीत कालखंड, वाचक, अभिरुची, कांदवरीकरांची लाचारी, मागणी तसा पुरवठ्याचा आर्थिक नियम हे सर्वच या कालखंडाचे विशेष लक्षात घेऊन आणि या कादंबरीकारांनी आपल्या प्रस्तावनेत

नमूद केलेल्या बोधवादाला भुलून, ह्या रंजनवादी कादंबऱ्यांच्या परंपरेची अनिवार्यता मानली. कालसुसंगत बाब मानली.

लहान मुलांसाठी असलेल्या नीतिकथा आणि मोठ्यांसाठी लिहिल्या गेलेल्या करमणूकप्रधान रंजनवादी अद्भुत कादंबऱ्या यातला भेद कुसुमावतीबाईंनी लक्षात घेतला नाही. ह्या नावलांची कीड आणि अद्भुताच्या खुरट्या पिकातूनही कुसुमावतीबाईंनी बोधप्रधानता हाच या कादंबऱ्यांचा विशेष मानला आणि त्यातूनही त्यांच्या हळव्या मानवतावादी दृष्टीला गांभीर्य जाणवले. ''या कथांच्या लेखकांनी बालिश वृत्तीच्या मनोविनोदनाच्या पलीकडे एक कार्य मात्र निश्चितपणे साधले व ते म्हणजे मराठी भाषेच्या पोषणाचे. संस्कृताच्या अमर वैभवाची त्यांनी मराठीला आठवण दिली व इंग्रजीच्या आक्रमणाच्या कठीण काळात मराठी भाषेच्या त्या मूलस्त्रोताची जपणूक केली. (५) कुसुमावतीबाईंना हळबे, रिसबुड, गुंजीकरादी कादंबरीकारांनी संस्कृतभाषा आणि अलंकारांचा मराठीसदृश्य वापर केल्याचे कौतुक वाटले. कालिदास, भवभूतीशी ह्या कादंबरीकारांची तुलना त्यांना करावीशी वाटली असावी. उलट ह्या कादंबऱ्यांतली मराठी ही किती भिकार होती याचा एकच मासला न्यायाधीश का. बा. मराठे यांनी दिला तो पाहा, नारो सदाशिव रिसबुडांच्या मंजुघोषा कादंबरीत मंजुघोषेचा म्हातारा बाप आपल्या बायकोवर रागावतो तेव्हा तो म्हणतो, ''माझ्या इष्ट कन्येने नृपश्रेष्ठ कुमारास शिष्टजनही संतुष्ट होऊन ज्यास मान तुकवतील अशा अष्टविवाहातील वरिष्ठ गांधर्वविवाह करून वरून यथेष्ट सुखोपभोगानुभव घेणार, तो या दुष्टमती भ्रष्ट स्त्रीने केवळ एकनिष्ठ सापत्न व मत्सर भावाने तिजवर महारिष्ट आणावे असा हेतु धारण करूनच माझे मनात तिजविषयी क्लिष्ट कल्पना भरवून रुष्ट अंतःकरणाने तिजला नाना कष्ट भोगावयास लावून नष्ट दशेस लाविले हे स्पष्ट आहे.''(६)

या लांबपल्ल्याच्या एकवाक्यी संस्कृतप्रचुर शब्दयोजनेवर काबा म्हणतात, ''काय 'ष्ट' कारांची गर्दी ! हे खष्ट वाक्य ऐकिल्यावर ज्यास वाद इष्ट आहे तो असे म्हणेल की असल्या रागाच्या अप्लिष्ट प्रसंगी महिष्ट व गरिष्ट शब्दांचे साधिष्ट काम नाही. त्या संतापलेल्या म्हाताऱ्याला इतके ष्टकारयुक्त शब्द कसे आठवले कोण जाणे.''(७) तात्पर्य असे की काबा आणि विकांच्या तुलनेत कुसुमावतीबाईंचा ह्या पहिल्या शतकातील कादंबऱ्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोण सहानुभूतीचा होता.

सविकल्प समाधी आणि कादंबरीकाराचे तादात्म्य

न. चि. केळकरांच्या सविकल्प समाधी या उपपत्तीवर वामन मल्हार जोशींनी साक्षेपी टीका केली. कुसुमावतीबाईंनी मात्र केळकरांचा पक्ष घेतला. सविकल्प समाधीशिवाय लेखकाच्या लेखनात उच्चदर्जाचे जीवनदर्शन आणि व्यक्तिचित्रण असंभव असते, असा निष्कर्षच कुसुमावतीबाईंनी अधोरेखित केला. कुसुमावतीबाईंचा साहित्याकडे पाहण्याचा दृष्टिकोण जीवनवादी आणि मानवतावादी होता. लेखनप्रक्रियेत लेखकाचे तादात्म्य त्यांनी महत्त्वाचे मानले. कादंबरीतील जीवनविषयक जाणीव मानवतावादी दृष्टीनेच व्यक्त झाली पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. ''जीवनदर्शन कशामुळे साधत असावे याचा थोडा विचार केला तर मला वाटते, आपल्याला असे दिसून येईल की, कथेतील मुख्य व्यक्तीशी तादात्म्य होण्यावर हे अवलंबून असावे.'' (८) तसेच, ''ज्या कथेमध्ये केवळ मुख्य व्यक्तीशी लेखकाचे तादात्म्य झालेले असते. मुख्य व्यक्तीच्या दृष्टीने लेखकाने जगाकडे, तिच्या संबंधियांकडे पाहिलेले असते, त्या कथेत एक विशेष एकसूत्रता येते. ती बांधीव होते, तिच्या परिणामात उत्कटता येते. तादात्म्य विषयाची अनेकता विशालता निर्माण करते.''(९) मराठीतील हरिभाऊंची 'पण लक्षात कोण घेतो'? व टॉलस्टॉयची 'वॉर अँड पीस' लेखकाच्या मानवतावादी आणि विविधतावादी तादात्म्याची उदाहरणे आहेत, असे कुसुमावतीबाईंनी म्हटले आहे. ना. सी. फडक्यांच्या तांत्रिक टोकळेबाजीवर टीका करतांना कुसुमावतीबाई म्हणतात, ''सुरगाठ, निरगाठ, उकल वगैरे तांत्रिक खटपटींनी युक्तिबाज कादंबऱ्यांची पैदास होत आहे. बऱ्याच कथांमध्ये निमित्तमात्र राजकीय वातावरणात पात्रांचे ठोकळे फिरवले जात आहेत. अशा कलाविषयक ऱ्हासातून आपल्याला जर वर निघायचे असेल तर तादात्म्याच्या तत्त्वाचे आपल्याला स्मरण, चिंतन व पुनरुज्जीवन करणे प्राप्त आहे. (१०)

काबा आणि विकांनी ज्याला सत्य, वास्तव आणि अद्भुताचे मिश्रण म्हटले आहे त्यालाच कुसुमावतीबाईंनी लेखकाच्या मानवतावादी तादात्म्याचा परिणाम म्हटले आहे. सत्य आणि वास्तवाचा विपर्यास त्यांना मान्य नव्हता. भारतीय कलाशास्त्रातील हृदयाकाशातील प्रतिबिंबतत्त्वावर त्यांनी अधिक भर दिल्याचे दिसते. कलावंताच्या मनावर समाजाचे उमटलेले प्रतिबिंब हे कलारूप घेते तेव्हा ते प्रत्यक्षातल्या वास्तवाचेच सत्यसृष्टीतील प्रतिबिंब असते. कलावंतांच्या जाज्वल्यवृत्तीतून आणि मानवतावादी कळवळ्यातून हेच प्रतिबिंब साहित्यकृतीत तादात्म्यातून साकार होते. तादात्म्याविषयी आणि साहित्यातील वास्तवाविषयी इशारा देतांना कुसुमावतीबाई म्हणतात. ''परिस्थितीच्या एखाद्या विशिष्ट प्रकाराशी व एखाद्या व्यक्तीशी समरस होणे, तादात्म्य पावणे म्हणजे आत्मनिष्ठा सोडून जे ऐकले ते लिहिणे किंवा केवळ चर्मचक्षूंनी पाहिले ते चितारणे. हे मात्र नव्हे.'' (११) लेखकाची प्रतिभा जीवनदर्शनाने भारली जाऊन सत्यदर्शनाशी तद्रूप होईल, तेव्हाच त्याला लोकजीवनाचे भव्य स्वरूप जाणवेल. केवळ हातचलाखी करून त्याच्या वाट्याला कारागिरी

येऊ शकते परंतु त्यात कलेची सर्जनशीलता मात्र येणार नाही.

निर्मळ मानवतेपोटीच विशाल व उच्च कलेचा जन्म

ज्या कादंबरीकाराचे व्यक्तिमत्त्व उदार आणि गंभीर मानवतेने ओतप्रोत भरलेले असते त्यालाच केवळ व्यक्तिचित्रण व जीवनदर्शन यांचा संयोग घडवून आणण्याची उच्चतम तादात्म्य स्थिती प्राप्त होते. मानवी जीवनाचा दिलासा, विसावा व स्फूर्तिस्थान असलेली कथनात्मक कला असीम मानवतेशिवाय निर्माण होत नाही. निर्मळ मानवतेच्या पोटीच विशाल व उच्च कलेचा जन्म होतो. अशी मानवता सर्वधर्मातीत असते. सर्वपक्षभेदातीत असते. सर्व राजकीय, आर्थिक वा सामाजिक विचारप्रणालीच्या पलीकडली असते. कुसुमावतीबाईंचा निर्मळ मानवतावादी दृष्टिकोण वरवर अध्यात्मातल्या अलौकिकतावादासारखा वाटत असला तरी त्याचे साधर्म्य राजवाड्यांच्या जाज्वल्यवृत्तीच्या उपपत्तीशी सांगता येते. याच तत्त्वाचा विस्तार करतांना कुसुमावतीबाईंनी कादंबरीकारांसाठी एक सुंदर आचारसंहिताही निर्देशित केली आहे. ''कथालेखकाला जीवनातील विविधतेची चाड बाळगावी लागते. त्याला अनेकांशी समरस व्हावे लागते. थोरांच्या उदारतेबरोबर क्षुद्रांची हीनता समजून घ्यावी लागते. समचित्तपणे सुंदराचा व असुंदराचा स्वीकार करावा लागतो. प्रत्येकाच्या जीवनाविषयी त्याला समज व सहृदयता बाळगावी लागते. तेव्हाच कादंबरीचा पसारा त्याला निर्माण करता येतो.'' १२ कुसुमावतीबाईंनी निर्मळ मानवतावादी कादंबऱ्यांची उदाहरणेही दिलेली आहेत. उदा. हार्डीची 'टेस', टॉलस्टॉयची 'ॲना कॅरेनीना', गॉर्कीची 'आई', शरच्चंद्रांची 'श्रीकांत', हरिभाऊंची 'यशंवतराव खरे'

कादंबरीकार हा पक्षातीत आणि प्रणालीविरहित असावा, अशी कुसुमावतीबाईंची अपेक्षा होती. सर्वच प्रणालींचा आणि जीवनप्रभावित दर्शनाचा परिणाम तटस्थपणे लक्षात घेणारा कादंववरीकार कथात्म लेखनाला न्याय देऊ शकतो. जे प्रणालीने नियमित होतात ते प्रणालिपीडित होतात; एकच पक्षाचे एकाच दृष्टिकोणाचे समर्थन करण्यात ते जीवनदर्शनाला मुकतात. १३ प्रणालिपीडितांपेक्षाही हीन परिस्थिती मानवताशून्य कलावाद्यांची असते, असा महत्त्वपूर्ण निष्कर्ष कुसुमावतीबाईंनी नमूद केला आहे. ''ही मंडळी कशातून मनोविनोदनाचा मार्ग काढतील याचा नेमच नसतो. जगाला जाळणारे प्रश्न, व्यक्तिजीवनाचा चुराडा करणारे प्रश्नदेखील ते घटकाभर करमणुकीसाठी राववून घेतील.''१४

१८५० ते १९५० पर्यंतच्या कालखंडातल्या तंत्रवादी, कलावादी, बोधवादी, रंजनवादी मानवताशून्य कलावाद्यांनी केवळ नावलांची कीड प्रसवली म्हणून कुसुमावतीबाईंनाही कावा आणि विकांप्रमाणेच मराठीत श्रेष्ठ कादंबऱ्याची निर्मिती झाली नाही, असे खेदाने म्हणावे लागले. ह्या मीमांसकांना कादंबरीविषयीचे आपले विवेचन आणि सिद्धांतही, जुन्या कथात्म वाङ्‌मयाची तसेच युरोपातल्या श्रेष्ठ कादंबऱ्यांची उदाहरणे देत स्पष्ट करावे लागले. कादंबरीच्या पहिल्या शतकात एखादादुसरा अपवाद सोडला तर श्रेष्ठ मराठी कादंबऱ्यांची किती वानवा होती ! हे लक्षात येते.

देशी वाङ्‌मय आणि देशी परंपरांची विस्मृती

मराठे आणि राजवाडे यांनी पहिल्यांदा मराठीत देशीय साहित्याचा गौरव करीत देशीवादाची परंपरा मराठीत रुजविण्याचा प्रयत्न केला. विशेषतः राजवाडे तर देशीवादाचे कट्टर पुरस्कर्ते होते. कादंबरी हा साहित्यप्रकार जरी आधुनिक असला तरी त्याचे बीज फार पुरातन आहे, असे जे कुसुमावतीबाईंना विसाव्या शतकाच्या मध्यात जाणवले तेच कावा आणि विकांना तर कादंबरीच्या पहिल्या पन्नास वर्षातच जाणवले होते. रामायण - महाभारतादी कादंबऱ्यांचा अडीच हजार वर्षांपासून भारतीय मनावरील पगडा अजूनही कायम असल्याचा राजवाड्यांचा निष्कर्ष होता. व्यास वाल्मिकींची रामायण महाभारतादी पुराणे, गुणाढ्याची बृहत्कथामंजरी, सोमदेवाचा बृहत्कथासरित्सागर, महानुभावांचे कथाकाव्य, लीळाचरित्र, दृष्टांतपाठादी साहित्य, संत कथाकाव्य; अशी साहित्याची समृद्ध परंपरा असतांनाही आपल्या कादंबरीकारांनी देशीसाहित्यपरंपरांचे भान ठेवले नाही म्हणून कावा आणि विकांनी पहिल्या पन्नास वर्षातील चांदोबांच्या गोष्टी लिहिणाऱ्या कादंबरीकारांवर कठोर टीका केली. इंग्रजी वळणाचे मराठी गद्य लिहिण्याची गरज नव्हती, असे कुसुमावतीबाईंनाही वाटले. आपले देशी जीवन, देशी साहित्य आणि देशी परंपरांना विसरणाऱ्या सुशिक्षित, मध्यमवर्गीय वाचक आणि कादंबरीच्या भव्यतेचं भान नसणाऱ्या महाराष्ट्रीय इंग्रजाळलेल्या कादंबरीकारांवर टीका करताना कुसुमावतीबाई म्हणतात, ''महाराष्ट्राचे दुर्दैव असे की, त्याच्या जवळ बाकी सर्व सामग्री होती तेव्हा मुद्रणकला त्याला अज्ञात होती, आणि मुद्रणकलेचा प्रसार झाला तेव्हा त्याला स्वतःचे स्वतंत्र जीवन राहिले नव्हते व स्वयंस्फूर्त जीवनदृष्टीही उरली नव्हती. त्याला असे वाटू लागले होते की, आपली भाषा आपल्याला येतच नाही. मुद्रणकलेत निष्णात असलेल्या पाश्चात्य पंडितांनी त्याला लेखनकला शिकविण्याचा आव आणला व त्यांच्या आवेशापुढे आपली परंपरा विसरून बऱ्याच मराठी लेखकांनी मान तुकवली. इंग्रजी वळणाचे मराठी गद्य सुरू झाले.''(१५) या एका फटकाऱ्यातच कुसुमावतीबाईंनी मराठी कादंबरीच्या पहिल्या शतकातील इंग्रजाळलेल्या परभृत संपूर्ण मराठी साहित्याची वासलात लावली. शेवटी कावा, विका आणि कुसुमावतीबाईंनी भरणपोषण केलेल्या देशीय परंपरांना आणि देशीय साहित्याला कठोर वास्तववादाची किनार देत, भालचंद्र नेमाडे यांनी विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात देशीय साहित्यातील वास्तववादाचे पुनरुज्जीवन करण्याचा मूलगामी

प्रयत्न केल्याचे दिसून येते.

देशीय साहित्यपरंपरेतून आधुनिक मराठी कादंबरीला आशय आणि रूपबंधाचा समृद्ध विचार करता आला असता आणि जगात अद्वितीय ठराव्या अशा मराठी कादंबऱ्याही निर्माण करता आल्या असत्या, असे कुसुमावतीबाईंना वाटत होते. ''पार्थिव संसाराविषयी आस्था ही कादंबरीची वृत्ती. जीवनाचे कोनेकोपरे चौकसपणे धुंडाळणे, तत्त्वदर्शित्वाचा किंवा अद्‌भुताचा मार्ग धरून मूलतः मानवी प्रश्नांचा विचार करणे हा कादंबरीचा दृष्टिकोण. जीवन सामग्री. ही वृत्ती, हा दृष्टिकोण, हे अनुभव वा कल्पना जिवंत व्यक्तिचित्रांच्या व एका विस्तृत, आकर्षक कथानकाच्या द्वारे व्यक्त करणे ही कादंबरीची पद्धती.'' १६ कादंबरीची ही अंगोपांगे इंग्रजी आक्रमणाच्या पूर्वीच मराठी वाङ्‌मयात निश्चितपणे अस्तित्वात होती, परंतु आमच्या मराठी कादंबरीकारांना मात्र आपल्या ह्या देशीय कादंबरी परंपरेचा पूर्णपणेच विसर पडला होता. कावा, विका, कुसुमावतीबाई आणि आता नेमाडे या कादंबरीच्या मीमांसकांनी मराठी कादंबरीकारांना खडबडून जागे करण्याचा प्रयत्न केला. परंतु झोपेचं सोंग घेणारे मराठी कादंबरीकार आजवरही जागे झाल्याचे काही दिसत नाहीत.

यमुनापर्यटन आणि पण लक्षात कोण घेतो ?

'यमुनापर्यटन' आणि 'पण लक्षात कोण घेतो'? या दोन्ही कादंबऱ्यांचा कुसुमावतीबाईंच्या मनावर जबरदस्त प्रभाव होता. दोन्ही कादंबऱ्यातील नायिका यमुनाच आहेत. दोन्ही कादंबऱ्या नायिकाप्रधान - स्त्रीप्रधान आहेत. दोन्ही कादंबऱ्या समाजसुधारक असलेल्या बाबा पद्‌मनजी आणि समाजसुधारणेविषयी आस्था असलेल्या आणि गोखले - आगरकरांच्या वैचारिक प्रभावात वाढलेल्या हरिभाऊंनी लिहिल्या आहेत. खरेतर काबा, विका, श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांपासून तर बापट गोडबोल्यांपर्यंतच्या कादंबरी - मीमांसकांनी सन् १८५७ मध्येच लिहिलेल्या बाबा पद्‌मनजी यांच्या यमुनापर्यटन या कादंबरीवर घोर अन्याय केला. यमुनापर्यटनचे रूप ख्रिस्त धर्मप्रसारक असल्याचा शिक्का मारून ही कादंबरीच नसल्याचा निर्वाळा दिला. काबा आणि विकांनी तर आपल्या लेखनात यमुनापर्यटनचा साधा उल्लेखही केलेला नाही. लक्ष्मणशास्त्रींची मुक्तामाला (१८६१) हीच मराठीतील पहिली स्वतंत्र कादंबरी मानण्याचा प्रघात होता. कुसुमावतीबाईंच्या निर्मळ मानवतावादी दृष्टीला मात्र यमुनापर्यटन (१९५७) ही मराठीतील पहिली कादंबरी असल्याचे जाणवले. या कादंबरीतील ख्रिस्ती वळणाची भाषा आणि धर्म पुरस्काराबाबत संथपणे नाराजी व्यक्त करीत, या कादंबरीतील वस्तुस्थितीच्या सूक्ष्म व व्यापक अवलोकनात एक नवा मानवतावादी दृष्टिकोण असल्याची ग्वाही, कुसुमावतीबाईंनी दिलेली आहे. कादंबरीतील रचनेचे शैथिल्य हे अशा प्रकारच्या सामाजिक कादंबरीच्या प्रारंभावस्थेत दुर्लक्षित करून, तिच्या निर्मितीमागील कादंबरीकाराची समाजपरिवर्तनाची उत्कट आकांक्षा आणि तळमळ, कुसुमावतीबाईंना मौलिक वाटते. बाबा पद्‌मनजींची यमुनापर्यटन ही पुढच्या सामाजिक कादंबरीचीच नव्हे तर हरिभाऊंच्याही सामाजिक कादंबरीच्या निर्मितीची नांदी ठरली आहे, असे महत्त्वाचे प्रतिपादन कुसुमावतीबाईंनी केलेले आहे.

'पण लक्षात कोण घेतो?' (१८९० - ९३) ही कादंबरी कुसुमावतीबाईंना हरिभाऊंच्या एकूणच कादंबऱ्यात सर्वश्रेष्ठ कादंबरी वाटली. त्यांच्या कथांमध्ये जे सर्व मनःशक्तींना उत्स्फूर्त करण्याचे सामर्थ्य आहे ते अन्य कोणाच्या कृतीत अजून तरी दिसत नाही. हरी नारायणांचे युग हे कादंबरीचे सुवर्णयुग नसले तरी स्वतःच्या निर्मितीत मराठी कादंबरीने उच्चांक गाठला असे अजूनही म्हणता येईल. आपल्या मानवतापूर्ण आणि केवळ मानवतेनेच भारलेल्या वृत्तीशी वाचकाला हरिभाऊंनी तल्लीन केले आहे. यमूच्या मनातील बदल, तिच्या वृत्तीचा विकास लक्षात घेता, यमूची स्वभावरेखा ही मराठीतली पहिली गतिशील स्वभावरेखा आहे, असे कुसुमावतीबाईंना वाटले. १७ कुसुमावतीबाईंना ह्या दोन्ही कादंबऱ्या सर्वाधिक भावल्या होत्या.'' समाजपरिवर्तनाबद्दल उत्कट आकांक्षा, सहृदयता व भाषेची अनलंकृत सरलता या सर्व गोष्टींत बाबा पद्‌मनजींची यमुनापर्यटन ही कादंबरी म्हणजे हरी नारायण आपट्यांच्या वाङ्‌मयकृतीचे पूर्वचिन्ह होय.'' १८ असा अभिप्राय व्यक्त करून कुसुमावतीबाईंनी आपल्या सजग स्त्रीवादी दृष्टीची आणि निर्मळ मानवतावादी दृष्टीचीही साक्ष नोंदविली आहे.

कादंबरीच्या पहिल्या शतकाची मीमांसा

कुसुमावतीबाईंनी पाच वर्ष खपून मराठी कादंबरीच्या पहिल्या शतकाचा आढावा घेणारा ग्रंथ दोन भागात सिद्ध केला आहे. सन् १८५० पासून तर १९५० पर्यंत त्यांनी कादंबरीचा चिकित्सक अभ्यास केला. अर्थातच या अभ्यासामागे त्यांचा दृष्टिकोण हा निर्मळ मानवतावादाचा होता. न. र. फाटकांनी या लेखनाला वृत्तान्तविवेचन म्हटले आहे. परंतु कुसुमावतीबाईंच्या ह्या लेखनाचे स्वरूप आढावा आणि वृत्तांतविवेचनापेक्षा काहीसे वरचे आहे. शंभर वर्षातील मौलिक कादंबरीकारांचा तत्कालीन परिस्थिती, वाचकवर्ग व लेखकाचा व्यक्तिधर्म तसेच वृत्तिविशेषांचा साक्षेपी विचार त्यांनी केला आहे. उदंड व्यासंग, चतुरस्त्र दृष्टी व तीक्ष्ण समीक्षाशक्तीचा प्रत्यय त्यांच्या लेखनातून येतो.

सन् १८५० ते १९०० या पहिल्या पन्नास वर्षातील मराठी कादंबऱ्यांचा विचार करतांना त्यांनी मुक्तामाला परंपरेतील अद्‌भुत कादंबऱ्या, भाषांतरित कादंबऱ्या, ऐतिहासिक कादंबऱ्या तसेच सामाजिक कादंबऱ्यांचा विचार करतांना हरिभाऊ, वामन मल्हार,

अनुक्रमणिका

[illegible] प्रवर्तक कादंबरीकार असल्याची नोंद केली आहे. [illegible] कादंबऱ्यांचा सापेक्ष विचार करूनच. एकूण पहिल्या [illegible] मधील कादंबऱ्यांवर इंग्रजी, फारसी व संस्कृत या तिन्ही [illegible] कथावाङ्मयाचा संस्कार झाल्याचे त्यांनी म्हटले. या [illegible] विविध प्रवृत्ती स्पष्ट करतांना, ''तिचा एक प्रवाह [illegible], [illegible] व [illegible] होता आणि दुसरा [illegible] सामाजिक [illegible] झालेला होता.'' असे [illegible] त्यांनी मांडले आहे. [illegible] प्रवृत्ती ही [illegible] करणारे असले तर दुसरे प्रगतिशील [illegible] आणण्याची [illegible] समरस होणारी [illegible] त्यांनी म्हटले आहे.

[illegible] कालखंडातील ना. सी. [illegible] खांडेकर, ग. त्र्यं. माडखोलकर, [illegible] तसेच साळूबाई तांबेकरांची [illegible] काशीबाई कानेटकरांची रंगराव [illegible] विभावरी शिरूरकरांच्या स्त्रीवादी कादंबऱ्यांचाही साक्षेपी विचार मांडला आहे. बळी (१९५० या कादंबरीने मराठी कादंबरीला नवीन वळण लावल्याची महत्त्वपूर्ण नोंद कुसुमावतीबाईंनी केली आहे. रघुवीर सामंत, साने गुरुजी, विश्राम बेडेकर, श्रीधर देशपांडे, र. वा. दिघे, बा. सी मर्ढेकर यांनी चोखाळलेल्या वेगळ्या वाटांचाही गुणदोषांसह त्यांनी विचार केलेला आहे. १९४० ते १९५० च्या दरम्यान काही नवीन कादंबरीकारांनी हाताळलेल्या नव्या कथाविषयांचा वेध घेतांना त्यांच्या नवेपणातील उथळपणाचाही कुसुमावतीबाईंनी उल्लेख केलेला आहे. दि. बा. शिरवाडकर, ग. ल. ठोकळ, चंद्रकांत काकोडकर, बा. भ. बोरकर, श्री. रा. विवलकर, वसंत कानेटकर, श्री. ना. पेंडसे यांच्या नव्या नव्या प्रयत्नांचाही साक्षेपी धांडोळा कुसुमावतीबाईंनी घेतला आहे. दुसऱ्या कालखंडावर प्रभाव पाडणाऱ्या फडके देशपांडे खांडेकर, माडखोलकर यांच्या कादंबऱ्या आभासाश्रयी आणि व्यक्तिकेंद्रित असल्याचे मत कुसुमावतीबाईंनी नोंदविले आहे. या दुसऱ्या कालखंडात त्यांना विभावरी शिरूरकरांची 'बळी' (१९५०), श्री. ग. विवलकरांची 'मुनीता' (१९४७), श्री. ना. पेंडसे यांची 'हद्दपार' (१९५०) ह्या तीन कादंबऱ्या मानवी जीवनाचा व्यापक, सुजाण व सुसंगत दृष्टिकोण बाळगणाऱ्या वाटतात. या कालखंडातील वास्तवाची जाणीव ही वरवरचे निरीक्षण, तपशिलांचे वर्णन, साकल्यात्मक व खोल जाणिवेचा अभाव, वार्ताहरी चित्रण या दोषांनी वरवटल्याची खंतही कुसुमावतीबाईंनी कालची आणि आजची आपत्ती म्हणून नोंदवून ठेवली आहे.

शेवटी, कुसुमावतीबाईंनी कादंबरीकारांना गंभीर इशाराही दिला. ''जीवनाची उकल करण्याच्या प्रयत्नात लेखकाजवळ त्यातील अनेक मूलभूत समस्यांचे ज्ञान, आर्थिक, वैज्ञानिक वा सामाजिक प्रवृत्तींची माहिती, भरीव व्यासंग, व्यापक अनुभूती, व्यक्तिचित्रणातील समरसता असेल, त्यालाच थोडेतरी यश मिळण्याची शक्यता आहे. आजचा कादंबरीकार केवळ माणूस म्हणून माणसाजवळ जाऊ शकला, तरच त्याला समरसता लाभणे शक्य आहे. एरव्ही माणसांमाणसात तटबंदी उभी करण्यासाठी आज कित्येक शक्ती सज्ज आहेत. माणसाच्या अंतःकरणाविषयी सहृदय समज व मानवी जीवनाविषयी व्यापक, सुजाण व सुसंगत दृष्टिकोण हे आजच्या कादंबरीकाराला अवश्य असणारे निदानीचे गुण आहेत. २० या अवतरणातून कुसुमावतीबाईंचा कादंबरीकडे पाहण्याचा मानवतावादी दृष्टिकोण स्पष्ट होतो. मराठी कादंबरीचे विश्व विस्तारण्यासाठी आजच्या कादंबरीकारांनाही कुसुमावतीबाईंच्या दृष्टिकोणाचा अंगिकार करणे अत्यंत गरजेचे आहे.

संदर्भ

राजवाडे लेखसंग्रह, संपा. लक्ष्मणशास्त्री जोशी, साहित्य अकादेमी, नवी दिल्ली, प्रथम आवृत्ती, १९५८, पृ. २८२

मराठी कादंबरी पहिले शतक, कुसुमावती देशपांडे, दुसरी आवृत्ती १९७५, पृ. ५.

कित्ता, पृ. १८

राजवाडे लेखसंग्रह, पृ. २७६-७७

कुसुमावती देशपांडे, उनि., ३२

नावल आणि नाटक, का. बा. मराठे, मॉर्डन बुक डेपो प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, १९६२, पृ. ९.

७. कित्ता,पृ. ९.

८. कुसुमावती देशपांडे, उनि., पृ. ७

९. कित्ता,पृ. ८.

१०. कित्ता,पृ. ९

११. कित्ता,पृ. ९

१२. कित्ता,पृ. १०.

१३. कित्ता,पृ. ११.

१४. कित्ता,पृ. ११.

१५. कित्ता,पृ. १७.

१६. कित्ता,पृ. १६.

१७. कित्ता,पृ. ५,६,७०.

१८. कित्ता,पृ. २१.

१९. कित्ता,पृ. ३४.

२० कित्ता,पृ. ३४३.

(दि. ७ नोव्हेंबर २००४ रोजी विदर्भ साहित्य संघ, नागपूर येथे कुसुमावती देशपांडे यांच्या वाङ्मयावरील चर्चासत्रात वाचलेला निबंध)

- डॉ. किशोर सानप

कमला नेहरू शाळेच्या बाजूला, रामनगर, वर्धा,

दूरध्वनी :- ०७१५२-२४१७५९

कुसुमावतींचे कथासाहित्य

डॉ. अरुणा देशमुख

कुसुमावती देशपांडे यांचा कालखंड म्हणजे सामाजिक, राजकीय आणि वैचारिक उलथापालथींचा आणि म्हणूनच समृद्ध असा कालखंड आहे. हरिभाऊ आपट्यांचा उदारमतवादी सुधारणावाद, केशवसुतांचा जुने जाऊ द्या मरणालागुनी असे म्हणणारा विद्रोही मानवतावाद आणि आगरकरांचा व्यक्तिस्वातंत्र्य आणि बुद्धिप्रामाण्य यावर भर देणारा सुधारणावाद यांची भक्कम रुजवात या काळात झालेली होती. या सर्वांच्या जोडीला गांधीवाद आणि मार्क्सवाद आला आणि तोपर्यंत मध्यमवर्गापाशी थांबलेली सुधारणा समाजाच्या तळापर्यंत जाऊन पोचली. त्यामुळे समाजजीवन आणि व्यक्तिजीवन यांच्या सर्वस्पर्शी सुधारणेला खऱ्या अर्थाने रंगरूप आलेले या काळात दिसू लागलेले आहे. व्यक्ती, त्याचे कुटुंब आणि समाज झपाट्याने बदलू लागला. सुधारणावाद हा शब्द मागे पडला आणि नवमतवाद हा शब्द पुढे आला. नवमतवादाने बंडखोर वृत्तींना प्रतिष्ठा दिली. समतेचा पुरस्कार केला. जुन्या नैतिक, पारंपारिक आणि धार्मिक श्रद्धांना बुद्धिप्रामाण्याच्या बळावर आव्हान दिले. कुटुंबसंस्था, विवाहसंस्था प्रखर बुद्धिप्रामाण्यावर घासून पारखल्या गेल्या पाहिजेत असे मत व्यक्त होऊ लागले. इंग्लंडमधल्या सेफ्रेजेट चळवळीमुळे भारतातही स्त्रीजीवनाला वेगळे परिमाण प्राप्त झाले. या काळात आपल्यावरील अन्यायाच्या विरोधात स्वतः स्त्रियांनीच तीव्र स्वर लावायला प्रारंभ केला होता. अर्थार्जनाला सुरुवात केल्यामुळे त्यांच्या स्वातंत्र्याचा आणि अस्मितेचा प्रश्न ऐरणीवर आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मनुस्मृतीचे दहन करून दलितांच्या जीवनातील परिवर्तनासाठी समाजव्यवस्थेपुढे आव्हान उभे केलेले होते. महायुद्धानंतर आर्थिक अवमूल्यन झाले. त्यामुळे मध्यमवर्ग सुखवादी, विलासप्रिय बनला. परंतु औद्योगिकरणामुळे निर्माण झालेल्या कामगार वर्गाचे जीवन समस्यांनी व्यापले गेले. अशा प्रकारे विविध वैचारिक धारणांनी सामाजिक जीवन घुसळले जात होते. या साऱ्यांचा परिणाम वाङ्मयावर होणे अपरिहार्य होते. या काळाचे वर्णन करताना हा काळ म्हणजे संक्रमणाचा आणि संमिश्र स्वरूपाचा काळ होता असेच म्हणावे लागेल. त्यातही कुसुमावतींनी इंग्लंडला जाऊन ऑनर्सची पदवी घेतलेली होती. आपल्या संवेदनशील मनाने त्यांनी तिथल्या जीवनाचा आणि साहित्याचा वेध घेतलेला होता. या साऱ्यांचा परिणाम म्हणून त्यांचा स्वतःचा असा जीवनविषयक दृष्टिकोण तयार झालेला होता. आपल्या समकालातील वैचारिक गुंतागुंत आणि उलथापालथ पचवून त्यांच्या जीवनजाणिवेचा गाभा त्यांनी घडविला होता. त्यांनी केलेले सर्वच लेखन म्हणजे या गाभ्याला फुटलेले अंकुर आहेत. या जाणिवेच्या गाभ्यातला जीवनरस घेऊन हे अंकुर वाढले, विकसले. 'वाङ्मयाचा आस्वाद' या आपल्या लेखात त्यांनी मनाच्या वृत्ती सम्राज्ञीचे जे वर्णन केले आहे ते खुद्द त्यांच्याच जीवनदृष्टीचे वर्णन आहे. त्या म्हणतात - "ही जी मनाची वृत्ती सम्राज्ञी असते तिचे दोन विशेष सहज जाणवतात. ती मोठी चौकस असते. आपल्या भोवतालचे जग म्हणजे काय प्रकार आहे हे जाणून घेण्याची तिला तीव्र उत्कंठा असते. आणि तशीच आपण स्वतः म्हणजे तरी कोण आहोत, कशा आहोत, हे ही जाणून

घेण्याची तिला आकांक्षा असते. हेच दोन्ही तिच्या व इतर व्यक्तिमनांच्या मधील स्पर्शबिंदू ठरतात.'' कुसुमावती एकाच वेळी बाह्य वास्तवाचा आणि स्वतःच्या अंतरंगाचा शोध घेऊ पाहत आहेत. जीवनवास्तवाचे त्यांच्या पुढ्यातले स्वरूप आणि त्यांच्या मनाच्या वृत्तीसम्राज्ञीने त्यांच्या अंतःकरणात सिद्ध केलेले जीवनवास्तव यांच्यातल्या एका सुंदर नात्याचे दर्शन त्यांच्या ललितलेखनामधून आपल्याला घडते. आपल्या भोवती पसरलेल्या पसाऱ्यातील विसंगति शोधणे, सुंदर - असुंदराची भूमिती शोधणे, आपल्या वृत्तीसम्राज्ञीने कल्पिलेल्या जीवनाच्या मूल्यभावाशी त्याची सांगड जुळवून पाहणे असा प्रयत्न कुसुमावती सतत करीत आहेत असे आपल्याला जाणवत असते. श्रेष्ट कलावंत नेहमीच त्याच्या भोवतीची सजीव निर्जीव सृष्टी पूर्णपणे उपटून काढतो आणि तिची रोवणी पुन्हा आपल्या मूल्यजाणिवेच्या प्रकाशात कलाकृतीच्या भूमीत करीत असतो. त्याची वृत्तीसम्राज्ञी या प्रक्रियेत बाह्य आणि आंतर अशा विश्वाशी जो संबंध जोडू पाहते तोच अखेरीस शब्दरूप घेऊन प्रकट होतो. कुसुमावतींच्या कथावाङ्मयात या प्रक्रियेचे थोडेसे दर्शन आपल्याला होते. ते जर साकल्याने झाले असते तर कथाक्षेत्रात त्यांना एका उंच शिखरावर वसवता आले असते पण दुर्दैवाने तसे घडत नाही.

कथनपर कलाकृतीचे जेवढे म्हणून घटक असतात ते सारे घटक कलावंताच्या जीवनजाणिवेने भारलेले असावे लागतात. कलावंताचा जीवनविषयक दृष्टिकोण त्या सर्वच घटकांचा रूपबंध टरवित असतो. पात्र - प्रसंग - घटना - संवाद या सर्वांचे नियंत्रण तो करीत असतो. त्याच्या जीवनजाणिवेच्या गाभ्याची जी आंतरदृष्टी असते ती बाह्य जीवनवास्तवातले सारेच अनुभव पचवून घेते. या आतल्या दृष्टीला समाजातले परस्परविरोधी द्वंद्व दिसते. त्याचाच आविष्कार कलावंत आपल्या मूल्यजाणिवेच्या प्रकाशात करीत असतो. कुसुमावतींचा जीवनजाणिवेचा गाभा हा असा जीवनाचे द्वंद्व टिपणारा आहे. त्यांना इथली माणसे आणि त्यांची वैशिष्ट्ये भुरळ घालताना दिसतात. त्यांना माणसे लढताना, झगडताना दिसली. अपयशाने, निराशेने, तोचतोचपणाच्या अनुभवाने ग्रासलेली दिसली. समाजाच्या धारणांनी दुखावलेली दिसली. जगण्याच्या लढाईत एकाकीपणे वावरताना दिसली. खोट्या फसव्या जीवनमूल्यांच्या मागे धावताना दिसली. आपल्या संसाराच्या छोट्या वर्तुळातही जगताना छोट्याछोट्या सौंदर्यस्पंदनांना कवेत घेताना दिसली. काही कथा आणि काही लघुनिबंध यामधून त्यांनी हे सारे विश्व शब्दबद्ध केले. त्यांची एकूण संख्या केवळ ४२ इतकी आहे. कुसुमावती जी माणसे आपल्या पुढ्यात उभी करतात ती माणसे त्यांच्या समकालात इतर लेखकांनी उभी केली त्यापेक्षा वेगळी आहेत. फडक्यांनी आपल्या कथनपर साहित्यातून जी माणसे दाखवली ती प्रणयी विभ्रमांचे आलंबन म्हणून येणारी माणसे होती. त्यांचा त्यांच्या समाजवास्तवातील जिवंत माणसांशी फार थोडा संबंध होता. तर खांडेकरांची माणसे त्याग, सेवाशीलता, कर्तव्यनिष्ठा इत्यादी मानवी मूल्यांच्या जपणूकीसाठी आदर्श उभे करावेत म्हणून अवतरणारी माणसे असतात. या दोघांच्याही कथा मनोरंजन हेच मूल्य पोटात बाळगून येतात. त्यासाठी त्या नीट बेतलेल्या असतात. तंत्राचा नीट वापर त्यांच्यात झालेला असतो. दुसरीकडे भावनेने ओथंबलेली व जिव्हाळ्याच्या पालखीतून मिरवणारी य. गो. जोशी यांच्या कथेतील माणसे आहेत. ती माणसे कुटुंबसंस्था जपणारी भारतीय संस्कृतीतील नात्यांमधील भाववंध जपणारी आहेत. त्यांची कथा साधी व तंत्रविन्मुख होती. पण य. गो. जोशांना बदलत्या सामाजिक संदर्भाची संपूर्ण दखल घेता आली नाही. नव्या वैचारिक उलथापालथीशी त्यांच्या माणसांचा कोणताच संबंध नव्हता.

कुसुमावतींच्या समकालातल्या कथांमधली अशीही माणसे त्यांना दिसलेली होती. वामन चोरघडे यांची कथा तर कुसुमावतीच्या अगदी समोरच होती. चोरघड्यांच्या कथांमधली माणसे निरागस, जीवनाच्या मांगल्यावर विश्वासणारी असहेत. पण या माणसांचे स्तर विभिन्न आहेत. गोंड, आदिवासी, खेडूत, शहरी, सुसंस्कृत अशा अनेक प्रकारची ही माणसे आहेत. पण त्यांनाही जीवनातले हीण, काळे, नास्के कुजके असे काही दिसत नाही. युद्धोत्तर काळात जीवन झपाट्याने बदलले. जीवनकलह अतिशय तीव्र झाला. त्या कलहाने माणसे कोलमडली, गांजली. त्याचे तपशीलही चोरघड्यांनी मांडले पण त्यांचे जगणे भकास किंवा वैफाल्यग्रस्त होत नाही. त्यांच्या निष्ठा ढळत नाहीत. जगण्याचा हेतू बहाल करणाऱ्या निष्ठा त्या माणसांना कुठे ना कुठे दिसतातच. परंतु प्रभाकर पाध्ये यांनी लिहिली तशी किंवा पुढे गंगाधर गाडगीळ यांनी लिहिली तशी कशा चोरघडे किंवा कुसुमावतींनी लिहिली नाही. आधीच्या आणि नंतरच्या यांच्यामधल्या कथाप्रदेशातला दुवा म्हणून कुसुमावतींच्या कथांकडे पहावे लागते. गाडगीळांनी माणसांचे जे जग दाखविले ते लख्ख प्रकाशात चहूबाजूंनी एखादी वस्तू पाहता यावी तसे दाखविले. माणसांच्या साऱ्या विकृत - सुकृत रंग - रूप - आकृती यासकट ती लख्ख दिसतात. आता आणखी काही दिसायचे शिल्लक उरत

अनुक्रमणिका

नाही. नवकथेतले आणखी एक महत्त्वाचे कथाकार म्हणजे जी. ए. कुळकर्णी त्यांच्या कथांमधली माणसे गूढ - गार - भयप्रद अंधारात कायम रहस्यमय प्रवास करणारी असतात. ती आपल्यावर चेटूक करतात. आपल्यालाही त्या अंधारात ओढून घेतात आणि त्या गच्च काळोखात काही म्हणता काही दिसू नये असे होत होत आपणही त्या अंधारात बुडून जातो. पण फारच थोडेस लेखन करून कुसुमावती जी माणसे आपल्या पुढ्यात उभी करतात ती प्रकाशाच्या अंधाराच्या अलीकडच्या जगातली असतात. त्या माणसांमध्ये जीवन स्वीकारण्याचे अद्‌भुत बळ असते. परिस्थितीच्या समंजस स्वीकाराबरोबरच त्यातल्या सौंदर्याचा ती वेध घेणारी असतात. या माणसांचे रंग रूप, आकृती गाडगीळांच्या माणसांइतकी स्पष्ट नसते, तशी जी. एं. च्या माणसासारखी गूढ काळोखातलीही नसते. ती फक्त माणसाची असावी तशी आकृती असते. गाडगीळ, जी. ए. यांच्या पूर्वी माणसांसारखी माणसे आपल्या कथांमधून उभी करून कुसुमावतींनी माणसांकडे घेऊन जाणाऱ्या विशुद्ध मार्गाची स्वतःची अशी दृष्टी प्रकट केली. ही माणसे जीवन आहे तसे स्वीकारतात. ती बंड करीत नाहीत. पण जीवनातल्या कुरूपतेने व्यथित होतात. आपल्यापुरता तो कुरूपपणा बोथट करून त्यातही सौंदर्याचे स्पंदन शोधू लागतात. आपल्या जवळच्या चांगुलपणाची लय बिघडू न देता जीवनाला तोलून धरतात. 'सरस्वती' (माऊली) 'कला धोबीण' (कला धोबीणीचे वैधव्य) सीता (सीता), 'गंगाकाकू' (एकटी), 'चिमणी' (चिमणी), 'सदाशिवराव' (गवताचे पाते), 'भैय्यासाहेब' (पिसारा), 'शांता' (झिमझिम उघाड) ही सगळी माणसे अशीच आहेत. त्यांच्या कथेतले सगळे जगच साधारणांचे जग आहे पण या जगात अजून जगण्याची वीण चांगुलपणाच्या, मूल्यवत्तेच्या आणि सौंदर्याच्या सुमनावरचे दव चुंबून घेणाऱ्या धाग्यांनी गुंफलेली आहे. त्यांचा जगण्यावरचा विश्वास उडालेला नाही. ही माणसे खेड्यातली आहेत. शेतात राबणारी, मोलमजुरी करणारी, गवताचे भारे विकणारी, मोलकरणीचे काम करणारी, भटके आयुष्य जगणारी अशीही आहेत. व मध्यमवर्गीय कारकुनी करणारी, शिक्षकी पेशा करणारी, सुसंस्कृत अशी आधुनिक काळाचे प्रतिनिधी असणारी अशीही आहेत.

पण त्यांचा आपल्या स्वतःवरचा, जीवनावरचा आणि चांगुलपणावरचा विश्वास कायम आहे. म्हणून त्यांच्या आकृत्या ह्या अशा साधारणांच्या असूनही वैशिष्ट्यपूर्ण झालेल्या आहेत. अशी वैशिष्ट्यपूर्णता त्यांना कुसुमावती देऊ शकल्या कारण त्यांच्या जीवनजाणिवेचा गाभा तसाच आहे. त्यांच्या बव्हंशी कथांमध्ये त्यांनी जीवनाची दोन रूपे स्पष्ट केलेली आहेत. एक रूप प्रत्यक्षात दिसणाऱ्या वास्तवाचे; आणि दुसरे त्यांच्या मनातल्या, कल्पनेतल्या वास्तवाचे. या दुसऱ्या कल्पनेतल्या, मनातल्या वास्तवात जीवनाच्या (becoming) च्या प्रक्रियेचे स्वप्न आहे. 'असणे' आणि 'होणे' असे या दोन जगांचे स्वरूप आहे. हे स्वरूप काहिसे युटोपिअन आहे. ('समांतर रेषा' सारखी कथा याची साक्ष पटवताना दिसेल.) या युटोपिआचा आधार वास्तवातली माणसेच असतात. तीच ह्या स्वप्नांना जन्माला घालत असतात. कुसुमावती 'मी कां लिहिते' या लेखात म्हणतात - "कधीकधी कोटेतरी कोनाकोपऱ्यात अज्ञानपणे जीवन व्यतीत करणाऱ्या एखाद्या साध्या व्यक्तीच्या अंतःकरणात आपल्याला अशा चैतन्याचे अखंड झरे दिसून येतात. त्या झऱ्यांनी त्यांच्या भोवतालचे जीवन कैक वर्षे फुलत ठेवलेले असते. व्यवहारकटुतेने किंवा स्वार्थाने ते गढूळले जात नाही. त्या व्यक्तिंची मानवता अखंड असते आणि त्यांच्या दिलदारपणाने आणि सत्त्वनिष्ठेने त्यांच्याशी क्षणकालही ज्यांचा संबंध येतो त्यांचा मानवजातीवरील विश्वास दुणावतो" अशा प्रकारच्या माणसांची कुसुमावतींना अपूर्वाई वाटते म्हणूनच त्यांच्या जीवनातील भावावस्थांना त्यांच्या कथेत स्थान मिळते. बाह्यतः ही माणसे छोट्या उंचीची वाटत असली तरी त्यांची आंतरिक उंची उत्तुंग असते. गाडगीळ, जी. ए. या उत्तरकालीनांपेक्षा आणि फडके - खांडेकर - य. गो जोशी - बोरकर या समकालीनांपेक्षा ही माणसे याठिकाणी वेगळी असतात. कुसुमावतींच्या जीवनजाणिवेच्या गाभ्यात मानवजातीवरचा अक्षय्य विश्वास असतो. व्यवहारकटुता किंवा स्वार्थ यामुळे हा विश्वास त्या कधी ढळू देत नाहीत. अखंड मानवतेने या गाभ्याचे पोषण झालेले असते. त्यामुळेच साधी साधी माणसे व त्यांचे सत्वनिष्ट जीवन यासंबंधीची अपूर्वाई त्यांच्या ललितलेखनातून सतत झळाळताना दिसते. त्यांची माणसे वेळी परिस्थितीशी झगडतात. समाजमान्य मूल्यांच्या विरोधात जगण्याचे बळ प्रकट करतात. पण त्यांच्या झगड्याला तीव्र भांडखोर स्वर कधी प्राप्त होत नाही. उद्रेकी भावनांचे स्तोम ती माणसे माजवत नाहीत. विलक्षण संयमाने आपल्या सत्त्वनिष्ठेच्या बळावर अगदी जगावेगळे निर्णय घेऊन, त्यांच्या परिणामांना स्वीकारत जगत राहतात. जगण्यावरची, जीवनावरची आपली निष्ठा ती माणसे ढळू देत नाहीत. अगदी पहिल्याच संग्रहात अशी माणसे आपल्याला भेटू लागतात. आपापल्या गुणदोषांसकट परिस्थितीने पुढ्यात आणून ठेवलेल्या पेचांची आपल्यापरिने सोडवणूक करीत जगत राहतात. 'सीता' ही कथा

अनुक्रमणिका

यासंदर्भात मला खूप महत्त्वाची वाटते. जीवनावरच्या विश्वासाची प्रतीती घडवणारी ही कथा आहे. या कथेच्या चैतन्यतत्वाचे स्पंदन या विश्वासातच आहे. अगदी सुरवातीलाच सीतेच्या एकूण व्यक्तिमत्त्वावर कुसुमावती प्रकाश टाकतात. कथेची सुरूवातच सीतेच्या स्वभावातील दोष दाखवून होते. ती कुढी आणि आत्मनिष्ठ आहे. तिच्या वाट्याला आलेले प्राक्तन आणि परिस्थिती या संदर्भात ती स्वयंपूर्ण आहे. ''तिचे मन आकुंचित जाणिवेच्या बाहेर कधीच गेले नाही. कुठल्याही आत्यंतिक भावनेने उचंबळून येऊन परिस्थितीच्या किंवा जगरहाटीच्या सापेक्षतेने स्वतःविषयी विचार करण्याची तिच्यावर पाळी आलीच नाही. बरोबरीच्या बायकांशीही तिचे बोलणे जितक्यास तितकेच असावयाचे. त्यामुळे मनाच्या परिपक्वतेचा हाही मार्ग तिला बंदच होता. असे तिच्याबद्दल सुरवातीलाच कुसुमावती सांगून टाकतात. सीतेच्या वाट्याला अचानक प्राक्तनाचा प्रहार होतो. तिचा नवरा रामजी मरण पावतो. पण तो प्रहारही ती आपल्या स्वाभाविक गुणधर्माच्या बळावरच पचवते. जगण्याचा मार्ग आपला आपणच शोधून काढते. स्वतःभोवती हेकेखोरपणाचे व अनुभवाच्या अभावाचेच जणु कवच ती निर्माण करून घेते असे कुसुमावती म्हणतात. माणसांच्या निरनिराळ्या प्रवृत्तींना ती तोंड देत राहते. माणसांचे निरनिराळ्या प्रकारचे गट तिच्याबद्दल चर्चा करतात, तिला त्रास देतात. पण ती आपल्या कवचाच्या आत स्वतःला सुरक्षित मानून जगत राहते. पण मूलतः स्वाभाविक दोषांवर अवलंबून असलेले कवच तिची फार काळ राखण करू शकत नाही. अखेरीस म्हादवा नावाच्या गुंडाच्या अत्याचाराला ती बळी पडते. एकट्या राहणाऱ्या, तिखट वाणीच्या आणि हेकेखोर स्वभावाच्या स्त्रीमुळे आपल्या पौरुषाचा अपमान झाल्याचे मानणाऱ्या म्हादवाविरुद्ध सूडाने पेटून उठलेल्या सीतेला स्वतःच्या भावनांच्या पलिकडच्या सामाजिक वास्तवाची काहीही जाणीव होणे शक्यच नव्हते. कारण आपण कसेही असलो तरी माणसे चांगली असतात, शुद्ध असतात, न्यायी असतात असे ती धरून चाललेली असते. ''म्हादवाची घाणेरडी कारस्थानी बुद्धी, पाटलाचा पुरुषीपणा, गावात एकंदरीतच रूढ असणारी आपल्याबद्दलची वृत्ती या कशाचा विचारही तिला करता आला नाही. ती पूर्णतः विश्वस्तपणे पाटलाकडे गेली. त्याच्या ठिकाणी तिला शुद्ध सरकारी न्यायाचा ठेवाच वाटला'' असा यासंदर्भात कुसुमावती उल्लेख करतात. आपल्याविरुद्ध जगरहाटीने काय वाढून ठेवले असेल याची अस्फुटही कल्पना सीतेच्या मनाला शिवत नाही. तिच्या मनाभोवतीच्या कवचाबाहेरच्या क्रूर दुष्ट दुनियेच्या कारस्थानात तिचे मूळ कवच खळक्कन फुटते. पण तिच्या व्यक्तित्वाला दुसरे नवे कवच लाभते. तिचा एकटेपणा दुणावतो. अनिश्चितता वाढते. पण एका अनिर्वाच्य निर्धाराचे कवच आता तिच्यापाशी आहे. मूळचे कवच स्वाभाविक दोषांचे असते. पण आता मिळालेले हे दुसरे कवच परिस्थितीशी दिलेल्या लढ्यामुळे तिला प्राप्त झालेले असल्यामुळे ते अधिक कणखर आणि टणक आहे. या कवचामुळे तिला जगण्याचे बळ मिळते. परिस्थितीचे आव्हान स्वीकारण्याचे बळ मिळते. म्हादवाशी पाट लावण्याचा सार्वत्रिक सल्ला ती झुगारून लावते. कुणालाही शरण न जाता आयुष्य काढण्याच्या आपल्या निर्णयाशी ती ठाम राहते. साऱ्या प्रतिकूलतेशी, नियतीशी आणि स्वतःशीही भांडत ती आपल्या मनाशी ठाम होत जाते. दिवस गेल्याचे कळल्यावरही तिचा ठामपणा तसाच कायम राहतो. ती जशी पाट लावायला नकार देते तसाच आता गर्भपातालाही नकार देते. हे बळ, हा ठामपणा आता तिला प्राप्त झालेला आहे, त्यामुळे केवळ कसेबसे जगत राहायचे असे तिला अभिप्रेत नाही. उलट जगण्याला तिला आता एक हेतू प्राप्त होतो. नको असलेल्या संबंधातून पोटात वाढणाऱ्या जीवासंबंधी तिच्या मनात काही धारणा आकार घेऊ लागतात. तो जीव तिच्या जीवनहेतूचे केंद्र बनू लागतो. म्हादवाचा त्याच्याशी असलेला संबंध आता गैरलागू ठरू लागतो. आपल्या रक्तावर वाढणारा तो जीव आपल्याला माय म्हणेल हेच तिच्या जगण्याचे अर्थपूर्ण सत्त्व बनून जाते, जीवनचैतन्याचे सत्त्व बनून जाते आणि अखेरीस आपल्या जीवन चैतन्याच्या सत्त्वाचा जीव घेणे म्हणजे जगणेच नाकारण्यासारखे आहे. म्हणून तो जीव वाढवण्याचा निर्णय ती घेते. जगाचा, जगरहाटीचा, नीतीचा फोलपणा ती अधोरेखित करीत राहते.

कुसुमावतींची माणसे ही अशी बलसंपन्न आहेत. ती साधी आहेत म्हणूनच अशी आहेत. ती सत्त्वसंपन्न आहेत म्हणूनच अशी आहेत. ती जीवननिष्ठेने संपन्न आहेत म्हणूनच अशी आहेत. कुसुमावतींनी अशी अनेक माणसे आपल्या कथांमधून रंगविली. ती स्वतःचा आकार, स्वतःचे रूप - रंग स्वतःच शोधू लागतात आणि या शोधात स्वतःची सत्त्वशीलता न गमावता अधिकाधिक उजळत राहतात, आणि आपल्याबरोबरच आपले भवतालही उजळून टाकतात. ही माणसे एखाद्या विशिष्ठ सामाजिक नैतिक वा वैचारिक चष्म्यातून जीवनाकडे बघत नाहीत. त्याचे कुठलेही वर्गीकरण आपल्याला करता येत नाही. जीवन चैतन्याचा जो आशय ती माणसे धारण करीत असतात तीच त्यांची ओळख असते. आणि याचमुळे

कुसुमावतींच्या कथासाहित्याला वैशिष्ट्यपूर्णता लाभते. गाडगीळांची किडलेली माणसे दिसण्याच्या अगोदर आपल्याला कुसुमावतींनी अशी जीवनचैतन्याच्या स्पंदनाने भारलेली, भरलेली माणसे दाखविली. त्यांच्या समकालीनांपेक्षा आणि उत्तरकालीनांपेक्षा ती वेगळी आहेत. आपल्यासारखीच साधीसुधी, सामान्य रंगाकृतीची अशी ही माणसे आपल्यासारखाच जगण्याचा गुंता उकलत होती. पण आपल्याला जे निर्माण करता येऊ शकत नाही असे एक प्रेरणाक्षेत्र ती निर्माण करीत होती. हे प्रेरणाक्षेत्र जीवनचैतन्याच्या स्पंदनांची जाणीव करून देणारे होते. कुसुमावतींच्या आधीची व नंतरची कथा या प्रकारचा अनुभव आपल्याला देऊ शकत नाही. जुन्या कथेचे वर्णन करताना माधव आचवल यांनी केलेले विवेचन पाहिले म्हणजे कुसुमावतींनी कथेच्या क्षेत्रात नेमके काय केले ते आपल्या लक्षात येते. ते म्हणतात ''जुनी कथा ही व्यक्तींच्या तसेच व्यक्तिसमूहांच्या कृतिक्षेत्राशी घट्ट बांधलेली होती. तिच्यातील प्रेरणाक्षेत्र हे अत्यंत मर्यादित, साधे, त्यातील निरनिराळ्या पातळ्या व त्यांची स्थलकालातील सहस्थिती यांची जाणीव नसलेले, 'सर्वसामान्य माणसाचा अनुभव' या साधारण कल्पनेशी चिकटून राहिलेले, कृतिक्षेत्र नीट टांगता यावे म्हणून मारलेल्या खुंट्यांसारखे असे.... कथेत येणारे सारे संघर्ष किंवा घटना कथेतील भावनाशयाशी कधीच एकरूप झाल्या नाहीत. त्या घटना नेहमी तुटक आणि अपुऱ्या राहिल्या..... ही कथा एकाच वेळी बेगडी पण अत्यंत मोहक वाटत असे. बेगडी अशामुळे की जीवनातील चैतन्याचा जो मुखवटा तिने घेतला होता तो मात्र अगदी खऱ्यासारखा होता. स्वतःच्या पायावर उभे राहण्याची शक्तीच नसल्यामुळे मग हा मुखवटा जास्त जास्त मोहक होणे हेच कलाकृतीचे वैशिष्ट्य होऊ लागले. त्याचे तंत्र झाले. ललित लेखकाचे काम जसे काही शिंप्यासारखे झाले. जितका अंगाबरहुकूम कपडा तितका शिंपी हुशार. मग तुकडे फाडून जोडावे लागत असे करताना दैवयोगाने घडणाऱ्या भेटी वा चुकामुकी, आजारीपण, अपघात हे कथाकाराच्या फार उपयोगी पडत. त्यांच्या आधाराने कथा नीट बेतता येई.'' आचवलांच्या या विश्लेषणाच्या आधारे आपल्याला कुसुमावतींची कथा तपासून बघितली पाहिजे. त्यांची कथा व्यक्तीच्या कृतिक्षेत्रावर भर देत नाही. उलट ती व्यक्तीच्या प्रेरणाक्षेत्राचा शोध घेऊ पाहते. त्याच्या विविध पातळ्या निरखून पाहण्याचा प्रयत्न करते. या पातळ्यांचा विकास एका विशिष्ट दिशेने कसा घडतो आहे ते दाखविण्याचा प्रयत्न करते. कथा 'बेतली' जाते, तिचे तंत्र असते, त्याच्यापलीकडे जाऊन ही कथा जीवनाच्या अदृश्य झऱ्याच्या खऱ्या स्वरूपाचा शोध घेण्याचा प्रयत्न करते. सर्वसामान्य माणसाच्या अनुभवाचे कृतिक्षेत्र निर्धारित करणाऱ्या मूलभूत जाणिवेच्या गाभ्याकडे, तिथल्या प्रेरणाक्षेत्राकडे घेऊन जाण्याचा प्रयत्न ही कथा करते आहे. या प्रयत्नात ती कधी अपयशी होते, कधी ठळक काळा - पांढरा रंगच दाखवते किंवा कधी कृतिक्षेत्राचे युटोपिअन स्वरूप स्पष्ट करण्याचा प्रयत्न करू लागते. पण बहुंशी ही कथा प्रेरणाक्षेत्राकडे जाण्याचा निदान तिथे डोकावण्याचा तरी प्रयत्न करताना दिसते. म्हणूनच मग तंत्राचा बेगडी पण मोहक मुखवटा त्यांना कधी घालावा लागत नाही. उलट कधी कधी त्या प्रेरणाक्षेत्राची नीटस आकृती काढणे साधत नाही. त्याची बांधणी कलात्मक सौंदर्याने परिपूर्ण करता येत नाही. अशा वेळी ती कथा कथारूप सोडून भरकटते. लघुनिबंध अथवा व्यक्तिचित्र या रूपाकडे सरकत जाते. पण त्याची पर्वा न करता त्या प्रेरणाक्षेत्राचा वेध घेत राहतात. त्यांच्या समकालातील कथा तंत्रशुद्ध आणि त्यामुळे मोहक होती. पण तंत्रशरण होऊन बेगडी मोहकतेला बळी जाण्यापेक्षा त्यांनी तंत्रदृष्ट्या फसलेल्या कथा लिहिणे पत्करलेले दिसते. आपल्या अनुभवविश्वातील प्रेरणाक्षेत्राची स्वयंपूर्णता आणि आपल्या जीवनजाणिवेतील पृथकता यावर विश्वासून आपल्या कथांच्या अंकुराचे त्यांनी पोषण होऊ दिलेले आहे. जीवनाचे खरे सत्त्व ते जीवन घडवण्यात असते असे त्यांनी मानलेले होते. ''जीवनमूल्यांची राखण करणे, त्याविषयी मानवी मनाला सदैव जागृत ठेवणे, मानवी सहृदयतेची जपणूक करणे, मानवी मनाला आकुंचित क्षुद्रवृत्ती बनवू न देणे, अश्मप्राय बनवू न देणे हे कलेचे मुख्य कार्य आहे'' असे त्यांनी मानल्यामुळे जीवनाच्या (becoming) च्या प्रक्रियेतले प्रेरणाक्षेत्र आपल्या कथासाहित्यातून त्या निर्माण करीत राहिल्या. त्यांची वैचारिक जडणघडण त्यांच्या समकालीन लेखकांपेक्षा वेगळी असल्यामुळे त्यांना तंत्राला नकार देता आला, तंत्रशरणतेला नकार देता आला. आपल्या वेगळेपणामुळे त्यांनी कथेला त्यातील अनुभवविश्वाला एक प्रकारचा वैचारिक पीळ देण्याचा प्रयत्न केला. कारण अनुभव घेणारे त्यांचे मन जितके सौंदर्यवेधी होते तितकेच ते विचारवेधीही होते. त्यांची जीवनाकांक्षा सत्यसौंदर्य, शिव याबरोबरच मानवतावादी विचारांनी परिपूर्ण होती. कारण मानवता ही युगायुगांच्या जीवनविषयक प्रयोगांनी सिद्ध झालेले एक मूल्य आहे. या वैचारिक बळावर त्यांची जीवनजाणीव उभी होती तीच त्यांच्या कथांना वैचारिक बळ देते आहे. त्यांची माणसे जशी सौंदर्याच्या दर्शनाने आपल्या

जगण्यात बळ प्राप्त करून घेतात तशीच विचारांच्या बळावरही आपले जीवन सुंदर करू शकतात.

'एकटी' या कथेतील गंगाकाकूसारखे पात्र स्त्रीजीवनाचा किती खोलवर विचार करू शकते ते पाहण्यासारखे आहे. ''बायकांच्या भांड्याकुंड्यांच्या हौशीची, मुलाबाळांच्या जोपासनेत अवश्यमेव जाणाऱ्या त्यांच्या वेळाची वरवर थट्टा करावी, पण मनात भाव हा की वरी पीडा टळली. त्यांच्या मनाचा आता आपल्याला विचार करायला नको. कोणत्याही कारणामुळे म्हणा, आपल्यापेक्षा कमी विकास पावलेल्या बुद्धीच्या प्राण्याला बरोबर घेऊन चालायचं म्हणजे गळ्यात कोण जोखड. आपण जसं कामाच्या वेळी मुलांच्यापुढे चार खेळणी टाकून देतो, त्यातलाच प्रकार हा. फरक एवढाच की मुलाला ती खेळणीच जन्मभर आवडतील, अन् आपली त्याला कधीच गरज वाटणार नाही, अशी सोयीची कल्पना आपण करून घेत नाही.'' असे गंगाकाकू म्हणतात. पुरुषसत्तेविषयीचा, स्त्रीच्या एकटेपणाचा, तिच्या वाट्याला इतिहासभर आलेल्या वंचनेचा आणि एकूणच तिच्याकडे पाहण्याच्या दृष्टिकोणाचा हा आलेख गंगाकाकूंकडून काढला जावा याचे काहीच आश्चर्य वाटत नाही. कारण तिच्या आंतरअनुभवविश्वातील गाभा तिला गवसतो आहे. हे केवळ कृतिक्षेत्राचे पडसाद नव्हते. अंतरंगातील प्रेरणाक्षेत्राची नेमकी जाणीव येथे कुसुमावती प्रकट करीत आहेत. ध्रुवासारख्या एखाद्या अढळ स्थान देऊ पाहणाऱ्या विश्वाची गरज हे आजच्या स्त्रीवादी विचारसरणीचे उद्दिष्टही यात प्रकट झालेले आहे. सुरवातीच्या काळात लिहिलेली 'एकटी' ही कथा आणि कथालेखनाच्या अंतिम टप्प्यावर लिहिलेली 'कला धोबीणीचे वैधव्य' या प्रवासाचा आलेख काढला तर अगदी पहिल्या कथेपासूनचा कुसुमावतींचा स्त्रीवादी दृष्टिकोण अगदी स्पष्ट जाणवण्याजोगा आहे. त्या ठिकाणी प्रकट होणारी स्त्रीवादी वैचारिक भूमिका सुरवातीपासून जी आहे ती शेवटपर्यंत तशीच कायम राहिलेली दिसेल. इतकेच नव्हे तर 'चिंधी', 'दमडी', 'लहानी', 'इंद्रा' यासारख्या स्त्रियांची चित्रे काढून स्त्रीमुक्तीच्या वाटा नेमक्या कोणत्या दिशेने वळायला हव्या आहेत त्याचेही सूचन केलेले आहे. हे सूचन म्हणजे त्यांच्या जीवनजाणिवेचे विचारवेधी प्रेरणाक्षेत्र आहे. त्यांच्या समकालात अशा प्रकारची जीवनजाणीव अल्प प्रमाणात निर्माण झालेली होती असे आपल्याला दिसते. कथेच्या छोट्याशा अवकाशात विचारांची मांडणी करणे हे त्यावेळच्या तंत्रशरण आणि मनोरंजनाचा हेतू बाळगून निर्माण होणाऱ्या कथेला मान्य होण्याजोगे नव्हते; अशा काळात त्या अशी मांडणी करू पाहत आहेत. हे त्यांच्या कथेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल.

त्यांच्या कथालेखनाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे वैचारिकतेप्रमाणेच सौंदर्यवेधी जीवनजाणिवेचे. त्यांच्या अनेक कथांच्या केंद्रस्थानी ही सौंदर्यवेधी जीवनजाणीव या ना त्या रूपात प्रकट होते. जीवनाची विविध अनुभवरूपे शब्दबद्ध करताना त्यांच्या भाषेतून, प्रतिमांमधून त्यांचे सौंदर्यवेधी मन जाणवते. कथेच्या भावनाशयाला कित्येकदा कलाटणी मिळते ती त्यांच्या या सौंदर्यवेधी जीवनजाणिवेमुळेच हेही लक्षात घेण्याजोगे आहे. त्याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे 'गवताचे पाते' ही कथा. साधारण माणसांच्या वाट्याला सौंदर्याचे निधान येते ते निसर्गामुळे. निसर्गाकडूनच त्याच्या थकल्याभागल्या कंटाळवाण्या झालेल्या जीवनाला नवचैतन्य लाभते. द्विगुणित उत्साहाने आणि वाढत्या समजाने तो पुन्हा आपल्या व्यावहारिक जड जगात परततो असे कुसुमावती म्हणतात. निसर्गाच्या राज्यातील पावसाच्या एकेका थेंबाचे, गवताच्या एकेका पात्याचे साभिप्राय सौंदर्य डोळ्यात भरू लागले की मानवी जीवनातील तोच तोचपणा नष्ट होतो आणि नवीन आशयाचा प्रत्यय येऊ लागतो. रोजच्या जगण्यात नवचैतन्य निर्माण होऊ लागते. म्हणून त्यांच्या कथेतील बव्हंशी सर्वच माणसे निसर्गाच्या सान्निध्यात आपले ताणतणाव हलके झाल्याचा अनुभव घेतात. माणसे जणू आपल्यातील हीण झटकून टाकून शुद्ध होतात. त्यांच्यातील वृत्तीची अशुद्धे गळून पडतात. त्यांच्या जीवनावरील निष्ठा त्यांना परत प्राप्त होतात. ती माणसे पुन्हा प्रसन्नतेचे वरदान देऊन झळाळून उठतात आणि आपली जीवनावरची श्रद्धा परत मिळवतात. आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या ह्या विशिष्टतेमुळे कुसुमावतींची कथा या संदर्भात मोलाची भर कथा वाङ्मयात घालत असते.

त्यांच्या कथेने मराठी वाङ्मयाच्या विविध प्रवृत्ती आणि प्रवाह यांच्या भविष्यातील वाटांचे सूचनही केलेले आहे. फारच थोडेसे लेखन करूनही भविष्यातील साऱ्याच वाङ्मयप्रवाहाची बीजे धारण करणारे साहित्य त्यांना निर्माण करता आले. म्हणूनच कुसुमावतींचा समावेश आपल्याला बीजवृत्तीच्या लेखकांमध्ये करावा लागतो. पुढे जाऊन मराठी वाङ्मयात या साऱ्याच बीजांचे विकसन झाल्याचे दिसून येते. ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, जनवादी, आंबेडकरवादी वाङ्मयाची बीजे त्यांच्या अल्प वाङ्मयात आपल्याला दिसू शकतात. हे असे त्यांना साधते ते त्यांच्याजवळ विचारवेधी आणि सौंदर्यवेधी असे संतुलित मन होते म्हणून. सौंदर्य आणि विचार त्यांच्या कथेत एकमेकांना बळ पुरवतात आणि एकमेकांना कलात्मकता बहाल करतात असे त्यांच्या कथांमधून आपल्या प्रत्ययाला येते असे असले

तरी आपल्या समकालातील वैचारिक उलथापलथ संपूर्णपणे त्यांनी आपल्या कथेतून आणली नाही. त्यांचा पिंड वैचारिक असला तरी त्यांना बंडखोरी करता आली नाही. त्यांच्या नायिका स्त्रीवादी असतात. पण हा स्त्रीवाद अशंतःच त्या स्वीकारतात. कारण पूर्णतः परंपरेपासून तुटणे कुसुमावतींना साधत नाही. वस्तुतः त्यांच्यापूर्वीचे स्त्रियांच्या प्रश्नांच्या संदर्भात अत्यंत विद्रोही भूमिका घेणारे लेखक त्यांच्या समोर होतेच. केतकरांच्या कादंबऱ्यामधील नायिका अनेक प्रकारचे प्रश्न विचारीत होत्या. वामन मल्हारांच्या नायिका वैचारिकतेने परिपूर्ण असे वादविवाद करीत होत्या. विभावरी शिरूरकरांच्या नायिका बंडखोरपणे आपली कुचंबणा आणि नव्या समाजजीवनाने निर्माण केलेली दुःखे धीटपणे मांडत होत्या या सर्वच नायिका, धर्म, समाज, राजकारण, स्त्रीस्वातंत्र्य या संदर्भात वैशिष्टयपूर्ण मते प्रकट करीत होत्या. उदा. केतकरांची प्रियंवदा ''जगातील पुरुषी धर्मशास्त्रीय कल्पना स्त्रियांनी झुगारून द्याव्या. बायकांनी स्वतःचे धर्मशास्त्र आपल्या इच्छेने निर्माण करण्याची वेळ आली आहे'' असे म्हणते. स्त्रियांना आपल्या इच्छेने लग्ने करता आली पाहिजेत, लग्नाशिवाय प्रजोत्पत्ती करता आली पाहिजे असे म्हणते आणि पुरुषस्वामित्वापासून आपली मुक्तता करून घेण्यासाठी पितृसत्ताक आणि मातृसत्ताक या दोन्ही कुटुंबपद्धती असाव्यात असेही त्यांची आणखी एक नायिका म्हणते. वामन मल्हारांची ''विस्तवाचे खेळ' या नाटकातील विजया 'स्वातंत्र्य' तुम्ही कोण देणार ? मी जन्मतःच स्वतंत्र आहे आणि स्वतंत्रच राहणार असे ठणकावून सांगते. अशा स्त्रीवादाच्या असंख्य जाणिवांनी समृद्ध असे दशक कुसुमावतींच्या कथांच्या काळात त्यांच्या समोर होते. पण कुसुमावतींनी त्यांचे पडसाद फारच सौम्यपणे आपल्या कथांमधून उमटू दिले. नवमतवादी विचारसरणीमुळे प्रत्यक्षात जे वातावरण बौद्धिक क्षेत्रात होते त्यातील क्रांतिकारकताही त्यांनी आपल्या दृष्टीआड केली. त्यातील सौम्य आणि आपल्या प्रेरणाक्षेत्राला अनुकूल असा आशय त्यांनी स्वीकारला त्यामुळे वैचारिक बळ त्यांना प्राप्त झाले पण वैचारिक द्वंद्व त्यांना पेलता आले नाही व ते कथेतून आविष्कृत करता आले नाही. त्यांच्या पुढ्यातला वैचारिक संघर्ष त्यांनी आपल्यापुरता सौम्य करून घेतला त्यामुळे त्यांची कथाही तशीच साधी आणि सौम्य होऊन गेली. त्यांच्याजवळ जीवनसौंदर्याचा युटोपीआ आहे पण त्याचे प्रत्यक्षातले स्वरूप सिद्ध होण्यासाठी व्यक्तित्वात जे बंडखोरी करू पाहणारे मन असावे लागते तसे कुसुमावतींजवळ नाही. त्यांच्या ऋजू अतःकरणाला अशी बंडखोरी मानवू शकत नाही. त्यामुळे त्यांचा युटोपिआ त्यांच्या कथेला मोठी उंची देऊ शकत नाही. 'कवींची काव्यदृष्टी' या आपल्या लेखात रविकिरण मंडळातील कवींविषयी लिहिताना त्या म्हणतात ''समोर दिसेल त्यात मन रमविण्यात, सहजप्राप्य दिसेल त्यात जीव गुंतविण्यात एकंदर सर्वच कलावंत समाधान मानीत होते. साध्या विषयातला मोटा आशय शोधणे ही केशवसुतांची वृत्ती: परंतु साध्या रोजच्या व्यवहारातल्या विषयात साधाच अर्थ पाहणे, व्यावहारिकतेच्या पातळीतलाच अर्थ पाहणे, ही गिरीश - यशवंतांची वृत्ती असावी.... असे वाटते. या वृत्तीने या मंडळींनी कवितेचे एक मोठे कार्य साधले आहे; ते म्हणजे कवितेला एका प्रकारे लोकाभिमुख करणे व लोकांच्या रोजच्या साध्या जीवनातल्या अनुभवांना वाचा देणे..... त्या कवितांतील भावना अगदी साध्या माणसाच्या अनुभवाच्या कक्षेत येऊ शकते; नव्हे आलेली असते, परंतु बहुतेक व्यक्त झालेली नसते.....या दृष्टीने महाराष्ट्रीय जीवनातील या कालखंडाला 'साधारणांचे युग' म्हणायला हरकत नाही. रविकिरणमंडळाचा हा खासच मोठेपणा आहे की काव्याच्या प्रांतात वावरूनही त्यांनी साधारण जीवनाचे वास्तवताशून्य वर्णन केले नाही. (जसे फडक्यांनी मनोरंजक आणि खांडेकरांनी बोधवादी कादंबरी लिहून वास्तवापासून पलायन केले तसे) साधारणांच्या भावना व आकांक्षा त्यांनी साधारणांच्या भूमिकेवरूनच व्यक्त केल्या.'' हे जे विवेचन कुसुमावतींनी केलेले आहे ते तसेच्या तसे त्यांच्या कथेला लावले तर कुसुमावतींची कथा ही त्याच साधारणांच्या युगाचे प्रतिनिधित्व करणारी कथा ठरते. कुसुमावतींपाशी उदंड मानवतेची भूमिका होती. सौंदर्य वेध घेऊ शकणारे काव्यात्म मन होते आणि मुख्य म्हणजे तंत्राच्या पल्याड जाऊन अभिव्यक्तीच्या तीव्रोत्कट सामग्रीचे निधान होते पण आपल्या युगाच्या निर्मितीला पोषक अशी गतिमान, उत्कट व प्रभावशाली वृत्ती व तिच्यातील विविधता व विशालता यांना स्पर्श करणारी असाधारण प्रतिभा त्यांच्याजवळ नव्हती. लहानातल्या लहान आणि विशालातल्या विशाल विचारप्रवाहापर्यंत पोचेल येवढा प्रचंड आवाका त्यांच्याजवळ नव्हता. त्यामुळे कथेच्यापुरत्या तरी त्या साधारणांच्याच प्रतिनिधी ठरतात. मात्र त्यांच्या कथेतून साधारणांच्याच युगाचे जे चित्र प्रकट झाले ते फडक्यांच्या मार्गाने गेले नाही आणि खांडेकरांच्याही मार्गाने गेले नाही. ते जीवनाच्या चांगुलपणाकडे, सौम्य अशा वास्तवनिष्ठतेकडे आणि आहे त्या जीवनाला आपल्यापरीने सुंदर करणाऱ्या जीवनश्रद्धेकडे आपल्याला घेऊन जाते. म्हणूनच साधारणांच्या युगाचे प्रतिनिधित्व करतानाही ती चौकट ओलांडून थोडेसे पुढे

जाण्याचा प्रयत्न त्यांची कथा करते आहे हे आवर्जून याठिकाणी सांगायलाच हवे. कारण साधारणांचे जीवनदर्शन घडवताना स्वतःही साधारण बनण्याचा, स्थितीनिष्ठ बनण्याचा धोका असतो. कुसुमावतींना हा धोका संपूर्णतः टाळता आलेला आहे. आपल्या विचारवेधी आणि सौंदर्यवेधी जीवनजाणिवेने, जीवनमूल्यांचा हात कधीही न सोडता, स्वतःच्या संस्कारक्षमतेवर आणि जिवंतपणावर विश्वास ठेवत, जीवन अश्मप्राय बनू न देण्याची प्रतिज्ञा करीत त्या लेखन करीत होत्या. म्हणूनच साधारणांच्या युगाचे प्रतिनिधित्व करीत असूनही त्यांची कथा जुन्या व नव्या कथेच्या सीमारेषांवरची मोठी कथा बनू शकली. पण एकूण कथेच्या इतिहासातले मोठे सीन मात्र तिला मिळवता आले नाही. लेखक प्रज्ञा आणि प्रतिभा यांच्या बळावर आपल्या काळाची चौकट ओलांडून जेव्हा भविष्याकडे नजर लावतो आणि भविष्याची स्वप्ने पाहू लागतो तेव्हाच त्याच्या लेखनात मोठेपणाची बीजे प्रकट होतात. कुसुमावती मात्र आपल्या काळाच्या चौकटीच्या मर्यादांनी स्वतःला बांधून ठेवून जिधवर पाहता येईल तेवढेच आपल्याला दाखवतात. फार पुढचे पाहण्याची नजर त्यांना लाभलेली नाही असे म्हणावे लागते.

त्यांच्या कथासाहित्याचा आणखी एक दोष म्हणजे कथेच्या आकृतिबंधाचा. त्यांच्या कथेतील भावनाशय, विचारसौंदर्य आणि तिचा रचनाबंध यांचे सेंद्रिय एकात्म असे रसायन होत नाही. त्यांच्या काही कथा लघुनिबंध होतात. काही कथा व्यक्तिचित्रे होतात व काही कथा ललितनिबंधांच्या जवळ सरकतात. त्यांच्यावर घेतला जाणारा आकृतिबंधाविषयीचा हा आक्षेप खराच आहे. त्यामुळे कथेच्या क्षेत्रातले त्यांचे श्रेय त्यांच्यापासून दुरावते. कुणाला त्यांचा पिंड लघुनिबंधकाराचा वाटतो. कुणाला त्यांचा पिंड 'स्व'तंत्र लेखिकेचा वाटतो पण त्यांचा पिंड असा एकेरी नव्हता. तो व्यामिश्र होता. संयम, विवेक, सौम्यपणा, रसिकता, काव्यात्मता, सौंदर्यासक्ती, समाजनिष्ठा, मानवनिष्ठा, जीवननिष्ठा आणि या सर्वांना सामावून घेणारी वैचारिकता असा बहुपेडी पिंड त्यांना लाभलेला होता. त्यामुळे त्यांच्या जीवनजाणिवाही तशाच संमिश्र आणि बहुपेडी होत्या. ज्या ज्या जाणिवेचा प्रभाव त्यांच्या प्रेरणाक्षेत्रावर पडला ती ती जाणीव त्या त्या कलाकृतीत प्रभावी होत गेली. परिणामी कलाकृतीचा रचनाबंध कमकुवत झाला व या लघुकथा आहेत की लघुनिबंध आहेत असा गोंधळ निर्माण झाला. परंतु यासंदर्भात आपण नीट विचार केला पाहिजे. असे का झाले किंवा का होते याचा शोध घेतला पाहिजे. कलाकृतीचा भावनाशय आणि रचनाबंध यांच्या एकात्मतेची कुसुमावतींना जाणीव नव्हती असे म्हणणे कुसुमावतींवर अन्याय करणारे ठरेल म्हणून मग हा शोध घेताना काही वेगळा विचार करावा लागेल. कुसुमावतींच्या समकालात फडक्यांच्या कथा कांदबऱ्यांचे तंत्र अत्यंत लोकप्रिय होते. 'प्रतिभासाधन' हे पुस्तक १९३२ मध्ये प्रकाशित झालेले होते. त्यातील तंत्रविचार म्हणजेच कलात्मकतेचा विचार आहे असे समर्थन या काळात केले जात होते. परंतु ही निव्वळ कारागिरी आहे. ती बेगडी व कृत्रिम असून केवळ रंजनाचे ध्येय तिच्या पोटात आहे हे कुसुमावतींच्या नीट ध्यानात येत होते. पण या तंत्रविचाराचा सार्वत्रिक प्रभाव निदान या काळात खोडता येणे त्यांना शक्य नव्हते. कथालेखन करताना त्यांना या प्रभावाशी खरा झगडा द्यावयाचा होता. सुरवातीला कदाचित त्यांच्या कथेला हा झगडा कळला नसेल पण नंतर नंतर हा झगडा त्यांना नीट समजला असावा. हॅरॉल्ड ब्लूम या पाश्चात्त्य साहित्यमीमांसकाने प्रभावचिंतेची संकल्पना मांडली. तिच्या आधारे हा गोंधळ आपल्याला नीट समजून घेता येतो. त्याचे म्हणणे असे की ''साहित्याला एका चिंतेने ग्रासलेले असते. ही चिंता म्हणजे आपल्या पूर्वीच्या परंपरेच्या दडपणाखाली आपण चिरडून जाऊ आणि आपल्याला नवे म्हणण्यासारखे असे काही उरणारच नाही. कवींना आपल्या पूर्वसूरींबद्दल प्रेमादर वाटत असतोच. परंतु त्याचबरोबर एक असूया आणि भीतीही वाटत असते. स्वतःच्या स्वतंत्र जाणिवेला स्थान मिळवून द्यायचे असेल तर पूर्वसूरींना आव्हान देणे आणि त्यांच्या जबरदस्त प्रभावाला विरोध करणे या गोष्टी लेखकांना कराव्या लागतात. त्याच्या मते कलात्मक परंपरा आणि नवीन कवी यांच्यातील लढाई ही एक 'मर्दानी' लढाई असते. पूर्तसूरींचा प्रभाव नव्या कवींना 'नामर्द' बनवू पाहत असतो. त्याविरुद्ध बंड करताना स्वतःची बलस्थाने लक्षात घेऊन प्रत्येक नवा कवी आधीच्या कवींचे, त्यांच्या प्रभावशाली काव्याचे एक 'विपरीत वाचन' (misreading) करीत असतो. किंवा 'विपरीत अर्थनिश्चिती' करीत असतो. हे नव्या कवींचे एक संरक्षक कवच असते.'' (मालशे मिलिंद, स्त्रीवादी समीक्षा संकल्पना व उपयोजन, संपा. मंगला वरखेडे, १९९९, धुळे, पृ. २३ -२४) ही संपूर्ण प्रक्रिया जाणीवपूर्वक केली जाईलच असे निश्चितपणे सांगता येत नाही. पण जेव्हा कुसुमावती लघुकथा लिहू लागल्या तेव्हा कदाचित अजाणता हा संघर्ष त्यांच्या वाट्याला आला असावा. तंत्रशरण आणि वास्तवापासून मनोरंजनवादाच्या किंवा बोधवादाच्या मार्गाने जाणाऱ्या कथेच्या प्रदेशात स्वतःची जागा निर्माण करण्यासाठी

आपल्या पूर्वसूरींशी त्यांनी एक लढाई दिली असावी. परंतु त्यासाठी करायला लागणारे बंड स्वभावात नसल्यामुळे कुसुमावतींना ते साधले नाही. कथेच्या क्षेत्रात आपली जागा निश्चित करण्याची ही लढाई कुसुमावतींना जिंकता आली नाही. या लढाईतली 'विपरीत अर्थनिश्चिती' किंवा विपरीत वाचन त्यांना करता आले नाही. शिंप्याचे काम करत कथा 'वेतणारे' लेखक आणि त्यांचे तंत्र यांचे विपरीत वाचन त्या करू लागल्या तेव्हा त्यांनी आपल्या कथेतल्या तंत्राची मोडतोड केली. या मोडतोडीत कधी त्यांची कथा लघुनिबंध झाली कधी शब्दचित्रे झाली तर कधी व्यक्तिचित्रे झाली. जर त्या हे विपरीत वाचन यशस्वीपणे करू शकल्या असत्या तर तंत्र झुगारून आणि समकालीन कथांमधले बोधवादादी कृत्रिम, वेगडी पण मोहक असे रूप नाकारून आपल्या जीवनजाणिवेच्या चैतन्याने रसरसलेली मौलिक कथा लिहू शकल्या असत्या. परंतु हे साधले नाही. मात्र त्यांनी पूर्वसूरींचे 'विपरित वाचन' करण्याचा प्रयत्न केला असावा असे त्यांच्या कथेचे स्वरूप पाहता वाटून जाते. व आपण हे यशस्वीपणे करू शकत नाही हे लक्षात आल्यावरोबर त्यांनी कथालेखन थांबविले तेही यामुळेच असेही वाटून जाते. आपल्या लघुकथा या कथा नव्हेतच हा चिकित्सकांनी घेतलेला आक्षेप त्यांनी शिरोधार्य मानला. आपल्या हातून थोडेसे का होईना जीवनदर्शन टिपले गेले त्याबद्दल त्या कृतज्ञता व्यक्त करतात. या त्यांच्या म्हणण्यावरूनही त्यांनी आपले स्थान पडताळून पाहण्याचा प्रयत्न केला होता याची साक्ष आपल्याला पटते.

कुसुमावतींनी ही जी लढाई केली त्यातच त्यांना आपल्या नेमक्या स्थानाचा शोध मात्र लागला. आपली जागा कथेच्या क्षेत्रात नसून ललित साहित्यावरच ज्याची संपूर्ण इमारत उभी राहते तो समीक्षेचा आणि साहित्यविचाराचा विस्तीर्ण प्रदेश त्यांच्यापुढ्यात या लढ्यामुळेच उभा राहिला असावा. कथेच्या प्रांतात त्यांनी जे प्रयोग करून पाहिले त्याच्या पाऊलखुणा मात्र कायमच्या उमटल्या. याच पाऊलखुणांचा मागोवा घेत पुढच्या टप्प्यावर नवकथा अवतीर्ण झाली. मराठी कथेतील नव्या जाणिवेची, नव्या जीवनस्पंदनांची आणि नव्या प्रेरणाक्षेत्राची अर्थपूर्ण मांडणी कशी करता येऊ शकते याची सुरवातीची पाऊले कुसुमावतींनी टाकली आहेत. नवकथेची ही अग्रदूती कथाक्षेत्रातल्या शिखरावर पोचली नाही पण शिखराकडे जाणारी वाट तिने निर्देशित करून ठेवली. आपले शिखर या क्षेत्रात आपल्याला सापडणार नाही असे लक्षात येताच मागे परतून आपल्या पुढच्या प्रवासाला निघाली. आपले वाङ्मयीन कर्तृत्व त्यांनी मग पुढे समीक्षेच्या क्षेत्रात सिद्ध केले. कथेच्या क्षेत्रात जे घडले तेच लघुनिबंधाच्या क्षेत्रात घडले असते का ? असा प्रश्न स्वाभाविकपणेच निर्माण होतो. या क्षेत्रात कुसुमावतींना आपले शिखर सापडण्याची दाट शक्यता होती. कारण चंद्रास्त, मध्यान्ह आणि मध्यरात्र हे तीनच निबंध लिहून तोपर्यंतच्या लघुनिबंधाचे ललितनिबंध करण्याचे श्रेय कुसुमावतींना द्यावे इतके ते निबंध महत्वाचे आहेत. त्यांच्या ज्ञानसंपन्न, सौंदर्यासक्त आणि वैचारिक पिंडाला ललितनिबंध मानवला असता यात शंकात नाही. पण त्याकडेही त्यांनी पाठ फिरवली. ललितसाहित्याच्या प्रदेशातून त्या ज्या माघारी फिरल्या त्या फिरून तिकडे डोकावल्या नाहीत. पण त्यांची पिंडप्रकृती ललितनिबंधांना अधिक साजेशी होती. त्यांच्या समीक्षा लेखनातूनही त्यांच्या विदग्ध रसिकतेची आणि काव्यात्म मनोवृत्तीची साक्ष अनेक ठिकाणी पटताना दिसते. मात्र आपल्या आविष्कारासाठी हे ही माध्यम त्यांनी स्वीकारले नाही हे खरे.

कथेच्या क्षेत्रात त्यांनी जेवढे प्रयोग केले त्यामुळे नवकथेची भूमी मात्र तयार झाली आणि तेवढे श्रेय साऱ्याच इतिहासकारांनी त्यांना दिलेले आहे. वाङ्मयाच्या वा वाङ्मयप्रकाराच्या इतिहासात एखाद्या लेखकाचा अभ्यास करताना त्याचे रूप (फॉर्म), द्रव्य (मटेरिअल), आणि तंत्र (टेकनिक) यांच्या परंपरांचा मागोवा घ्यायचा असतो. त्या त्या लेखकाने तिन्हींच्या संदर्भात तो तो वाङ्मयप्रकार किती पुढे नेला आहे याचा विचार करावा लागतो असे आर. एस. क्रेन नावाचा अभ्यासक म्हणतो. कुसुमावतींनी साधारणांच्या युगाचे प्रतिनिधित्व केले पण आपल्या आशयद्रव्याला बेगडी, कृत्रिम आणि केवळ मोहक होऊ दिले नाही. साधारणांच्या चौकटीतले आशयद्रव्य आविष्कृत करून त्या चौकटीबाहेर पाऊल टाकण्याचे धाडस केले नाही तरी वास्तवाशी असलेली त्याची नाळ त्यांनी तुटू दिली नाही. फारशी बंडखोरी त्यांना साधली नाही तरी जीवनमूल्यांवरची श्रद्धा त्यांनी ढळू दिली नाही. तंत्रदृष्ट्या त्यांना कथा साधली नाही पण ते लक्षात येताच त्यांनी कथालेखन थांबविले. त्यामुळे कथेच्या क्षेत्रात एक खुला, झापडमुक्त वैचारिक दृष्टिकोन मांडत जुन्या कथेला नवे बनविण्यासाठीचे बळ त्या अत्यंत शांत - सौम्य आणि आपल्या ऋजु स्वभावाच्या आधारावर त्या पुरवित राहिल्या हे कुठल्याही कथेच्या अभ्यासकाना नाकारता येणार नाही.

- डॉ. अरुणा देशमुख
श्रीनाथ रोड, शांतीनगर, नागपूर

❑❑❑

पासंग :- समीक्षेचे संविधान

◗ डॉ.जया द्वादशीवार

कै. सौ. कुसुमावती देशपांडे यांच्या शताब्दीनिमित्ताने त्यांच्यासारख्या विदुषीच्या 'पासंग' या मौलिक ग्रंथाचे अध्ययन करायला मिळाले ही मी माझी उपलब्धी समजते. त्यांच्यासारखीच इंग्रजीची अभ्यासक असल्यामुळे मराठी वाङ्मयावर टीका करण्याच्या माझ्या अनाधिकाराची मला पूर्ण जाणीव आहे व ही जाणीव ठेवूनच त्यांच्यासारख्या प्रगाढ अभ्यासकाच्या कांही मतांवर प्रकाशझोत टाकण्याचा प्रयत्न या निबंधांत करण्याचा माझा प्रयत्न आहे. १९५४ साली प्रथम प्रकाशित झालेल्या या ग्रंथाचे स्वरूप बाईंनीं इंदूर, ग्वाल्हेर, बडोदे व जबलपूर येथील साहित्यपीठावरून १९४३ ते १९६१ या काळात दिलेली भाषणे, मौज, युगवाणी, अभिरुची या नियतकालिकांमधून दिवाळी अंकासाठी लिहिलेले लेख व दोन परिशिष्टे यांचे संकलन असे आहे. त्यामुळे संकलनाच्या सर्व मर्यादा 'पासंग' मध्ये येतात पण त्याचबरोबर संकलनातील विषयांच्या निवडीचा अचूकपणा व महत्त्व हे दोन महत्त्वाचे गुणही या पुस्तकात येतात. त्यांचे विचार सर्वच निबंधात विखुरले असल्यामुळे अभ्यासकाला त्यांचे मुख्य विचार सूत्ररूपाने समजावून घ्यावे लागतात. सर्व लेखंमधून कुसुमावतीबाईंचे कला, कलेचे प्रयोजन, कविदृष्टीची चिकित्सा, समीक्षेचे कार्य व मापदंड, सौंदर्य, कला व जीवनाचा संबंध या गोष्टींवर स्वतःची स्पष्ट व मार्मिक मते नोंदविली आहेत. या निबंधात त्यांतील काही कवीच्या मुद्यांचा थोडक्यात परामर्श घेण्याचा प्रयत्न केल्या गेला आहे.

इंग्रजी वाङ्मयाच्या अभ्यासाने व अध्यापनाने त्यांच्या वाङ्मयदृष्टीला एक भक्कम आयाम प्राप्त झाला व त्यामुळे त्यांच्या चिंतनाचा आवाका व्यापक झाला. पण 'पासंग' मधले चिंतन इंग्रजी वाङ्मयाच्या प्रभावाखाली व त्याचे मापदंड लावून झाले असे फारसे वाटत नाही. उदाहरणे देतांना मात्र त्या त्यांच्या वाचनांत आलेली इंग्रजी वाङ्मयातील उत्कृष्ट उदाहरणे उद्धृत करतात पण म्हणून त्यांची तुलना मराठी वाङ्मयाशी करून त्यांना हीन दाखविणे हा उद्देश जरासासुद्धा डोकावत नाही. उलट मराठी साहित्यात अनेक अशी हिमशिखरे दिसतात असा विश्वास त्या वेळोवेळी त्या करतात. आपल्या मायबोलीचे वाङ्मय आशयधन व्हावे, समाजाभिमुख व्हावे, इतर भाषा वाङ्मयाच्या तोडीचे व्हावे हीच एक आंतरिक तळमळ 'पासंग' मधील लेख वाचकासमोर आणतात. मराठी भाषा, प्रदेश, संस्कृती, वाङ्मय, कला व संपूर्ण जीवनाविषयी आंतरिक ओढ असलेले व त्यामुळे समाजाच्या उन्नयनाचा ध्यास असणारे एक अभिजात व्यक्तिमत्त्व ह्या लेखांद्वारे वाचकांसमोर उभे राहते.

कै. कुसुमावतीबाईंच्या चिंतनाचे सगळे आयाम काही केंद्राभोवती घुमताना दिसतात व ते केंद्र म्हणजे त्यांची समाजाभिमुखता व जीवनाविषयीचे भान. त्या एका आदर्शाच्या पूजक होत्या. स्वतंत्र भारतातला आदर्श समाज व असा समाज निर्माण करण्यासाठी आवश्यक असणारे घटक यांविषयी त्यांचे चिंतन चालत होते. असे आदर्श प्रस्थापित करण्यासाठी कलेने झटले पाहिजे, जोपर्यंत जीवन व कला (मग ती कोणतीही असो) यांचा संबंध असतो तोपर्यंतच कलेत प्राण असतो. 'कला व कृत्रिमता' या निबंधात त्या म्हणतात

''कला म्हणजे साधारण जीवनाचाच परिपाक (quintesence) व प्रतिकात्मक आविष्कार. जीवनमूल्यांची राखण करणे, त्याविषयी मानवी मनाला सदैव जागृत ठेवणे, त्याला क्षुद्र व अश्मप्राय होऊ न देणे हेच कलेचे मुख्य कार्य आहे.

त्यामुळे समाजजीवन प्रगल्भ करणारी मूल्ये व माणसे त्यांना भावतात. त्यांना आंबेडकर, फुले देखील भावले असतील. हीच कसोटी त्यांनी साहित्याला लावली. म्हणून त्यांच्या लेखी साहित्य हे साध्य नसून लोकजीवन व लोकजीवनाची सर्व अंगे त्यांचे उन्नयन करणारे साधन आहे. साहित्याचा परिणाम जीवनाचे उन्नयन करणारा असेल तर स्वच्छ कलादृष्टी घेऊनच कलाकारांनी कलेचा पाठपुरावा केला पाहिजे. हा पाया भक्कम करण्यासाठी जगाचे, विश्वाचे व सौंदर्याचे खरे रूप जाणून घेणे आवश्यक. समाजाचे व व्यक्तीचे संबंध व्यक्तिमत्त्वाच्या समतोलपणावरच अवलंबून असतात. त्यांच्या लिखाणात अशा समतोलवृत्तीच्या व वास्तवदृष्टीच्या लोकांची समाजातील उणीव ही फार गंभीरबाब आहे असे वारंवार उल्लेख येतात.

समाज व कलेचे असे अतूट नाते राखून ठेवण्याचे काम फक्त मध्यमवर्गीयच करू शकतात असे 'कला व मध्यम वर्ग' या लेखात त्या म्हणतात. कलेचा आत्मा मानवतेचा असला तरी तिचा देह मध्यमवर्गीयच असतो. श्रीमंत व दलित अशा दोन्ही टोकांना ती स्पर्श करत असली तरी मध्यमवर्गीय जीवनाच्या आविष्कारणात, सुशोभनात व शुद्धिकरणातच तिचे साफल्य झाले आहे. ज्ञानेश्वरी, तुकारामाचे अभंग व मनाचे श्लोक या निकषावर त्यांना केशवसुतांची कविता उत्कृष्ट वाटते. केशवसुतांनी कवितेला प्रगतीचे एक साधन, गणले. काव्य हे तुतारीसारखे समाजाला आव्हान देणारे, जागवणारे असते ह्या विश्वास बाळगणारे केशवसुत सुरवातीच्या कवितांमध्ये निसर्गवृत्तीत रमलेले आढळतात. त्यांच्या कवितांमधील अनेक उदाहरणे त्यांच्या काव्यदृष्टीविषयक उत्क्रांतीची दिशा नमूद करतात. केशवसुतांची दृष्टी केवळ आत्मलक्षी राहिली नाही, ती काव्याच्या केवळ सामाजिक परिणामावर खिळून राहिली नाही, तर या दोहोंना उल्लंघून तिने साकल्याचा विचार केला. त्यांच्या नव्या शिपायाने स्वतंत्र मानवतेचे स्वप्न पाहिले. मानवजातीविषयी प्रेम, बंधुभाव व मांगल्याची भावना तो जोपासतो. कुसुमावतीबाईचे टीकावाङ्मय देखील अशाच मूल्यांचा पाठपुरावा करणारे आहे.

वाङ्मयीन समीक्षेचे निकष, दिलेले भाषण, मराठी वाङ्मय समीक्षा सौंदर्याची नवप्रतीती, वाङ्मयाचा आस्वाद इ. भाषणांमधून कुसुमावतीबाईंनी समीक्षाविषयक तत्त्वचिंतन विस्तृतपणे मांडले आहे. त्यांना समीक्षेची प्रचलित अशी एकहि पद्धत परिपूर्ण वाटत नाही. कलाकृतीचा आस्वाद घेऊन त्यातील अनूभूती व आशय व सौंदर्याची जाणीव होणे हा दुसरा टप्पा. यासाठी मानसशास्त्रीय व समाजशास्त्रीय निष्ठांची मदत घ्यावी लागते. ज्या भूमीनून ती कृती व्यक्तिमनाच्या द्वारा फुलून आली, त्या भूमीचे विशेष लक्षात घ्यावे लागतात. कुसुमावतींच्या मते साहित्याच्या परंपरा व समीक्षेच्या परंपरांना पण इथे महत्त्व असते. तिसरा टप्पा म्हणजे या अनूभूतीचे मूल्यमापन करणे. इथे जीवनमूल्यांचा संबंध येतो. म्हणून सौंदर्यशास्त्रीय मूल्यांसोबत जीवनमूल्यांचाही समीक्षेने विचार करायला हवा. जीवनाविषयीचे सत्य जाणून घेणे हा आग्रह त्यांनी बाळगला.

याच निकषांवर सौ. कुसुमावतीबाईंनी मराठी काव्याची समीक्षा केलेली दिसते. या समीक्षेत त्यांनी जीवनविषयक मूल्यांचा शोध पूर्वग्रहशून्य दृष्टीने व अभ्यासू संशोधकाच्या दृष्टीने घेतला. समीक्षेत त्यांनी आपले सौजन्य, शुद्ध बुद्धी व वैचारिक पातळी सोडली नाही. गाढ समाजमनस्कता हा त्यांच्या वाङ्मयीन दृष्टीचा परिपाक होता म्हणून समीक्षेचे निकष हे समाजाभिमुख असलेच पाहिजे असा त्यांचा आग्रह असे.

केशवसुत, बी, गोविंदाग्रज, रविकिरण मंडळाचे कवी यांच्या आत्मनिष्ठा व बहुनिष्ठा या वृत्तीचे ऊहापोह करताना त्यांनी पटवर्धन व माडखोलकरांनी केशवसुतांवर घेतलेल्या आक्षेपांना अत्यंत मर्मपक उत्तरे दिली आहेत. सुरवातीच्या काळातील केशवसुतांच्या कविता या रोगट, चमत्कारिक किंवा दुबळ्या मनोवृत्तीच्या द्योतक आहेत हा आरोप किंवा कवितेवर चेतनागुणाचा आरोप करणे हे त्यांना मान्य नाही. ''साध्याहि विषयात आशय कधी मोटा किती आढळे'' हे म्हणणारे केशवसुत, सृष्टीला परममित्र मानणारे टिळक, चाफा किंवा पिंगा सारख्या अलौलिक कविता लिहिणारे 'बी' सुरवातीला सृष्टीत रमणारे पण नंतर जगाच्या भावशून्यतेने विकल झालेले बालकवी व आपल्या प्रतिभेची काळोखाशीच मैत्री करून देणारे गोविंदाग्रज यांना श्रेष्ठ वाटतात. कवितेला लोकाभिमुख करणारे व साध्या अनुभवांना वाचा देणारे पटवर्धन गिरीश, यशवंत यांचा मोठेपणा कुसुमावतींना या लोकांनी कविवेत या साधारण जीवनाचे वास्तवशून्य वर्णन केले नाही यांत वाटतो.

'कवींची काव्यदृष्टी' या लेखाच्या शेवटी केशवसुतांच्या काळातील आत्मनिष्ठा व रविकिरण मंडळाची लोकजीवनाशी समरस होण्याची आकांक्षा असा संगम मराठी काव्यात व्हायला पाहिजे अशी

अपेक्षा त्या व्यक्त करतात. परंतु रविकिरण मंडळाच्या कवितेनंतरची आलेली मराठी कविता या निकषांवर, तपासून घ्यायचे त्या टाळतात. 'पासंग' वाचत असतांना आपल्यासारख्या स्वातंत्र्यकाळात जन्मलेल्या वाचकांना ही उणीव सतत भासत राहते. मराठी काव्याला ओहोटी लागली काय ? हा प्रश्न उपस्थित करतात पण उदाहरणे देऊन त्याचे विवेचन मात्र करीत नाहीत. १९६१ सालच्या नवसाहित्याचे प्रश्न या भाषणांत प्रचलित साहित्यातील अधिक व उणे टोकळमनाने सांगतात सर्वच कलावंतांच्या कलात्मक जाणिवेच्या अधुरेपणाचा उल्लेख करण्यात लेखकाला स्वतःला काय म्हणायचे आहे याची खोल व विशुद्ध जाणीव नाही व या मुळाशी प्रश्न त्यांच्या जाणीवेच्या व उत्कटतेचा आहे असे त्यांना वाटते. जीवनाविषयीचे नैराश्य, विनबुडाचे मूल्यविचार इ. ठळक कारणे या मागे आहेत. पण हे सर्व चिंतन केवळ विचारांच्या पातळीपर्यंत त्या मर्यादित ठेवतात. आपण घालून दिलेल्या समीक्षासूत्रांचे application त्या 'पासंग' मध्ये करत नाहीत. त्यामुळे यामागची त्यांची भूमिका काय ? हा प्रश्न मनात उभा राहतो. आपली समीक्षा एका मर्यादेतच ठेवण्याचे वंधन त्यांनी स्वतःवर घालून घेतले होते का ? की निर्भीड समीक्षेने सहन करावा लागणारा कडवटपणा झेलण्याची त्यांची मानसिक तयारी नव्हती ? असे अनेक प्रश्न या ठिकाणी उपस्थित करता येतात.

मराठी कादंबरी शतक पाहिले या कादंबरी समीक्षा ग्रंथातील सूत्रांची बीजे १९४३ साली त्यांनी मुंबई मराठी साहित्य संघाच्या वर्धापनदिनी दिलेल्या 'मराठी कादंबरीचा उत्क्रांतिमार्ग' या लेखांत आहेत. प्रचलित मराठी कादंबरीची वृत्ती ही आभासनिष्ट व्यक्तिवादाने ग्रासलेली असून ही वृत्ती मनाला अत्यंत जीवनविमुख व समाजविमुख करणारी आहे असे स्पष्ट मत त्या नोंदवतात. राजपुत्र सिद्धार्थाला जसे त्याच्या वडिलांनी ऐश्वर्याच्या दुनियेत (दुःख व संकटांपासून सुटका म्हणून) गिरफ्तार केले तसेच फडक्यांनी वाचकांना सुखाभासाच्या दुनियेत बंदिस्त केले हा त्यांचा आरोप. य. खु. देशपांडे, खांडेकर, माडखोलकर इ. साहित्यकारांच्या काळाच्या या अभ्यासनिष्ठेने त्या ग्रासल्या गेल्या असून या प्रवृत्तींना दूर सारणे अत्यंत महत्त्वाचे आहे असे त्या प्रतिपादन करतात. 'रणांगण' ही त्यांच्या दृष्टीने उत्कृष्ट कादंबरी कारण त्यातल्या नायकाला स्वतःविषयी कुठलाहि आभास नाही. संपूर्ण कादंबरीत त्याची विशुद्ध मानवता कायम राहते. अशा मानवताप्रधान कादंबरीचे 'अनुकरण' केल्याचे 'पवित्रपाप' माडखोलकरांनी 'नागकन्या' या कादंबरीत केल्याचा उल्लेख पण त्या करतात. एकूण या अनिष्ठ परिणामांतून मराठी कादंबरीला बाहेर काढायचे असल्यास कादंबरीकारांनी आत्मशोधन, वस्तुनिष्ठता व व्यापकता या घटकांचा विचार जाणीवपूर्णक करावा असे त्यांना वाटते. कादंबरी विषयक त्यांनी घेतलेले निर्णय अभ्यासकांना मार्गदर्शक ठरतील असे आहेत. ते निर्भीडपणे व स्पष्टतापूर्वक नोंदवले असतील तरी ते उग्र व न्यायनिष्ठुर नाहीत. पण ते न्यायकरुण आहेत असा अभिप्राय न. र. फाटकांनी दिला तो न्यायपूर्णच वाटतो.

'पासंग' हा कुसुमावतीबाईंच्या केवळ वाङ्मयविषयक महत्तेचा आलेख नाही तर त्यात त्यांची सामाजिक प्रश्नाविषयीची आस्थापण जागोजागी प्रगट होणे अपरिहार्य आहे. साहित्य हे एकूणच समाजजीवनावर परिणाम करते त्यामुळे सामाजिक प्रश्न आपल्या पद्धतीने सोडविणे हे अपरिहार्य ठरते असे त्यांना वाटते. स्वतंत्र भारतातील सामाजिक पुनर्घटनेचे प्रश्न त्यांनी जाणले होते. संतुलित व्यक्तिमत्त्वाच्या निमितीसाठी कलाव्यवसायाचे योग्य शिक्षण देणे हे त्यांना आवश्यक वाटते. झपाट्याने होणारा बहुजनसमाजाचा उदय व त्याप्रती असणारी मध्यमवर्गाची अनुदार वृत्ती यामुळे भीषणता व बीभत्सता उफाळून येईल व म्हणून समाजातल्या सर्व वर्गांनी बहुजनसमाजाच्या जीवनाकडे सहृदयतेने पाहावे असा गर्भित इशारा त्या देतात. नव्यानेच निर्माण झालेल्या महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक व साहित्य महामंडळ व मराठी साहित्य महामंडळाकडून त्यांच्या काही अपेक्षा आहेत. भाषा संवर्धन, मराठी भाषेचे अध्ययन व अध्यापन, उच्च अभिरुची जोपासण्यासाठी मराठी नियतकालिकांचा दर्जा तपासून हीन व अभिरूची बिघडवणाऱ्या साहित्याला रोखणे ही कामे या मंडळांनी करावीत.

सत्य, शिव व सौंदर्य या त्रिसूत्रीचे पाठराखण करणारे वाङ्मय ते सकस व अस्सल वाङ्मय ! वाङ्मयाच्या समीक्षकांनी या तत्त्वांची पाठराखण केलीच पाहिजे. सौंदर्यपूर्ण कलादृष्टी हीच टीकामूल्यांची जननी असते. याच कलादृष्टीच्या अभावामुळे टीकावाङ्मयाला समाजजीवनाच्या जवळ जाता आले नाही. मानवाची सारी धडपड जीवनासाठी आहे. जीवनाकरिता ही जगण्याची मूळ प्रेरणा असते. मनुष्याच्या या क्रियाशीलतेचे मूळ सौंदर्यविषयक कल्पनांत असते.

त्यांच्या मते :- जे युगायुगाच्या अनुभवांत टिकते ते सत्य
जे युगायुगाला आनंदित करते ते सौंदर्य
जे युगायुगाच्या वदलत्या जीवनांत मानवाला कल्याणकारी

ठरते ते शिव.


म्हणून जे वाङ्मय, कला याचा पाठपुरावा करेल ते उत्कृष्ट असा ठाम समज घेऊन त्या समीक्षेच्या प्रांतात वावरतात.

शेवटी 'पासंग' हा समीक्षातत्त्वांचीच चिकित्सा करणारा ग्रंथ नव्हे तर तो समकालीन वाङ्मयातील निरनिराळ्या प्रवाहांचे गुणदोष दाखवणारा व त्यांची गंभीरता पटवून देणारा एक मौलिक ग्रंथ आहे. साहित्य व साहित्याची समीक्षा हे समाजजीवन उन्नत करण्याचे एक साधन कसे आहे हा मुद्दा त्यांनी वेगवेगळ्या दृष्टिकोनातून मांडला आहे. या अपेक्षा पूर्ण करण्याचे कौतुक त्या करतात पण न करणाऱ्याविषयी स्पष्टपणे लिहीत नाहीत. त्या समीक्षेचा कायदा 'पासंग' मधील विवेचनातून सांगतात पण त्या कायद्यानुसार न्यायदान करण्याचे मात्र टाळतात. कदाचित त्याचे मूळ त्यांच्या सौम्य, सौजन्यशील व ऋजुतापूर्ण व्यक्तिमत्त्वांत असेल. कदाचित त्या त्यांच्या मर्यादाहि असतील.-

- डॉ. जया द्वादशीवार

जंगवार्ड, बाबूपेट, चंद्रपूर

❑❑❑



अनुक्रमणिका

कुसुमावतीबाईंचे ललित साहित्य

डॉ. रा. गो. नाईकवाडे

कुसुमावती अनिल देशपांडे, गत शतकातील मराठी साहित्यात आपल्या वैशिष्ट्यपूर्ण प्रतिभेने व पराक्रमाने सार्थ झालेले एक नाव. त्यांच्या या नावातच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा अनोखेपणा आणि वेगळेपणा सामावला असल्याचे दिसेल. काही मोजक्या कथा आणि तुरळक ललितनिबंध यांचे लेखन करून मराठी ललित साहित्यविश्वात इतका महत्त्वाचा ठरलेला कलावंत विरळाच. यापूर्वीच्या एका शोधनिबंधातून आणि त्यावरील चर्चेतून कुसुमावतींच्या व्यक्तित्वाचा मराठी साहित्यविश्वात तुलनेने अधिक गाजलेला 'टीकाकार' हा पैलू पुरता उजेडात आलेला आहे. माझ्या या 'शोधनिबंधा'त कुसुमावतींच्या ललित साहित्याचा वेध घेण्याचा प्रयत्न मी करणार आहे.

आधुनिक मराठी कथेच्या इतिहासात आणि आधुनिक मराठी ललितनिबंधाच्या प्रवाहात कुसुमावती देशपांडे यांचे अनन्यसाधारण स्थान वहुधा सर्वच वाङ्येतिहासकारांनी आणि समीक्षकांनी मान्य केलेले आहे. त्यांच्या ललित साहित्याविश्वावद्दलच्या काही गोष्टी निर्विवादपणे मान्य झाल्या आहेत. त्यामध्ये फडके खांडेकर आदींची लघुकथा आणि गाडगीळ - गोखले यांची नवकथा यांना जोडणारा दुवा म्हणून वामन चोरघडे यांच्यासोवत कुसुमावतींच्या काव्यात्म - चिंतनशील कथेचे स्थान, मराठी लघुकथेला नवे वळण लावून नवकथेपूर्वीची पार्श्वभूमी तयार केली व ललितनिवंधाच्या प्रवाहात मोलाची भर घालून पूर्वीचा लघुनिवंध आणि ५० नंतरचा विविध रूपांनी विकसित झालेला 'मी'त्वप्रधान ललितनिबंध यांच्यामधला दुवा म्हणून त्यांच्या ललितनिबंधाचे महत्त्व आहे.

कुसुमावतींच्या ललित साहित्यानिर्मितीमागे त्यांचे संवेदनशील, रसिक, प्रज्ञावान, बहुश्रुत आणि पारंपारिक भारतीय मन उभे आहे. त्यांचे व्यक्तिमत्त्व आणि त्यांची निर्मिती यांच्यातील नाते जिव्हाळ्याचे असून त्यात पूर्ण एकात्मता होती, असे मत मांडणाऱ्या अनुराधा पोतदारांनी 'कुसुमावती वाङ्मयदर्शन' च्या प्रस्तावनेत हा अनुवंध विस्ताराने मांडून दाखविला आहे, त्याचा उल्लेख पुढील विषयविवेचनात ओघाने येणार आहे.

कथाकार कुसुमावती

अल्पकाळ व अल्पसंख्येत कथालेखन केल्याने वाङ्मयीन महात्मतेच्या सर्व शक्यता विद्यमान असताना वाङ्मयप्रवाहात केवळ नामनिर्देशापलीकडे कुसुमावती देशपांडे यांनी 'मराठीतील नामवंत कथाकार' ही उपाधी प्राप्त होऊ शकली नाही. परंतु आधुनिक मराठी कथेच्या इतिहासात त्यांचे स्थान मात्र ऐतिहासिक महत्त्वाचे ठरले. पृथगात्म प्रतिभेच्या बळावर मराठी कथेला वळण देण्याचे कार्य काळाने त्यांच्या हातूनच करवून घेतले. कुसुमावती देशपांडे यांची पहिली कथा 'मृगाचा पाऊस' ही सप्टेंबर १९३१ च्या किर्लोस्कर मासिकात प्रसिद्ध झाली. त्यानंतर त्यांचा पहिला कथासंग्रह 'दीपकळी' १९३५ मध्ये प्रकाशित झाला, ज्यात एकूण १३ कथा होत्या. नंतरचा 'दीपदान' १९४१ मध्ये प्रकाशित झाला. ज्यात ११ कथा, २ ललितनिवंध (माधान्ह व मध्यरात्र), दोन वाङ्मयविषयक टीकालेख व दोन भाषणे इतकी सामग्री होती. तिसरा संग्रह 'मोळी' १९४६ मध्ये देशमुख आणि कंपनीने काढला ज्यात भाग १ या शीर्षकाखाली ८ कथा, भाग २ या शीर्षकाखाली ४ व्यक्तिचित्रे वा व्यक्तिचित्रणप्रधान कथा, व भाग ३ अंतर्गत 'चंद्रास्त' हा ललितनिबंध इतक्या साहित्यकृती समाविष्ट

होत्या. १९५८ मध्ये वि. स. खांडेकरांनी पुढाकार घेऊन दीर्घ प्रस्तावनेसह कुसुमावतींच्या निवडक कथांचा एक संग्रह 'दीपमाळ' या नावाने (प्रकाशन - देशमुख आणि कंपनी) प्रसिद्ध केला. यात यापूर्वी प्रकाशित कथांशिवाय नव्या पाच कथा आलेल्या दिसतात. म्हणजे कुसुमावतींच्या ग्रंथरूपात प्रसिद्ध कथांची एकूण संख्या ३९ व ललितनिबंधांची संख्या ३ इतकी होते. (वाङ्मय परंपरेने ज्यांना ललितनिबंध मानले.)

कुसुमावतींच्या कथालेखनाला असणारी त्यांच्या लौकिक व्यक्तिमत्त्वाची पार्श्वभूमी लक्षात घ्यायची असल्यास, त्यांचा विवाह कवी अनिलांसोबत ६ ऑक्टो. १९२९ ला झाला. गतशतक गाजवणारे मराठी साहित्यविश्वातले हे एक आदर्श दाम्पत्य आहे. ३ जुलै १९३० ला पुत्रप्राप्ती. आणि त्यानंतर जवळजवळ एक वर्षाने कुसुमावतींनी आपल्या कथालेखनाला प्रारंभ केला. (कारण पहिल्या कथासंग्रहात लेखनकाळ १९३१ ते १९३५ असा दिलेला आहे.) ३१ ते ४६ हा त्यांच्या ललित साहित्यलेखनाचा काळ मानला तर वयाच्या २७ ते ४२ या काळात त्यांनी हे लेखन केलेले दिसते. कारण पुढे ललिततलेखनाकडे पूर्णपणे पाठ फिरवून त्या समीक्षा लेखनाकडे वा वैचारिक लेखनाकडे वळलेल्या दिसतात. लेखन प्रवासातला पहिला टप्पा प्रेमपत्र लेखनाचा, दुसरा ललित लेखनाचा व तिसरा वैचारिक समीक्षालेखनाचा, अशी ही त्यांच्या आयुष्यक्रमाची वाङ्मयीन विभागणी करता येते. इथे काही मंडळींच्या मनात त्यांच्या प्रसिद्ध झालेल्या पत्रलेखनाचा समावेश ललित साहित्यात करता येईल का ? असा प्रश्न निर्माण होऊ शकतो. पण प्रत्येक प्रसिद्ध झालेले लेखन साहित्य म्हणजे ललित साहित्य नसते. आणि ती खरोखरची प्रेमपत्रे आहेत हेही त्यात महत्वाचे !

कथांचे आशयविश्व आणि वैशिष्ट्ये

कुसुमावतींच्या कथांबद्दलचे विवेचन हे प्रामुख्याने 'दीपमाळ' या कथासंग्रहात समाविष्ट असलेल्या ३१ कथांच्या आधाराने मांडले आहे. (त्यातील काही कथा, 'कथे'च्या आकृत्तिबंधात न बसणाऱ्या आहेत.) या कथा वाचल्यानंतर त्यातील आशयविश्वाविषयी काही गोष्टी चटकन नजरेत भरतात. या कथांतून प्रामुख्याने तीन प्रकारची व्यक्तिमने त्यांच्या सुखदुःखासह प्रकटली आहेत. स्त्रीमन, श्रमजीवी माणसाचे मन आणि बालमन. हे मन ज्या व्यक्तिरेखांचे आहे त्या व्यक्तिरेखा अवतीभवतीच्या विशिष्ट परिस्थितीसकट, वातावरणासह या कथातून आपल्यापुढे उभ्या राहतात. स्त्रियांच्या मनस्थितीचा आणि परिस्थितीचा शोध घेताना कुसुमावती शहरी स्त्रियांइतकेच ग्रामीण - दलित निरक्षर स्त्रियांवरही आपले लक्ष केंद्रित करतात. त्या निरक्षर स्त्रिया आणि श्रमजीवी माणसे यांच्या जीवनाची वीण समजून घेण्याचा प्रयत्न आपल्या कथातून लेखिका करतात. उघडपणे सामाजिक सह - अनुभूतीचा स्वर कुसुमावतींच्या कथेतून प्रकट होतो. स्त्रीच्या अंतर्मनाचा वेध घेणाऱ्या कथांमध्ये एकटीच, मृगाचा पाऊस, चिमणी, माऊली, गवताचे पाते, पिसारा, पिटोरी अमावस्या, झिमझिम उघाड, दमडी, लहानी, लहरी, जाईबाई, समांतर रेषा, संगीताचा झरा,चिंधी, कलाधोविणीचे वैधव्य ह्या कथा येतात. 'एकटीच' मधल्या गंगाकाकूचे नवऱ्याच्या त्यांच्याविषयीच्या औदासिन्यातून निर्माण झालेले एकटेपणाचे दुःख निवेदिका कथन करते. 'माऊली' तली सरस्वती वतनदार नवऱ्याने दुसरी बाई ठेवल्याने एकटेपणाच्या दुःखाला सामोरे जाते, परंतु ग्रामजीवनाशी समरस होत ती त्या दुःखावर मातही करते व गावाची 'माऊली' बनते. मध्यमवर्गीय जीवनातल्या तोचतोपणाला उत्तर म्हणून 'गवताचे पाते' मधल्या रमाबाई ईश्वरभक्तीची संगत करतात, तेच त्यांच्या शांती - समाधानाचे कारण आहे. 'पिसारा' कथेतल्या पावर्तताीबाई नवऱ्याचे ढोंग जाणतात, त्याकडे तटस्थपणे बघत, कधी स्वतःस बदलवीत आपल्या छोट्याशा आयुष्यवर्तुळात सार्थकता शोधतात. 'झिमझिम - उघाड' मध्ये शांता नावाच्या एका नवख्या शिक्षिकेच्या मनाची घालमेल व्यक्त झाली आहे. 'लहरी' कथेत नायिका उर्मिलेच्या विचारांच्या लहरी लेखिका अचूक पकडतात. स्त्रीपुरुषांच्या मनातील परस्परांविषयीच्या आकर्षणात व प्रेमात चालणारा आशानिराशेचा खेळ आणि दोघांच्या मनातील भावलहरींचा अमूर्त संघर्ष कुठल्याही प्रत्यक्ष घटना - प्रसंगांशिवाय कथारूपात मूर्त होतो. 'चिंधी', 'समांतर रेषा' कलाधोविणीचे वैधव्य, लहानी, दमडी, 'पिटोरी अमावस्या' या कथा ग्रामीण, निरक्षर, गरीब स्त्रियांची मने आपल्यापुढे उघडी करतात. दारिद्र्यात जगणाऱ्या स्त्रियांचे आणि पुरुषांचे चित्रण करताना ह्या मंडळींचा कोणत्याही विपरीत परिस्थितीत टिकून राहणारा पीळ लेखिकेला विशेष महत्त्वाचा वाटतो. संकटांना कधी धैर्याने, कधी बेफिकीरीने व निमूटपणे (नदीकिनारी मधील बुरड जमातीचे श्रमिक) कधी पारंपारिक श्रद्धांचा आधार घेत (जाईबाई) तर कधी आपल्या कामाशी समरस होत कष्ट झेलणारी माणसे इथे दिसतात. या लेखनामागील प्रेरणा सांगताना 'कलाधोविणीचे वैधव्य' या कथेतील निवेदिका म्हणते - ''माझे पांढरपेशी मन व्याकूळ होऊन गेले. सारी सकाळ एक विचित्र हुरहुर मनात भरून राहिली. वाटे. वैधव्याची विकलता आता कलाच्या जीवनावर पसरली असेल...... कोण तिला आधार देईल ? पण पुन्हा वाटे - तरीही तिने अचूक वेळेवर कपडे तयार करून पाठवले ! कसे होऊ शकले हे ?'' लेखिकेच्या मनाला सतत पडणाऱ्या अशा प्रश्नातच या कथांची बीजे आहेत. त्या प्रश्नातून निघालेले चिंतन कथारूप धारण करताना दिसते. एक पांढरपेशे पण संवेदनशीलतेने सहानुभूतीने व्याप्त मन

अवतीभवतीच्या जगाकडे कसे आपुलकीच्या व सहअनुभूतीच्या डोळ्यांनी बघते याचा प्रत्यय कुसुमावतींच्या कथातून मिळतो. लेखिकेच्या मनाला अस्वस्थ करणारे प्रश्न आणि तिच्या मनात भरून राहणारी हुरहुर, तिच्या मनातली आपुलकी आणि जिव्हाळा सहजपणेच चिंतनशीलता आणि काव्यात्मता धारण करतो. जो त्यांच्या कथांचा महत्त्वपूर्ण विशेष आहे. 'कलाधोबिणी'तला कोण तिला आधार देईल ? हा प्रश्न श्री. म. माट्यांच्या 'उपेक्षितांच्या अंतरंगातील' बन्सीधर तू कुठे रे जाशील ? या प्रश्नासारखाच असल्याचे लक्षात येते.

'चिंधी' या कथेला स्वातंत्र्य चळवळीची पाश्वभूमी आहे. व 'वहाणा' या कथेतला दादाजी चांभार औद्योगिकरणाच्या खेड्यातील प्रभावाची आणि विस्कटलेल्या ग्रामजीवनाची व्यथा धारण केलेला आहे. हे बघताना एक गोष्ट सहजच मनात येते. ३० ते ४५ हा कालखंड एकीकडे गांधींच्या व गांधीवादाच्या प्रभावाने तर दुसरीकडे मार्क्सवादी प्रभावाने भारलेला दिसतो. कुसुमाग्रजांची आणि पुढे अनिलांची तत्कालीन कविता हा प्रभाव उघडपणे दर्शवते. शहरी पांढरपेशा सुशिक्षित वर्ग अशा प्रभावातून खेड्यांकडे आणि दलित जीवनाकडे वळल्याचेही दिसून येते. कुसुमवातींवरही हाच प्रभाव दिसून येतो. त्यांची सहानुभूती मात्र कुठेही उणी वाटत नाही. त्यांच्या कथांतली मानवतेची सौम्य, शांत हाक कुठेही आत्मप्रत्ययात कमी पडत नाही आणि तत्कालीन परिस्थितीचा विचार करता हे सुद्धा त्यांच्या कथांचे एक सामर्थ्य आहे. सामाजिक चिंतनाच्या अंगाने त्यांची कथा मर्ढेकर गाडगीळांच्याच नव्हे तर अनिल - मुक्तिबोधांच्या नवतेच्या परंपरेत बसणारी आहे. त्या परंपरेचे पूर्वसूत्र म्हणून त्यांच्या कथांचा याही अंगाने विचार करता येऊ शकतो. काही कथा ढोबळ पद्धतीने सुखी समृद्ध वर्ग आणि श्रमजीवी वर्ग यांच्यातील 'विरोध' चित्रित करतात. 'छायाप्रकाश', 'त्यांची काळजी', 'नदीकिनारी' या कथांतून हा ढोबळपणा उघडपणे तर 'भैया' 'अप्सरांची भेट', 'लहानी' या कथातून तो सूचकपणे मांडलेला दिसतो. बालमनाचे लघुतम परंतु आशयघन चित्र रेखाटणाऱ्या 'सवंगडी' व 'वादळ' या दोन लघुतमकथाही प्रभावी ठरतात. कुसुमावतींच्या कथांचे आशयविश्व इतर बावींप्रमाणेच वाचकांना अंतर्मुखतेचा आणि मनोविश्लेषणप्रधानतेचाही प्रत्यय देते. एका आंतरिक गरजेपोटी कथा या आकृतिबंधाची रूढ बंधने न पाळता त्यांनी आपल्या समाजशील मनाचा प्रत्यय आपल्या कथांमधून घडवला. श्रमजीवी वर्गातील स्त्री - पुरुषांच्या भावनांशी आणि सुखदुःखाशी समरस होत, त्यांच्या व्यक्तिरेखा भावोत्कट वृत्तीने त्यांनी साकारल्या. इत्यादींमुळे त्यांच्या कथांतून नवकथेचे बीजारोपण होऊ शकले. त्यांच्यानंतरच्या नवकथेत आढळणारी वैफल्यग्रस्तता आणि अश्रद्ध वृत्ती मात्र त्यांच्यात नाही. याउलट भारतीय जनजीवनातील पारंपारिक मूल्ये, समाजाची धारणा करणाऱ्या सांस्कृतिक - सामाजिक धारणा, मानवतेवरील निष्ठा, श्रद्धा इत्यादी जीवनमूल्यांचा प्रत्यय त्यांच्या कथेतून येतो. विशेषतः स्त्री मनाच्या किंवा श्रमजीवी वर्गाच्या चित्रणातून हे दिसून येते.

कुसुमावतींचे ललितनिबंध

कुसुमावतींच्या ललित साहित्याचा विचार करताना एक वादग्रस्त मुद्दा वारंवार वाचला जातो. तो त्यांच्या ललितलेखनाच्या आकृतिबंधावावतचा ! कुसुमावतींनी कलावंताच्या आंतरिक उर्मीनेच केवळ ललित साहित्य निर्माण केल्याचे दिसून येते. त्या काळात त्यांच्या डोळ्यासमोर प्रामुख्याने कथा व लघुनिबंध हे दोन वाङ्मयप्रकार होते. वैचारिक निबंधाचेच लालित्यपूर्ण रूप असलेला खेळकर शैलीचा लघुनिबंध आणि कथानकाच्या व तंत्राच्या ठराविक चौकटीत अडकलेली कथा या दोन्हींना टाळून कुसुमावतींची कथा आणि त्यांचे ललितलेखन पुढे जाऊ इच्छित होते. त्यांच्या चिंतनपर, काव्यात्म, सैल आणि मुक्त अभिव्यक्तीला कधी कथांचे तर कधी ललितनिबंधाचे, त्यांच्यातल्या लेखकाच्या नकळत लाभलेले दिसते. त्यामुळे त्यांचे 'कथा' म्हणून प्रसिद्ध झालेले आणि 'कथा' म्हणूनच विचारात घेतले गेलेले काही लेखन 'ललितनिबंध' या समावेशक वाङ्मयप्रकारात समाविष्ट होण्यासारखे निर्माण झाले. त्यांच्या संपूर्ण साहित्यप्रवासात 'ललितनिबंध' म्हणून केवळ माध्यान्ह, मध्यरात्र आणि चंद्रास्त या तीनच ललितकृतींचा विचार केला जातो. त्यांच्या उर्वरित सर्व ललितसाहित्याचा विचार कथेच्या अंतर्गतच केला जातो. कुसुमावतींच्या काही कथा या कथांसारख्या न वाटता ललितनिबंधासारख्या वाटतात असे समीक्षकांनी वारंवार नमूद केले. त्यामुळे त्यांच्या साहित्यातील आकृतिवंधाची निश्चिती न होता एकप्रकारे गोंधळाची स्थिती निर्माण झाली. स्वतः समीक्षक म्हणून प्रसिद्धी पावलेल्या कुसुमावतींनाही याबावत ठाम व स्पष्ट भूमिका घेता आली नाही. कारण उघड होते. 'ललितनिबंध' हा आत्माविष्कारी आकृतिबंध जसा १९५० नंतरच्या कालखंडात स्वतंत्रपणे सिद्ध होत गेला तसे पूर्वी नव्हते. लघुनिबंध वगळता इतर आत्मनिष्ठ, 'मी'च्या अंगाने लिहिल्या जाणाऱ्या लेखनाबाबत निश्चित अशी चौकट सिद्ध झाली नव्हती. ज्याप्रमाणे नंतरच्या काळात आनंद यादव यांनी 'मीत्व' हे 'ललितनिबंधाचे' व्यवच्छेदक लक्षण सांगत एक स्वतंत्र वाङ्मयप्रकार म्हणून त्याची मांडणी केली. (साहित्य अध्यापन आणि प्रकार) तसा विचार पूर्वी समग्रपणे नीट मांडला गेला नव्हता.

'दीपमाळ' या खांडेकर संपादित संग्रहाच्या मनोगतात कुसुमावती म्हणतात - ''माझ्या लेखनाचे तीन संग्रह. त्या तीनही संग्रहामध्ये

लेखनप्रकारांची थोडीबहुत खिचडी झालेली आहे.... माझ्या लघुकथा या कथा नव्हेतच, हा कित्येक चिकित्सकांचा आक्षेप आहे तो वेगळाच ! पण या 'तथाकथित कथा' व ललित निबंध...... या सामग्रीतले खडे निवडून काढून तांदुळाची व मुगाची साटवणी वेगवेगळ्या डब्यात.... ''कुसुमावतींच्या साहित्यिक खिचडीतले तांदूळ आणि मूग वेगवेगळे करण्याचे काम खांडेकरांनी खरेच केले का ? हा एक प्रश्नच आहे. त्यांच्या निवडक कथांच्या संपादनात पूर्वीच्या दीपकळी, (१९३५) संग्रहातील ७ व दीपदान (१९४१) मधील एक असे एकूण आठ कथा व ललितनिबंध त्यांनी वगळले आणि काही नव्या महत्वपूर्ण कथा त्यात समाविष्ट केल्या. दीपमाळ खांडेकरांनी निवडक कथांचा संग्रह म्हटल्याने वगळलेले लेखन हे कथा म्हणून वादग्रस्त व ललितनिबंध ठरणारे असे समजायला हरकत नाही परंतु त्यांचाही संभ्रम 'कथा' की 'ललितनिबंध' यासंदर्भात पुरेसा मिटला नाही कारण ते म्हणतात कथेचे स्वरूपही अनेकदा शब्दचित्राशी मिळतेजुळते होत जाते. (दमडी, जाईबाई, कला धोबिणीचे वैधव्य)...... 'नदीकिनारी' सारख्या लालित्यपूर्ण लिखाणाला नकळत निबंधाचे स्वरूप आल्यासारखे वाटते. (प्रस्तावना, पृ. २४) याशिवाय त्यांनी आपल्या विवेचनात विचारप्रवण ललितनिबंध, रूपककथा, गद्यकाव्य आदी संज्ञांचाही निर्देश केला आहे. वा ल. कुलकर्णी कुसुमावतींच्या लेखनाचे तंत्र हे 'स्व-तंत्र' असल्याचे म्हणतात, तर 'दीपकळी' या कथासंग्रहात माडखोलकरांना भावचित्रे, शब्दचित्रे इत्यादी आढळल्याने ते या संग्रहास चक्क 'ललित लेखाचा सममह' म्हणतात. कुसुमावतींचे 'वाङ्मयीन दर्शन घडविणाऱ्या अनुराधा पोतदार यासंदर्भात सांगतात ''कुसुमावतींच्या तीन संग्रहात विखुरलेल्या साहित्यामध्ये अनेक कथा आहेत. काही ललितलेख, व्यक्तिचित्रे आणि शब्दचित्रेही आहेत. विविध वाङ्मयप्रकारांच्या सीमारेषा इथे परस्परांना भिडल्या आहेत. या कथांना एकच एक साचेबंद घाट नाही.'' त्यांच्यामते यात असलेले विविध घाट म्हणजे ललितलेख, व्यक्तिचित्रे, नाट्यछटा, क्षणचित्रे, अनुभवाचे काव्यात्म टिपण, वैचारिक निबंध, गद्यकाव्य इत्यादी. या विवेचनानंतरही कुसुमावतींनी तीनच महत्वाचे ललितलेख लिहिल्याचे त्या सांगतात. डॉ. प्र. न. जोशी यांनी आपल्या 'मराठी वाङ्मयाच्या विवेचक इतिहासात' एक वेगळेच विधान केले आहे.''त्यांची कथा अनेकदा शब्दचित्रांचे वा रूपक कथांचे रूप धारण करताना दिसते. ''(कथांविषयीचा अभिप्राय)''
कुसुमावतींच्या 'दीपकळी' व 'दीपदान' मधील काही कथा, कथा की लघुनिबंध ? असा प्रश्न उपस्थित व्हावा अशा आहेत. माध्यान्ह, मध्यरात्र व चंद्रास्त या कथा ललितनिबंधासारख्या वाटतात.'' हा गोंधळ इथेच थांबत नाही. रजनी कोलारकर नावाच्या समीक्षका 'समकालीन साहित्य प्रवृत्ती आणि प्रवाह' मध्ये एक वेगळाच सूर लावतात. वैचारिकतेने हे निबंध वैचारिक निबंधच ठरतात. ते निखळ आत्माविष्काराचे रूप धारण करीत नाही......... कुसुमावती. इरावती, माधव आचवल वगैरे निबंधकार, हे लघुनिबंधकार. ललितनिबंधकार ठरत नसून वैचारिक ललितनिबंधकार ठरतात.
या सगळ्या संकल्पनात्मक गोंधळातून वाट काढून कुसुमावतींच्या ललित लेखनाची आकृतिबंधाबाबत नीट व्यवस्था लावावी. (आपल्या परीने) या उद्देशाने मी डॉ. आनंद यादव यांचे याबाबतचे विवेचन आधाराला घेतले आहे. पूर्वी याचा उल्लेख आला आहे. त्यात त्यांनी 'ललितनिबंध' हा स्वतंत्र वाङ्मयप्रकार मानून त्यातील 'मी'त्वाच्या व्यवच्छेदक लक्षणाभोवती मांडणी केली आहे. ललितनिबंधात प्रामुख्याने एका व्यक्तित्वाचा 'मी' चा आविष्कार प्रकट होतो. त्यात विषय निमित्तमात्र ठरून अंतिमतः खरा 'मी' हा विषय ठरतो. पूर्वीच्या लघुनिबंधातून विकसित झालेल्या 'ललितनिबंध' या स्वतंत्र वाङ्मयप्रकारांचे स्वातंत्र्योत्तर काळात विविध अंगांनी विकसन झाले, ज्याचे व्यवच्छेदकत्व 'मीत्व' हे होते. 'मी' चा 'मी' ने घ्यावयाचा शोध किंवा 'मी' चे चिंतनशील व काव्यात्म समर्थन असेही त्याचे वर्णन केले जाते. यात 'मी' हा कल्पनात्मक पातळीवर न वावरता 'वास्तव' पातळीवर वावरतो. अशा लेखनात 'मी'त्व आणि विषयवस्तू अशी विभागणी करून त्यातील विशिष्ट प्रमाणावरून 'आठवणी - अनुभव' 'लघुनिबंध' 'प्रवासलेख' 'व्यक्तिचित्रे' व 'ललितलेख' अशी पाच उपप्रकारात त्याची मांडणी करण्यात येते. यात अनुक्रमे 'मी'त्वाचा प्रदेश कमी कमी होत जातो. व विषयवस्तूचा प्रदेश वाढत जातो. कुसुमावतींच्या कथावाङ्मयात आपण विचारात घेतलेल्या ३९ कथांमध्ये 'दगडाची गोष्ट', 'जांभई' 'छायाप्रकाश' 'कला आणि कला' 'पश्चात बुद्धी' 'निराशेतून' 'विचारशील प्राणी' 'दीपदान' इत्यादींचा समावेश लघुनिबंधात होतो. 'दमडी', 'लहानी' 'जाईबाई' 'समांतर रेषा' 'चिंधी', 'भैया' यांचा समावेश व्यक्तिचित्र या प्रकारात करता येईल. शिवाय त्यामध्ये माध्यान्ह, मध्यरात्र व चंद्रास्त हे तीन लघुनिबंध मिळविता येतील. असे केल्यास कुसुमावतींच्या साहित्याची कथा व ललितनिबंध अशी जवळपास समप्रमाणात विभागणी होते.

दा वि. कुलकर्णी आपल्या मराठी कथा या पुस्तकात म्हणातात -....... त्यांचा (कुसुमावतींचा) मूळ पिंड हा कथाकाराचा नसून लघुनिबंधकाराचाच असावा असे दिसते. (पृ. ३०७) माझ्या या शोधनिबंधामागे एक गृहीतक अनाहूतपणे उभे झाले. ते म्हणजे, कुसुमावतींचा पिंड मूलतः कथाकाराचा नसून ललितनिबंधकाराचा आहे. तो पिंड पुढे समीक्षक - विचारवंताच्या

रूपात विकास पावला आहे. पोतदार म्हणतात- ''कुसुमावतींच्या कथारूपाकडे बघताना काही गोष्टी उत्कटपणे जाणवतात. प्रथम जाणवतो तो त्यांचा आत्मगत स्वगतासारखा, प्रकट चिंतनासारखा सूर'' यातूनही वरील मतास पुष्टी मिळते. कुसुमावतींच्या ललित साहित्यात 'मी' त्याचा आविष्कार करणारे चिंतनशील काव्यात्म लेखन मोठ्या प्रमाणात दिसते. त्यांचा मूलपिंड ललितनिबंधकाराचा मानल्यास, त्यांच्या काही कथांनी ललितनिबंधाचे रूप घेतले असे न म्हणता, उलट काही ललितनिबंधांनी कथांचे रूप धारण केले असे म्हणावे लागेल. मुळात त्यांना लिहायचे आहेत ललितनिबंध, परंतु 'कथा' या वाङ्मयप्रकाराच्या तत्कालीन दबदब्यामुळे त्या कथा लिहितात. म्हणून हे सर्व लिखाण ललितनिबंधवजाच झाले आहे. म्हणूनच त्यांच्या कथांची वैशिष्ट्ये सांगाताना 'कथावस्तू, त्यातील व्यक्तिचित्रण, वातावरण - पार्श्वभूमी' इत्यादी गोष्टींची चर्चा न होता (पूर्वीचे समीक्षक) चिंतनशीलता, काव्यात्मता इत्यादी गोष्टींवरच वारंवार भर देतात. किंवा कथांचे विवेचन करताना काढलेले निष्कर्ष बघा. समाजजीवनातला विरोध सहृदयतेने टिपताना त्यांच्या निवेदनाला आलेला अकृत्रिम सरळपणा, घटनांपेक्षा व्यक्तींमध्ये रंगून जाण्याची वृत्ती, एखाद्या चिमुकल्या पण उत्कट अनुभूतीचे त्यांनी केलेले काव्यात्म टिपण, काही ठिकाणी येणारे वैचारिक उद्‌बोधन व निबंधवजा भाष्य, भावानुभवांच्या आविष्कारात जाणवणारी सौम्य आणि मंद लय इत्यादी कथांबद्दल सांगितलेल्या गोष्टी ललितनिबंधाची वैशिष्ट्ये आणि लक्षणे दर्शवितात. या गोष्टी मूलतः ललितनिबंधाच्या प्रकृतीशी निगडित आहेत. कलावंताच्या मुक्त आणि उघड स्वरूपाच्या आत्माविष्काराशी निगडित आहेत. कुसुमावतींच्या ललितनिबंधांमध्ये निसर्गाकडे ओढ घेणारे, निसर्गाची विविध रूपे अपार कौतुकाने बघणारे रसिकमन दिसून येते. निसर्ग हा संवेदनशील व सौंदर्यवेधी रसिकमनाचा कायमचा प्रामाणिक मित्र असल्याचे त्यातून प्रतीत होते. ''मराठी लघुनिबंधातील नकली व नाटकी वैयक्तिकतेच्या जागी कुसुमावतींनी आत्मनिष्ठा आणली. खोल उत्कट अनुभवाचा, प्रगल्भ, तत्वलक्षी व तरल आविष्कार साधला. संवेदनांचे व भावनांचे अस्सल काव्य व्यक्त केले. ''हा श्री. पु. भागवतांचा अभिप्रायही (सत्यकथा, डिसेंबर ६१) या विवेचनास बळ पुरविणारा आहे. कारण हेच कार्य त्यांना मूलतः करायचे होते आणि त्यांनी ते केले. ललितनिबंध या वाङ्मयप्रकाराचा 'मीत्वाचे प्रकटीकरण' हा गाभा ओळखून पुढे करंदीकर, इरावती कर्वे, दुर्गाबाई भागवत यांचे ललितनिबंधलेखन झाले. या गाभ्याभोवती व्यक्तिचित्रे, प्रवासलेख, आठवणी - अनुभव, लघुनिबंध इत्यादी अंगाने एक समृद्धी मराठी वाङ्मयाला प्राप्त झाली. ज्याचे मूळ कुसुमावतींच्या लेखनात होते. इतरांना आणि स्वतः कुसुमावतींनाही कदाचित याचे नीट आकलन झाले नसावे. पुलंसारख्या लेखकाने व्यक्तिचित्रे, प्रवासलेख या प्रकारांचे 'मीत्वनिष्ठ' असे मानदंड स्थापित केले तर ग्रेससारख्या लेखकाने स्पष्टपणे आठवणी अनुभव, लघुनिबंध, ललितलेख या प्रकारचे आदर्श रूप उभे केले. कुसुमावतींनी रुजविलेले 'मीत्वाचे' बीज अशाप्रकारे पुढे अनेकांगांनी विकसित झाले. कुसुमावतींच्या लेखनकाळात 'कथा' या वाङ्मयप्रकारासारखी प्रतिष्ठा एक स्वतंत्र वाङ्मयप्रकार म्हणून जर 'ललितनिबंधास' असती, जी पुढे ५० नंतर करंदीकर, दुर्गाबाई इत्यादींच्या लेखनाने आली, तर कुसुमावती 'कथाकार' न होता 'ललितनिबंधकार' झाल्या असत्या. आणि त्यांचे ललितनिबंधलेखन संभ्रमाच्या धुक्यात हरवून वाट न सापडल्यामुळे अर्ध्यातच थांबले नसते. दुर्गाबाई भागवतांनी ज्याप्रमाणे समांतरपणे वैचारिक समीक्षा - संशोधन आणि 'ललितलेखन' या दोन्ही प्रकारचे समृद्ध लेखन केले त्याचप्रमाणे कुसुमावतींच्याही प्रतिभेने मराठी साहित्यविश्वाला एकाचवेळी ह्या दोन्ही प्रकाराचे दान दिले असते.

या विवेचनाच्या छोट्याशा चौकटीत फारच थोड्या गोष्टी येऊ शकतात. काही महत्त्वाच्या वाटणाऱ्या, चिंतनप्रक्रियेत प्रकर्षाने जाणवणाऱ्या गोष्टी सुटल्या आहेत. त्यात सुटलेल्या गोष्टी अशा - १ कुसुमावतींच्या ललित साहित्याचा विचार त्यांच्या टीकाविचारांच्या व समीक्षाशैलीच्या कसोटीवर करणे वा त्यास पुढे ठेवून करणे. २. त्यांच्या लौकिक व वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचा समग्र शोध घेऊन त्या पार्श्वभूमीवर ललित साहित्याची चिकित्सा करणे. स्वतंत्रपणे समाजशास्त्रीय, शैलीशास्त्रीय इत्यादी अंगाने त्यांच्या ललित साहित्यकृतींमधील वाङ्मयीन महत्तेचा शोध घेणे. ४ पूर्वकालीन, समकालीन आणि भविष्यकालीन कथाकारांशी व ललितनिबंधकारांशी तुलना करीत त्यांच्या ललितसाहित्याचे वेगळेपण अधोरेखित करणे. इत्यादी. यावरून आपणास माझ्या निबंधाची मर्यादित चौकट लक्षात येईल.

चर्चासत्राच्या आयोजकांनी उदार मनाने मला ही निबंधवाचनाची संधी दिली त्याबद्दल त्यांचे मनापासून आभार व्यक्त करतो.

धन्यवाद.

- डॉ. रा. गो. नाईकवाडे
४८, योगायोग, जुना नंदनवन परिसर, नागपूर - ०९,
दूरध्वनी - २७०१५४२

❑❑❑

कुसुमावतींच्या कौटुंबिक आठवणी

(कै. कुसुमावतीबाई चिरंजिव डॉ. शिरीष व स्नुषा सौ. आशावती देशपांडे यांनी सांगितलेल्या आठवणी)

शब्दांकन : डॉ. मालती निमदेव

कुसुमावतींच्या आठवणी सांगतांना सौ. आशावती देशपांडे अक्षरशः भारावून बोलत होत्या. त्यांना किती सांगू अन् किती नको असं होऊन गेलं होतं.

कुसुमावतींचा आणि त्यांचा सहवास अगदीच कमी कालावधीचा ठरला. परंतु देशपांडे कुटुंबीयांवर कुसुमावतींनी अपार माया केली. काकू, मामी, आत्या वहिनी ही सगळी नाती त्यांनी विलक्षण आत्मीयतेनं जोपासली. नात्यातल्या भाचे-पुतण्यांना आणून शिकवलं. कुसुमावतींचे व्यक्तिमत्त्वच वेगळं होतं. इतक्या मोठ्या अधिकारी पदावर असणाऱ्या कुसुमावतींनी सामान्यातल्या सामान्य नातेवाईकांचं इतकं केलं की आजही 'कुसुमकाकू नसती तर आम्ही इथवर पोहोचू शकलो नसतो. असं त्यांचे पुतणे - भाचे सांगतात.

स्वतःचं कॉलेज, स्वतःचं लेखन. चार मुलांच्या खस्ता आणि इतर शिक्षणासाठी म्हणून आलेली नात्यातली मुलं या सगळ्यांचं करणं किती कठीण होतं. त्यात पुन्हा अप्पा (कवी अनिल) नेहमी बदलीवर असायचे. शिरीष देशपांडे म्हणाले, 'आई आम्हाला वडिलांसारखी वाटायची.'

घरातलं सगळं पाहायला शांताताई होत्या. त्या जयवंतांकडे कुसुमावतींच्या लहानपणापासून राहत असत. त्या देशपांडेंकडेही सर्व पाहात.

कुसुमावती आल्यागेल्याची उठवस अगत्याने करीत. त्यांनी आपल्या वागण्याने खूप माणसं जोडली. एकदा आजी म्हणजे कवी अनिलांची आई पडली. तेव्हा तिला नागपूरला आणून कुसुमावतींनी खूप सेवा केली. ग्लोव्हज् घालून रोज त्या स्वतः जखमेचं ड्रेसिंग करायच्या. आजींना खूप कौतुक वाटायचं. मात्र त्या कुसुमावतींच्या हातचं खायच्या नाहीत. 'जनरीत आड येते' म्हणून खंत करीत रहायच्या. पण कुसुमावतींनी त्यांचं मन जिंकलं होतं. अनिलांच्या वडिलांना सूनबाईचं मोठच कौतुक होतं. त्यांनी सूनबाईच्या डोहाळजेवणासाठी खास माहेश्वरी हिरवं वाण (हिरवी साडी) ऑर्डर देऊन करवून घेतलं होतं.

अतिशय साधी रहाणी होती कुसुमावतींची. ऑफ व्हाईट कलरच्या साड्या त्या नेसायच्या. त्यांच्या सौम्य, घरंदाज, शालीन व्यक्तिमत्वाला साजेसा वेश. कॉलेजमध्ये जायच्या तेव्हा साडीवर कोट असायचा. लग्नानंतर सुरवातीला कॉलेजमध्ये पाचवार साडी तर घरी आल्यावर नऊवार पातळ त्या नेसत होत्या. सकाळी लवकर चार साडेचारला त्या उठायच्या. देवासमोर बसून ईशावास्य म्हणायच्या. दक्षिणामूर्ती स्त्रोत्र म्हणायच्या. आमच्या घरी ज्ञानेश्वरांनी ज्या प्रकारचं देऊळ सांगितलं त्याची फ्रेम होती आणि ज्ञानेश्वरांच्या पादुका असायच्या. त्याच्यासमोर कुसुमावतींचे हे नित्यपठण होत असे. स्त्रोत्र, ज्ञानेश्वरीच्या ओव्या आणि ओंकार म्हणण्याचा नेम होता.

अप्पा (कवी अनिल) आणि आई (कुसुमावती) दोघांनाही कर्मकांडाचा तिटकारा होता. सगळे सणवार काकांकडे असायचे. किशोरसाठी गणपती मात्र बसवला जायचा.

आपलं दुःख दुसऱ्यासमोर दिसू द्यायचं नाही हा घरचा अलेखित नियम होता. नव्हे तसे ट्रेनिंगच दिलं जायचं. शिरीष देशपांडे म्हणतात 'आईच्या डोळ्यात कधी पाणी पाहिल्याचं आठवत नाही.' बावनसाली (सर्वात मोठ्या मुलाचा) किशोरचा अपघाती

अनुक्रमणिका

निधनाचा आघातही त्यांनी अतिशय धैर्यानं पचविला होता. इतकंच नव्हे तर अप्पांना धक्का बसू नये म्हणून त्या खंबीर राहिल्या. अवघ्या २२ व्या वर्षी एअरफोर्समधे असलेल्या किशोरचे दुःखद निधन झाले. 'स्वोर्ड ऑफ ऑनर' (Sword of Honour) हा अत्यंत गौरवाचा किताब त्यांना इतक्या लहान वयात मिळाला होता. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर असा किताब त्यांच्यापूर्वी फक्त एकालाच मिळाला होता. विमानचाचणी करताना विमानाने पेट घेतला आणि नगरजवळ विमान कोसळले. कुसुमावती आणि अभय दोघं नागपूरला होते. अप्पा आर्वीला जज्ञ होते. किशोरच्या निधनाची तार नागपूरला पोहोचली. कुसुमावती काही क्षणच स्तब्ध झाल्या. लगेच नाना जोगांना घेऊन गाडीने आर्वीला गेल्या. शिरीष देशपांडे तेव्हा जे. जे. स्कूलला मुंबईला होते तर उल्हास फर्ग्युसनला पुण्याला. सगळे पुण्यात जमले. कुसुमावतींनी किशोरचं पार्थीव दाखवावं म्हणून आग्रह धरला. एअरफोर्सच्या अधिकाऱ्यांनी त्यांना सांगण्याचा प्रयत्न केला की तुम्ही बघू शकणार नाही. पण 'मी त्याची आई आहे. मी त्याला कशाही स्थितीत पाहू शकते. त्याला पाहिल्याशिवाय तो गेला हे मी खरं कसं मानू' असं कुसुमावती म्हणाल्या. आधी त्यांनी आणि अप्पांनीच किशोरला पहायचं असं टरलं होतं. 'पण मग दोघच का ? तो या तिघांचा मोठा भाऊ आहे' असं त्या म्हणाल्या. मग सगळ्यांनीच त्याला पाहिलं. पुत्रवियोगाच्या अत्यंत कठीण प्रसंगातही त्यांना कुणी रडताना पाहिलं नाही. किशोरचं फ्युनरल पुण्यातच झालं.

श्री. शिरीष देशपांडे आणि सौ. आशावती यांचा विवाह ठरला तेव्हा देशपांडे आणि टकले दोन्ही कुटुंब दिल्लीला होते. एप्रिल १९६० मधे साखरपुडा झाला आणि नोव्हेंबरमध्ये लग्न. मधल्या काळात सौ. आशाताईंचे देशपांडेंच्या घरी जाणंयेणं असायचे. शिरीष तेव्हा चंदीगडला होते. कुसुमावती अभयला पाठवून आशाताईंना बोलावून घेत. मात्र त्यांना कधी एकटं जाऊ देत नसे. अभयला पोहचवून द्यायला सांगत. त्यावेळी दिल्ली आकाशवाणीवर त्या स्त्री व बालविभागाच्या निर्मितीप्रमुख होत्या. एवढ्या मोठ्या अधिकारी असल्या तरी घरातल्या सगळ्या गोष्टींची हौस होती. आशाताईंच्या आईशी त्यांचं विहिणीचं नातं असलं तरी खूपच जिव्हाळा, स्नेह होता. 'लग्नसोहळा कसा असावा' ही पुण्याच्या कुठल्याश्या प्रकाशनाची पुस्तिका मागविण्यात आली. स्वतः अप्पांनी ते पुस्तक वाचून तेलगणापासूनचे सर्व विधी कसे करायचे ते सांगितले. १२ नोव्हेंबरला गोरजमुहूर्तावर लग्न संपन्न झाले आणि सगळे विवाहविधी पार पडेपर्यंत रात्रीचे अडीच वाजले होते. दिल्लीला कडाक्याची थंडी पडली होती. कितीतरी फॉरिनर्स हा लग्नसमारंभ बघायला आले होते.

धाकट्या अभयवर कुसुमावतींचा अधिक जीव होता. 'सगळी सूट अभयला असायची. असं शिरीष देशपांडे म्हणतात. अभयने एअरफोर्समधे जाण्यासाठी परवानगी मागितली तेव्हा कुसुमावती अस्वस्थ झाल्या. किशोरच्या अपघाती निधनाचा धक्का बसलेला होता. पण हे अभयला सांगणार कसं ? त्यांनी दोन रात्री बसून मुलाला पत्र लिहिलं आणि नाश्त्याच्यावेळी त्याला मिळेल अशी व्यवस्था केली. त्या ऑफिसात गेल्या पण आशाताईंना अभयची काय प्रतिक्रिया होते यावर लक्ष ठेवायला सांगितले. त्या स्वतः अभयवर बारकाईने लक्ष ठेवीत होत्या. पण त्या पत्राचा परिणाम म्हणा अभयने एअरफोर्सला न जाण्याचा निर्णय घेतला.

सौ. आशाताई आणि कुसुमावती यांचा सहवास अवघा दीड वर्षांचा होता. त्यांना स्वतःला मुलगी नसल्यामुळे सुनेला त्यांनी मुलीसारखं जपलं. पहिल्या बाळंतपणासाठी आशाताई माहेरी पुण्याला गेल्या. कुसुमावतींनी त्यांना सांगितलं, 'मुलगा झाला तर साधी तार कर, मुलगी झाली तर मात्र एक्सप्रेस तार कर. नात झाली तेव्हा आनंद झाला.

१९६१ च्या ग्वाल्हेरच्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी कुसुमावती होत्या. साहित्य संमेलन आटोपून त्या नात पहायला गेल्या तेव्हा पितृपक्ष सुरू होता. त्यांनी स्वतः बाळासाठी स्वेटर वगैरे विणले होते. आशाताईंच्या आईला त्यांनी विचारले, 'पितृपक्ष आहे हे देऊ का ' इतका साधेपणा स्वभावात होता. त्या सगळ्यांशी अतिशय जिव्हाळ्याने वागायच्या २२ नोव्हेंबरला बारश्यासाठी येणार होत्या त्यापूर्वीच ११ नोव्हेंबरला गेल्या. बाळाच्या बारश्यासाठी बाळलेण्यांसह सगळी पेटी त्यांनी स्वतः तयार करून ठेवली होती.

११ नोव्हेंबरला कुसुमावती ऑफिसमधून घरी आल्या. बरं वाटत नाही म्हणून गोळी घेतली. दुपारी ३ ॥ ला अस्वस्थ वाटायला लागलं. डॉक्टर आले पण काही करता आलं नाही. श्वासाची गती कमी कमी होत गेली. आणि सारं संपलं.

पुण्याला त्यादिवशी चिमुकली शर्वरी (बाळ) सारखी रडत होती. तिच्या रडण्यानं घरातले सगळे बेचैन होऊन गेले होते. तेवढ्यात आशाताईंचा चुलतभाऊ आला आणि त्याने आशाताईंच्या वडिलांना रेडिओवरच्या प्रादेशिक बातम्या ऐकल्या का विचारले. कुसुमावती गेल्याची बातमी होती. खरेच वाटेना. मग रात्री ९ च्या बातम्यात कुसुमावतींच्या निधनाचे वृत्त ऐकले. कुसुमावतींच्या अशा अचानक जाण्याचा धक्का विलक्षण होता. त्याही परिस्थितीत

अप्पांनी आशाताईंना सांगितले 'तू स्वतःची काळजी घे' आणि त्यांच्या वडिलांना सांगितले तुम्ही येऊ नका.

कुसुमावती गेल्यानंतर ७-८ डिसेंबरला अप्पांनी कळवलं बारसं ठरल्याप्रमाणे व्यवस्थित करा हा बाळाचा पहिला धार्मिक सण आहे. नातीच्या बारश्याची सगळी तयारी कुसुमावतींनी आधीच करून ठेवली होती.

शिरीष देशपांडे म्हणाले, 'आई गेल्यानंतर अप्पांना अनेक वर्ष सुचत नव्हतं. जमत नव्हतं. श्री. पूं. ची पत्रं यायची यातून बाहेर निघा म्हणून. अनेक वर्षानंतर त्यांनी 'एकाकी' ही संवेदनापूर्ण कविता लिहिली.

स्वप्नातल्या मुक्या सावलीसारखी दिसते अशी का
आकृती तुझी.
बोलत नाही ऐकूही न ये का गळ्यात दाटली
हाक तुला माझी..... !

अप्पा नेहमी गंभीर अन् शांतच असत.

''आईचं लेखन, भाषणांची तयारी वगैरे सारं शांतपणे चालायचं. ग्वाल्हेरचं अ. भा. साहित्य संमेलनाचं अध्यक्षीय भाषण तिनी खाली बसून घरातल्या बसक्या टेबलवर लिहिलं. अप्पासुद्धा तसंच लिहायचे. आम्हाला कधीही अप्पांनी 'आज मी ही नवी कविता केली ऐका रे' असं म्हटल्याचं आठवत नाही. आई सकाळी लवकर उठून लिहायची. घरी पु. ल. देशपांडे, विमलाबाई देशपांडे नेहमी यायचे. पुल तारस्वरातच बोलत. वाद चालायचे. आम्ही मुलं सगळं दुरून बघायचो. विमलाबाईंकडे मध्यस्थाची भूमिका असायची. अप्पांना शब्दच्छल करण्याची इनबॉर्न देणगी होती. त्यामुळे जोरदार संभाषणं चालायची असं वातावरण असायचं.

इतक्या वर्षानंतर जाणवतं, आईच्या आठवणी काढल्या की गलबलल्या सारखं वाटतं.

डॉ. मालती निमदेव.
जी -४, उत्कर्षपूर्वा, ७३०, खरे टाऊन, धरमपेठ, नागपूर - १०

❑❑❑



अनुक्रमणिका

युगवाणी
कुसुमावती देशपांडे
विशेषांक
२००४/०५

आठवणी दाटतात

(कै. कमलिनी देशमुखांच्या आठवणी)

शब्दांकन : डॉ. अनघा केसकर

कुसुमावतींना आम्ही भावंडं आक्का म्हणत असू. नात्यानं पाहिलं तर आक्का माझी मोठी वहीण. पण, माझ्या तिच्यात सोळा वर्षांचं अंतर. त्यामुळे तिनं मला जन्मभर आईचीच माया दिली. अशी माया की जी माझ्या जन्मदात्या आईला मला कधी देता आली नाही. तिच्यासमोर अकस्मिकपणे येऊन टाकलेल्या कठीण परिस्थितीशी झुंजण्यात आमच्या ताईला (आईला) तिची शक्ती पूर्णत्वानं लावावी लागली. मात्र त्याची पुरेपूर भरपाई आक्कानं केली.

तान्हुली वहीण म्हणून तिच्याकडून माझे भरपूर लाडवीड झाले. पुढच्या आयुष्यात उपयोगी पडेल अशी जीवनदृष्टीही तिच्या आणि अप्पासाहेबांच्या (कवी अनिल) रसिक सहवासातल्या असंख्य क्षणांनी माझ्याही न कळत मला देऊन टाकली. आक्काने मला खूप काही दिलं. तिच्या मनातही नसताना तिच्यामुळे जे जे काही माझ्या आयुष्यातून हरवलं, मला नाकारलं गेलं, ते ते देण्याची तिनं पराकाष्ठा केली. आपल्यामुळे, आपल्या वागण्यामुळे आपल्या या धाकट्या वहिणीचं आयुष्य शिस्तीच्या साखळदंडात अडकलं हे तिच्या संवेदनशील मनाला पहिल्यापासून जाणवत होतं, कुरतडत होतं.

आक्काचं आणि अप्पासाहेबांचं कॉलेजजीवनात एकत्र येणं आणि एकमेकांवर प्रेम करणं ह्या एका घटनेनं आमचं जयवंतांचं घर पार पार वदलून गेलं. त्या वदलांनी माझं वालपण होरपळत गेलं. आक्का १९१९ साली हुजुरपागेतून मॅट्रिक झाली. त्याच वर्षीचा माझा जन्म. पुढे फर्ग्युसनला पहिल्या वर्षाला शिकत असतानाच त्याचं प्रेमप्रकरण हळुहळू गाजायला लागलं. त्यानंतर आक्काचं इंटरला नापास होणं, पुण्यातून तिला नागपूरच्या मॉरिस कॉलेजमध्ये दाखल केलं जाणं आणि मित्रमैत्रिणींच्या पुस्तक वह्यांमधून ह्या दोघांची पत्रापत्री चालणं, ती पकडली जाणं हे माझ्या अगदी वालवयात घडत गेलं.

त्याचा अर्थ, संदर्भ कळण्याचं माझं वय नव्हतं. तरी, आमच्या आईदादांच्या मनस्तापाला त्यामुळे सुरुवात झाल्यानं घरातलं तापलेलं वातावरण मला कळायचं. एक प्रकारचा ताणतणाव सतत घरात जाणवायचा. आक्काला सगळेजण 'पत्र पाठवू नको', 'अशी पत्र लिहू नको' असं सांगताहेत, तिच्यावर रुष्ट आहेत एवढं मला कळत असावं. त्यावेळी रोज आमचे माईदादा संध्याकाळी क्लवमध्ये जात. ते गेले की आमच्या घरातला महादेव नावाचा गडी खूप गंमती करून दाखवायचा, नाचायचा, खेळ करायचा आणि मला हसवायचा. तेव्हा इतकं मोकळं मोकळं आणि छान वाटायचं !

आक्काच्या संदर्भातली माझी पहिली आठवण पुण्याच्या होस्टेलवरची आहे. तिनं मला होस्टेलवर नेलं होतं आणि तिच्या सगळ्या मैत्रिणी माझे खूप लाड करीत होत्या. इकडून तिकडे या खोलीतून त्या खोलीत नेत होत्या. आता असं वाटतं की ही माझी स्वतःची आठवण नसेलच. आक्कानेच कदाचित पुढे वेळोवेळी सांगताना मी ऐकली असेल आणि ती माझीच आठवण आहे असं मला वाटायला लागलं असेल. कारण इंटरच्या वर्षानंतर आक्का

अनुक्रमणिका

पुण्याच्या होस्टेलवर नव्हती. म्हणजे माझं वय त्यावेळी जेमतेम दोन-अडीच वर्षांच असेल. त्यावेळची ही आठवण माझी असू शकेल का ? काहीही असो, मला ती माझीच आठवण असावी असं वाटत आलं आहे.

एका वर्षीच्या गणपतीतली एक गोष्ट मला आठवते. आमच्या माईकडे एक छानशी लाकडी चौकोनी पेटी होती. त्यात पत्र, किल्ल्या अशा सटरफटर गोष्टी आम्ही ठेवीत असू. गणपतीत आरास करताना ही पेटी गणपतीची प्रतिष्ठापना करताना बैठक म्हणून वापरली जायची. गावात राहणाऱ्या आमच्या आत्याबाई तेव्हा हौसेनं यायच्या. त्या वर्षीही गणपतीची आरास झाली. मखर सजलं, लाकडी पेटीवर गणपतीची मूर्ती ठेवली गेली. पूजा संपत येताना आक्काच्या लक्षात आलं की तिच्या बॅगेची किल्ली त्या लाकडी पेटीतच राहून गेली होती. आक्काला माईचं लुगडं नेसता आलं असतं; माईनं तसं तिला सुचविलंही. पण आक्काला ते पटलं नाही. तिला तिच्या बॅगेची किल्ली हवीच होती. अशा वेळेला जसा काहीतरी फुसका शास्त्राधार काढला जातो तसा आत्यानं काढला. अजून पूजा पूर्ण झाली नव्हती त्यामुळे पेटी किलकिली करून त्यातून किल्ली काढायला हरकत नाही असं तिनं सांगितलं. किल्ली काढताना जी थोडी झटापट झाली त्यात गणेशमूर्तीच्या उजव्या हाताला तडा गेला.

खरं म्हणजे आमच्या घरातलं वातावरण सुधारकी थाटाचं होतं. कर्मकांडामध्ये कोणालाच फारसं गम्य नव्हतं, वृत्तीही खूप धार्मिक नव्हती. तरीही असले अपशकून मनावेगळे करून झटकता येतील असं कोणीच नव्हतं. बोलाफुलाला गाठ म्हणजे दोनच दिवसांनी आमच्या दादांचा उजवा हात निखळला ! गणेशमूर्तीबाबतची ती दुर्घटना दादांना कोणी सांगितली नव्हती. मनातल्या मनात सर्वांनी दादांच्या हात निखळण्याचा त्या घटनेशी कार्यकारणभाव मात्र लावून टाकला. पुढे आक्का नि अप्पासाहेबांच्या प्रेम प्रकरणातून जेव्हा दादांना संतापातिरेकाने अर्धांगाचा झटका आला तेव्हा त्यांची उजवी बाजू लुळी पडली, हाही निव्वळ योगायोग आहे असं माईला किंवा इतरांनाही वाटलं नाही.

त्याचं असं झालं की आक्का बी.ए. झाली. तिच्या डोक्यातून अजुनी अप्पासाहेबांचं वेड गेलं नव्हतं. वातावरणातील बदलाने ती ते खूळ डोक्यातून काढून टाकेल अशा उद्देशाने तिला लंडनला पुढच्या शिक्षणासाठी पाठवावं असा बेत आमच्या घरच्या वडीलधाऱ्या मंडळींनी केला. तिला बोटीवर पोहोचवायला माई स्वतः जाणार नव्हती आणि मलाही पाठवायला ती तयार नव्हती. दादा तिला घेऊन मुंबईला जाणार होते. दोन दिवस आमच्या जवळच्या नात्यातल्या डॉ. वसंत चिटणीसांकडे राहून थोडीफार खरेदी करून आक्का विलायतेला जायला निघणार होती. ऐन वेळी दादांना काही काम निघालं. आक्कानं ठरल्याप्रमाणे पुढे मुंबईला जावं आणि नंतर दोन दिवस ते काम आटोपून दादा आक्काला गाठतील असा बेत ठरला.

आक्का एकटीच नागपूरहून मुंबईला जाते आहे ही बातमी समजल्याबरोबर बडनेरा स्टेशनवर अप्पासाहेब आक्का यांनी एकत्र बसायचं ठरविलं. डबा बदलण्याच्या धांदलीत आक्काचा होल्डऑल हरवला होता हेही मला आठवतं आहे. आप्पासाहेबांबरोबर मुंबईत त्यांच्या दोस्त मंडळीत काही काळ घालवून दादा चिटणीसांकडे पोहोचायच्या सुमाराला आक्का चिटणीसांकडे जाणार होती. पण इकडे वेगळंच रामायण घडलं. दादांचं काम अपेक्षेइतकं लांबलं नाही. ते दुसऱ्या दिवशीच मुंबईकडे रवाना झाले. चिटणीसांकडे जाऊन बघतात तर तिचा पत्ताच नव्हता ! मुलीने आपली प्रतारणा केली. चार लोकात अब्रू घालविली म्हणून दादांचा तीळपापड झाला. आक्का चिटणीसांकडे आली. दादा त्या लोकांसमोर तिला काही बोलले नाहीत पण आत नुसते धुमसत होते. आक्काला बोटीवर बसवून दादा परत आले. आल्यावर संतापाने तणतणणारे दादा मला आजही आठवतात. तो सर्व प्रसंगच मनावर कोरल्यासारखा झाला आहे.

आमच्या धंतोलीच्या बंगल्यात देवघर आणि देवघरासमोर खोलीच्या दाराची चौकट अशी रचना आहे. माई देवघरात बसली होती. तिच्या डोळ्यामधून अखंड पाणी वहात होतं. दादा समोरच्या चौकटीत बसून उजव्या हाताची तर्जनी जोरजोरात पुढेमागे हलवीत माईला काही काही सांगत होते. ते काय बोलत होते ते मला पूर्ण समजत नव्हतं. पण, ''आक्कानं फसविलं, मान खाली घालायला लावली, माझा अपमान झाला'' असं सारखं सारखं पालूपद येत होतं, हे मात्र मला स्पष्ट आठवीं आहे.

त्यानंतर दोनतीन दिवस घालमेलीत गेले. मी आणि माई रात्री खाली गादी टाकून झोपलो होतो. दादा शेजारच्या पलंगावर अस्वस्थपणे तळमळत पडले होते. उकाड्यामुळे पंखा जोरात चालू होती. रात्री अकराच्या सुमाराला दादांच्या तोंडून कण्हल्यासाखा आवाज यायला लागला माई जागी झाली. पाहते तर दादांच्या तोंडून शब्द फुटत नव्हता. ते काहीतरी बोलायचा सांगायचा प्रयत्न करीत होते. उजवी बाजू पूर्ण लुळी पडलेली. त्या काळता अर्धांगवायूचा झटका म्हणजे

मृत्यूची झडपच समजली जायची ! नंतरची कित्येक वर्षं माईनं दादांची शुश्रुषा करण्यात घालविली. त्यांच्यवर हर तऱ्हेचे औषधोपचार करून पाहिले. कोणी दैवी उपाय करायला सांगितले तर तेही व्रतवैकल्यांच्या रूपाने केले. व्रतवैकल्यं, साधू - बाबा, मालिश - शेक, नियमित व्यायाम करून घेणं अशा अनेक गोष्टी तिनं न कंटाळता मनोभावे केल्या.

ह्या सर्व पार्श्वभूमीचा विचार करता असं म्हणावसं वाटतं, माईचं बाकीच्या संसारातलं लक्ष उडालं. माझ्याकडे हवं तसं, हवं तितकं लक्ष देणं तिला जमलं नाही. परिस्थितीने ती अगतिक होती याची मला जाणीव आहे. पण, माझी जी कुतरओढ व्हायची ती झालीच. अगदी अलिप्तपणे विचार केला तरी असं जाणवतं की आपली धाकटी मुलगी ह्या नात्यानं माईनं फारशा जवळीकीनं माझा विचार कधी केला नाही. आक्काच्या प्रतारणेमुळे तिच्यातली कर्तबगार आई दुखावली गेली. तिच्या अस्मितेला, आत्मसन्मानाला ठेच लागली होती. त्या कडवटलेपणातून ती एकीकडे आक्कावर संतापत राहिली आणि दुसरीकडे भाऊ, नाना आणि मी. आमच्या तिथांकडे दुर्लक्ष करीत राहिली.

आता मागे वळून पाहताना मनात येतं की एक सुसंस्कृत, सुसंपन्न घर समूळ हादरून जावं एवढी ही घटना मोठी होती ? जातीबाहेर आपल्या लेकानं अथवा लेकीनं विवाह केला या घटनेकडे पालकांनी कसं पहावं ? देशपांडे कुटुंब वऱ्हाडातलं, देशस्थ कुटुंब त्यांच्याही घरी आंतरजातीय विवाह होत होता. पण इतकी उलथापालथ त्यांच्या कोणाच्या आयुष्यात झाली नाही.

पुढे ज्या घरात मी सून म्हणून आले त्या घरानं १९१९ मध्ये म्हणजे आक्काच्या विवाहाआधी नऊ वर्षे सी. डी. देशमुखांच्या सनातन कुटुंबालाही हादरा बसला होता. आपल्या थोरल्या मुलाची असामान्य बुद्धिमत्ता पाहून, ऐपत नसताना कर्ज काढून त्याला वडिलांनी शिकायला विलायतेला पाठविलं. त्याच्यावर त्यांच्या सर्व आशाआकांक्षा एकवटल्या होत्या. त्यानेच असा धक्का दिल्यावर माझे मामंजी त्यावेळी संतापले होते. एका रात्रीत मनस्तापामुळे त्यांच्या दोन्ही हाताला भेगा पडल्या आणि सालडी गेली, असं सासूबाईंच्याकडून मी पुढे ऐकलं. पण सासूबाईंच्या शांत, विचारी स्वभावामुळे झाली घटना पेलण्याचं सामर्थ्य त्या घरातल्या कुटुंबियांना मिळालं आमच्या घरी तसं का होऊ शकत नाही ? अप्पासाहेब सी के पी नव्हते; पण उच्चवर्णीय - ब्राह्मण होते. जयवंतांच्या तथाकथीत सामाजिक प्रतिष्ठेच्या मानाने देशपांडे कुटुंब सामान्य होतं हा महत्त्वाचा आक्षेपाचा मुद्दा असावा. जातीबाहेर आणि प्रेमविवाह हे दोन्ही मुद्देही निषेध करण्यासाठी पुरेसे होते. पण, ह्या सर्व मुद्यांचा बुद्धिनिष्ठपणे विचार न करता आल्याने मुळात माफक असलेला धक्का आम्ही आमच्या वागण्याने तीव्र करून घेतला आणि त्यात होरपळून गेलो असं मला वाटतं.

आक्काला वाढविताना तिच्या सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने तिला सर्व प्रकारचं स्वातंत्र्य आणि सुधारकी वळणाचं वातावरण घरातून मिळालं होतं. मात्र माझ्या बाबतीत माई आता जास्त कडक झाली. माझ्या वागण्या बोलण्यावर, राहणीवर काटेकोर नजर ठेवून तिनं मला शिस्तीत वागवायला सुरुवात केली. झाल्या गोष्टींमुळे आपली धाकटी बहीण उगीचच अनेक सुंदर गोष्टींना मुकतेय या भावनेतून आक्काने मला आईची माया भरभरून दिली. त्यामुळेच बहुधा दादामाईबद्दल किंवा आक्काबद्दल माझ्या मनात जराही आकस निर्माण झाला नाही.

ठरल्याप्रमाणे दोन वर्ष लंडनला राहून अभ्यासक्रम संपवून आक्का परत आली. मग माझ्या आईच्या आईने पुढाकार घेतला आणि आक्का - अप्पासाहेबांचं लग्न आता करून द्यायला हवं हे माई - दादांना पटविलं. एव्हाना अप्पासाहेब मुन्सफ होऊन हुशंगाबादला गेले होते. विवाहसमारंभ तिथेच करायचा असं ठरलं. दादा लग्नाला जाण्याच्या परिस्थितीत नव्हते आणि माई जाण्याच्या प्रश्नच नव्हता ! भाऊ - नाना लग्नाला गेले पण माईनं मला मात्र जाऊ दिलं नाही. आक्काला याचं फार वाईट वाटलं. देशपांडे मंडळी अतिशय चांगली नि समजंस होती; त्यांनी आक्काला आपल्यामध्ये सामावून घेतलं.

आक्काचं लग्न झाल्यावर मात्र दादांचा राग आपोआप ओसरला. घरातल्या सर्व लोकांनी, आप्तांनी अप्पासाहेबांना आपलं मानलं. फक्त माई शेवटपर्यंत हट्टाने आक्काशी किंवा अप्पासाहेबांशी एक अक्षरही बोलली नाही ! मात्र आक्काच्या व्यावसायिक यशाचं हुषारीचं तिला कायम कौतुक वाटत आलं. आम्हा भावंडांनाही तिनं आक्कापासून तोडलं नाही.

आक्काच्या लग्नाच्या वेळची एक हकीकत मला आठवते. मी तेव्हा ७ / ८ वर्षांची असेन. मी शेजारी खेळायला गेले होते. त्या दिवशी अप्पासाहेबांना आमच्या घरी लग्न ठरविण्यासाठी म्हणून बोलावले होते. शेजारीपाजारी ह्याची कल्पना होती, पण मला पत्ताच नव्हता. शेजारच्या मावशींनी मला सहज विचारलं ''आज मजा आहे ना ? तुमच्याकडे जावई येणार म्हणे. आक्काचे होणारे यजमान येताहेत. माहीत आहे ना ?''

ते ऐकून मला खूप मजा वाटली. उत्सुकतेनं धावतच मी घरी आले. आमच्या बंगल्यात बाहेरच्या खोलीत पक्षकारांना बसण्यासाठी लाकडी बाकं मांडलेली असायची. त्या बाकावर एक काळेला, धोतर नेसलेला, टोपी घातलेला माणूस बसला होता. तेच माझे मेव्हणे होणार हे कळल्यावर माझी निराशा झाली. आमच्या आक्काचा नवरा कसा असायला हवा याविषयी माझ्या काही खास कल्पना असतील असं मला वाटत नाही. पण आमच्या आसपास वावरणाऱ्या नातेवाईकांसारखे, त्यांच्यासारखेच पॅण्ट शर्ट घालणारा, उजळ वर्णाचा कोणी असायला हवा असं मला वाटत असावं. माझ्या ह्या वेडगळ वाटण्याला काही अर्थ नव्हता तरीही त्यावेळची झालेली निराशा आजही मला आठवते.

पण एवढं मात्र खरं की त्यानंतर आयुष्यात कधीही अप्पासाहेबांबाबत माझा अपेक्षाभंग झाला नाही. कधीच कशाहीबाबत निराशा - नाराजी वाटली नाही. उलट माझ्या जडणघडणीत आक्काच्या बरोबरीनं त्यांचा सक्रीय सहभाग होता. धाकट्या मेव्हणीचं आणि थोरल्या मेव्हण्यांचं जितकं सुंदर, निरागस नातं असू शकतं तसं आमचं नातं कायम राहिलं. माझ्या पतीचं अप्पासाहेबांच्या कवितेवर प्रेम असल्यानं आणि त्या दोघांची चांगली गट्टी झाल्यानं माझ्या विवाहानंतरही त्या नात्यात अंतराय निर्माण झाला नाही. उलट ते नातं अधिक घट्ट आणि गडद होत गेलं.

त्यावेळीची एक आठवण मुद्दाम सांगाविशी वाटते, कारण तिच्यामुळे माझ्या मनावर खोलवर परिणाम झाला. शाळेच्या सनातनी वातावरणाशी जुळवून घ्यायचा मला विशेष त्रास झाला नाही. संस्कृत मराठी शिकविण्यासाठी शंकरराव शास्त्री या उत्तम शिक्षकांची व्यवस्था माईने केली होती. त्यामुळे ते विषय आत्मसात करणं अवघड गेल नाही.

पण, बारीकसारीक गोष्टी संस्कारातील फराकामुळे माझ्या ध्यानात येत नसत. एकदा शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन होतं. मोठ्या वर्गातल्या मुली काहीतरी स्वयंपाक करीत होत्या. मला स्वयंपाकात फारसं गम्य नव्हतं, पण उगीचच मी हौसेनं जाऊन लुडबुड करायला लागले. पळीनं मी शिजणारा पदार्थ ढवळला ! झालं ! एकदम सगळ्या मुली गप्प गप्प झाल्या ! आपण काहीतरी आगळीक केलीय अशी भावना माझ्या मनात झाली, पण नेमकं काय चुकलं हे कळलं नाही. नंतर त्या दिवशी समजलं की आम्ही सी. के. पी. म्हणून शिजणाऱ्या पदार्थांना मी हात लावायला नको होता. जातीची पहिली जाणीव त्या दिवशी, अशा तऱ्हेने मला झाली.

धंतोलीवर आमच्या दादांचे कितीतरी दोस्त होते. त्यात ब्राह्मणही होते. पण हा असला प्रकार तिथे नव्हता. कोणीही कोणत्याही घरी थेट स्वयंपाकघरापर्यंत सरळ जात असत. त्यादिवशी जी एक वेगळेपणाची, इतरांना नको असलेली सगळी दाखविल्याची बोच मला जाणवली ती खूप खोलवर गेली. त्यापुढे कधीही मी कोणाच्याही स्वयंपाकघरात कधी जाऊ धजले नाही. आजही इतक्या वर्षानंतर ते तसं जाणं मला नकोसं वाटतं !

मी पुढे यथावकाश ह्या हिंदू मुलींच्या शाळेतून अकरावी पास झाले. पण त्याआधीच्या शैक्षणिक अस्थिरतेच्या काळात आक्कानं आवर्जून मला आपल्या घरी नेलं. अप्पासाहेब त्या वेळी ज्युडिशिअल सर्व्हिसमध्ये तात्पुरत्या पदावर हुशंगाबादला होते. नर्मदेच्या काठी उंचावर छानसा बंगला त्यांना रहायला मिळाला होता. दीड दोन महिने मी त्यांच्याकडे राहिले होते. त्या काळात आक्कान स्वतः माझा अभ्यास घरी करून घेतला. मला कितीतरी कविता शिकवल्या. झोपाळ्यावर बसून शिकलेल्या, गायलेल्या कविता मला आजही आठवतात. तो चैत्र महिना असावा. कारण आक्का बरोबर चैत्रगौरीच्या हळदीकुंकवाला गेल्याचं मला आठवतंय.

तिथल्या पद्धतीप्रमाणे आमच्याबरोबर नेहमी एक रौताईण यायची. हळदीकुंकवाला जाताना पोतं घेऊनच एक नोकर येत असे. हळदीकुंकवाला आलेल्या प्रत्येकीला कलिंगड देण्याची तेव्हा तिथे प्रथा होती. अशी खूप कलिंगडं जमत असत. आक्काकडचे हुशंगाबादचे ते दिवस अगदी मजेत गेले. त्यावेळीच माझी आणि अप्पासाहेबांची गट्टी झाली. आक्का त्यावेळी फक्त गृहिणीच होती. त्यामुळे मला ती पूर्ण वेळ देऊ शकत होती. त्यावेळची आणखी एक आठवण आहे ती 'दीपदाना'च्या सोहळ्याची. नदीची पूजा करण्यासाठी पत्रावळीवर सवाष्ण बायका पाच - पाच कणकीचे दिवे वाती लावून सोडत. अतिशय रम्य, सुंदर असं ते दृश्य दिसे. त्याच सोहळ्यावर पुढे आक्कानं 'दीपदान' हा सुंदर लेख लिहिला. तिच्या दुसऱ्या कथासंग्रहालाही 'दीपदान' हेच नाव आहे.

त्यानंतर काही महिन्यांनी आक्काला मुलगा झाला. अप्पासाहेबांची ती तात्पुरती नोकरी संपली आणि ते नागपूरला आले. आमच्या घराजवळच त्यांना घर मिळालं. माझा आणि त्या दोघांचा सहवास वाढत गेला. अप्पासाहेब नागपुरात वकिलीत जम बसवायच्या प्रयत्नाला लागले. आक्काला मॉरिस कॉलेजमध्ये अतिशय प्रतिष्ठेची, मानाची अशी प्राध्यापिकेची नोकरी मिळाली. आक्काचा

मुलगा किशोर अगदी लहान होता. त्याला सांभाळायला एक मुलगी होती. आक्का नोकरीवर गेली की किशोरला घेऊन ती आमच्याकडे येत असे. माईनं नातवाचं प्रेमानं सगळं केलं, पण आक्काशी ती बोलत नसे. किशोरचंच नाही तर आक्काच्या सर्वच मुलांचं तिनं प्रेमानं केलं आणि घर जवळ असल्यानं ते शक्यही झालं.

प्राध्यापिका म्हणून आक्का अतिशय विद्यार्थिप्रिय होती. तिचा कॉलेजमध्ये दबदबाही होता. अध्यापनात ती निष्णात होती. तिचे तास फार प्रभावी होत असत. सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी तिच्या शिकविण्यानं, एकंदर व्यक्तिमत्त्वानं भारावून गेलेले असत. अलिकडे अध्यापन करताना, संस्थेत वावरताना एप्रन घालण्याची प्रथा पुण्या - मुंबईकडे आली आहे. पण, आक्कानं हा प्रयोग तिच्या प्राध्यापकी आयुष्यात केला होता. फिकट रंगाचे ऐटबाज आकर्षक कोट तिनं शिवले होते. कॉलेजमध्ये जाताना साडीवरून ते घालून ती जात असे. त्यामुळे ती रुबाबदार दिसायची. गोऱ्या रंगामुळे, ऐटबाज हलचालींमुळे एक वेगळीच शान तिला यायची. थोडीशी पाश्चिमात्य छटाही त्या कोटामुळे तिच्या व्यक्तिमत्त्वाला यायची.

पण नागपूरातल्या काही लोकांना तिचा तो अगाऊपणा वाटला. सीताबर्डी, महालातल्या कर्मठ मंडळींना असा 'अगाऊपणा' अर्थातच चालण्यासारखा नव्हता. नागपुरात चोवीस तास पान चघळण्याचा रिवाज होता. त्यामुळे ती रस्त्याने जात असताना वरच्या मजल्यावरून तिच्या अंगावर पिचकाऱ्या टाकून लोकांनी आपला निषेध नोंदविला. आक्काने तिच्या मितभाषी नि सौम्य स्वभावामुळे जाहीर आकांततांडव केलं नाही, पण आपला वेशही बदलला नाही. पुढे लोकांनी तो वेश मान्य करून टाकला. विद्यार्थिनींमध्ये तर तिचं अनुकरण करण्याच्या प्रयत्नातून तसे कोट घालायची फॅशन त्याकाळी बळावली होती हेही मला आठवतंय.

पुढे अप्पासाहेबांना ज्युडिशियल सर्व्हिसमध्ये पुन्हा नोकरी लागली. नागपूर हेडक्वार्टस्‌. ठेवून बरेच वेळा ते नागपूरच्या आसपास दौऱ्यावर जात. शनिवार - रविवार ते नागपूरला मुक्कामाला असत. आक्का - अप्पासाहेबांच्या सहजीवनाकडे त्यावेळी मला अगदी जवळून पाहता आलं. जाणीवपूर्वक मी त्याकडे पाहात नव्हते, माझ्याही न कळत ते माझ्या मनात झिरपत होतं.

अप्पासाहेबांचा रसिक म्हणून, कविमनाचे संवेदनशील कवी म्हणून लौकिक होता. तरी पती म्हणून ते सर्वसामान्य पुरुषांप्रमाणे आक्कावर हुकुमशाही गाजवत असत. अप्पासाहेब जरा जास्त हिशोबी होते आणि दुसऱ्यांच्या बाबतीत कमी संवेदनाशील होते.त्यांच्या आवडी - निवडी आक्काने सांभाळाव्या असा त्यांचा आग्रह असे.त्यांच्या दैनंदिन गोष्टीतही आक्काने जातीनं लक्ष घालावं अशी त्यांची अपेक्षा असे. ते आंघोळीला निघाले की त्याचं धोतर निऱ्या करून तिनं सज्ज ठेवायचं. दिवसभरासाठी त्यांना लागणारे विडे लावून, त्यांच्या पट्ट्या बांधून विड्यांच्या डबीत ठेवायच्या. असल्या छोट्या छोट्या गोष्टी आक्का मनापासून सांभाळायची. त्यांच्या लहरी आणि आवडीनिवडी तिनं निगुतीनं पुऱ्या केल्या. नाईलाज म्हणून नव्हे तर त्यांच्यावरच्या अत्यांतिक प्रेमामुळे तिनं हे सर्व जपलं. कॉलेजमध्ये दराग असलेली आक्का घरात एका सुगृहिणी, सुविद्य सहचारिणी आणि एक सुमाता या भूमिका छान पार पाडे. संपूर्ण घरावर तिची पूर्ण छाप होती. ती सुगरण होती. नाना पदार्थ करून सर्वांना खाऊ घालायचं तिला वेड होतं. घरसजावटीकडे ती विशेष काळजीपूर्वक लक्ष देई. आल्यागेल्या आप्तमित्रांचं उत्तम आदरातिथ्य करायला तिला मनापासून आवडत असे. साहित्यिक दोस्तमंडळींच्या चर्चा संवादात ती सहभागी होत असे.

मी अकरावी पास झाले तेव्हा माझं वय पंधरा वर्ष होतं. नियमाप्रमाणे मॉरिस कॉलेजमध्ये मला त्या वर्षी प्रवेश मिळू शकत नव्हता. एक वर्ष थांबून सोळाव्या वर्षी वयाच्या अटीत बसल्यावर मी मॉरिस कॉलेजातच प्रवेश घ्यावा असं आक्काचं मत होतं. पण मला तेव्हा ते पटलं नाही, कारण मला आता कॉलेजमध्ये जाण्याची घाई झाली होती. मग माईने मला पुण्याला एस. एन. डी. टी. कॉलेजात घालायचं ठरविलं. एका मुलीच्या बाबतीत 'शहाणपण' आल्यानं तिनं मला मुलींच्याच कॉलेजात घालायचं ठरविलं होत. मला निरोप देण्यापूर्वी तिनं खूप कबुल्या करून घेतल्या. मला देवासमोर बसवून 'असं वागणार नाही' तसं करणार नाही' अशी वचनं तिनं घेतली.

पुन्हा एकदा तेच ते देवघर - देवघरात मला पुढ्यात घेऊन बसलेली माई आणि तिची अखंड चाललेली वाणी ! पुण्यात वैदर्भीय मुलामुलींचं एक मंडळ होत, त्या मंडळाकडे फिरकायचंही नाही, मुलांशी बोलायचं नाही, आपल्या घराण्याला ज्यामुळे कमीपणा येईल असं काही करायचं नाही असे निर्बंध घातले आणि उपदेश मला तिने दिले. मी मुकाट्यानं सगळं ऐकून घेऊन मान्य करीत होते. मला एस. एन. डी. टी. च्या कोर्सला माई पाठवते आहे त्यालाही अप्रत्यक्षपणे आपणच कारण आहोत हे आक्काला कळत होतं. मला चाललेले उपदेशाचे डोस, माझ्यावरचे अनेक निर्बंध हे माझ्या काळजीपेक्षाही अक्कावरच्या रागामुळे चाललं होतं. म्हणून

आक्काचं हृदय माझ्यासाठी तुटत होतं.

मी हिंगण्याला शिकायला आले ती ह्या पार्श्वभूमीवर. त्यावेळी माझं आजोळघर पुण्यात होतं. सुट्टीच्या दिवशी मी फक्त तिथेच जायचं, बाकी कुठे हिंडायचं नाही अशी माईची सक्त ताकीद होती. त्यावेळी मला त्यात फार जाचक असं काही वाटलं नव्हतं. दिवस मजेत चालले होते. मी येण्यापूर्वीच आक्काच्या हुषारीची, तिने धीटपणे घरचा विरोध पत्करून केलेल्या प्रेमविवाहाची ख्याती एस. एन. डी. टी. च्या वसतिगृहात पोहोचली होती. वरच्या वर्गातल्या मुलींना त्यातल्या नाट्यमयतेमुळे आणि चित्रथरारकतेमुळे खूप कुतूहल होतं. त्यामुळे मोठ्या मुली मला सारख्या त्यांच्या घोळक्यात ओढत असत.

आमचे प्राध्यापकही अत्यंत नाणावलेले होते. प्रा. लागू खूपच तापट होते. अगदी जमदग्नीचा अवतार होता तो. स्मितापासून चाळीस हात दूर राहणारे कट्टर ब्रह्मचारी होते ते, पण ते अगोदर अक्काला शिकवीत असल्याने मला त्यांनी खूपच सवलती दिल्या. मला इंग्रजीचे उत्तम धडे देत. प्रा. वा. म. जोशींना आम्ही तात्या म्हणत असू. ते अतिशय सहृदय आणि सौजन्यशील होते. स्वतः विद्वान असूनही विद्यार्थिनींना ते बरोबरीच्या नात्याने वागवीत. प्रा. मायदेवही उत्तम शिक्षक होते. या सर्व शिक्षकांची, त्यांनी वेळोवेळी दिलेल्या सल्लामसलतीची आजही मला जाणीव आहे.

मी मुळात आळशी. झटझटून अभ्यास करावा, नाव मिळवावं, चांगल्या गुणांनी पास व्हावं अशी इच्छाच माझ्यापाशी नव्हती. मात्र प्राध्यापकांची माझ्याकडून खूप अपेक्षा असायची. आक्काच्या ख्यातीमुळे माझ्या हुषारीबद्दल अभ्यासुपणाबद्दल उगीचच त्यांच्या अपेक्षा असत. मी जो अभ्यास केला तो पुढच्या वर्गात जाता यायला पुरेसे गुण मिळावेत एवढाच. लोकांच्या अपेक्षांचं मला ओझं वाटलं नाही कारण मलाच महत्त्वाकांक्षा नव्हती. कोणी कधी आक्काचा दाखला घेऊन काही म्हणालंच तर मी हसत उत्तर देई, ''आमच्याकडे हुषारी सगळी एकट्या आक्कानेच घेऊन टाकली !'' मग समोरची माणसं ह्यावर काय बोलणार ? मी निदान टेनिस खेळावं, काहीतरी भरीव करून दाखवलं असं लोकांना वाटायचं. पण मी मात्र गप्पाटप्प्यात, नाटकं, गाणी यात रमत असे.

पाहिल्या वर्षाला असताना मी सुटीला नागपूरला गेले. त्यावेळी आक्का कॉलेजच्या मुलींची एक नृत्यनाटिका बसवीत होती. ऐन वेळी मुख्य भूमिका करणाऱ्या मुलीनं काम करायचं नाकारलं. आता आली पंचाईत ! पण आक्काच्या सगळ्या उपक्रमात अप्पासाहेबांचंही तेवढंच लक्ष असायचं. ते म्हणाले - ''आपली वाबी करेल ही भूमिका.

आक्काला ते पटलं. मग मला नृत्य शिकवायला एक गुरुजी नेमले. त्यांनी न चुकता नियमितपणे माझ्याकडून सराव करून घ्यावा अशी खबरदारी दोघांनी घेतली. त्या गुरुजींना अफू - गांजाचं व्यसन होतं. पण नृत्यशिक्षक म्हणून ते फार चांगले होते. सरावाच्या वेळी ते नीट असतील याची खातरजमा ते दोघे करून घेत. आणि सराव झाल्यावर त्यांना त्यांच्या तल्लफी भागवता येतील असंही पहात !

नृत्याच्या वेळी माझी वेशभूषा कोणती असावी, मला कोणता रंग खुलेल, याचा गंभीरपणे विचार - विनिमय चालायचा. माझ्याकडे इतका गंभीरपणे पाहून माझ्यात कोणीच इतका रस यापूर्वी घेतला नव्हता. त्यामुळे माझा आत्मविश्वास वाढला. अप्पासाहेब दूर उभे राहून, मान वाकडी करून मला काय छान दिसेल याचा अंदाज घेत आहेत हे दृश्य मी अजुनी विसरले नाही. त्या नृत्यनाटिकेत भाग घ्यायला फारच मजा आली.

नृत्याच्या शेवटी एका प्रसंगात मानेला एक झटका देऊन मी माझ्या डोक्यावर बांधलेला आंबाडा नृत्याच्या लयीतच सोडायचा होता. त्या दृश्यासाठी माझ्याकडून कसून सराव करून घेतला गेला होता. त्यावेळी माझे केस लांब आणि दाट होते. रेशमाच्या लडीसारखे ते मोकळे केस दिसावेत यासाठी प्रयोगाच्या आदल्या दिवशी भरपूर शांपू लावून आक्कांन मला नहायला घातलं. कार्यक्रम छानच झाला. त्यानंतर, आक्काच्या कॉलेजच्या स्नेहसंमेलनात मी वेळ पडल्यास भाग घायचा हे ठरूनच गेलं. मंतरलेले, झपाटलेले दिवस असायचे ते ! आक्का, तिच्या विद्यार्थिनी आणि अप्पासाहेब त्यासाठी मनापासून झटत असायचे.

आक्का अप्पासाहेब दोघेही सौंदर्याचे उपासक होते. सांगितादी कलात, साहित्यात त्यांना आवड होतीच पण ते निसर्गवेडेही होते. ह्या काळात आक्काच्या घरात राहून मला रसिकपणे आयुष्य न्याहाळण्याची, त्याचा आस्वाद घेण्याची आपसूक सवय लागली. सर्वांनी एकत्र बसून काही वाचावं, ऐकावं त्यावर मतं मांडावीत. कधी कोणा कवींची मैफल घरी सजावी. कित्येकदा तर साहित्यिक गप्पा करायला अप्पासाहेब - आक्का यांचे प्रतिभावान स्नेहीसोबती जमत. संगीत ऐकण्याचे संस्कारही ह्या घरातच प्रथम माझ्यावर झाले.

एखाद्या रविवारी बाहेर उन्हाळ्याची तलखी असली तरी

अप्पासाहेबांच्या सूचनेप्रमाणे सर्वांच्या हाती कागद, रंग, कुंचले असत. सर्वांनी चित्रं काढायची, रंगवायची अशी टूम निघे. अशाच एका प्रसंगी नंदकुमार घोष यांच्या शैलीतलं पद्मपाणि बुद्धाचं चित्र आक्काने वॉटरकलरमध्ये काढलं. आजही ते चित्र फ्रेम करून आमच्या घरात भिंतीवर टांगलेलं आहे. कधी आम्ही भटकंती करायला सगळेजण बाहेर पडत असू. वाटेत एकादं बहरलेलं, फुलांनी नखशिखान्त लगडलेलं झाड पाहून आम्ही सर्वांनी तिथेच थांबावं आणि त्याचं निरीक्षण करावं. अशावेळी काळवेळाचं बंधन अप्पासाहेब स्वतःवर लादून घेत नसत. शांतिनिकेतनला राहिलेल्या अप्पासाहेबांच्या तरल संवेदनक्षमतेची प्रचीती त्यांच्या अशा रसिक कलंदर वृत्तीतून दिसत असे. अतिशय अभिरुचिसंपन्न आयुष्य जगण्यासाठी आवश्यक असलेली जीवनदृष्टी त्या दोघांनी मला दिली. पुढे रामच्या आस्वादक आणि रचिक वृत्तीमुळे ती बहरली हे जसं खरं, तसंच त्या पूर्वतयारीमुळे आमचं दोघांचं सहजीवन अभिरुचिसंपन्न होण्यास मदत झाली हेही खरं.

आक्काला साध्या साध्या गोष्टीतही टापटीप, नीटनेटकेपणा आवडत असे. घर सजवितानाही काहीतरी वेगळं नाविन्यपूर्ण करण्याकडे तिचा कल असे. फुलदाणीत फुलांची रचनाही पारंपरिक पद्धतीने करण्यापेक्षा ती वेगवेगळ्या गंमती करी. कोणी खास पाहुणे येणार असतील तर त्या दिवशी विशेष चोखंदळपणे ती सर्व गोष्टी करी. कित्येकदा महाराजबागेत जाऊन झाडावरचा एखादा अनवट फुलांचं झुबका, आणि पानं आणून आम्ही फुलदाण्या सजवत असू. कुठलीही गोष्ट आनंद घेत, चिकित्सक तेनं करायची तिची वृत्ती मी माझ्या संस्कारक्षम वयात अगदी जवळून पाहिली.

एरव्ही आक्काचं हे असं लोभसवाणं असलेलं रूप काही वेळा आदळआपट न करता किती करारी व्हायचं ते मला नाना जोगांच्या बाबतीत घडलेल्या त्या प्रसंगातून जाणवलं. नाना जोग ही एक वल्लीच होती ! आमच्या घरी त्यांचं खूप येण - जाणं होतं ते खूप व्यासंगी आणि बहुश्रुत होते. पण एखादं वेड डोक्यात घेतलं की त्यातच वहावत जाण्याचा एककल्लीपणा यांच्यात होता. त्यांनी मानसशास्त्राचं वेड घेतलं होतं तेव्हाची ही गोष्ट.

मी बी. ए. होऊन नागपूरला परत आले तेव्हा पुढे काय करायचं याविषयी मी विचार केलेला नव्हता. नागपूरच्या महिला मंडळानं त्यावर्षीच तिथे बालवाडी सुरू केली आणि मी तिथे शिक्षिकेची नोकरी करायला लागले. माझ्या निर्माण कलेला तिथे वाव मिळायला लागल्याने मला ते काम आवडायला लागलं. मुलांचे खेळ घेणं, त्यांच्यासाठी साधनं बनविणं, गाणी - गोष्टी सागणं, सर्वच मला खूप आवडायला लागलं. पुढे मुंबईला १ वर्षाचा मॉटेसरीचा कोर्स करायला मी गेले. त्याच वेळी आमचं बिऱ्हाड नाना माई यांनी मुंबईला थाटलं आणि नागपूरच्या आमच्या घरात आक्का - अप्पासाहेब राहू लागले. मॉटेसरीचा कोर्स पूर्ण करून मी कामावर पुन्हा रुजू झाले तेव्हा आक्काकडेच रहायला गेले. आक्का - अप्पासाहेब, त्यांची चार मुलं, अप्पासाहेबांची बहीण शांती आणि मी असे सर्वजण तिथे रहात होतो. मी आणि शांती त्या दोघांच्या नकळत प्रभात फेऱ्यांना जात असू आमची खूप गट्टी होती.

आक्काच्या मोठ्या किशोरला पहिल्यापासून माझा लळा होता. आता तो माझ्या मागेमागे असे. त्यावेळी त्याचे जगावेगळे छंद असत. त्याला कबुतरं पाळण्याचा आणि त्यांना शिकवण्याचा नाद होता. मला जे पगाराचे २० रु. मिळत ते मी आक्काकडे ठेवायला देत असे. घरात मला खर्च असा काही नव्हता. कपडे, साड्या मला वेळच्या वेळी मिळत. आक्का ते करीत होती की माई हे सुद्धा मला आजतागायत माहीत नाही. थोडक्यात मतलब असा की माझे पैसे शिलकीत असत.

कधीतरी किशोर येऊन म्हणे - ''चार आणे दे की मावशी, एक जोडी घेतो ग.''

एक जोडी म्हणजे कबुतरांची जोडी ! त्याचे हट्ट पुरवायला मलाही मजा वाटायची. काही कारणाने अप्पा - आक्का रागावतील असं वाटलं की तो मला ढाल करायचा.

आम्हा सर्वांनाच चटका लावून हा किशोर पुढे आकालीच ऐन तरुणपणी जगाचा निरोप घेऊन गेला. तो स्वतःच्या आवडीने वैमानिक झाला होता. अतिशय उमद्या व्यक्तिमत्त्वाच्या किशोरला वैमानिकाचे शिक्षण पूर्ण केल्यावर थोड्याच दिवसात विमान कोसळून अपघात झाला.

आक्का - अप्पासाहेब दोघांनाही हा धक्का असह्य झाला. किशोर जाण्याच्या आधीपासूनच त्याच्या येऊ घातलेल्या मरणाची आक्काला अनामिक चाहुल लागली होती की काय अशी शंका यावी इतकी ती सैरभैर झाली होती.

आम्ही सुटीला लोणावळ्याच्या घरी राहात असू. किशोर पुण्याला होता आणि रोज सकाळी त्याच्या विमानांची एक चक्कर असायची. एखाद्या विमानाची घरघर ऐकू आली की आक्का धावतच बाहेर येई. त्याच्या विमानाची रोज सकाळी ती वाट पहात

असायसची. किशोरच्या जाण्यानं आक्का खचली पण तिनं ते दुःख आपल्याबरोबर महत् प्रयासानं बाळगलं.

अर्थात ह्या सगळ्या फार नंतरच्या घटना, पण आठवणीच्या ओघात आठवलं म्हणून सांगितलं. किशोरची आठवण कधीच त्याच्या मृत्यूच्या भयाण आठवणीशिवाय आम्हाला येत नाही !

आक्काकडच्या वास्तव्यामधली आणखी एक आठवण सांगाविशी वाटते. मी काय किंवा शांती काय फार विचारी मुली नव्हतो. पण एकदा कसं कोण जाणे शांतीच्या आणि माझ्या दोघींच्याही मनात आलं की आक्का आपल्याला नेहेमी काहीतरी देते, आपले लाड करते. आपणही तिला काहीतरी द्यावं. तिचा वाढविस आला होता, त्यानिमित्त आम्ही काहीतरी प्रेझेंट घ्यायंच ठरविलं. कुणाला न सांगता साडी निवडायच्या मोहिमेवर आम्ही गेलो. आक्का अप्पासाहेबांना पत्ता लागू न देता आम्ही चिक्कार हिंडलो. शेवटी एक वाईन कलरची जॉर्जेटची साडी आम्ही पसंत केली. रंगीत कागदात गुंडाळून वाढदिवसादिवशी सकाळी 'सरप्राइझ गिफ्ट' म्हणून आम्ही ती साडी आक्काला दिली.

गंमत अशी की अगदी तश्शीच, त्याच रंगाची जॉर्जेटची साडी अप्पासाहेबांनीही आक्कासाठी आणली होती. त्यांची ती साडी पहिली नि मी रडायला लागले ! 'अप्पासाहेबांची ही साडी असल्यावर आक्का आता आमची साडी कशाला नेसेल' ह्या विचारानं मला रडू आवरेना. अप्पासाहेबांनी माझी खूप समजून घातली आणि म्हणाले ''मी ही साडी वदलून आणतो, आक्का तुम्ही दिलेली साडीच नेसेल, मग झालं ?''

खरोखरच त्यांनी त्यांची साडी वदलून आणली, केवळ आमच्या दोघींच्या भावना जपण्यासाठी !

आक्काकडचा माझा मुक्काम असा छान रंगात आला असतानाच मला मुंबईच्या सेंट कोलंबा हायस्कूलमध्ये नोकरी चालून आली. अर्थातच नागपूर सोडून मी मुंबईला आले. मी मॉटेसरीचा कोर्स करीत असतानाच देशमुखांच्या घरी माझं जाणं येणं वाढलं. मी आणि रामनं एकमेकांशी विवाहबद्ध होण्याचा निर्णयही घेतला होता.

लग्न अगदी साधेपणानं करायचं ठरलं. कपडालत्ता, दागदागिने, जेवणावळी याचा प्रश्नच नव्हता. फार कशाला, नोंदणी पद्धतीनं विवाह झाल्यावर राम परभारे नोकरीवर जाणार होता आणि मी चार - पाच उपस्थितांबरोबर घरी परतणार होते. इतक्या साधेपणानं लग्न होणार होतं, तरी अक्का आणि अप्पासाहेब नागपूरहून लग्नासाठी आले होते.

लग्नाच्या आधल्या रात्री हिंदू कॉलनीतल्या आमच्या घरी मी अंथरुणावर निजले होते. आक्का माझ्या शेजारी येऊन बसली. मूकपणे ती माझ्या अंगावरून हात फिरवीत बसलेली मला आजही आठवते. मुलीच्या विवाहाने आई व्याकूळ व्हावी तशी तिची घालमेल चालली होती. माई त्या मानानं शांत, थोडीशी निर्विकारच होती. आक्काचं त्या वेळचं हळवं होणं मलाही वेडीला त्यावेळी फारसं उमगलं नव्हतं. मला मुळी मी सासरी जाणार आहे अशी जाणीवच झाली नव्हती. कारण रामची त्यावेळची जागा फारशा चांगल्या वस्तीत नसल्याने आम्ही दोघेही काही दिवस माई - नानांबरोबर हिंदू कॉलनीतल्या त्यांच्या बिऱ्हाडात राहणार होतो. पण त्यावेळी माझ्या अपरिपक्वतेमुळे जे मला समजलं नव्हतं ते पुढे समजलं.

माझं लग्न झालं म्हणून तिथेच माझे नि आक्काचे ऋणानुबंध संपले नाहीत. रामचं आणि त्या दोघांचंही छान मेतकूट होतं. त्यामुळे आम्ही चौघेही एकमेकांच्या सहवासात छान रमत असू. माझं पहिलं बाळंतपण आक्कानं नागपूरला केलं. आमचं लग्न अगदीच साधेपणानं केलं गेलं होतं म्हणून बारशाचा थाट उडवून द्यायची तिची इच्छा होती. त्यासाठी तिचे बेतही चालले होते.

पण, गरोदरपणात मला गर्भाशयावर सिस्ट झालं आणि ते दुखणं खूप महिने पुरलं. बाळंतपणात माझी सगळी काळजी तिनं घेतली. सिस्टच्या लांबलेल्या दुखण्यामुळे मी अगदी बिछान्यावर आजारी पडून होते. माझी देखभाल तिलाच करावी लागली माझ्या तान्ह्या मुलालाही तिलाच पहावं लागत होतं. त्या काळात आक्का आणि अप्पासाहेबांचा आम्हाला मोटा आधार होता.

पुढेही कित्येक वर्ष मी माहेरपणाला जावं तशी दिवाळीच्या सुटीत आक्काकडे जात असे. आक्काकडची दिवाळी अगदी साग्रसंगीत असे. तिला सगळ्या गोष्टी करायची खूप हौस होती. आकाशकंदिल , फटाके आणि दारुकाम यात सर्व घर रंगून जात असे. फराळाचे नाना पदार्थ ती सुगरणपणे करीत असे.

मुलांचा दंगा सुरू झाला की काही वेळा अप्पासाहेब रागावत असत. मुलांवर अप्पासाहेब रागावले, त्यांना ओरडले की आक्काला फार वाईट वाटायचं. त्या रागवारागवीची अखेर व्हायची आक्काच्या मुसमुसुण्यानं. सणासुदीला पोराबाळांवर रागावलेलं तिला अजिबात आवडायचं नाही. बहुतेक वेळा हे रागवण्याचं सत्र दुपारच्या वेळी होत असे. संध्याकाळ अप्पांना अतिशय आवडायची. त्यामुळे सूर्य मावळतीकडे वळायला लागला की हवेतल्या गारठ्याबरोबर अप्पाही

अनुक्रमणिका

शांत होत जात. अगदी चांगले मूडमध्ये येत असत. घरातलं वातावरण अप्पासाहेबांच्या चांगल्या मूडमुळे मग आल्हादकारक बनायचं. १९६० साली अप्पासाहेब नोकरीनिमित्त दिल्लीला गेले. आक्कालाही तिथे आकशवाणीवर चांगली संधी मिळाली. १९६१ साली आक्काला साहित्यसंमेलनाचं अध्यक्षपद भूषविण्याचा मान मिळाला. त्याच वर्षी तिला पहिली नात झाली. तिला मुलींची फार हौस होती, पण मुलगेच झाले. ती कसर आता नातीनं भरून काढली. आक्का अगदी खुषीत होती.

१९६० सालीच आमचं इंग्लंडला जायचं घाटत होतं. पण सगळं नक्की ठरेपर्यंत उगीच कुठे वाच्यता नको म्हणून आम्ही कोणाला काही सांगितलं नव्हतं. शेवटी जायचं पक्क झालं त्यावेळी एकच गडबड उडाली. इकडचा पसारा आवरायचा, सगळे व्यवहार निपटायचे यात इतका वेळ गेला की आक्काला सविस्तर कळवायला जमलं नाही. आम्ही तीन वर्षांसाठी इंग्लंडला जाणार होतो, आणि तरी जाण्यापूर्वी आक्काला भेटायला जायला जमलं नाही. ती माझ्यावर खूप रागावली. तिचं दिल्लीहून अगदी चिडून पत्र आलं होतं. तिचं चिडणं रास्तचं होतं. तिच्या माझ्यावरल्या मायेपोटीच ती रागावली होती.

पण खरंच रागावण्यामागे एवढंच कारण होतं ? आता वाटतं आतून तिला त्यावेळी जाणवलं होतं का की यापुढे आमची कधीच भेट होणार नाही ? कारण आमच्या तिकडच्या वास्तव्यात इथे आक्काचा आकस्मिक मृत्यू झाला. इंग्लंडला जाण्याआधी आक्काकडे दिल्लीला जाणं प्रयत्न करूनही शक्य नव्हतं. तरी तिला भेटता आलं नाही याची पुढे मला कायमची चुटपुट लागून राहिली.


१९६१ साली आक्का साहित्य संमेलनाची अध्यक्ष झाली. त्यावेळच्या समारंभांचा तपशीलवार वृत्तांत आक्काने मला चौदा - पंधरा पानी पत्र लिहून कळवला होता. त्या सोहळ्याचा तिनं मनापासून आस्वाद घेतला. तिच्या पत्रात तिनं लिहिलं होतं. ''सर्व गोष्टी छान झाल्या, फक्त ते बघायला तू त्यावेळी नव्हतीस.''

मला वाटलं आक्काचं मला आलेलं ते शेवटचं पत्र होतं. संमेलनाची दगदग, मुंबईला नातीला पहायला जाणं या सर्वांचा तिच्या तब्येतीवर परीणाम तर झाला नसेल? असा अन्य तर्कवितर्क करायचा. तसं काही तिचं जाण्याचं वय नव्हतं.

आजही मित्रमंडळींच्या गोतावळ्यात, आप्तेष्टांच्या घोळक्यात जेव्हा गप्पागोष्टी रंगतात तेव्हा आक्का अप्पासाहेबांचा विषय हरघडी निघतो. माझ्या आयुष्याला आकार देण्यात त्या दोघांचा केवढा वाटा होता हे आता या उतारवयात माझ्या लक्षात येतंय

आठवणी के. कमालिनी देशमुख
शब्दांकन डॉ. अनघा केसकर
'गौरीनंदन', ७६/१३, शांतीशीला सोसायटी,
लॉ कॉलेज रोड, एरंडवन, पुणे - ४

❑❑❑



युगवाणी
कुसुमावती देशपांडे विशेषांक
२००४/०५

समांतर रेषा

कुसुमावती देशपांडे

आमच्या गड्याची ती मुलगी. तिचं नांव इंदिरा. पण तिचा बाप तिला 'इंद्रा' म्हणे. त्या दिवशी तिच्याकडे मी किती तरीवेळ निरखून पाहत होतें.माझी दृष्टि तिच्या अंतरंगाचा ठाव घेण्यासाठी धडाडत होती तिच्या भवितव्यांतहि शिरू पाहत होती. पण एकीकडे हें चालू असतांनाच माझ्या अंतर्मनांत वेगळंच चित्र उमटलं जात होतं. दोन वेगवेगळ्या असीम पण समांतर पातळ्यांतून दोन बिंदु झपाट्यानं सरकत होते. दोन्ही आपापल्या पातळींतून एकाच दिशेनं दोन संवादी बिंदूंपासून निघाले; एकाच गतीनें निघाले; पण दोघांची भेट कधींच झाली नाहीं. त्या दोन्ही पातळ्या नेहमीं समांतरच राहतील का ?

त्यांतला एक बिंदु 'इंद्रा'च्या वास्तविक जीवनाचा लेख लिहीत होता. त्याची पातळी वास्तवतेची होती. दुसरा बिंदु त्याच जीवनाचा माझ्या मनांतील आदर्श लेख लिहीत होता. तो बिंदु आदर्शाच्या जगांत होता. पण माझ्या मनांतील आदर्श सृष्टि म्हणजे स्वप्नसृष्टि थोडीच होती ? कांही तरी उच्च - उच्च, दिव्य - दिव्य, तरल - विरल थोडंच होतं ? माझी आदर्श सृष्टि निव्वळ मानवतेची, मानवतेच्या पूर्ण विकासाच्या स्पष्ट जाणिवेची बनलेली होती. मग तरीही इंद्राच्या वास्तव जीवनाच्या पातळीचा व माझ्या अंतर्मनांतील आदर्श सृष्टीच्या पातळीचा संयोग कधींच होणार नाहीं का ? त्या नेहमीं समांतरच राहतील का ?

त्या दिवशीं इंद्रानं माझ्या मुलांच्या खेळायच्या गोट्या लांबवल्या. तिनं हाताळपणा केल्याचा हा पहिलाच प्रसंग मुळींच नव्हता. मुलांची सकाळ सारी सुव्यवस्थित जाते ; खाणंपिणं होतं, अभ्यास होतात, आंघोळी होतात, जेवणं आटोपतात व तीं शाळेंत जातात. त्यांची छोटींशी मनं, त्यांच्या नैसर्गिक वृत्ति मध्येंच उफाळून आल्या, हट्टांच्या वावटळी उठल्या, दांडगाईचं वारं भरारलं, तरी कुणाच्या ना कुणाच्या समजावणीच्या शब्दानं ते आपल्या नित्याच्या रुंद, सरळ, सपाट रस्त्यावर पुन्हा स्थिर होतात व संथपणं चालूं लागतात. अकरा वाजेपर्यंत आम्ही सर्व आपल्या कामाला जातो व इंद्रा घराच्या आसपास एकटीच खेळत राहते; बागेच्या कोनाकोपऱ्यांत भिरभिरत राहते.

ती एकटीच खेळते. हातांत एखादी काडी, नाहीं तर दोरी, नाहीं तर सुकल्या - चुरगळल्या फुलांचा झुपका घेऊन पेरूच्या झाडाखालीं किती तरी वेळ ती आपल्याच तंद्रीत उभी असते. रस्त्यावरच्या सहदारींतलं अखंड नावीन्य तिचे डोळे जणुं शोषून घेत असतात. तिचे डोळे लहानसेच आहेत; त्यांत सौंदर्य मुळींच नाहीं. तिचं नाक अपरं आहे, तिवणी फाकलेली आहे, तिच्या झिपऱ्या नेहमी डोळ्यांवर आलेल्या असतात, नाक वाहत असतं,केस धुळीनं भुरकट झालेले असतात, परकर मळकट असतो. हें आपलं ध्यान घेऊन किती तरी वेळ आपल्या अधाशी नेत्रांनी रस्त्यावरची गंमत ती पाहत उभी असते.

आसपास एखादा कुणबाऊ पोरगा दिसला, नाहीं तर काटक्या - शेण गोळा करणारी पोरगी दिसली कीं इंद्राच्या रिकामटेकड्या पण चळवळ्या डोक्यानं उचल खाल्लीच पाहिजे. मग ती कुणाला एखादी शिवी देईल, एखादा खडा मारील, वाकुल्या दाखवील. पळभर

शब्दाशब्दी झाली कीं तो रस्त्यावरला पाईक पाय काढतो व इंद्रा आपली ती मारक्या म्हशीसारखी दृष्टी त्याच्यावर रोखून कांहीं वेळ उभी राहते. पाहतां पाहतांच तिला माझ्या मुलांबरोबर हजार वेळां ऐकलेल्या एखाद्या रेकॉर्डमधले शब्द आठवतात.आपल्या हेंगाड्या भाषेंत व सर्वस्वीं संगीतशून्य आवाजांत ती तें गाणं बडबडूं लागते व कुठं तरी झाडाखालीं मातीचीं घरकुलं बनवूं लागते.

अन्नासाठीं हपापलेलं तिचं मन बागेंत कंटाळलं कीं बंगल्याकडे, मुलांच्या खोलीकडे वळतं. तिचं सबंध बुद्धियंत्र जणु आपल्या पूर्ण वेगानं काम करूं लागतं. दृष्टींतला शून्यपणा जातो, मुठी बांधल्या जातात, पावलं सावधपणानं पडूं लागतात. कारण मुलं घरीं नसतांना त्यांच्या खोलींत न जाण्याबद्दल तिनं कितीदां तरी माझी बोलणी खाल्ली असतील व आपल्या बापाच्या हातचा मारहि खाल्ला असेल. पण रिकामं पडलेलं तिचं मन, निव्वळ नैसर्गिक शक्तींमुळं स्वतःला जिवंत राखूं पाहणारी तिची बद्धि तळतळून काम मागते. तिच्या आसपास, तिच्या हातांशी किती तरी लोभनीय वस्तू पडलेल्या असतात; किती तरी खेळण्यांनीं तिची बुद्धी चक्रावून सोडलेली असते.

मुलं घरीं असतात तोंबर तें सर्व तिला दुरून पाहावं लागतं. हात लावायचाच तर आर्जवानं परवानगी घ्यावी लागते. आता संधि आलेली असते - निर्भरपणें, अडथळ्याविना मन मानेल ती वस्तू पाहायला, चाळवायला, खेळायला घ्यायला संधि आलेली असते. तें सामान तिच्या मालकीचं नव्हतं; उलट तिच्या मालकाचं होतं. त्याला हात कसा लावायचा ? मागच्या वेळीं बापानं कसं मारलं होतं.... पण त्या माराचा तिच्या शरीरावर तर नाहींच, पण मनावरहि वळ राहिला नव्हता. शारीरिक भुकेच्या यातनांपुढं मालकी हक्कांचं माहात्म्य मोठेदेखील गुंडाळून ठेवतात, मग इंद्राच्या मनावर स्वतःचं अस्तित्वच राखायचा प्रसंग आल्यावर जें दिसेल ते आपलंच असं त्याला वाटल्यास नवल काय ?

अशाच अजाणत्या आंतरिक आवश्यकतेमुळं तिनं परवां कांही गोट्या लांबवल्या असाव्यात. तें मुलांच्या लक्षांत येतांच त्यांनीं परस्पर धमकावणी वगैरे केलीच. पण इंद्रा तेवढ्याला न बधण्याइतकी आतां पक्की झाली आहे. तिनं आपल्यावरील आळ साफ नाकारला. मग प्रकरण माझ्याकडे आलं.

जणुं तीन पोलिसांनीं तिला गिरफदार करून आणलं. तिनंहि एखाद्या अट्टल डाकूची मुद्रा धारण करून प्रवेश केला. तिची तिरस्कारपूर्ण दृष्टि त्या तिघांनाहि आपल्यावरचा आळ सिद्ध करून दाखवायला जणुं आव्हान देता होती.

किती तरी वेळा माझीं व तिची प्रश्नोत्तरं झालीं. अखेर तिनं तीनच गोट्या खेळतां खेळतां हरवल्याचं कबूल केलं. कदाचित त्या चौकशीच्या बैटकींतून निसटण्यासाटींच तिनं धूर्तपणानं तो उपाय शोधून काढला असेल.

त्यानंतरहि मी तिला किती तरी वेळ छेडीत होतें. वरपांगीं तिला चोरीचं स्वरूप दाखवून भेडसावण्याचा प्रयत्न करीत होतें; तिची हीच सवय कायम राहिल्यास काय होईल तें समजावून देत होतें; धाकहि दाखवित होतें; पण आंतून माझं मलाच मनसोक्त हसूं येत होतं. कारण माझे डोळे तिची मुद्रा नीट निरखीत होते.

तिची कृति किती स्वाभाविक होती ! निव्वळ तिच्या बालमनांतून उत्स्फूर्त झालेली ! पण त्या चौकशीच्या बैटकीपुढं तिला सादर करण्यांत येतांच एखाद्या गोगलगायीच्या कवचासारख्या किंवा कासवाच्या पाठीसारख्या कटोर, निश्चल, कृत्रिम मुद्रेचा तिनं आश्रय केला होता. माझं समजावणं, माझं दरडावणं, सारख्याच निर्विकारपणानं त्या मुद्रेवर झेलतं जात होतं. कांहीं वेळ निपचित पडून राहिल्यावर कासव जसं हळूच डोकं बाहेर काढून आजूवाजूचा आढावा घेऊन पाहतं, तशीच तिनं गोट्या लांबवल्याची कबुली दिली होती व पुन्हा लागलीच ती आपल्या कवचांत शिरली......

माझ्या आदर्श सृष्टीच्या पातळीवरचा बिंदु झपाट्यानं सरकत होता...

तिथं इंद्रा फारच निराळ्या वातावरणांत होती. ती आमच्या गड्या सारख्या एका साधारण शेतकरीवजा माणसाचीच मुलगी होती. पण तिच्या बापाला चार पैशांच्या कमाईसाटीं शहराचा रस्ता धरायची पाळी आली नव्हती. आपल्या मूळच्या खेडेगांवांत मनमुराद शेतीचं काम करून तो सुखांत होता. त्याच्या जिवाचं रोपटं जिथं उगवलं तिथंच भरदारपणानं विकसलं होतं.

इंद्रा त्या शेतकऱ्याच्या गांवींहि एका लहानशा पण सर्वस्वीं नवयुगीन शाळेतं जात होती. तिला स्वभावतःच घरकुलं बांधायची फार हौस आणि त्या हौसेचं तिच्या शाळेंत चीज होत होतं. शाळेंतल्या मातीकामाच्या कोपऱ्यांत विटांपासून थाप्यांपर्यंत सर्व सामान ठेवलेलं असे. तिथं थोडा अवसर सांपडतांच इंद्रा आणि तिच्या मित्रमैत्रिणी आपल्या लहानलहान हातांनी लहानमोठीं घरं बांधण्यांत, स्थापत्यशास्त्राचे तऱ्हेतऱ्हेचे प्रयोग करण्यांत गुंग होत असत. तिथल्या कृषिप्रधान शिक्षणाची मर्यादा ओलांडल्यावर तिच्या चळवळ्या वृत्तीमुळं तिनं शहराचा रस्ता धरला. तिथं तात्पुरती एक घरकामाची नोकरी

धरून तिनं आपल्या हक्काच्या फुरसदीच्या वेळीं आपला आवडता व्यासंग वाढवण्यासाठीं अभ्यास चालवला होता. हे सर्व तिला शक्य झालं. सहजसाध्य झालं, कारण त्या जगांत तिचं शिक्षण तिच्या वंशपरंपरेवर, तिच्या बापाच्या आर्थिक परिस्थितीवर अवलंबून नव्हतं. ती आतां पंधरा - सोळा वर्षांची मुलगी होती, म्हणूनहि तिचा मार्ग कोणीं रोखला नाहीं. तिची हौस व तिची कर्तबगारी एवढंच भांडवल त्या जगांत अवश्य होतं. स्वतःची इच्छा व स्वतःची महत्त्वाकांक्षा एवढ्यांचं संरक्षण तिला तिथं पुरेसं होतं.

तिचं स्थापत्यशास्त्राचं वेड कायमच होतं. एका स्थापत्यशाळेंतील 'अवसर-वर्गांत' ती धडे घेऊं लागली. कुशल अनुशासनामुळं तिच्या नैसर्गिक बुद्धीचं सार्थक झालं. तिला घरकाम करून पोट भरण्याची, जन्मभर मोलकरणीचं जीवन कंठण्याची गरज राहिली नाहीं. तिच्या बुद्धीला वाव मिळाला. कल्पकतेला क्षेत्र मिळालं. ती समाजाचा एक जिवंत घटक बनली.

त्या जगांत प्रत्येक उमलत्या वृत्तीचा फुलोरा पूर्ण फुलत असे. त्या फुलांना फळं येत असत. तें जग व्यक्तीच्या विकासाचं होतं. सर्व सामाजिक संपत्ति तिथं व्यक्ती - व्यक्तीच्या हितासाठी खर्चली जात होती. म्हणूनच त्या जगांत सामाजिक समृद्धीहि होती. तिथं पूर्ण विकसित फुलांचा सुवास दरवळून जात असे.

वास्तवतेच्या पातळीवरचा तिचा जीवनलेख स्पष्ट होऊं लागला, काळवंडून उमटूं लागला.

इंद्रा मोठी होईल.आणखी एखादं वर्ष ती अशीच रिकामटेकडी वाढेल. तिच्या नैसर्गिक वृत्तींचा विकास तर होणार नाहींच, त्यांचा कांही उपयोगहि होणार नाही. तिची बुद्धि स्वैरपणानं धावेल, अस्तित्वांत आहे म्हणून कांहीं तरी मार्ग काढील व चळवळ करील. ती भलतीकडे गेली तर रपक्यांशिवाय तिला कांहींहि मिळणार नाहीं. मग ती आणखी खोल शिरेल; स्वतःसाठीं कवच निर्माण करील रपक्यांपासून आपलं रक्षण करील; पण स्वतःला जो दिसेल त्या मार्गानं दौडत राहील.

या कवचासहच तिचा बाप तिचं कुणाशीं तरी एखाद्या गड्याच्या पोराशीं लग्न करून देईल व मग इंद्राला आपल्या त्या कवचासह आपल्या नवऱ्याशीं झुंज घ्यावी लागेल. ज्या अनिवार्य ओढीनं तिनं माझ्या मुलाच्या खोलीकडे धाव घेतली, त्याच हिरिरीनं ती जीवनाचं क्षेत्र धुंडाळूं लागेल, अन् शिताफीनं तिनं माझी बोळवण केली त्याहूनहि जास्त कौशल्यानं, जास्त आत्मविश्वासानं ती भोंवतालच्या माणसांशी, नवऱ्याशीं, सासूशीं, जावेशीं किंवा आपल्या मालकिणीशीं टक्कर देईल. आपल्याला ज्या हव्या त्या, पण ज्या मिळत नाहींत त्या वस्तू ओढून घेऊन दाबून बसेल...

तिची सारी शक्ति, तिची सारी बुद्धि स्वतःला जें हवं तें मिळवण्यांत व त्याचं रक्षण करण्यांत वेचली जाईल व जग तिला भांडखोर म्हणेल..

किंवा हवं तें मिळण्याची तिची भूक शिल्लकच रहाणार नाहीं. सर्वांशी झुंज देणारं तिचं व्यक्तिमत्त्वच नाहीसं होईल व ती एक ईर्ष्याशून्य, चैतन्यविहीन असं दुसऱ्याचं काम उपसणारं यंत्र बनेल आणि मग तिची सासू तिच्यावर खूष राहील. जिथं ती कामाला राहील तिथं वर्षवर्ष टिकून राहील. तिची मालकीण म्हणेल, ''किती गरीब, किती विश्वासू मोलकरीण मिळाली!''

आणि ती नेहमीं गड्याची मुलगी, गड्याचीच बायको व तोंवर जगांतच कांही अचाट उलटापालट न झाल्यास गड्याचीच आई होईल....

तिच्यापुढचं जीवनक्षेत्र कधींच विस्तारणार नाहीं. तिच्या विकासाची सारीं दारं बंदआहेत. त्यांना कुलपं ठोकली आहेत.

तिच्या वास्तव जगांत झाडं खुरटलेलीं आहेत. त्यांना फुलोरा आलाच तर तो वावटळीनं, गारपिटीनं झडून जातो. तिथं झाडावर फलभाराची शोभा दिसण्याऐवजीं झाडाखालीं झडलेल्या मोहोराचा खच पडतो, तो कुजून जातो....

त्या दोन रेषा नेहमींच समांतर राहतील का ?

(दीपमाळ या संग्रहातून)

❑❑❑

अनुक्रमणिका

माध्यान्ह

कुसुमावती देशपांडे

आमची मे महिन्याची दुपार म्हणजे वाळ्याच्या ताट्यांनी मढविलेल्या व पंख्यांनी विभूषित केलेल्या खोलीतच बहुधा जायची. अशा खोलीतल्या त्या मंद उजेडात काहीशा अस्वाभाविक परंतु अत्यंत आल्हादकारक थंडाव्यात आणि वाळ्याच्या सुगंधात निदान आम्हा वऱ्हाड्यांना तरी उन्हाळ्याचे सारसर्वस्व साठविल्यासारखे वाटते. अर्धवट झोपेत एखाद्या कादंबरीची पाने चाळावी, मध्येच या कुशीचे त्या कुशीवर वळून एकदा 'हुश्श' करावे व पूर्णपणे निद्रेच्या स्वाधीन व्हावे, हाच आमचा कार्यक्रम. माझेही हे दिवस बहुतेक असेत जातात.

पण एके दिवशी ऐन उन्हाळ्याच्या वेळी बाहेर कोणीतरी आले, म्हणून मला व्हरांड्यावर यावे लागले आणि त्या वेळेस मला कळून चुकले, की निसर्गाला खरोखरच आपले सौंदर्य, आपली दुःखे, आपले आनंदाचे क्षण जे जे म्हणून आपल्या जीवनात खरोखरच महत्त्वाचे असेल ते ते मानवी दृष्टीपासून दडवूनच ठेवावेसे वाटते. एरवी ज्यावेळी सृष्टीच्या दैनंदिन नाटकाला आत्यंतिक रंग चढतो, तेव्हाच तिच्या सान्निध्यात राहावयाला मानव असमर्थ का ठरतो ? तिच्या जीवनातला रस आपल्या अतंःकरणात साठविण्याची संधी साधून घेणे त्याच्या आवाक्याबाहेर का जावे ?

मी बाहेर आले तेव्हाचे दृश्य अगदी असेच होते. दृष्टीच्या सीमेपर्यंत काळी शुष्क जमीन पसरली होती. शब्दांच्या पलीकडे जिथे दारिद्र्य गेले आहे, अशा एखाद्या स्त्रीच्या अंगावरील फाटक्या चिंध्यांप्रमाणे वाळून कोळ झालेल्या गवताचे अवशेष भासणाऱ्या वाऱ्याने उगीचच भुरभुरत होत, दूरवर नजर फेकली, तर मधूनच मृगजलाचे तरंग दिसत. मधूनच ती काळीभोर जमीनच तरळल्यासारखी खालवर हलल्यासारखी वाटे.

मी कितीतरी वेळ तिथे उभी राहिले - अगदी दूरवर पाहात उभी राहिले. दृष्टीच्या टपप्यातला कानाकोपरा मी निरखून पाहिला. सगळीकडे स्तब्धता अनिमिष स्तब्धता पसरली होती. झोप लागली होती का सृष्टीला ? छे :, तिच्या जीवाची लाही लाही होत होती. तिचा ऊर दाटून आला होता. तिच्या तोंडून शब्द फुटत नव्हता. क्षितिजाच्या कडेवर थोडीशी शिंदीची, काही आंब्याची झाडे अंधुकपणे दिसत होत; पण त्यांची छाया कितीशी पुरी पडणार ! त्यांची त्यांनाच याची जाणीव असल्यामुळे ती जधू विंमूढपणे निश्चल उभी होती. एक कोरडा ठणठणीत रुंद रस्ता मात्र उन्हात तळमळत होता. त्या काळ्या माईवरचे आपले स्वामित्व प्रस्थापित, विजयोन्मादाने तिच्या हृदयावर नाचत होता.

वर अथांग निळे आकाश पसरले होते. अस्फुट बोलाप्रमाणे एखाददुसरी घार तिथे त्याच त्या घिरट्या घेत होती. त्या बोलासाठी धरित्रीची धडपड होती का ? त्या अथांग आसऱ्याकडे ती डोळे लावून पाहात होती. त्या निळ्या ओलाव्यासाठी तिचा जीव पिपासला होता..

मला माझ्या एका मैत्रिणीची आठवण झाली. तिच्या जीवनातल्या एका अत्युत्कट प्रसंगी मी तिच्याजवळ होते. अशीच ती हतबुद्ध झाली होती. तिचे विशाल, धैर्यशाली अंतःकरण दुःखाने भारावून गेले होते. तिच्याजवळ गेले की माझे समाधानाचे शब्द आतल्या आत विरून जावे, माझे पाऊल मंद व्हावे, अशा आत्यंतिक दुःखापुढे त्याच्याशी झगडणाऱ्या धैर्यशाली जीवापुढे मस्तक आपोआपच नम्र होते. त्या क्षणी सृष्टीसखीही अशीच आपल्या आंतरिक दुःखाशी झगडत होती.

पण मला आणखीही आठवणी झाल्या. पावसाळ्यातील

दुपार. आषाढातली रात्र आपल्या काळोख्या तीव्रतेने कविलोकांच्या ध्यानात भरली; पण आषाढी दुपार ? विश्वाच्या विविधतेत रममाण होणाऱ्या कवीचीही नजर वळवून घ्यायला सृष्टीला चित्रविचित्र पोशाख केला पाहिले. नाहीतर कुठेले तरी आत्यंतिक रूप घेतले पाहिजे ना ? निसर्गाच्या अनाघ्रात सौंदर्यात न्हाऊन निघालेल्या वेदकालीन ऋषींनी उषेच्या सुषमेवर कितितरी स्तोत्रे रचली. तिच्यामधील दैवी अंशाची प्रतीती होऊन, त्यांनी तिच्याजवळ तेजोमय जीवनाचा आशीर्वाद मागितला; पण मध्यान्हीची एकतानता त्यांनाही जाणवली नाही. ग्रीक लोकांना निसर्गाच्या एकूण एक अवस्थेत दैवी चेतन्य दिसले व त्यांनी या प्रत्येक अवस्थेला मूर्तिमय स्वरूप दिले; पण त्यांच्याही सौंदर्यप्रेमी दृष्टीला मध्यान्हीच्या साध्या - भोळ्या वृत्तीत देवताकरणाइतकी आकर्षकता दिसली नाही. सारखेपणाच्या शांतीतच ज्यांचे सौंदर्श साठवले आहे. अशा गोष्टीकडे त्यांचेही क्वचितच लक्ष जावे ?

खरोखर, पावसाळी दुपार म्हणजे प्रेमळपणाची मूर्ती आहे. कॉलेजमधील अनियंत्रित दिवसांत कित्येक वेळा मी दुपारचा सर्वच वेळ खुल्या आकाशाखाली घालविला आहे. त्या वेळी सर्वजण मोटमोठ्या इमारतीत आपापल्या कामात दंग झालेले असल्यामुळे सारे रस्ते खुले होतात. मानवी श्वासाचा संपर्कही नसलेला पावसाळी वारा अनिर्बंधपणे वागडू लागतो, नुकतेच वर मान करणारे कोवळे गवत आपले पंख फडफडवू लागते. त्या सौम्य उन्हाने जणू धीट होऊन इकडे तिकडे पाहू लागते; हसू लागते. येऊन गेलेल्या सरींच्या थेंबांनी झाडे - पाने चमकू लागतात.

अशा वेळी माझ्या मैत्रिणीला व मला आत बसून जीव कसा कोंडल्यासारखा वाटू लागे. कशाचीही फिकीर न करता, छत्रीचा कधी विचार न करता आम्ही आमच्या शेताटेकड्यांकडे वळावे.

एरवी फिरायला गेले, की आम्हाला कोण संभावित बनावे लागे ! रस्त्याने गुणगुणायची सोय नाही, मोटमोठ्याने हसण्या - खिदळण्याची सोय नाही ! कुठे थांबावेसे वाटले, तर नीटच बसणे भाग. पण दुपार ? दुपार म्हणजे पूर्ण स्वातंत्र्याची वेळ. ते स्वातंत्र्य लाभले म्हणूनच की काय, आम्ही किती तरी वेळ अक्षरही बोलू नये. प्रत्येकीचे मन त्या अपरंपार शांतीतच विलीन होऊन जावे. त्या विश्वस्त, प्रीतिमय, हळुवारपणे फुललेल्या वातावरणाने जीवन भारला जावा. टेकडीवर पोचताच कुठेतरी लहर लागेल तिथे आम्ही अंग पसरून द्यावे. पूर्ण सुखमय आयुष्यातदेखील इतक्या समाधानाचे क्षण क्वचितच येत असतील.

तिथे अद्‌भुतरम्य असे काहीच नव्हते. भरास आलेली, कोकिळेच्या गाण्याने निनादलेली आंब्यांची झाडे नव्हती; संध्येचे विलास, तिची उत्कटता, तिचे गूढ औदासीन्य नव्हते; उषेची चैतन्यपूर्ण खळबळ, क्षणोक्षणी बदलते रंग नव्हते - काहीही नव्हते. फक्त सारख्याच सारख्या दिसणाऱ्या टेकड्या व वर अथांग पसरलेले काळसर निळे आकाश होते. जलाशयामुळे भारावलेल्या व त्यामुळे जणू एकाच दिशेने मंदपणे वाहणारा वारा होता; पण म्हणूनच तिथे शांती होती, विश्रब्धपणाचे समाधान होते, म्हणूनच तिथे एक प्रकारच्या चिरंतन आनंदात मन एकत्रित होई. अशा वेळी जीवनातल्या खेचाखेचींचे दुःखांच्या धावपळींचे खरे महत्त्मापन होते. सर्व निरर्थक विचार - विकार गळून पडतात व जीवनातील केंद्रिभूत सत्याचे आकलन होऊ लागते.

हिवाळ्यातील दुपार तरी काय कमी असते ? त्या वेळच्या उबदार हवेची गोडी अस्सल. सुखवाद्यांनादेखील पटेल, तिचा आस्वाद घेत उन्हात पडले असताना डोळ्यांना चारी बाजूंना जणू समृद्धीची ऊब दिसू लागते. हेमंताचे सोने सगळीकडे पसरलेले असते. गव्हावर सोनेरी तांबूसपणा चढायला सुरुवात होते.कडुनिंबाच्या पानांचे सोने होऊन ती गरगर शिवाशिवी खेळत हिंडू लागतात. जसजशी शिशिराची कळा ओसरू लागते, तसतशा भिंगाऱ्यांच्या झाडावर निव्वळ सोनेरी शेंगाच शेंगा लटकू लागतात: तर पिवळ्या कांचनांचे झाड एकेका फांदीवर एखाददुसरेच सुवर्णमय फूल घेऊन डोलू लागते. पराकाष्ठेच्या एकतानतेने जणू दोघेही एकूण एक पानाला झुगारून देऊन आपल्या जीवनाचे सुवर्णमय ध्येय गाठण्याच्या आनंदात विहरत असतात. भिंगाऱ्यांच्या विस्तीर्ण वृक्षावरची एकेक शेंग किंवा कांचनाच्या फांदीवरचे एकेक फूल म्हणजे जणू एकेका ओजस्वी कल्पनाबीजाचे प्रकाशमय मूर्त स्वरूपच. आपल्या जीवनरसाला बाहेर पडायला तेवढेच मार्ग ठेवून ते त्यांचे जणू प्रकाशातच रूपांतर करतात व या सर्वांच्या भरीला सूर्याचे सोनेरी किरण. मिडास राजाने हेमंत - शिशिरातील दुपारच्या मौंदर्याकडे डोळे उघडून पाहिले नसावे का ?

परंतु मध्यान्हीचे सौंदर्य स्थलावर किंवा ऋतूवर अवलंबून नाही. अद्‌भुततेपासून अलिप्त व कुठल्याही तऱ्हेच्या अतिरंजनाने अदूषित अशा वास्तविकतेचे सौंदर्य तिच्यात आहे व म्हणून जीवनाच्या मुख्य वृत्तीशी तिची वृत्ती समरस होऊ शकते. जीवनसंगीताच्या स्थायी मधुरता व महत्त्व तिच्यात आहे, ती वेळ भावनेने ओथंबलेली आहे, पण ती भावना इतकी सखोल, इतकी संथ व अखंड आहे, की बुद्धीच्या अत्यंत प्रभावशाली झोतानेतिचे निरीक्षण करून घ्यावे. मध्यान्हीच्या वेळेत समतोलपणाचे स्वारस्य, गंभीरतेचा आनंद साठवलेला आहे. तीत उच्छृंखलपणा नाही. भडकपणा नाही. अभिजातपणाला साजेसे तिचे सौंदर्य आहे, प्रगल्भ हृदयाप्रमाणे तिची दुःखे निःशब्द आहेत. त्याच्याप्रमाणेच तिचा आनंद शांत आहे.

दीपदान (१९४१)

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ
वार्षिक अहवाल

जानेवारी, २००४

◗ दि. ३ जानेवारी

कथालेखक मोहन कडू यांना विदर्भ साहित्य संघातर्फे श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी एका शोकसभेचे आयोजन लोकसत्ताचे उपनिवासी संपादक प्रवीण बर्दापूरकर यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. डॉ. विश्वेश्वर सावदेकर, डॉ. धर्मराज निमसरकार व वसंत वाहोकर यांची श्रद्धांजलीपर भाषणे झाली.

◗ दि. १६ जानेवारी

प्रख्यात कथा लेखिका अंबिका सरकार व सानिया यांच्या सोबत गप्पांचा एक कार्यक्रम शुक्रवार, दि. १६ जानेवारी २००४ रोजी विदर्भ साहित्य संघाच्या ग्रंथालयात आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमास साहित्य रसिकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

◗ दि. १९ जानेवारी

विदर्भ साहित्य संघातर्फे घेण्यात येणाऱ्या निःशुल्क उर्दू भाषा प्रशिक्षण वर्गाचा प्रमाणपत्र वितरण कार्यक्रम उपाध्यक्ष डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांच्या अध्यक्षतेखाली झाला. या प्रसंगी प्रख्यात उर्दू लेखक व सेंट्रल बँक ऑफ इडियाचे निवृत्त शाखा प्रबंधक श्री. सिकंदर हयात हे मुख्य अतिथी होते. उर्दू प्रशिक्षण वर्गातील एक प्रशिक्षणार्थी प्रा. मनोहर सोनटक्के यांनी या प्रसंगी उर्दू गझल गायल्या. ह्या प्रसंगी विदर्भ साहित्य संघाच्या वर्धापनदिनी अमरावती येथे उपस्थित राहू न शकलेले महाराष्ट्र फाऊंडेशन पुरस्कार विजेते श्री. मारुती चितमपल्ली व डॉ. भास्कर लक्ष्मण भोळे, नागपूर विद्यापीठाची डी. लिट. प्राप्त डॉ. कुसुम पटोरिया यांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्हे प्रदान करून तसेच हरिकिसन अग्रवाल पत्रकारिता पुरस्कार प्राप्त पत्रकार श्री. सोपान पांढरीपांडे यांना स्मृतिचिन्ह व ३ हजार रु. रोख पुरस्कार प्रदान करून कार्याध्यक्ष मनोहर म्हैसाळकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

◗ दि. २४ जानेवारी

दुसऱ्या महायुद्धात हिरोशिमा - नागासाकी या शहरावर झालेल्या अणुबाँब हल्ल्यातून बचावलेले दोन वयोवृद्ध नागरिक भासू इको टाकेटा आणि सासू ईसा वालावा यांचा अणुहल्ल्याच्या भीषण आठवणी सांगणाऱ्या अनुभव कथनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास अणुबाँब विरोधी जनआंदोलन समिती, नागपूर यांचे सहकार्य लाभले.

◗ दि. २६ जानेवारी

प्रा. सुरेश द्वादशीवार यांच्या 'कोऽहम्' या कादंबरीचे प्रकाशन साधनाताई आमटे यांच्या हस्ते विनोबा विचार केंद्र, धरमपेठ येथे झाले. विदर्भ साहित्य संघ व विद्या विकास पब्लिशर्स यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात प्रख्यात कवी वसंत आबाजी डहाके यांचे भाषण झाले. अध्यक्षस्थानी प्रा. राम शेवाळकर होते.

फेब्रुवारी २००४

◗ दि. २ फेब्रुवारी

जागतिक ख्यातीप्राप्त साहित्यिक विभूतिभूषण वंदोपाध्याय यांच्या तीन कादंबऱ्यांवरून प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक सत्यजीत रे यांनी पथेर पांचाली, अपराजितो व अपूरसंसार या चित्रपटांची निर्मिती केली त्यावर विजय पाडळकर यांच्या रसास्वादाची मैफिल विदर्भ साहित्य संघ व राजहंस प्रकाशनचे 'मंथन' व्यासपीठ यांनी आयोजित केली.

◗ दि. ५ फेब्रुवारी

प्रख्यात लेखक, कवी, विचारवंत व इंग्रजी - मराठी साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. विश्वास कानडे यांना विदर्भ साहित्य संघातर्फे श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. शोकसभेच्या अध्यक्षस्थानी प्रा. सुरेश द्वादशीवार होते. याप्रसंगी डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी, वामन तेलंग, डॉ. शरद कोलारकर व श्री. वैकुंठ इंगळे यांची श्रद्धांजलीपर भाषणे झाली.

◗ दि. १५ फेब्रुवारी

विदर्भ साहित्य संघ आणि कौस्तुभ प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. चंद्रशेखर पांडे लिखित 'मानसिक स्वास्थ्य तंत्र व मंत्र' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. अभय वंग यांच्या हस्ते झाले. सर्वोदय आश्रम सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष प्रा. सुरेश द्वादशीवार हे होते. डॉ. श्यामला वनारसे यांनी याप्रसंगी आपले विचार व्यक्त केले.

◗ १५ फेब्रुवारी

विदर्भ साहित्य संघ आणि प्रतिमा प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने सुचित्रा कातरकर लिखित 'ऋतु, राग अन् चौकटीतलं आकाश' आणि 'निळे पाणी, हिरवी उन्हे' या ग्रंथांचा प्रकाशन समारंभ सायंटिफिक सोसायटीच्या सभागृहात आयोजित करण्यात आला. या ग्रंथांचे प्रकाशन प्रख्यात कवी प्रा. नारायण कुळकर्णी-कवठेकर यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी डॉ. अरुणा ढेरे, डॉ. सुलभा हेर्लेकर व नंदिनी सहस्त्रबुद्धे यांची भाषणे झाली. याच कार्यक्रमात सुचित्रा कातरकर यांनी गायलेल्या गीतांची 'रंगबावरी' ही ध्वनिफीत नंदिनी सहस्त्रबुद्धे यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आली.

◗ दि. २२ फेब्रुवारी

विदर्भ साहित्य संघातर्फे प्रख्यात कादंबरीकार रंगनाथ पठारे आणि कवी सतीश काळसेकर या साहित्यिकांची आणि वाचकांची स्नेहभेट व गप्पांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. अध्यक्षस्थानी डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी होते.

मार्च २००४

◗ दि. १४ मार्च

कविवर्य सुरेश भट यांच्या प्रथम स्मृतिदिनी त्यांच्या निवडक गीतांचा कार्यक्रम भावगंधर्व पं. हृदयनाथ मंगेशकर आणि यशश्री भावे यांनी सादर केला. पं. हृदयनाथांनी गायिलेल्या कवितांचे निरूपण प्रा. राम शेवाळकर यांनी केले. या प्रसंगी अ. भा. मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष डॉ. गं. ना. जोगळेकर यांनी सुरेश भटांच्या आठवणी सांगितल्या. सायंटिफिक सोसायटीच्या मैदानावर झालेल्या या कार्यक्रमाचे आयोजन विदर्भ साहित्य संघ, सप्तक व सायंटिफिक सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. या कार्यक्रमास रसिकांनी अमाप प्रतिसाद दिला. याचवेळी कवी सुरेश भट यांची स्मृती जतन करण्यासाठी विशेष उपक्रम राबवला जाण्याची घोषणा विदर्भ साहित्य संघातर्फे करण्यात आली.

◗ दि. २० मार्च

विदर्भ साहित्य संघातर्फे कवी बा. सी. मर्ढेकर यांच्या स्मृतिदिनाचा कार्यक्रम विदर्भ साहित्य संघाच्या सांस्कृतिक संकुलात आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपाध्यक्ष डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी होते. याप्रसंगी 'मर्ढेकरांच्या काव्यातील ईश्वर' या विषयावर श्रीमती सुषमा सावरकर ह्यांचे निबंधवाचन झाले. डॉ. सुहास राजनकर यांनी मर्ढेकरांच्या निवडक कविता सादर केल्या. डॉ. श्यामला मुजुमदार व डॉ. रवींद्र शोभणे या प्रमुख वक्त्यांची भाषणे झाली.

◗ दि. २७ मार्च

विदर्भ साहित्य संघाच्या अन्य भाषा साहित्य विभागातर्फे 'नागपुरम् विदर्भयम्' या श्री गोपी अनयाड लिखित ग्रंथाचा प्रकाशन समारंभ विदर्भ साहित्य संघाच्या सरचिटणीस शोभा उवगडे यांच्या अध्यक्षतेखाली झाला. प्रा. व्ही. सी. कुमारम यांनी ग्रंथाचे प्रकाशन केले. याप्रसंगी इतिहासाचे अभ्यासक श्री. गो. मा. पुरंदरे यांचे भाषणे झाले.

◗ दि. २९ मार्च

विदर्भ साहित्य संघातर्फे घेण्यात येणारी ग. त्र्यं. माडखोलकर स्मृती व्याख्यानमाला विनोबा विचार केंद्र येथे प्रा. सुरेश द्वादशीवार यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली. या व्याख्यानमालेत 'जागतिकीकरण, देशीवाद आणि मराठी साहित्य' या विषयावर प्रख्यात कथाकार प्रा. के ज. पुरोहित 'शांताराम' यांचे व्याख्यान झाले.

मे २००४

◗ १ मे

नाना जोग स्मृतिदिना प्रीत्यर्थ विदर्भ साहित्य संघाच्या कार्यालयातील त्यांच्या अर्धपुतळ्यास माल्यार्पण करण्यात आले. विदर्भ साहित्य संघाचे उपाध्यक्ष डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी कै. नाना जोग यांच्या पुतळ्यास हार अर्पण केला. कार्यक्रमाला विदर्भ साहित्य संघाच्या सरचिटणीस शोभा उवगडे, विदर्भ साहित्य संघाचे कोषाध्यक्ष श्री. सुरेश शेंद्रे, अर्थसमिती सचिव संयोगिता धनवटे, परीक्षा समिती संचालक शुभदा फडणवीस, प्रकाश एदलावादकर आदी स्थानिक कार्यकारिणी सभासद यावेळी उपस्थित होते.

◗ ७ मे

विश्वकवी गुरुदेव रवीन्द्रनाथ टागोर यांच्या १४३ व्या जयंतीप्रीत्यर्थ बंगाली एज्यु. सोसायटी, विदर्भ साहित्य संघ व सप्तक यांच्या संयुक्त सहकार्याने 'आकाश आमी भोरवो गाने' हा वंगाली नृत्यनाट्याचा कार्यक्रम घेण्यात आला. गुरूदेव टागोरांच्या कवितांवर आधारित भरतनाट्यम शैलीतील या नृत्यनाट्याचे सादरीकरण कोलकता येथील 'दिशायतन' ह्या संस्थेन केले. याचे निवदेन वंगाली व मराठी या भाषात असल्याने मराठी भाषकांनाही याचा आनंद घेता आला. मराठी निवेदन स्वतः वीणा आलासे यांनी केले. हा कार्यक्रम सायंटिफिक सभागृहात घेण्यात आला.

◗ २० मे

विदर्भ साहित्य संघ आणि 'मुक्तिवाहिनी' या संस्थांतर्फे कवी वामनदादा कर्डक यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. अध्यक्ष स्थानी डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी होते. तर अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे कार्यवाह वामन तेलंग वक्ते म्हणून उपस्थित होते. विदर्भ साहित्य संघाच्या सांस्कृतिक संकुल स्थित सभागृहात घेण्यात आलेल्या या सभेत श्री. वामन निंबाळकर, डॉ. प्रकाश खरात व श्री. ताराचंद्र खांडेकर यांनी शोक संवेदना व्यक्त केल्या. संचालन डॉ. ईश्वर नंदापुरे यांनी केले.

अनुक्रमणिका

जून २००४

◗ ८ जून

विदर्भ साहित्य संघ व अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ यांच्या वतीने, ज्ञानयोगी कै. डॉ. श्रीकांत जिचकार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. धंतोलीतील अभ्यंकर स्मारक ट्रस्टच्या बजाज सभागृहात झालेल्या सभेच्या अध्यक्षस्थानी विदर्भ साहित्य संघाचे व अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. सुरेश द्वादशीवार होते. त्याचप्रमाणे प्रा. राम शेवाळकर, नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरु प्रा. हरिभाऊ केदार, संस्कृत विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पंकज चांदे व डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी यावेळी आपल्या शोक संवेदना व्यक्त केल्या. संचालन प्रकाश एदलाबादकर यांनी केले.

◗ १३ जून

विदर्भ साहित्य संघाच्या 'युगवाणी' या वाङ्मयीन मुखपत्राचे आद्य संपादक व प्रसिद्ध साहित्यिक कै. वामन नारायण देशपांडे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यांच्या स्फुटलेखनाचे प्रा. राम शेवाळकर संपादित व विदर्भ साहित्य संघ प्रकाशित करणार असलेल्या तीन खंडांपैकी 'तुलाधर' या प्रथम खंडाचे प्रकाशन सुप्रसिद्ध समीक्षक प्रा. म. द. हातकणंगलेकर यांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. गं. ना. जोगळेकर हे प्रमुख अतिथी होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. सुरेश द्वादशीवार होते. कार्यक्रमाला वा. ना. देशपांडे यांचे पुत्र सुधाकर देशपांडे उपस्थित होते. संचालन शुभदा फडणवीस यांचे होते.

◗ १४ जून

विदर्भ साहित्य संघातर्फे आयोजित गणेश व्याख्यानमाले अंतर्गत प्रसिद्ध समीक्षक व साहित्यिक प्रा. म. द. हातकणंगलेकर यांचा 'जी एं चा नंतरचा प्रवास या विषयावर धंतोलीतील अभ्यंकर स्मारक ट्रस्टच्या बजाज सभागृहात व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी विदर्भ साहित्य संघाचे उपाध्यक्ष डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी होते. कार्यक्रमाला डॉ. राम शेवाळकर, प्रा. महेश एलकुंचवार उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन डॉ. रवींद्र शोभणे यांनी केले. प्रकाश एदलाबादकर यांनी आभार मानले.

◗ १७ जून

विदर्भ साहित्य संघाच्या 'युगवाणी' या वाङ्मयीन मुखपत्राचे आद्य संपादक व प्रसिद्ध साहित्यिक कै. वा. ना. देशपांडे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यांच्या स्फुटलेखनाचे प्रा. राम शेवाळकर संपादित दुसऱ्या खंडाचा प्रकाशन सोहळा यवतमाळ नगर परिषद व विदर्भ साहित्य संघ शाखा यवतमाळ येथे आयोजित केला होता. दुसरा खंड 'चित्रगुप्त' या ग्रंथाचे सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा. शरच्चंद्र टोंगो यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्रा. सुरेश द्वादशीवार होते. समारंभाला प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष प्रा. रा. रं. बोराडे हे उपस्थित होते. प्रा. प्र.ग. सहस्त्रबुद्धे व वानांचे चिरंजीव सुधाकर देशपांडे यांनी विचार मांडले. कार्यक्रमाला प्रा. राम शेवाळकर उपस्थित होते.

◗ २० जून

प्रख्यात नट, चित्रपट अभिनेते व अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषदेचे अध्यक्ष मोहन जोशी यांनी विदर्भ साहित्य संघाच्या सांस्कृतिक संकुलास भेट दिली. त्या प्रसंगी विदर्भ साहित्य संघाचे उपाध्यक्ष डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी, सरचिटणीस शोभा उबगडे, परीक्षा समिती संचालक शुभदा फडणवीस तसेच अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषदेच्या केंद्रीय नियामक मंडळाचे सदस्य दिलीप ठाणेकर व शेवाळकर डेव्हलपर्सचे प्रबंध संचालक श्री. आशुतोष शेवाळकर उपस्थित होते.

◗ ३० जून

उर्दू कवी कुलगुरु प्रा. जगन्नाथ आझाद यांना विदर्भ साहित्य संघाच्या अन्यभाषा समितीतर्फे श्रद्धांजलीचा कार्यक्रम विदर्भ साहित्य संघाच्या सांस्कृतिक संकुलात घेण्यात आला. या कार्यक्रमाला उर्दू शायर डॉ. मंशा ऊर रहेमान मंशा अध्यक्षस्थानी होते. विदर्भ साहित्य संघाचे उपाध्यक्ष डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी व अंजूमन - ए - तरक्की च्या नागपूर शाखेचे अध्यक्ष मोहम्मद खिजार ह्यांनी शोक संवेदना व्यक्त केल्या. ह्या प्रसंगी डॉ. अशफाक अहमद, डॉ. विनय वाईकर, मौलाना गुलाम हुसेन, डॉ. रशिद खान, कमर हयात हे मान्यवर उपस्थित होते.

जुलै २००४

◗ १० जुलै

विदर्भ साहित्य संघाच्या ग्रंथालयातर्फे महाविद्यालयीन विद्यार्थ्यासाठी 'व्यासपीठ' हा नवा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. यामध्ये सर्वप्रथम कवि संमेलनाचे आयोजन करण्यात आले. प्रमुख अतिथी म्हणून विदर्भ साहित्य संघाच्या पहिल्या युवा साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे होते. अध्यक्षस्थानी डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी होते. कार्यक्रमाला डॉ. ईश्वर नंदापुरे व डॉ. सुहास राजनकर उपस्थित होते.

◗ १६ जुलै

विदर्भ साहित्य संघातर्फे कथाकथन आयोजित करण्यात आले. विदर्भ साहित्य संघाच्या सांस्कृतिक समितीतर्फे घेण्यात येणाऱ्या मासिक साहित्यिक उपक्रमाअंतर्गत प्रसिद्ध कथा लेखिका सौ. उर्मिला देशपांडे यांच्या कथाकथनाचा कार्यक्रम झाला. अध्यक्षस्थानी विदर्भ साहित्य संघाच्या सरचिटणीस शोभा उबगडे, वामन तेलंग उपस्थित होते. लेखिकेची ओळख प्रकाश एदलाबादकर यांनी करून दिली.

ऑगस्ट २००४

◗ ७ ऑगस्ट

विदर्भ साहित्य संघाच्या अन्य भाषा समितीतर्फे भारतीय मल्ल्याळम लेखक श्री. पोनकुन्नम वर्की यांच्या स्मरणार्थ विदर्भ साहित्य संघाच्या सांस्कृतिक संकुलात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. ह्या कार्यक्रमात प्राचार्य श्री. व्ही. सी. कुमारन, गोपी अनयाड व श्री. जो. जो. काविल यांची पोनकुन्नम वर्की त्यांचे लेखन त्यांचे रंगभूमीविषयक तसेच अन्य संस्थात्मक व परिवर्तना संबंधातील त्यांचे कार्य व भूमिका या विषयी भाषणे झाली.

◗ १० ऑगस्ट

विदर्भ साहित्य संघाच्या ग्रंथालयातर्फे 'व्यासपीठ' उपक्रमांतर्गत महाविद्यालयीन विद्यार्थ्यासाठी लेखकांचे कथाकथन हा कार्यक्रम घेण्यात आला. अध्यक्षस्थानी डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी होते. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. योगेंद्र मेश्राम होते. डॉ. रवींद्र शोभणे, डॉ. मनोहर रोकडे, तसेच प्रा. सुनील रामटेके कार्यक्रमाला उपस्थित होते.

◗ १८ ऑगस्ट साहित्यिक, सौंदर्यशास्त्राचे मर्मज्ञ भाष्यकार व साक्षेपी समीक्षक कै. रा. भा. पाटणकर यांच्या

साहित्यिकर्तृत्वार एक परिसंवाद विदर्भ साहित्य संघाच्या सांस्कृतिक समितीतर्फे सांस्कृतिक संकुलस्थित सभागृहात आयोजित चर्चेच्या अध्यक्षस्थानी डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी होते. या परिसंवादात डॉ. विजयकुमार इंगळे, डॉ. अरुणा देशमुख व सौ. माधुरी जोशी यांनी आपले विचार मांडले. कार्यक्रमाचे संचालन प्रकाश एदलावादकर यांनी केले.

◗ २१ ऑगस्ट

विदर्भ साहित्य संघ व विजय प्रकाशन ह्यांच्या संयुक्त विद्यमाने कै. डॉ. विश्वास कानडे यांच्या 'प्रदेश साकल्याचा' या ग्रंथाचा प्रकाशन सोहळा प्रख्यात साहित्यिक, कथाकार व अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे पूर्वाध्यक्ष के. ज. पुरोहित 'शांताराम' यांच्या हस्ते सर्वोदय आश्रम सभागृहात (विनोबा विचार केंद्र) येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून प्रा. राम शेवाळकर होते. अध्यक्षस्थानी प्रा. सुरेश द्वादशीवार होते. ज्येष्ठ पत्रकार श्री. मेघनाद बोधनकर तसेच वाङ्मयाचे अभ्यासक प्रा. धनंजय जोग व डॉ. प्रकाश आवळे यांनी ग्रंथासंबंधी आपले विचार मांडले. विजय प्रकाशनाचे सचिन उपाध्याय यांनी आपले मनोगत व्यक्त केले. संचालन प्रकाश एदलावादकर यांनी केले.

सप्टेंबर २००४

◗ ७ सप्टेंबर

सुप्रसिद्ध रंगभूमीकलावंत, चित्रपट अभिनेते सचिन खेडकर यांनी विदर्भ साहित्य संघास भेट दिली. विदर्भ साहित्य संघाच्या सरचिटणीस शोभा उबगडे, कार्यालय चिटणीस नरेश सबजीवाले, परीक्षा समिती संचालक शुभदा फडणवीस, प्रकाश एदलावादकर यावेळी उपस्थित होते.

◗ १० सप्टेंबरः

विदर्भ साहित्य संघ व कौस्तुभ प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मंजुषा सावरकर यांच्या 'डांगोरा' या कथासंग्रहाचा प्रकाशन सोहळा विदर्भ साहित्य संघाच्या सांस्कृतिक संकुलात पुणे विद्यापीठाचे मराठीचे विभाग प्रमुख डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांच्या हस्ते करण्यात आला. अध्यक्षस्थानी कवयित्री सुलभा हेर्लेकर होत्या. प्रमुख वक्ते म्हणून डॉ. रवींद्र शोभणे व डॉ. विजय इगळे होते. संचालन डॉ. सुहास राजनकर यांनी केले. शैलेश देशपांडे यांनी आभार मानले.

◗ ११ सप्टेंबर

विदर्भ साहित्य संघाच्या ग्रंथालयातर्फे 'व्यासपीठ' या उपक्रमांतर्गत 'ललित निबंध लेखन' वाचनाचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाला डॉ. मनोहर रोकडे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी विदर्भ साहित्य संघाच्या सरचिटणीस शोभा उबगडे या होत्या.

◗ १६ सप्टेंबर

विदर्भ साहित्य संघाच्या 'युगवाणी' या वाङ्मयीन मुखपत्राचे आद्य संपादक व प्रसिद्ध साहित्यिक कै. वा. ना. देशपांडे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यांच्या स्फुटलेखनाचे प्रा. राम शेवाळकर संपादित तिसऱ्या खंडाचे 'त्रिविक्रम'चे प्रकाशन खामगांव येथे दै. सकाळ (पुणे) चे संपादक अनंत दीक्षित यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी प्रा. सुरेश द्वादशीवार होते. या कार्यक्रमात डॉ. गोविंद देशपांडे यांचे प्रमुख भाषण झाले. यावेळी सुभाष देशपांडे, वामन तेलंग, सरचिटणीस शोभा उबगडे, वानांचे नातू संजय देशपांडे उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन सौ. कावडकर यांनी केले.

अनुक्रमणिका

◗ २३ सप्टेंबर

विदर्भ साहित्य संघाच्यावतीने मराठी समीक्षक व लेखक डॉ. भालचंद्र फडके यांना सांस्कृतिक संकुलात आयोजित कार्यक्रमात श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी प्रा. वामन निंबाळकर, डॉ. सुलभा हेर्लेकर, डॉ. ज्योती लांजेवार व डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांची भाषणे झाली. कार्यक्रमाचे संचालन डॉ. ईश्वर नंदापुरे यांनी केले.

ऑक्टोबर २००४

◗ २ ऑक्टोबर

विदर्भ साहित्य संघ व बगे, देशपांडे, दामले कुटुंबीय यांच्या संयुक्त विद्यमाने 'वाग्देवी' व्याख्यानमाला घेण्यात आली. सुगंध सभागृह येथे हा कार्यक्रम घेण्यात आला. व्याख्यानमालेतील दोन पुष्पे प्रसिद्ध लेखिका, समीक्षक व अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. विजया राजाध्यक्ष यांनी गुंफली. हा कार्यक्रम दोन दिवस घेण्यात आला. मराठी काव्याच्या विश्वात आपल्या स्वयंभू तेजाने चमकणारे महान कवी 'गोविंदाग्रज' उत्तुंग प्रतिभेचा कवी या विषयावर त्यांनी आपले मत मांडले.

◗ ३ ऑक्टोबर

विदर्भ साहित्य संघ व बगे , देशपांडे, दामले कुटुंबीय यांच्या संयुक्त विद्यमाने 'वाग्देवी' व्याख्यानमाला घेण्यात आली. सुगंध सभागृह येथे हा कार्यक्रम घेण्यात आला. व्याख्यानमालेतील दुसरे पुष्प 'कुसुमाग्रजांची कविता एक अन्वयार्थ' या विषयावर डॉ. विजया राजाध्यक्ष यांनी आपले विचार मांडले.

◗ ३ ऑक्टोबर

विदर्भ साहित्य संघ व कौस्तुभ प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी लिखित 'माध्यम, पत्रकारिता आणि आपण' या ग्रंथाचा प्रकाशन सोहळा घेण्यात आला. अध्यक्षस्थानी नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. अरुण सातपुतळे होते. तर प्रमुख अतिथी प्राख्यात शिक्षणतज्ज्ञ व नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. मधुसूदन चान्सरकर होते. तसेच नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरु प्रा. हरिभाऊ केदार, दै. तरुण भारतचे संपादक श्री. सुधीर पाटक व प्रख्यात पत्रकार व लोकनेते श्री. रणजीत मेश्राम ह्यांनी या ग्रंथावर आपले विचार मांडले. संचालन श्रद्धा पराते यांनी केले. शैलेश देशपांडे यांनी आभार मानले.

◗ ४ ऑक्टोबर

विदर्भ साहित्य संघातर्फे ७८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष प्रख्यात कवी - समीक्षक प्रा. केशव मेश्राम यांचा सत्कार करण्यात आला. अध्यक्षस्थानी प्रा. सुरेश द्वादशीवार होते. कवी वामन निंबाळकर, डॉ. ज्योती लांजेवार, डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांची गौरवपर भाषणे झाली यावेळी सरचिटणीस शोभा उबगडे आणि कार्यकारीणीचे सदस्य उपस्थित होते. संचालन प्रकाश एदलाबादकर यांनी केले. तर आभार प्रदर्शन डॉ. ईश्वर नंदापुरे यांनी केले.

◗ ६ ऑक्टोबर

विदर्भ साहित्य संघाच्या ७७ व्या उर्दु प्रशिक्षण वर्गाचा प्रमाणपत्र वितरण समारंभ घेण्यात आला. या प्रसंगी उर्दु लेखक वकील परवेज हे प्रमुख अतिथी होते. तर यशोदा कला वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजहर हयात हे विशेष अतिथी होते. अध्यक्षस्थानी डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी होते. या कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन श्री. अशोक जोशी यानी केले.

◗ ७ ऑक्टोबर

ज्येष्ठ मराठी कवी श्री. अरुण कोल्हटकर, भारतीय इंग्रजी साहित्याचे प्रख्यात लेखक मुल्कराज आनंद, मल्ल्याळम कवयित्री पद्मभूषण वालमणि अम्मा, तसेच प्रख्यात लेखक विचारवंत किशन पटनायक व गायिका शोभा गुर्टू अशा विविध कलाक्षेत्रातील व्यक्तींचे गेल्या काही दिवसांपूर्वी निधन झाले. त्यांना विदर्भ साहित्य संघाच्या वतीने श्रद्धांजली अर्पण आली. या सभेत श्री. दिनकर बेडेकर, श्री. जगदीश शाहु, डॉ. प्रकाश आवळे, श्री. सुरेश खैरनार ह्यांची भाषणे झाली.

◗ १७ ऑक्टोबर

विदर्भ साहित्य संघाच्या व परिवर्तन साहित्य मंडळातर्फे मीनाक्षी वसंत मून यांच्या श्रद्धांजलीचा कार्यक्रम घेण्यात आला. अध्यक्षस्थानी डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी होते. तर स्नेहलता निंबाळकर, डॉ. ज्योती लांजेवार व अर्जुन राटोड ह्यांची भाषणे झाले. प्रास्तविक डॉ. ईश्वर नंदापुरे यांनी केले.

◗ २१ ऑक्टोबर

विदर्भ साहित्य संघातर्फे पहिल्या अखिल भारतीय जनसाहित्य संमेलनाचे व विदर्भ साहित्य संघाच्या दुसऱ्या जनसाहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष, दक्षिण नागपूरचे नवनिर्वाचित आमदार गोविंदराव वंजारी यांच्या श्रद्धांजली कार्यक्रम घेण्यात आला. प्रा. सुरेश द्वादशीवार ह्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेत नागपूरचे माजी महापौर श्री. अटलबहादूर सिंग, यशवंतराव चव्हाण प्रतिष्टांनचे विभागीय अध्यक्ष श्री. गिरीश गांधी व गोविंदराव वंजारी यांचे तरुण भारतातील जुने सहकारी ज्येष्ठ पत्रकार श्री. राजाभाऊ पोफळी यांनी आपल्या शोक संवेदना व्यक्त केल्या.

नोव्हेंबर २००४

◗ ७ नोव्हेंबर

कुसुमावती देशपांडे जन्मशताब्दी निमित्त विदर्भ साहित्य संघ व सर्वोदय आश्रमातर्फे चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. 'कुसुमावती देशपांडे : व्यक्ती आणि वाङ्मय' हे चर्चासत्र विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष प्रा. सुरेश द्वादशीवार यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले. या प्रसंगी मुंबई उच्चन्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी, प्रा. राम शेवाळकर, सर्वोदय आश्रमाचे गाडे गुरुजी, डॉ. प्रभा गणोरकार कुसुमावतींचे चिरंजीव डॉ. शिरीष देशपांडे, सौ. आशावती देशपांडे, श्री. उल्हास देशपांडे व क्षमा देशपांडे तसेच विदर्भ साहित्य संघाचे उपाध्यक्ष डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी होते.

न्या चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली 'आठवणी कुसुमावतीच्या हे सत्र झाले. यामध्ये प्रा. राम डोके, श्री. गो. काशीकर, श्री. शिरीष देशपांडे, सौ. आशावती देशपांडे यांनी आपल्या आठवणी सांगितल्या. डॉ. प्रभा गणोरकर यांच्या अध्यक्षतेखाली तिसरे सत्र झाले. यामध्ये निबंध वाचन झाले. डॉ. आशा सावदेकर, डॉ. जया द्वादशीवार, डॉ. किशोर सानप, डॉ. अरुणा देशमुख यांनी निबंध वाचन केले. चर्चक म्हणून डॉ. दमयंती पांढरीपांडे, डॉ. रवींद्र शोभणे, डॉ. वीणा मुळे - जोग, डॉ. राजा नाईकवाडे. डॉ. प्रज्ञा आपटे, डॉ. मालती निमदेव इत्यादींचा सहभाग होता. अध्यक्षीय समारोप डॉ. प्रभा गणोरकर यांनी केला. या कार्यक्रमाच्या सर्वप्रथम कुसुमावतीचे चिंरजीव सेवानिवृत्त वायुसेना अधिकारी उल्हास देशपांडे व डॉ. शिरीष देशपांडे, सौ. क्षमा देशपांडे व आशावती देशपांडे यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन सौ. शुभदा फडणवीस यांनी केले. आभार प्रदर्शन नरेश सबजीवाने यांनी केले.

◗ ८ नोव्हेंबर

थोर विचारवंत आचार्य विनोबा भावे लिखित 'गीताई' च्या लेखनास ७५ वर्ष तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज लिखित 'ग्रामगीता' या ग्रंथास ५० वर्ष झाल्याच्या निमित्ताने विदर्भ साहित्य संघ आणि सर्वोदय आश्रम यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. अध्यक्षस्थानी न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी होते. तर प्रमुख अतिथी म्हणून प्रा. राम शेवाळकर, सुश्री कालिंदीताई, डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी, सौ. शोभा उबगडे ह्या कार्यक्रमास उपस्थित होत्या. संचालन सौ. शुभदा फडणवीस यांनी केले. प्रास्ताविक डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी केले. कार्यक्रमाला ज्ञानेश्वर रक्षक, गाडे गुरुजी, पांढरीपांडे उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. दमयंती, पांढरीपांडे व श्री पांढरीपांडे यांना 'मिळून साऱ्याजणी' चा सहजीवन पुरस्कार मिळाल्याबद्दल त्या दांपत्याचा सत्कार करण्यात आला. दोन्ही कार्यक्रम सर्वोदय आश्रम (विनोबा विचार केंद्र) सभागृहात घेण्यात आले.

◗ ८ नोव्हेंबर

प्रख्यात कवी विष्णू नागर व संपादक मधुसूदन आनंद यांनी विदर्भ साहित्य संघाच्या सांस्कृतिक संकुलास भेट दिली. यावेळी दै. भास्करचे संपादक श्री. प्रकाश दुबे उपस्थित होते. विदर्भ साहित्य संघाचे उपाध्यक्ष डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी त्यांचे स्वागत केले. ह्या प्रसंगी युगवाणी संपादक डॉ. सुलभा हेर्लेकर, सौ. शुभदा फडणवीस, डॉ. ईश्वर नंदापुरे, अन्य भाषा साहित्य विभागाचे सदस्य श्री. हरीश अड्याळकर व राजेंद्र पटोरिया हे उपस्थित होते.

डिसेंबर - २००४

१८ डिसेंबर

विदर्भ साहित्य संघ, मंगेश प्रकाशन आणि साकेत प्रकाशन औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने विदर्भ साहित्य संघाच्या सांस्कृतिक संकुलात डॉ. रवींद्र शोभणे यांच्या 'सत्व शोधाच्या दिशा' आणि 'तद्‌भव' या कथा संग्रहाचे डॉ. आशा सावदेकर यांच्या हस्ते प्रकाशन समारंभ झाला. अध्यक्षस्थानी डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी होते. याप्रसंगी डॉ. किशोर सानप व डॉ. सुलभा हेर्लेकर यांची भाषणे झाली. संचालन श्री. प्रकाश एदलाबादकर यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री. प्रसन्न मुजुमदार यांनी केले.

२८ डिसेंबर

भारताचे माजी पंतप्रधान पी. व्ही नरसिंहराव यांना विदर्भ साहित्य संघातर्फे श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. हा कार्यक्रम सर्वोदय आश्रमाच्या भवनात झाला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विदर्भ साहित्य संघाचे आणि अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. सुरेश द्वादशीवार हे होते. प्रा. राम शेवाळकर, माजी केंद्रीय मंत्री वसंतरावजी साठे, विधान परिषदेचे विरोधी नेते श्री. नितीन गडकरी, डॉ. भा. ल. भोळे आणि माजी महापौर श्री. अटलबहादुरसिंह यांनी आपल्या शोक संवेदना व्यक्त केल्या.

❑❑❑

विदर्भ साहित्य संघ
परीक्षा समिती

प्रतिवर्षीप्रमाणे यंदाही इ. ५ वी ते साहित्य पारंगत (एम. ए. समकक्ष) पर्यंतच्या परीक्षा घेण्यात आल्या. १०, १२ वी समकक्ष साहित्य विनीत - २ आणि साहित्य परिचित - २ या परीक्षा २८ डिसेंबर रोजी घेण्यात आल्या.

विद्यालयीन परीक्षा (इ. ५ वी ते ९ वी आणि ११ वी) दि. ८ फेब्रुवारी, २००४ रोजी घेण्यात आल्या. महाविद्यालयीन परीक्षा दि. ७, ८ फेब्रुवारी, २००४ रोजी घेण्यात आल्या. विदर्भात या परीक्षांची एकूण ११० केंद्रे आहेत.

विद्यालय व महाविद्यालय या स्तरावरील विविध परीक्षात एकूण १७,००० विद्यार्थी सहभागी झाले होते.

शालेय विद्यार्थ्यांसाठी इयत्ता १० वी समकक्ष साहित्य विनीत - २ परीक्षेत विदर्भातून प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी कै. ना. कृ. दिवाणजी यांच्या नावे पुरस्कार देण्यात येतो. यंदा तो कु. मोनाली चिरकुटराव लिखार, कु. अनुपमा विजय झाडे, कु. प्रणाली चिंतामणी टोंबरे, मंगेश महादेव चांदेवार, कु. मेघा उद्धवराव फणीभरे या ५ विद्यार्थ्यांना प्राप्त झाला.

अभिनंदन

सत्र डिसेंबर २००३ व फेब्रुवारी २००४ मध्ये विदर्भ साहित्य संघातर्फे घेण्यात आलेल्या परीक्षांमध्ये प्रथम भाषा मराठी परीक्षेत विदर्भातून सर्वप्रथम आलेले विद्यार्थी -

अनु.	परीक्षेचे नाव	विद्यार्थी / विद्यार्थिनीची नावे	विद्यालय / महाविद्यालय
१	मराठी प्राथमिक	सौरभ सुरेश बोपटे	विद्यामंदिर हायस्कूल, कोराडी
२.	मराठी प्रारंभ	कु. सायली गोपीचंद शेंडे	आदर्श विद्यालय, कचारीसावंगा
	मराठी प्रारंभोत्तर	कु. अश्विनी दिलीप बोंद्रे	आदर्श विद्यालय, कचारीसावंगा
४.	पूर्वविनीत	श्री. प्रतीन पट्टलवार	सोमलवार हायस्कूल, रामदासपेठ, नागपूर
५.	साहित्य विनीत - १	कु. स्नेहल यशवंत निमसटकर	प्रतापनगर विद्यालय, नागपूर
६.	साहित्य विनीत - २	कु. मोनाली चिरकुटराव लिखार	प्रा. अरुणराव कलोडे विद्यालय, नागपूर
		कु. अनुपमा विजय झाडे	प्रा. अरुणराव कलोडे विद्यालय, नागपूर
		कु. प्रणाली चिंतामण टोंबरे	महाराष्ट्र विद्यालय, खापरखेडा
		मंगेश महादेव चांदेवार	वैनगंगा विद्यालय, पवनी
		कु. मेघा उद्धवराव फणीभरे	तारकुंडे धरमपेठ मुलांची शाळा, नागपूर
७.	साहित्य परिचित - १	अमोल भैय्याजी किन्नाके	लोकमान्य कनिष्ठ महाविद्यालय, वरोरा
८.	साहित्य परिचित - २	कु. अरुणा पांडुरंग खरावे	श्रीमती अन्नपूर्णाबाई देशमुख क. महा. नागपूर

अनुक्रमणिका

सत्र डिसेंबर २००३ व फेब्रुवारी २००४ मध्ये द्वितीय भाषा मराठी परीक्षेत विदर्भातून सर्वप्रथम आलेले विद्यार्थी -

अनु.	परीक्षेचे नाव	विद्यार्थी / विद्यार्थिनीची नावे	विद्यालय / महाविद्यालय
१.	मराठी प्रथमा	कु. विजेता जयपाल धिंगरा	जे. एन. टाटा पारसी हा., नागपूर
२.	मराठी प्रवेश	कु. श्रुती सुनील गुळतकर	भरत इंग्लिश हायस्कूल, वर्धा
३.	मराठी परिचय	कु. पारुल दुष्यंत लांजेवार	जे. एन. टाटा पारसी हाय., नागपूर
		कु. खुशवु सतीश मदान	जे. एन. टाटा पारसी हाय., नागपूर
		कु. समता दिलीप टालाटुले	जे. एन. टाटा पारसी हाय., नागपूर
		कु. श्रद्धा किशोर गळगटे	जे. एन. टाटा पारसी हाय., नागपूर
४.	मराठी बोध	कु. शाहीन अंजुम मो. शफी	ताजाबाद उर्दू हायस्कूल, नागपूर
५.	मराठी प्रबोधिनी	कु. सायली सुनील खापरे	श्री. राजेंद्र हायस्कूल, नागपूर
६.	मराठी प्रवो.	कु. दीप्ती दिनेशकुमार वासनिक	बालमंदिर सेकंडरी हाय., नागपूर

सत्र डिसेंवर २००३ व फेब्रुवारी २००४ मधील सर्वाधिक परीक्षार्थी प्रचार पुरस्कार -

अनु.		विद्यालयीन	विद्यार्थी संख्या	पुरस्कार
१.	प्रथम	सोमलवार हायस्कूल, खामला, नागपूर	५९९	३०१ /-
२.	द्वितीय	राजेंद्र हायस्कूल, नागपूर	५३९	२०१ /-
	तृतीय	लोकमान्य विद्यालय, भद्रावती	४८२	१०१ /-

अनु.		महाविद्यालयीन	विद्यार्थी संख्या	पुरस्कार
१.	प्रथम	महिला महाविद्यालय, नंदनवन, नागपूर	६१७	३०१ /-
२.	द्वितीय	कमला नेहरू महाविद्यालय, नागपूर	४३९	२१० /-
	तृतीय	लोकमान्य महाविद्यालय, वरोरा, जि. चंद्रपूर	३४६	१०१ /-

❑❑❑

विदर्भ साहित्य संघ
शाखा कारंजा शाखावृत्त

कारंजा - लाड दि. ४ डिसेंबर, २००४

विदर्भ साहित्य संघ कारंजा शाखेचे अध्यक्ष व कारंज्यातील सामाजिक नेते श्री. वामनराव माधवराव मोकासदार यांनी ४ डिसेंबर, २००४ रोजी वयाची ९० वर्षे पूर्ण करून ९१ व्या वर्षात पदार्पण केले. यानिमित्त त्यांचा अभीष्टचिंतन सोहळा घेण्यात आला. शाखेतर्फे, शाखा सदस्य श्रीकृष्ण नांदेडकर यांच्या निवासस्थानी झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कारंज्यातील ज्येष्ट गायक कलावंत श्रीमती शांताबाई दहिहांडेकर होत्या. गुरुजींचे शिष्य व कारंज्याचे नगराध्यक्ष श्री. नरेंद्र गोलेच्छा प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

शाखेतर्फे श्री. नरेंद्र गोलेच्छा यांनी शाल व श्रीफळ अर्पण करुन मोकासदार गुरुजी यांचे प्रती कृतज्ञता व्यक्त केली. श्री गुरूमंदिर संस्थानचे व्यवस्थापक वसंतराव हस्तकर व श्री बालाजी शारीरिक शिक्षण संस्थेचे प्राचार्य प्रकाश घुडे यांनी शाल व श्रीफळ देऊन गुरूजींचा सन्मान केला. श्रीगुरूमंदिराचे विश्वस्त श्रीपाद पळसोकर यांनी भेटवस्तू प्रदान केली.

शाखा सचिव प्रा. डॉ. सुभाष गढीकर यांनी या कार्यक्रमामागील भूमिका स्पष्ट केली. कारंज्याच्या शैक्षणिक, सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक क्षेत्रातील गुरूजींच्या योगदानाबद्दल प्राचार्य अशोक गढीकर, श्रीगुरूमंदिराचे विश्वस्त उमाकांत पांडे, प्राचार्य अशोक घुडे, सामाजिक कार्यकर्ते मोहनलाल गोलेच्छा, सौ. शोभाताई पळसोकर यांनी मनोगत व्यक्त केले.

गुरूजींच्या योगदानाबद्दल श्रीमती शांताबाई दहिहांडेकर यांनी गेल्या ५० वर्षातील स्मृतींना उजाळा दिला.

कार्यक्रमाचे संचालन डॉ. सुभाष गढीकर यांनी केले. शाखा कोषाध्यक्ष आप्पाजी महाजन यांनी आभार मानले. याप्रसंगी गुरूजींचे शिष्य डॉ. मुकुंदराव सोनटक्के, डॉ. कोळीकर, ॲड् साधू, इंगोले गुरूजी, मोहन देशपांडे, सौ. कुसुदिनी नांदेडकर, सौ. शोभाताई पळसोकर, सौ. साधू, सौ. कोळीकर, सौ. सुषमा गढीकर, सौ. अरूणा गढीकर, प्रमोद दहिहांडेकर, दादासाहेब कर्वे, अरविंद देशपांडे, प्रा. विजय कुळकर्णी, श्रीकृष्ण नांदेडकर आदी मान्यवर उपस्थित होते.

अकोला शाखेचे कार्यवृत्त

१) महात्मा गांधीजींच्या जीवनावरील श्री. प्यारेलाल यांनी लिहिलेल्या (Earli phase) या इंग्रजी पुस्तकाचा श्री. ब्रिजमोहन हेडा यांनी केलेला मराठी अनुवाद 'आदिपर्व खंड १ व २' त्याचा प्रकाशन समारंभ वि. सा. सं. शाखा अकोला व पराग एजन्सीज् यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला. दि. २८ ऑगस्ट २००४ रोजी वि. सा. सं. चे अध्यक्ष प्रा. सुरेश द्वादशीवार यांच्या हस्ते, माजी प्राचार्य डॅडी देशमुख यांच्या उपस्थितीत हा प्रकाशन समारंभ संपन्न झाला.

२) रविवार दि. ५ सप्टेंबर २००४ रोजी दु. ४.०० वाजता प्रा. वसुधा देव यांच्या प्रमुख उपस्थितीत स्व. उ. रा. गिरी स्मृती बालकवी संमेलन झाले. एकंदर ४० बालकवींच्या सहभागाने दरवर्षी प्रमाणे यंदाही संमेलन रंगले. कु. अदिती कुळकर्णी व पग्मिन

असनारे या मुलांच्या नेटक्या संचलनाने उपस्थितांची वाहवा मिळविली.

३) राष्ट्रीय पुरस्कार विजेता, ऑक्सर नामांकन प्राप्त 'श्वास' चित्रपटाचे दिग्दर्शक संदीप सावंत आणि त्यांच्या चमूचा सत्कार, स्वागत आणि अभिनंदन सोहळा दि. १९ सप्टे. ०४ रोजी आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी सुरूवातीला महावीजचे प्रशासकीय व्यवस्थापक श्री. अनूपकुमार यांचे 'मराठी चित्रपट वाटचाल' याविषयी अभ्यासपूर्ण भाषण झाले. त्यानंतर दिग्दर्शक संदीप सावंत यांनी उपस्थितांच्या प्रश्नांना उत्तरे दिलीत. या रंगतदार सोहळ्यास श्री. डॅडी देशमुख व डॉ. नानासाहेब चौधरी यांची प्रमुख उपस्थिती होती तर प्राचार्य, डॉ. विठ्ठल वाघ अध्यक्षस्थानी होते.

४) अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष प्रा. केशव मेश्राम यांचा नागरी सत्कार सोहळा दि. ३० ऑक्टोबर २००४ रोजी संपन्न झाला. वि. सा. सं. शाखा अकोलाच्या पुढाकाराने घेण्यात आलेल्या या कार्यक्रमात दै. लोकमतचे निवासी संपादक श्री. बाळ कुळकर्णी, नाट्यकर्मी श्री. राम जाधव व प्रा. नारायण कुळकर्णी, कवठेकर, श्री. बाजी वझे यांची समयोचित भाषणे झालीत. प्रास्ताविक श्री. गजानन नारे यांनी केले. प्रा. मेश्रामांनी सत्कारला उत्तर देताना अकोला वास्तव्याच्या आठवणींना उजाळा देताना स्वतःचा जीवन प्रवास सांगितला. अकोला जिल्ह्यातील विविध गावांतून प्रा. मेश्राम यांचे चाहते कार्यक्रमास आवर्जून उपस्थित होते.

५) ग्रंथाली आणि वि. सा. सं. अकोला शाखा यांचे संयुक्त विद्यमाने अकोल्याचे जेष्ट साहित्यिक डॉ. नानासाहेब चौधरी यांनी अनुवादित केलेल्या 'मधुशाला' ह्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन २१ डिसेंबर रोजी करण्यात आले. प्रमुख अतिथी म्हणून केशव मेश्राम, बाळ कुळकर्णी यांची उपस्थिती होती. त्यांची समयोचित भाषणे झालीत. शाखेतर्फे सर्वांना स्मृतिचिन्हे देण्यात आलीत. साहित्यप्रेमींची ह्या प्रसंगी मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

❑❑❑

विदर्भ साहित्य संघ
दरवर्षी देण्यात येणाऱ्या पुरस्कारांची यादी

- ❑ ग. त्र्यं. माडखोलकर, स्मृती पुरस्कार 'जीवनव्रती' (दर दोन वर्षांनी)
- ❑ पु. य. देशपांडे स्मृती - कादंबरी पुरस्कार
- ❑ वा. वि. मिराशी स्मृती - वैचारिक वाङ्मय पुरस्कार
- ❑ अण्णासाहे खापर्डे स्मृती आत्मचरित्र लेखन पुरस्कार
- ❑ कुसुमानिल स्मृती - समीक्षा पुरस्कार
- ❑ शरच्चंद्र मुक्तिबोध स्मृती कविता लेखन पुरस्कार
- ❑ य. खु. देशपांडे स्मृती शास्त्रीय लेखन पुरस्कार
- ❑ राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्मृती चरित्र लेखन पुरस्कार
- ❑ वा. कृ चोरघडे स्मृती - कथा लेखन पुरस्कार
- ❑ संत गाडगेबाबा स्मृती प्रवासवर्णन लेखन पुरस्कार

या व्यतिरिक्त दोन - नवोदित साहित्य लेखन पुरस्कार

- ❑ कथाकार के. ज. पुरोहित 'शांताराम' पुरस्कृत कथा पुरस्कार
- ❑ स्व. हरिकिशन अग्रवाल स्मृती पत्रकारिती पुरस्कार
- ❑ व. कृ. वऱ्हाडपांडे स्मृती विशेष पुरस्कार
- ❑ डॉ. शकुंतला खोत पुरस्कृत - नाट्य एकांकिका लेखन पुरस्कार
- ❑ पां. ब. गाडगीळ 'युगवाणी' लेखन पुरस्कार
- ❑ ल. दे. जोशी शालेय निबंध लेखन स्पर्धा पुरस्कार

विदर्भ साहित्य संघ
वर्षभरात आयोजित करण्यात येणाऱ्या व्याख्यानमाला

१) कै. ना. के. बेहरे - व्याख्यानमाला
२) कै. ग. त्र्यं. माडखोलकर - व्याख्यानमाला
३) कै. शिवदास कृष्ण बारलिंगे - व्याख्यानमाला
४) कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर - व्याख्यानमाला
५) श्री. गणेश व्याख्यानमाला व्याख्यानमाला
६) कै. ए. श्री. पटवर्धन - व्याख्यानमाला
७) कै. दत्तो वामन पोतदार - व्याख्यानमाला
८) कै. एस. एम. जोशी व्याख्यानमाला
९) कै. 'राजाबढे' स्मृती काव्यविषयक उपक्रम
१०) 'कै. वसुमती-वसंत वऱ्हाडपांडे' - व्याख्यानमाला

कै. कुसुमावती देशपांडे यांना विनम्र अभिवादन

डॉ. प्रतिभा सहस्त्रबुद्धे

सौ. सुषमा मोघे (मॉरिस कॉलेज)

श्री. अरुण उबगडे (मॉरिस कॉलेज)

सौ. रत्नप्रभा घाटे (मॉरिस कॉलेज)

सौ. प्रतिभा गोडबोले

डॉ. भारती सुदामे

अनुक्रमणिका


विदर्भ साहित्य संघ : विक्रीस तयार असलेली प्रकाशने

१)	**प्रयोगक्षम मराठी नाटके** डॉ. मु. श्री. कानडे	रु. /-
२)	**मराठी वर्णोच्चार विकास** डॉ द. ह. अग्निहोत्री	रु. ३० /-
३)	**"प्रतिभा" लघुकथा संग्रह (१९८०)**	रु. २० /-
४)	**समग्र वजावा**	रु. २० /-
५)	**ज. के. उपाध्ये यांची १८८३ - १९१३ कविता** संपादन आशा सावदेकर	रु. ३० /-
६)	**दक्षिणेतील दोन आचार्य** तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी	रु. ५ /-
७)	**युगवाणी साहित्य सूची** (संपादन केशव जोशी)	रु. ७० /-
)	**कविता विदर्भाची** डॉ. सौ. आशा सावदेकर	रु. ५० /-
	वसंत वैभव डॉ. सौ. कुंदा केळापुरे / डॉ. मदन कुळकर्णी	रु. ८० /-
)	**धन्यतेची थाप** डॉ. वि. भि. कोलते	रु. १००/-
)	**वक्ता दशसहस्त्रेषु (प्रा. राम शेवाळकर)** संपादक डॉ. वि. स. जोग	रु. १२५ /-
१२)	**अध्यक्षीय भाषणे, खंड २** संपादक डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी (विदर्भ साहित्य संघाच्या संमेलनाध्यक्षांच्या भाषणांचे संकलन)	रु. २५० /-
१३)	**अध्यक्षीय भाषणे** संपादक डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी (विदर्भ साहित्य संघाच्या विविध प्रवाही साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणांचे संकलन)	रु. २०० /-
१४)	**युगवाणी साहित्य सूची, खंड २** (संपादन केशव जोशी)	रु. ५० /-
१५)	**वैदर्भीय मराठी प्रबंध सूची (१९३९ - ९८)** संपादक डॉ. व. वि. कुलकर्णी	रु. १०० /-
१६)	**विदर्भ साहित्य संघ - अमृत महोत्सवी स्मरणिका - १९९९**	रु. २००
१७)	**सांजदिव्याचे हंबर - शिवा राऊत (निवडक कविता)** संकलन / संपादन डॉ. आशा सावदेकर, वामन तेलंग	रु. ६० /-
१८)	**युगवाणी, माडखोलकर विशेषांक १९९८**	रु. ४० /-

-:पत्रव्यवहाराचा पत्ता :-

विदर्भ साहित्य संघ

सांस्कृतिक संकुल, झाशी राणी चौक, सीताबर्डी, नागपूर ४४००१२ दूरभाष २५२३९२९


With Best Compliments from
shewalkar
Developers limited
Regd Office: LAXMI BHAWAN SQUARE, W. H. C. ROAD, NAGPUR 440010
Dail: 2531777, 2543785, 2543807 fax : +91 -712 - 2538129
E-mail : shewalkr_ngp@sancharnet.in

अनुक्रमणिका